म. ग्रं. सं. ठाणें

विषय	लेखक	सन
ालय क्रमांक	पुस्तकाचें नांव	



नवीन मराठी पुस्तकें.

करुणराघव.

हें वर लिहिलेल्या पुस्तकमालेंतील प्रथम नंबरचें आहे. हें प्रसिद्ध कवि **भवभूति** याचें सर्वोत्तम नाटक **उत्तररामचरित** याच्या आधारानें लिहिलेलें असून यांत करुणरस इतका ओतप्रोत भरला आहे कीं, तो पाषाणाला देखील द्रव आणील. कागद, छपाई व बांधणावळ सुरेख असून याचीं डेमी १२ पेजी सांच्याचीं २६० पृष्ठें आहेत. याची किंमत १ रुपया आहे.

ललितवत्सराज.

याचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत. प्रसिद्ध **श्रीहर्षदेव** यांनीं केलेल्या **रत्नावली** नाटिकेचा आधार घेऊन पूर्वार्ध तयार केलें आहे. व त्याच्याच **प्रियदर्शिका** नांवाच्या नाटिकेच्या आधारानें उत्तरार्ध तयार केलें आहे. दोहोंचाही नायक एक असल्यामुळें अशी योजना केली आहे. कागद, छपाई व बांधणावळ सुरेख आहे. याच्या प्रत्येक अर्धाचीं डेमी द्वादशपत्री १३० वर पृष्ठें झालीं आहेत. प्रत्येक अर्धाची किंमत ८ आणे आहे.

चारुदत्त आणि वसंतसेना.

हें प्रसिद्ध महाकवि **श्रीशूद्रक** राजा याच्या **मृच्छकाटिक** प्रकरणाच्या आधारें तयार केलें आहे. यांत पौराणकाळाच्या नंतरची या देशाची स्थिति व्यक्त केली आहे. कागद व छपाई वगैरे सुरेख असून याचीं डेमी द्वादशपत्री पृष्ठें सुमारें ३०० आहेत. किंमत १ रुपया.

सुशिक्षित स्त्री.

स्त्रीशिक्षण कसें पाहिजे या संबंधानें या पुस्तकांत उत्तम सूचना आहेत. सुशिक्षित कुटुंबाची स्थिति उत्तम प्रकारें दाखविली आहे. किंमत १० आणे.

सुशीलगृहस्थ नाटक.

हें गोल्डस्मिथ् नांवाच्या विख्यात इंग्लिश ग्रंथकाराच्या 'गुड्नेचर्ड मॅन्' नाटकाचें भाषांतर आहे. हें विद्वान् लोकांस फार पसंत पडलें आहे. किंमत १२ आणे.

सुंदराबाई.

ही एक चटकदार व स्त्रियांस उपदेश होण्यासारखी लहानच गोष्ट आहे. किंमत १ आणा.

चातुर्यरत्नावलि.

भाग १., भाग २, भाग ३, भाग ४.

या पुस्तकाचे लहान लहानच पण सुंदर असे चार भाग असून त्यांत मौजेच्या व बोधपर अशा ८० गोष्टी आहेत. प्रत्येक भागाची किंमत अर्धा आणा.

बृहत्कथासागर.

हा ग्रंथ ऐतिहासिक असून मनोरंजक आहे. या ग्रंथांत पौराणिककाळानंतर या भरतखंडाची राजकीय, सामाजिक, धर्म व विद्या यांच्या संबंधानें स्थिति कशी होती, तिचें उत्तम प्रकारें वर्णन केलें आहे. बहुतेक संस्कृत नाटकांस व काव्यग्रंथांस आधारभूत हाच ग्रंथ आहे. मूळसंस्कृत ग्रंथ फारच उत्तम आहे. त्याचें हें भाषांतर आहे. याचे एकंदर १० भाग होणार आहेत. प्रत्येक भागाची किंमत २८४.

वासुदेव मोरेश्वर पोतदार,

कांदेवाडी, मुंबई.

पेतद्वारांची नीतिपर व मनोरंजक पुस्तकमाला.

१५.

सुन्दरी आणि वसंतसेन.

भाग ३ रा.

[redacted]

पंडित वामनशास्त्री इसलामपूरकर

[redacted] यांनीं लिहिलें.

सन्तुष्टाऽलोलुपा दक्षा धर्मज्ञा प्रिय-सत्यवाक् ।
अप्रमत्ता शुचिःस्निग्धा पतिं त्वपतितं भजेत् ॥

याज्ञवल्क्यः

छापवून प्रसिद्ध करणार,

वासुदेव मोरेश्वर पोतदार,

कांदेवाडी, मुंबई.

सन १८८९.

किंमत १० आणे.

मुंबईत

"कर्नाटक" छापखान्यां[redacted]

[हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर[redacted]
सर्व प्रकारचे हक्क पुस्तकप्रकाशकानें आपणांकडे राखिले आ[redacted]

प्रस्तावना.

[illegible] पहिला व दुसरा हे दोन भाग अनुक्रमें [illegible]नेवारींत व मार्च महिन्यांत प्रसिद्ध करण्यांत आले. [illegible]ल्या [illegible] लोकांकडून उत्तमप्रकारचा आदर झाला; व तिसरा [illegible]यांचा [illegible] कर प्रसिद्ध करण्याविषयीं पुष्कळ चांगल्या चांगल्या [illegible]ाग लौ[illegible] या अगत्यपूर्वक सूचना आल्या. त्याप्रमाणें हा [illegible]किंचि[illegible] पूर्वीच प्रसिद्ध केला पाहिजे होता; पण मध्यंतरीं जी [illegible]ाठी **"पुस्तकमाला"** तयार करण्याचें काम हातीं [illegible]हातें, तें एका मुक्कामावर आणून ठेवण्याचा हेतु [illegible]मुळें हा भाग प्रसिद्ध करण्यास बराच विलंब लागला. [illegible]सल्य[illegible] ती **"पुस्तकमाला"** फारच मोठी आहे, तथापि, [illegible]द्यापि[illegible] **१ राघव २ ललितवत्सराज** (पूर्वार्ध) **३ ललितव-** [illegible]. **कर[illegible]ज** (उत्तरार्ध) **४ चारुदत्त** आणि **वसंतसेना ५ प्रण-** [illegible]सरा[illegible]**व ६ आर्यचाणक्य ७ विदग्धपुरूरवा** आणि **८** [illegible]ी **मिश्र** अशीं आठ पुस्तकें प्रथम प्रसिद्ध करायचीं [illegible]लोकांस विदित केलें होतें. तेव्हां अर्थात् त्यांची तयारी [illegible]जरूर पडलें. ईश्वरकृपेनें तो हेतु पूर्ण होऊन पूर्वीं [illegible]र केल्याप्रमाणें सदरहू आठ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. [illegible]ाल आतां थोडी सवड मिळाल्यावरून हा तिसरा भाग [illegible]वर त[illegible]ांस सादर केला आहे.

[illegible]ा भागाच्या शेवटीं हा कथाभाग समाप्त झाला. **गो-** [illegible]**थाच्या** शापानें **सुंदरी** आणि **हंस** यांला तीन जन्म [illegible]घे होते, ते घेतल्यामुळें त्यांचा शाप सरला; व **सुं-** [illegible]र आसक्त झालेल्या राजा **वसंतसेनालाही** त्यांच्या [illegible]र जन्म द्यावे लागून त्याणें जो **सुंदरीवर** दृढ भाव [illegible]ा होता, त्याचें रूपांतर होऊन सर्वथा मूळच्या त्याच्या

हेतूच्या विरुद्ध पण अतिशय चांगला असा त्या[illegible]च्या आ-
सक्तीचा परिणाम झाला. एकंदरींत आर्य लोकांच्य[illegible]ा प्राची-
न धर्मशास्त्राप्रमाणें कर्म व त्यापासून उत्पन्न होणारी[illegible] वासना,
यांच्या मोठ्या प्राबल्याच्या योगानें प्राणिमात्र[illegible]ला ज-
न्ममरणादिकांच्या फेऱ्यांत कसें परिभ्रमण करावें ल[illegible]गतें, ह
यांत उत्तम प्रकारें सिद्ध करून दाखविलें आहे. त्याचा
वाचकांनीं चांगला विचार करण्यासारखा आहे.

ज्या मूळ हिंदुस्थानी पुस्तकाच्या आधारें हें पुस्तक
तयार करण्याचा प्रयत्न केला आहे, त्याचा तिस[illegible]रा भाग
शृंगारानें अतिशय थबथबलेला असून तो तसाच व[illegible]वाचकांस
सादर करणें हें आह्मांस योग्य वाटलें नाहीं. त्यांतलें [illegible]संविधा-
नक पुष्कळ अंशीं स्वभावविरुद्ध व कांहींसें विसंगत अ[illegible]सल्या-
वरून आह्मीं त्याचें भाषांतर करण्याचा प्रयत्न केला [illegible]नाहीं.
साधारणतः मूळची गोष्ट ध्यानांत ठेवून हा भाग [illegible]आह्मीं
स्वतंत्र रितीनें तयार केला आहे. प्रथम आह[illegible]त्याचें
भाषांतर केलें होतें, तें प्रसिद्ध करणें फार धोक्या[illegible]आहे
असें वाटल्यावरून तें रद्द करावें लागलें. शेवटीं वाचकां[illegible]आ-
मच्या हातून ही अल्प सेवा प्रेमपुरःसर स्वीकारली, य[illegible]ह्दल
अतिशय संतोष व आभार प्रदर्शित करून त्यांची रज[illegible]तों.

पूर्वीच्या दोन भागांप्रमाणेंच आमचे मित्र. रा[illegible]रा० कर-
वासुदेव मोरेश्वर पोतदार यांणीं हा भाग प्रसिद्धीस मान-
ण्याविषयीं उत्साह धरला याबद्दल त्यांचे आभारी
ल्यावांचून राहवत नाहीं.

मुंबई, गिरगांव, पोर्चुगीजचर्च लाईन;
घर नं० २०.
ता० २२ डिसेंबर सन १८८९ इ.

वा. शा. [illegible] इ.

सुंदरी आणि वसंतसेन.

भाग तिसरा.

पहिल्या व दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें **सुंदरी**, राजा **वसंतसेन** आणि **हंस** या तिघांचाही मोठ्या चमत्कारिक रीतीनें परस्पर संबंध जडून त्याचा दुःखकारक शेवट झाला. **सुंदरी** आणि तिचा पति हंस या उभयतांला तीन जन्म घ्यावे लागतील, असा **गोरक्षनाथा**चा शाप होता. त्याप्रमाणें त्या दोघांनीं एका जन्माचा अनुभव घेतला. आतां दुसऱ्या जन्माचा स्वीकार करण्याचा समय प्राप्त झाला, त्याची कथा पुढें सविस्तर येईलच. राजा **वसंतसेन** याला शाप वगैरे कांहीं नव्हतें, व **सुंदरी** आणि हंस यांला जसे तीन जन्म घेतल्यावांचून तुह्मांला मुक्ति प्राप्त व्हायची नाहीं, असें **गोरक्षनाथा**नें सांगितलें होतें; तसें राजा **वसंतसेना**ला कोणींही सांगितलें नव्हतें. तरी त्या उभयतांबरोबर त्यालाही जन्म घ्यावे लागले.

आमच्या वाचकांला या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटेल. कारण, त्या उभयतां स्त्रीपुरुषांला जन्म घ्यावे लागले, तरी त्यांच्या बरोबर राजाला जन्म घेण्याचें कार्य कारण होतें, हें त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. पण वस्तुतः राजाला जन्म घ्यावे लागले यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. वेदांतशास्त्र अथवा तत्वविचारशास्त्र आणि धर्मशास्त्र या उभयतांचें एकमेकांत अगदीं मिश्रण झालें

आहे. विशेष विचार नकरणाऱ्या मनुष्याला कर्मकांड आणि ज्ञानकांड यांचा अतिशय विरोध असल्याचें दिसून येतें, व त्या परस्परांची संगति मुळींच व्हायची नाहीं असेंही त्याला वाटतें; पण शास्त्रीय सरणीनें विचार करणाराला त्यांत मुळींच विरोध दिसत नाहीं. परलोक, पुनर्जन्म व वासना ह्याचा त्याग केल्यावांचून मुक्तता न मिळणें, ह्या गोष्टी ज्यांच्या शास्त्रांत मुळींच नाहींत व ज्यांला त्या प्रमाणसिद्ध आहेत हें ठाऊक नाहीं, असे कित्येक परधर्मी लोक पाहिजे तें बडबडतात; किंबहुना पुनर्जन्माचें नांव काढलें ह्मणजे त्यांना हसूं येतें. परंतु ज्यानें आपल्या शास्त्रांचा विशेष अभ्यास केला असेल, व ज्याला त्याची सरणी माहीत असेल, ज्यानें विद्वान् लोकांचीं यासंबंधीं मतें ऐकिलीं असतील, व ज्याची बुद्धि सूक्ष्म असून या गोष्टीचा ज्याणें स्वतः विचार केला असेल, त्याला परलोक, पुनर्जन्म इत्यादि गोष्टी अक्षरशः खऱ्या वाटतील, इतकेंच नव्हे तर याच्या विरुद्ध कल्पना करण्यास जागाच नाहीं, अशी त्याची खात्री होईल.

वर सांगितलेल्या विषयांच्या संबंधानें आह्मांस बरेंच विस्तारपूर्वक विवेचन करावें असें वाटतें. व त्याविषयीं मोठी उमेद आहे; पण त्याचें हें स्थल नव्हे. तो विषय फार गहन असून आकलन करण्यास कठीण आहे; ह्मणून आह्मीं त्या संबंधानें येथें विशेष विवेचन करीत नाहीं. सामान्यतः प्रत्येक प्राणिमात्र इष्ट गोष्टीची प्राप्ति व अनिष्टाचा परिहार होण्याविषयींच बहुतकरून सर्व प्रयत्न करीत असतो; पण त्याप्रमाणें फारच थोड्या गोष्टी घडून येत असतात. ज्या गोष्टीची सिद्धि होण्याविषयीं अत्यंत

अपेक्षित अशीं जीं साधनें असतिल तीं सर्व संपादन करून योग्य रीतीनें प्रयत्न केला तरी त्याला सिद्धि प्राप्त होत नाहीं; पण दुसऱ्या मनुष्याला आवश्यक साधनांपैकीं एक देखील साधन अनुकूल नसलें, तथापि त्याची कार्यसिद्धि होते, असा जो एक विलक्षण चमत्कार लहान मोठ्या सर्व मनुष्यांच्या अनुभवास येतो, त्याच्या कारणांचा शोध केला पाहिजे. व जे विचारी लोक तसा शोध करतात त्यांस आपल्याला दिसतें व जें आपल्या बुद्धीला गम्य असतें त्याहून निराळ्याच प्रकारचें कांहीं कारण आहे अशी त्याच्या मनाची खात्री होते.

यावरून पाहतां तशा प्रकारचें कारण झटलें झणजे त्या त्या प्राणिमात्राचें कर्म हेंच होय. याशिवाय दुसरें कांहीं कारण असल्याचें दिसून येत नाहीं. व्यवसायाचा भेद न होतां फलाचा मात्र भेद होतो, हें त्याच्या कर्माचें सामर्थ्य आहे. अर्थात् प्रत्येक प्राणिमात्राचें जसें जसें कर्म असेल तदनुसार त्याला फल भोगावें लागतें. ह्या कर्माचा प्रभाव इतका जबरदस्त आहे कीं, मेलेल्यां मनुष्यांस देखील

---

१ या संबंधानें "समुद्रतीरे मरणं किंचित् भोगो भविष्यति" असा एक श्लोक प्रसिद्ध असून त्यावर लोक अनेक गोष्टी सांगतात. प्रथम आम्हांस त्या गोष्टी खऱ्या वाटत नव्हत्या; पण एक दोन उदाहरणें प्रत्यक्ष पाहिल्यावरून सांप्रत आमची त्या संबंधानें पूर्ण खात्री झाली आहे; पण इतकें कशास? सुमारें दहा बारा वर्षांपूर्वी या मुंबई शहरांत पारशी आणि मुसलमान यांचा मोठा तंटा झाला होता, हें वाचकांस ठाऊक असेलच. त्यावेळीं अत्यंत दरिद्री असा एक बोहोरी मरण पावला. वस्तुतः त्या बिचाऱ्या गरीब मनुष्याबद्दल घटकाभर रडणारें देखील त्याच्याजवळ कोणी नव्हतें, व त्याच्या प्रेताबरोबर चार दोन मनुष्यां-

त्याचा अनुभव घ्यावा लागतो. अंतकाळीं ज्याची जिकडे अथवा ज्या पदार्थावर आसक्ति होईल त्याला तें जन्म घ्यावें लागतें. एका कवीनें म्हटलें आहे कीं, "**अंते मतिः सा गतिः**" म्हणजे शेवटीं जशी बुद्धि होईल तशी गति प्राप्त होते. तेव्हां या न्यायानें राजा **वसंतसेन** याचें मन प्राण जाईपर्यंत **सुंदरी**वर आसक्त झालेलें होतें व तिच्या संबंधानें तो जे अनेक मनोरथ करीत होता, ते पूर्ण न होतां तसेच राहिले होते. यामुळें जिकडे ती **सुंदरी** तिकडे **वसंतसेन** अशी स्थिति झाली व त्यालाही त्यांच्याबरोबरच जन्म घ्यावें लागलें.

दुसऱ्या भागाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें **सुंदरी**, राजा **वसंतसेन** आणि तिचा पति **हंस** या तिघांचाही शेवट झाल्यावर त्यांना दुसरें जन्म प्राप्त झालें. **सुंदरी** ही **कांची** नांवाच्या नगरींत एका ब्राह्मणाच्या घरीं जन्मास आली. त्याच दिवशीं त्याच नगरींत हंस दुसऱ्या

वांचून दुसरें कोणीच गेलें नसतें; पण ती वेळ अशी कांहीं चमत्कारिक आली होती कीं, दोघां जातींचा जो मोठा कलह चालला होता, त्या निमित्तानें स्वस्थता राखण्याविषयीं प्रयत्न करणाऱ्या सरकाराला त्याच्या प्रेताची व्यवस्था ठेवावी लागली. व ज्याच्या प्रेताबरोबर चार दोन मनुष्यें देखील जाण्यास मिळावयाचीं नाहींत त्याच्या प्रेताबरोबर एवढा मोठा जमाव जमला कीं, हजारों पलटणीचे शिपाई मागें व पुढें चाललेले होते, व मोठमोठे सेनापति बंदोबस्त राखीत होते! तेव्हां हा काय चमत्कार? यावरून तो मनुष्य मेला तरी त्याच्या प्रेताला जो भोग व्हावयाचा होता तो झाला असें निःसंशय सिद्ध होतें. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें केव्हां केव्हां दृष्टीस पडतात.

एका ब्राह्मणाच्या घरीं जन्मास आला होता. व राजा वसंत-सेन हा तेथेंच एक सुखवस्तु क्षत्रिय रहात होता त्याच्या घरीं जन्मास आला. तिघांचेंही जन्म एकेच दिवशीं झालें, तरी प्रथम हंस, नंतर राजा वसंतसेन व त्याच्या नंतर सुंदरी असा त्यांच्या जन्मकालाचा क्रम होता.

हंस ज्याच्या घरीं जन्मास आला त्या ब्राह्मणाचें नांव देवशर्मा व त्याच्या स्त्रीचें नांव भद्रशीला. त्या उभय-तांला पुष्कळ मुलें बाळें झालीं होतीं; पण त्यांचा काय योग होता कोणास ठाऊक? मुल जन्मास आलें कीं दहा दिवस होण्याच्या पूर्वीच त्याला कांहीं पिशाच बाधा होऊन तें मरत असे. याप्रमाणें त्याचीं सहा मुलें गेलीं. यामुळें देवशर्मा व त्याची स्त्री हीं उभयतां फारच दुःख करीत होतीं. एके दिवशीं तीं उभयतां स्त्रीपुरुषें—जेथें पोर बाळ नाहीं अशा त्या—उदासवाण्या घरांत रहात असतां सायंकालीं एक मोठा मांत्रिक ब्राह्मण फिरत फिरत सहज त्यांच्या दरवाज्यावर आला. त्या ब्राह्मणाला काठे तरी रात्रीं मुक्कामास राहायाचें होतें. त्याणें दरवाज्यांत येऊन 'आजची रात्र मुक्कामाला जागा द्याल काय?' म्हणून देवशर्म्यास विचारलें.

देवशर्म्याचा संसार अतिशय गरीबीचा होता. तरी तो ब्राह्मण मोठा सत्वस्थ असून कोणी अतीथ अभ्यागत आला तर यथाशक्ति त्याचा परामर्श घेत असे. आपल्या हातून त्याची विशेष कांहीं बरदास्त झाली नाहीं, तरी जागा, पाणी व गोड भाषण यांच्या योगानें तरी तो आल्या-गेल्याचा सत्कार करीत असे. पांथस्थानें, जागा द्याल काय म्हणून विचारलें, तेव्हां देवशर्मा मोठ्या सत्कारा-

नें त्याला आंत घेऊन आला. व त्याला बसायला आसन व हात पाय धुवायाला पाणी वगैरे देऊन त्याणें त्याचा परामर्श घेतला.

रात्रीचा फलाहार आटपल्यावर देवशर्मा आणि तो पांथस्थ ब्राह्मण दोघेही सोप्यांत गोष्टी करीत बसले. जवळ एक दिवा मिणमिणत होता, व भद्रशीला दरवाजाच्या आड उभी राहिली होती. पोरबाळ नसलेले गृहस्थाश्रमी लोक अतीथअभ्यागतांचें विशेष अगत्य ठेवतात व बहुतकरून त्यांच्याजवळ त्याच संबंधाच्या कांहीं गोष्टी करतात, हें उघडच आहे. त्या मांत्रिकानें विचारल्यावरून देवशर्म्यानें आपली सर्व हकीकत सांगितली. व सहा मुलें होऊन मेलीं, तेव्हां आतां आपण संततीविषयीं अगदीं निराश झालों आहें असें सांगितलें.

घरांत संपत्ति असो किंवा नसो, गृहस्थाश्रम्याला मुलांबाळांची फारच आवड असते. देवशर्म्याची हकीकत ऐकून त्या मांत्रिकाला मोठी दया आली. तो उगीच नांवाचा मांत्रिक नसून खरोखरच मोठा विलक्षण सिद्धि प्राप्त झालेला मनुष्य होता. तो ह्मणाला, 'तुह्मीं जी हकीकत सांगितली तीवरून तुमच्या घरीं कांहीं तरी समंदिक उपद्रव असावा, यांत कांहीं संशय नाहीं. व त्यामुळेंच तुमचीं मुलें मरतात, असें माझ्या लक्षांत येतें. तुमची इच्छा असेल तर मी याविषयीं कांहीं उपाय करीन.'

देवशर्म्याला तो ब्राह्मण मांत्रिक आहे हें जरी खात्रीपूर्वक ठाऊक नव्हतें, तरी त्याचा वेष व पूजा अर्चा वगैरे करण्याची पद्धति पाहिल्यावरून हा मांत्रिक असावा, असें त्याचें अनुमान होतें, व शेवटीं तेंच खरें झालें, मांत्रिकानें

कांहीं उपाय करतों, असें सांगितलें तें ऐकून त्या उभयतां नवराबायकांला फारच आनंद झाला. व दोघांनींही त्याचे पाय घट्ट धरून आपल्यावर हा अनुग्रह करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली.

त्या उभयतां स्त्रीपुरुषांच्या आग्रहावरून तो मांत्रिक दुसऱ्या दिवशीं तेथेंच राहिला, व त्याणें आपल्या सांप्रदायाप्रमाणें जपजाप्य होमहवन बलिदान इत्यादि जें काय करावयाचें होतें तें सर्व करून देवशर्म्याच्या घरांतील बाधा दूर केली, व जातेवेळीं एक ताईत मंत्रून देवशर्म्याजवळ दिला आणि 'आतां तुह्मांला मूल होईल त्यावेळीं तुह्मी हा ताईत त्याच्या उजव्या पायांत बांधा;' असें सागून अतिशय आभारी झालेल्या त्या दंपत्यानें ज्याचा प्रेमपूर्वक सत्कार केला होता असा तो मांत्रिक पुढें निघून गेला.

देवशर्मा व त्याची स्त्री हीं उभयतांही मोठीं श्रद्धाळू होतीं. मांत्रिकानें बंदोबस्त केला आहे, तेव्हां आतां पूर्वीसारखें व्हायचें नाहीं व आपली संतती खचीत वाढेल अशी त्यांची पूर्ण खात्री झाली होती. कोणतीही गोष्ट दृढ विश्वासानें व निश्चयानें केली असतां ती अवश्य फलद्रूप होते. त्याप्रमाणें मांत्रिकानें जी तजवीज केली तिचा देवशर्म्याला चांगला अनुभव आला. कांहीं दिवसांनीं त्याची स्त्री भद्रशीला गरोदर झाली व तिला अनुक्रमानें महिने पूर्ण होऊन शुभ वेळेवर पुत्र झाला.

यापूर्वीं बाळंतीण झाली ह्मणजे भद्रशीला एकसारखी रडून दिवस काढीत असे. तिला तें गर्भारपण व बाळंतपण हीं दोन्ही नकोत असें झालें होतें; पण यावेळीं ती मो-

व्या आनंदांत होती. यापूर्वी जीं सहा मुलें गेलीं तीं दहा दिवस पूर्ण होण्याच्या आधींच गेलीं होतीं. तेव्हां हा तरी मुलगा वांचेल किंवा काय, याविषयीं त्यांच्या मनांत धुगधुक होती हें सांगावयास नकोच; पण ईश्वरकृपेनें दहा दिवस पूर्ण होऊन गेले, तेव्हां त्या दंपत्याला फारच आनंद झाला. **देवशर्म्या**ला हा जो सातवा पुत्र झाला हा पूर्वजन्मीं **आनंदवर्धन** असें ज्यानें नांव धारण केलें होतें, तोच **सुंदरी**चा पति हंस जन्मास आला होता. **देवशर्म्या**नें बाराव्या दिवशीं आपल्या शक्तिप्रमाणें समारंभ करून पुत्राचें नामकरण केलें. त्याच्या आप्तइष्ट मित्रांनीं सुचविल्यावरून व मंत्र सामर्थ्यानें त्या ब्राह्मणानें त्याला वांचविलें म्हणून, त्या पुत्राला **मंत्रदत्त** असें त्यानें नांव ठेविलें.

घरांत गरिबी असल्यामुळें संसार संबंधीं अनेक अडचणी होत्या, तरी **देवशर्म्या**ला त्या पुत्राच्या योगानें तो संसार स्वर्गापेक्षांही अत्यंत सुखकारक वाटूं लागला. त्या आपल्या लहानशा घरांत तीं स्त्रीपुरुषें नवानवसांनीं वांचलेल्या मुलाचें लालन पालन करीत, आनंदांत दिवस घालवीत होतीं. **मंत्रदत्त** अथवा हंस हा मुळचा जितेंद्रिय असून त्याची वृत्ति फार शांत होती, त्याप्रमाणें याही जन्मांत त्याची वृत्ति तशीच राहिली. पूर्व जन्मांत तो **आनंदवर्धन** हें नांव धारण करून एका मोठ्या राजाचा पुत्र झाला होता; म्हणून त्याच्या त्या शांत वृत्तीचा त्यावेळीं योग्य उपयोग झाला नाही. उलट तशा वृत्तीमुळें तो मोठ्या संकटांत पडला ; पण सांप्रत त्याला त्याची भीति नव्हती.

ब्राह्मणाच्या अंगीं शांति, दया, क्षमा हे गुण अवश्य अस-

लेच पाहिजेत, व ते जितक्या प्रमाणानें त्याच्यांत अधिक वसत असतील तितक्या प्रमाणानें त्याची योग्यता विशेष वाढते. **मंत्रदत्त** हा ब्राह्मणकुलांतच उत्पन्न झाला होता व शांति, क्षमा इत्यादि गुण त्याचे अगदीं स्वाभाविक होते, यामुळें तो लहानपणापासून फारच लोकप्रिय झाला.

मंत्रदत्त सुमारें आठ वर्षांचा झाला तेव्हां **देवशर्म्या**नें त्याचा उपनयनसंस्कार करून वेदाध्ययन करण्याकरतां गुरुगृहीं त्याची योजना केली. **देवशर्म्या**चें अध्ययन वगैरे बेताबाताचेंच होतें; तरी आपला मुलगा मोठा विद्वान् व्हावा अशी त्याची फार इच्छा होती. त्याच **कांचीनगरांत विद्यानिधी** नांवाचा एक महापंडित रहात असून त्याच्या येथें पुष्कळ शिष्य अध्ययन करीत होते. **देवशर्म्या**नें **मंत्रदत्ता**ला **विद्यानिधी**च्या पायांवर नेऊन घातला आणि 'कृपा करून याला दोन अक्षरें सांगावीं' म्हणून त्याची प्रार्थना केली. त्याप्रमाणें त्यानेंही तें मान्य करून त्याला आपल्याच घरीं ठेवून घेतलें. आतां या **मंत्रदत्ता**ला येथेंच गुरुगृहांत अध्ययन करीत सोडून आपण **सुंदरी** आणि **वसंतसेन** यांच्याकडे वळूं.

त्या तिघांचें एकाच दिवशीं जन्म झालें होतें, हें वर सांगितलेंच आहे. **कांचीनगरांत कांतिवर्मा** नांवाचा एक क्षत्रिय रहात होता. तो जरी मोठ्या कुलीन क्षत्रिय कुलांत उत्पन्न झाला होता, तरी स्वतः राजा नव्हता. त्याला कोणाचें विशेष साह्य नसल्यामुळें म्हणा किंवा त्याचें दैवच अनुकूल नव्हतें म्हणून म्हणा, **कांतिसेन** हा शेतीभाती करून सामान्य मनुष्याप्रमाणेंच आपला निर्वाह करीत असे; तरी त्याचें वर्तन इतर कुळंब्यासारखें नव्हतें. त्यांतल्या

त्यांत घरची विशेष टापटीप ठेवून तो मोठ्या बेतावातानें वर्तन करीत असे.

पूर्वजन्मींचा **चंद्रगुप्त** अथवा राजा **वसंतसेन** हा सुंदरीवर आसक्तहृदय झाल्यामुळें आशाबद्ध होऊन **कांतिसेना**ची स्त्री **विजया** हिच्या उदरीं जन्मास आला. त्या स्त्रीपुरुषांचें तें पहिलेंच अपत्य होतें. **कांतिसेन** भरज्वानींत असून त्याला पोरबाळ होण्याची ह्मणजे निराशा झाली होती, असें नाहीं. किंबहुना त्याच्या व त्याच्या स्त्रीच्या—आपल्याला मुलबाळ नाहीं, ही गोष्ट ध्यानांत देखील येत नव्हती. अशा स्थितींत ईश्वरकृपेनें हा त्याला पुत्र झाला, त्यामुळें उभयतांलाही फार आनंद झाला. हा पुत्र गर्भांत असतां **कांतिसेना**ची स्त्री **विजया** हिला एके दिवशीं स्वप्न पडलें होतें व स्वप्नांत आपण मोठ्या ऐश्वर्यावर चढलें आहें व आपला पुत्र राजगादीचा अनुभव करीत आहे, असें तिनें पाहिलें होतें. आपल्याला राज्य मिळेल, ही गोष्ट तिच्या ध्यानीं मनीं देखील नव्हती, यामुळें त्या स्वप्नाविषयीं तिला फारसें महत्व वाटलें नाहीं. व कदाचित् नवऱ्याला तें स्वप्न सांगितलें तर तो आपली थट्टा करील असें समजून तिनें **कांतिसेना**लाही तें स्वप्न सांगितलें नाहीं.

पुत्र होऊन दहा दिवस पूर्ण झाले. तेव्हां बाराव्या दिवशीं त्याचें नांव ठेवण्याचा सभारंभ झाला. **कांतिसेन** श्रीमान् नव्हता, तरी त्याणें या दिवशीं यथाशक्ति खर्च करून उत्सव केला होता. त्याणें ज्योतिष्याला आणून मुलाचे ग्रह पाहण्यास सांगितलें. ज्योतिष्यानें मुलाच्या जन्मकाळावरून त्याचे ग्रह वर्तवून पाहिले, त्यावरून

त्याला असें दिसून आलें कीं, हा मुलगा खरोखर राजा होणार. तेव्हां त्याणें **कांतिसेनाला** मुलाच्या जन्मकाळचा योग उत्तम असल्याचें कळवून हा मुलगा मोठा भाग्यशाली राजा होईल, असें सांगितलें, व त्याचें **प्रतापसेन** असें नांव ठेविलें.

प्रत्येक मनुष्याला त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें आशा असतातच; व केव्हां केव्हां त्या भावी उदयाच्या सूचकही होतात. **कांतिसेन** सांप्रत ज्या स्थितींत होता त्या स्थितीवरून आपल्या मुलाला राज्य प्राप्त होईल, अशी त्याला विशेष खात्री वाटत नव्हती. तरी एकंदरींत तो मुलगा मोठा भाग्यशाली होईल, असें त्याला वाटत होतें. नामकरणसंस्कार यथाविधि करून **कांतिसेनानें** पुत्राला **प्रतापसेन** हें नांव ठेविलें व त्याप्रमाणें खरोखरीच तो मुलगा पुढें मोठा प्रतापशाली निघाला.

कांची हें मोठें शहर होतें, तरी तेथें राजधानी नव्हती. अर्थात् क्षत्रियांच्या मुलांला उचित अशा युद्धविद्येचा अभ्यास करण्याची तेथें कांहीं सोय नव्हती. **कांतिसेनानें प्रतापसेन** अम्मळ प्रौढ झाल्यावर त्याचे उपनयनादि संस्कार केले. क्षत्रियाला बारावे वर्षीं उपनयन करणें विहित आहे. त्याप्रमाणें **कांतिसेनानें** त्याचें उपनयन केलें. आतां मुख्यत्वें त्याला धनुर्विद्या शिकवावी असें त्याच्या मनांत होतें, कारण तो जरी शेतकी करीत असे, तरी क्षत्रियाला उचित अशा विद्येंत तो चांगलाच प्रवीण होता. काल अनुकूल नसून हात चालत नाहीं, ह्मणून निरुपायस्तव तो शेतकी करून निर्वाह करीत असे; तथापि त्याचे क्षात्रगुण नष्ट झाले नव्हते.

आपत्कालीं कोणत्याही रीतीनें निर्वाह करणें हीं निरुपायाची गोष्ट आहे.

कांचीनगरांत युद्धविद्येची शाळा नसल्यामुळें **कांतिसेन** आपला पुत्र **प्रतापसेन** याला सामान्य इतर विद्येचेंच शिक्षण देत होता. तरी कांहीं दुसरीं क्षत्रियांचीं मुलें धनुर्विद्येचा अभ्यास करीत. त्यांतच **प्रतापसेनालाही** त्याणें अभ्यास करावयास लाविलें होतें. नैसर्गिक बुद्धीचें वैभव अभ्यासाची विशेष अपेक्षा करीत नाहीं. "पूर्वजन्मांत जी विद्या संपादन केली असेल, तीच दुसऱ्या जन्मांत प्राप्त होते," असें जें प्राचीन विद्वानांचें मत आहे, तें अक्षरशः खरें आहे. शारीरिक स्थिति उभयतांची एकसारखीच असून अभ्यासही दोघांचा सारखाच असतां, एक विद्यार्थी मोठा प्रगल्भ होतो व दुसऱ्याच्या विद्येचा प्रकाश मुळींच पडत नाहीं. किंवा एकाला जो विषय एक वेळ ऐकल्यानें अवगत होतो, तोच दुसऱ्याला शंभर वेळ ऐकला तरी कळत नाहीं. याचें दुसरें काय कारण असावें? हा सर्व पूर्वजन्माच्या संस्काराचाच प्रभाव आहें, यांत कांहीं संशय नाहीं. पूर्वजन्म याला घटकाभर आपण कालचा दिवस असें मानलें, तर जसा काल, आपण जो विषय चांगला पाठ करून ठेवला असेल, तो आज आपल्याला तत्काल उपस्थित होतो, व तो विशेष घोकावा लागत नाहीं व ज्यानें काल मुळींच तो विषय पाठ केला नसेल, त्याला आज नव्यानें पाठ करावा लागतो, व अर्थात् लौकर येत नाहीं. त्याचप्रमाणें पूर्वजन्माची स्थिति आहे. पूर्वजन्मांत जी विद्या आपण शिकून ठेविली असेल, ती जन्मांतरांत अनायासानें सहज प्राप्त होते.

राजा **वसंतसेन** हा मोठा धनुर्धर असून शस्त्रास्त्रांत प्रवीण होता. तोच जन्मांतर घेऊन **प्रतापसेन** झाला असल्यामुळें अन्य जन्मांतील त्याची विद्या त्याला सहज प्राप्त झाली. व जरी त्याला व्यवस्थित रीतीनें शिक्षण मिळालें नव्हतें तरी वेड्यावांकड्या थोड्याशा अभ्यासानेंच तो धनुर्विद्येंत विशेष प्रवीण झाला. आपल्या बरोबरीच्या व कधीं कधीं आपल्यापेक्षां मोठ्या मनुष्याशीं देखील तो कुस्ती लढत असे. असें करतां करतां बाहुयुद्धांत त्याची एवढी ख्याति झाली कीं, केवढाही मोठा बलाढ्य पैलवान आला, तरी तो त्याच्याशीं दोन हात करून सहज त्याला हरवूं लागला. असो; **प्रतापसेना**ला या युद्धविद्येच्या अभ्यासांतच सोडून आपण **सुंदरी**चें काय झालें तें पाहूं.

सुंदरी अथवा पूर्वजन्मांतली **शशिप्रभा** ही त्याच **कांची** नगरांत **यज्ञपति** नांवाच्या एका विद्वान् व कर्मठ ब्राह्मणाच्या घरीं जन्मास आली. **यज्ञपती**ला तिच्यापेक्षां वडील दोन मुलगे होते, तरी त्याची स्त्री **सुलक्षणा** हिला, आपणास एक तरी मुलगी व्हावी व आपल्या हातून तिचें कन्यादान व्हावें, अशी मोठी इच्छा होती. तो त्या साध्वीचा हेतु परमेश्वरानें पूर्ण केला. जन्मांतर धारण केलेली **सुंदरी सुलक्षणे**च्या पोटीं उत्तम वेळेवर जन्मास आली. **यज्ञपति** हा मोठा कर्मशील होता. त्याणें कन्येचे संस्कार मोठ्या आस्थेनें यथाविधि केले व तिला **शांति** असें नांव ठेविलें.

ती मुलगी जन्मतःच उत्तमलक्षणसंपन्न होती. ती हळुहळु लहानाची मोठी होऊन आपल्या आईबापांना स्वगुणांनीं फारच आनंद देऊं लागली. **यज्ञपति** स्वतः मोठा

विद्वान् असून त्याच्या घरीं विद्यार्थ्यांना पढविण्याची मोठी शाळाच होती. रात्रंदिवस शेंकडों विद्यार्थी तेथें अध्ययन करीत असत. त्यांबरोबर **यज्ञपती**चे दोघे पुत्रही अध्ययन करीत होते. **शांति** ही मोठी गोजीरवाणी असून मधुर भाषण करणारी होती. त्या गुरुकन्येवर सर्व शिष्यमंडळी जीवप्राण करीत असे. ती नेहमीं शिष्यांच्या समुदायांत खेळत असे. जरी तिला मुद्दाम म्हणून शिक्षण देण्याचा कोणीं प्रयत्न केला नव्हता, तरी तेथें रात्रंदिवस विद्येची चर्चा चालत असून ती मोठी बुद्धिमति मुलगी त्यांच्या सहवासांत होती, यामुळें तिला आपोआप शिक्षण मिळालें.

ती त्या शिष्यमंडळींत सहज खेळतां खेळतां लिहायला वाचायला शिकली. शिष्य पाठ करीत असत तो ऐकूनच तिला आपोआप पाठ येऊं लागला. स्त्रियांची बुद्धि स्वभावतःच तीव्र असते. त्यांतून **शांति** ही तर पूर्व जन्मींची मोठी विदुषी होती, जन्मांतरीय संस्काराच्या बळानें तिला आपोआप विद्या प्राप्त झाली. याप्रमाणें **हंस** राजा **वसंतसेन** व **सुंदरी** या तिघांलाही दुसरे जन्म प्राप्त होऊन तीं विद्याभ्यास करूं लागलीं. आतां आपण त्या तिघांचा परस्पर योग कसा घडून आला, व तीं तिघें-ही निरानिराळ्या रीतीनें कशीं उदयास आलीं, त्याचें वर्णन करूं.

वर सांगितलेंच आहे कीं, **प्रतापसेन** हा युद्धविद्येंत बराच प्रवीण झाला होता. ज्योतिष्यांनीं त्याच्या जन्मकाळीं जें भविष्य वर्तविलें होतें, तें खरें होण्याचा हावेळपर्यंत कांहीं संभव दिसला नव्हता, म्हणून **कांतिसेना**ची

उमेद हळुहळु कमी होऊं लागली. **प्रतापसेन** मोठा शूर होईल, असें त्याला वाटलें होतें, तथापि तो राजा होईल, या गोष्टीचा त्याला कांहीं संभव दिसत नव्हता; पण ईश्वरकृपेनें तो योग लवकरच आपोआप प्राप्त झाला.

प्रतापसेनाला शूर मनुष्याला उचित असें शिकारीचें मोठें व्यसन लागलें होतें. प्रति दिवशीं कांहीं तरी शिकार केल्यावांचून तो मुळींच अन्नग्रहण करीत नसे. ही गोष्ट त्याच्या आईबापांलाही फार आवडत असे. एके दिवशीं **प्रतापसेन** धनुष्य बाण घेऊन अरण्यांत शिकारीला गेला. त्या दिवशीं त्याला मोठीशी कांहीं शिकार मिळाली नाहीं. शेवटीं त्यानें फार प्रयत्न करून एक हरिण मारून आणला. मारलेल्या हरणाला खांद्यावर घेऊन **प्रतापसेन** घरीं आला, व स्नान संध्या वगैरे आटपून जेवायला बसला, आणि जेवतां जेवतां शिकारीची गोष्ट आपल्या आईला सांगूं लागला.

प्रतापसेनानें या दिवशीं जो हरिण मारून आणला होता, त्याला एकावर एक असे दोन बाण त्याच्या कुशींत लागले होते. **प्रतापसेन**, आज शिकारीच्या संबंधानें आपण असें केलें, तसें केलें, अशा पुष्कळ गोष्टी सांगूं लागला, आणि त्यांत त्यानें आपली थोडिशी प्रौढीही दाखविली.

ती ऐकून **प्रतापसेना**ची आई **विजया** म्हणाली, 'मुला, तूं शिकारीची पुष्कळ बढाई सांगितलीस; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तूं आज जो हरिण मारून आणलास त्याच्या अंगावर दोन निरनिराळे बाण लागले आहेत, व तेही त्याच्या कुशींत लागले आहेत. यामुळें त्या हरणाचें कातडें अगदीं निरुपयोगी झालें. खरें म्हणशील तर एकाच

वाणांत हरणाला मारणें हें खऱ्या शूराचें लक्षण आहे. हरणासारख्या सामान्य शिकारीलाच जर दोन वाण खर्च करावे लागले, तर सिंह किंवा हत्ती याच्या शिकारीला किती वाण खर्च करावे लागतील? बरें, दोन वाण मारलेस तर मारलेस; पण तेही त्याच्या कानांत मारले असतेस, तर कातडें तरी उपयोगीं पडलें असतें. असें असून तूं आपल्या शिकारीचा मोठा बडेजाव सांगतोस, त्यांत मला तर कांहीं अधिक वाटत नाहीं. नेमका अमुकच ठिकाणीं वाण मारावयाचा असा नेम धरून त्याप्रमाणें शिकार करणें हेंच खऱ्या शूराचें लक्षण आहे.'

विजया ही कशी झाली तरी क्षत्रियाची मुलगी, व क्षत्रियाचीच पत्नी होती. ती याप्रमाणें आपल्या पुत्राला बोलली, ती केवळ त्याची हेळणा करावी म्हणून बोलली असें नव्हे ; तर त्यानें या कामांत विशेष निपुण व्हावें व अद्याप कोठें कांहीं पराक्रम दाखविला नाहीं, तोंच त्याला गर्वाची बाधा होऊं नये ; म्हणून तिणें असें भाषण केलें. पण तें त्या प्रतापी **प्रतापसेना**ला सहन न होऊन तो फार लज्जित झाला. यावेळीं त्याचें जेवण अर्धेसें झालें होतें, तरी आईचें भाषण ऐकून त्याला जो आवेश आला त्यासरसें त्यानें, आपल्यापुढें वाढलेल्या जेवण्याच्या ताटाला नमस्कार करून अन्नदेवतेची त्याणें आज्ञा घेतली. तो तत्काल उठून, आईला म्हणाला, 'तुझें बोलणें खरें आहे. तूं सांगतेस तशा रीतीनें एखादी मोठी शिकार करीन तेव्हांच परत येईन.' ती त्याला जेऊन जाण्याविषयीं फार आग्रह करीत होती; पण तो म्हणाला, 'यावेळीं मला हें अन्न अगदीं विषासारखें लागणार

आहे. बोलल्याप्रमाणें शिकार करून आल्यावर मी खुशाल पोटभर जेवीन.' असें सांगून तो आपलें धनुष्य, भाता वैगेरे घेऊन तत्काल अरण्यांत निघून गेला.

याप्रमाणें पुत्र निघून गेला; पण विजयेला त्या संबंधानें फारसें वाईट वाटलें नाहीं. उघडच आहे, पुत्र असावा हें आईबापांला जसें इष्ट वाटतें, तसेंच तो आपल्या कुलाला व धर्माला योग्य अशा प्रकारच्या सद्गुणांनीं संपन्न असावा, असेंही त्यांना वाटतें. एखादी वेडी आई असती तर, आपला एकुलता एक मुलगा जेवायाला बसला असून केवळ आपल्या बोलण्यानें आवेशावर चढून अरण्यांत निघून गेला, या गोष्टींचें तिला फार वाईट वाटलें असतें; पण विजयेला, तो रागानें गेला याचा एक प्रकारें संतोषच वाटला. जातेवेळीं तिनें त्याला—'तूं असाच आपल्या कामांत मोठा आवेशी व साहसी हो! आणि देव तुझे हेतु पूर्ण करो!' असा आशीर्वाद देऊन त्याला निरोप दिला.

वर सांगितल्याप्रमाणें क्षुल्लक कारणावरून प्रतापसेन आवेशानें घरांतून बाहेर निघाला. घरांतून निघते वेळीं आईनें सांगितल्याप्रमाणें शिकार करून आणावी या पलीकडे त्याचा कांहीं विशेष हेतु नव्हता. तरी पुढें एकामागें एक प्रसंग येऊन जो केवळ शिकार आणायाला गेला होता, तो एक मोठें राज्य संपादन करून परत घरीं आला. तो प्रकार अनुक्रमानें वर्णन करूं.

प्रतापसेन धनुर्बाण घेऊन एका मोठ्या दाट झाडींत शिरला. त्याणें त्या दिवशीं एकामागून एक अशीं पुष्कळ श्वापदें मारिलीं. तरी आईनें सांगितल्याप्रमाणें

नेमका कानांत बाण मारून श्वापद मारण्याचें त्याला साधलें नाहीं, किंवा तसा योगच आला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. पुढें चांगल्या अथवा वाईट ज्या ज्या गोष्टी घडावयाच्या असतात तदनुसार पूर्वी योगायोग जमून येतात. **प्रतापसेन** खरोखरच मोठा शूर होता. त्याला कानांत बाण मारून सावज मारणें हें मुळींच अशक्य नव्हतें. तरी त्यानें पुष्कळ प्रयत्न केला असतांही त्या दिवशीं तसा योग आला नाहीं, हें त्याला पुढें जो मोठा लाभ व्हावयाचा होता, त्याचें पूर्व कारण होय, असें म्हटलें पाहिजे. नाहीं तर तशी शिकार साधली असती म्हणजे तो तेवढ्यावरच संतुष्ट होऊन परत घराकडे गेला असता.

प्रतापसेन एकामागून एक सावजें मारीत सुटला, तरी ज्या रीतीनें मारावें असें त्याच्या मनांत होतें, तशी शिकार मुळींच साधेना, हें पाहून त्याला फारच आवेश आला. व जें होणार तें होवो; त्याप्रमाणें शिकार मिळाल्यावांचून मागें म्हणून परतावयाचें नाहीं, असा त्यानें पक्का निश्चय केला. एक नाहीं साधली तर दुसरी साधेल, दुसरी नाहीं तर तिसरी साधेल, असें करतां करतां तो एकसारखा पुढें पुढें चालला होता. शेवटीं संध्याकाळ झाला, सूर्यास्त होऊन हळुहळु अंधाराचें साम्राज्य पसरत चाललें; तरी **प्रतापसेना**चा हेतु पूर्ण झाला नाहीं. लौकरच जिकडे तिकडे काळोख गच्च भरून गेला तेव्हां अर्थात् शिकार साधण्याचें काम त्याला बंद करावें लागलें.

यावेळीं **कांचीपुरा**पासून तो बराच दूर गेला होता.

त्याला लवकर परत आपल्या घराकडे जाण्याची सवड नव्हती व ती गोष्ट त्याच्या मनांतही नव्हती. रात्रीची रात्र कोठें तरी आश्रयास रहावें व सकाळीं पुन्हा आपला उद्योग सुरू करावा, असें त्याच्या मनांत होतें.

नियमित अमुक ठिकाणीं गेलें असतां आपली रात्रीं राहण्याची सोय होईल, हें त्याला मुळींच माहीत नव्हतें. शिकारीच्या नादांत श्वापदांच्या मागून धांवतां धांवतां तो कोठल्या कोठेंच जाऊन पोंचला होता. यावेळीं आपण अमुक ठिकाणीं आहें, हें त्याच्या ध्यानांत येण्यास कांहींच साधन नव्हतें. तो प्रदेश अगदीं अपरिचित असून अंधार पडल्यामुळें त्याला दिशा देखील समजत नव्हत्या. अशा स्थितींत कोठेंतरी आश्रयास रहावें, म्हणून तो तसाच पुढें चालला. सारा दिवस रानावनांत वणावणा फिरतां फिरतां तो अगदीं थकून गेला होता. अंधारांत चांचपडत चांचपडत बराच दूरवर गेला; पण एखादा गांव किंवा घर अथवा निवाऱ्याची जागा त्याला कोठें आढळली नाहीं; तरी तो एकसारखा पुढेंच चालला होता. नंतर लौकरच त्याला एक लहानशी नदी आढळली. नदींत पाणी किती आहे, व कोणत्या वाटेनें गेलें असतां आपण सुरक्षितपणें पलीकडे पोहचूं, याचा त्याला कांहीं सुमार लागेना. रात्रीच्या वेळीं उगीच पाण्यांत शिरून धोक्यांत पडण्यापेक्षां त्या नदीच्या कांठींच रात्र घालविणें चांगलें, असा विचार करून तो तेथें एका धोंड्यावर बसला.

त्या नदीच्या पलीकडे जवळच एक लहानसा गांव होता. **प्रतापसेन** लक्षपूर्वक समोर पहात बसला असतां दुरून दिव्याचा प्रकाश त्याच्या दृष्टीस पडला.

तेव्हां गांव जवळच आहे, असें समजून त्याला अंमळ हुशारी वाटली; पण नदी उतरल्यावांचून गांवांत जाण्याची सवड नसल्यामुळें तो ती उतरण्याविषयीं विचार करीत बसला. इतक्यांत एक मनुष्य हातांत उजेडी घेऊन नदीकडेच येत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. जसजसा तो नदीकडे येऊं लागला, तसतसा **प्रतापसेना**ला मोठा आनंद झाला. व आतां या मनुष्याला विचारून त्याच्या साह्यानें नदी उतरण्याचा प्रयत्न करावा, असा त्यानें निश्चय केला.

उजेडी घेऊन जो मनुष्य येत होता तो त्या जवळच्या गांवांत राहणारा एक शेतकरी होता. त्याचे बैल व दुसरींही पुष्कळांचीं गुरें संध्याकाळीं त्याच नदीवर पाणी पिण्यास आलीं होतीं. जातांना गुरांच्या गर्दीत त्याचा एक बैल कोठें चुकला; म्हणून तो शेतकरी उजेडी घेऊन बैलाचा शोध करीत करीत नदीकडे येत होता. आपला बैल नदीच्या कांठीं कोठें तरी असावा असें त्याचें अनुमान होतें. त्याप्रमाणें तो शोधीत शोधीत नदीच्या पलिकडच्या किनाऱ्यावर येऊन पोंचला, व त्या बैलाचें नांव घेऊन त्याच्या ओळखीच्या शब्दानें हांका मारुं लागला.

प्रतापसेन आलिकडच्या किनाऱ्यावर होता, व तो शेतकरी पलिकडच्या किनाऱ्यावर होता. दैवयोगानें असा कांहीं योग जमून आला कीं, त्या शेतकऱ्याचा बैल नदी उतरून अलिकडे येऊन **प्रतापसेन** ज्या ठिकाणीं बसला होता त्याच्या जवळच चरत होता. त्याचें नांव घेऊन त्याच्या धन्यानें पुष्कळ हाका मारिल्या, तरी तो बैल चरण्याच्या नादांत असल्यामुळें त्यानें कांहीं हालचाल केली

नाहीं. त्या नदीचें पात्र इतकें लहान होतें कीं, आलिकडच्या कांठीं उभें राहून पलिकडच्या मनुष्याला हाक मारली तर ती सहज ऐकूं येण्यासारखी होती; म्हणून प्रतापसेन उठून उभा राहिला आणि त्या शेतकऱ्याला म्हणाला, 'भल्या गृहस्था, मी एक वाटसरू येथें अडून पडलों आहें. ह्या नदीला कोणत्या ठिकाणीं उतार आहे, हें सांगशील तर मी ह्या संकटांतून पार पडेन.'

शेतकरी लोक बरेच अडाणी असतात. ते स्वभावानें भोळे असतात, इतकेंच नव्हे, तर फार स्नेहाळूही असतात. तरी उर्मटपणा व बेपर्वाई हे गुण त्यांच्या अंगीं साहजिक असतात. प्रतापसेनानें मोठ्या नम्रतेनें त्या शेतकऱ्याला विचारलें, तरी त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. तो आपला बैल शोधण्याच्या नादांतच होता.

प्रतापसेनाला कसेंही करून पलीकडे जायाचें होतें. म्हणून त्याणें शेतकऱ्याला पुन्हा विचारिलें, तेव्हां तो संतापून म्हणाला, 'थांबरे बाबा! तुला आपलीच काळजी आहे; पण माझा बैल कोठें नाहींसा झाला आहे, त्याची मला मोठी फिकीर लागली आहे. असा त्या तिकडून ये, म्हणजे झालें. सरळ वाट येथें मुळींच नाहीं.'

शेतकऱ्याला अस्वस्थतेचें कारण काय तें बैल चुकला हेंच होतें. प्रतापसेन जेथें उभा होता, त्याच्याजवळ जो बैल चरत होता तो कदाचित् त्याचा असेल, असें समजून तो शेतकऱ्याला पुन्हा म्हणाला, 'भल्या गृहस्था, असा रागावूं नको. मी गैरमाहीत आहें, व अशा रात्रीच्या प्रसंगीं येथें परक्या ठिकाणीं संकटांत पडलों आहें; म्हणून तुला विचारतों. माझ्यापासून तुला आणखीं

कसलाही त्रास पोहोंचावयाचा नाहीं. तूं बैलाविषयीं घाबरला असशील, तर हा पहा एक बैल येथें चरत आहे. तो कदाचित् तुझाच असेल तर पाहून घे.'

प्रतापसेनानें बैल जवळ आहे हे सांगतांच शेतकऱ्याला अंमळ बरें वाटलें. व त्यानें त्या बैलाच्या खाणाखुणा विचारल्यावरून तो आपलाच बैल आहे अशी त्याची खात्री झाली. तथापि रात्रीची वेळ असून थंडीचे दिवस असल्यामुळें पाण्यांत पाय ठेवावयास बरेंच कठीण वाटत होतें. अशा वेळीं आपण पलीकडे जावें त्यापेक्षां **प्रतापसेना**लाच बैलाला घेऊन अलीकडे येण्यास सांगितलें तर काम होईल, असें समजून शेतकरी **प्रतापसेना**ला म्हणाला, 'बाबा, मी तुला सांगतों त्या वाटेनें ये म्हणजे तेथें पाणी अधिक नाहीं, आणि येतेवेळीं माझा तेवढा बैल हळूच घेऊन येशील तर मोठे उपकार होतील.'

प्रतापसेनाला पलिकडे जायाचें होतें, इतकेंच नव्हे तर रात्रीची रात्र कोठें तरी विसाव्याची जागा मिळण्याची अपेक्षा होती. व पुढें दैवयोगानें कदाचित् जेवणाची तजवीज झाली तर ती देखील पाहिजेच होती. तेव्हां शेतकऱ्याचें सांगणें त्यानें तत्काल मान्य केलें. जरी तो बैल त्याच्या संवयीचा नव्हता, तरी त्याला वेसण घातलेली असल्यामुळें **प्रतापसेना**नें वेसण धरतांच तो त्याच्या ताब्यांत आला. नंतर त्या वेसणीच्या दोरीला आपलें अंगवस्त्र बांधून **प्रतापसेन** शेतकऱ्यानें दाखविलेल्या वाटेनें आलीकडे आला. पाणी सुमारें छाती इतकें होतें, तरी ओढ विशेष नसल्यामुळें त्याला फारसें कठीण पडलें नाहीं.

नदीच्या आलिकडे येऊन **प्रतापसेना**नें बैल शेत-

कऱ्याच्या हवालीं केला. त्यामुळें तो शेतकरी त्याचा फारसा आभारी झाला असें नाहीं, तरी **प्रतापसेना**विषयीं त्यानें थोडेंसें अगत्य दाखविलें. प्रथम जसें त्याणें त्याला तुडसपणाचें उत्तर दिलें होतें, तसें तो आतां देईनासा झाला. **प्रतापसेना**नें आपलें भिजलेलें वस्त्र पिळून अंगावरचें कोरडें वस्त्र नेसून हळू हळू शेतकऱ्याबरोबर गांवाकडे जाण्याची वाट धरिली. चालतां चालतां **प्रतापसेना**नें त्या गांवांतील जी जी माहिती त्याला विचारिली, ती ती त्यानें त्याला सरळपणें सांगितली. व त्याणें **प्रतापसेना**लाही, 'तूं कोठला, कोण,' वगैरे विचारलें. **प्रतापसेना**नें आपली विशेष कांहीं माहिती सांगितली नाहीं, तरी—आपण एक क्षत्रियाचा मुलगा असून शिकार करतां करतां अरण्यांत वाट चुकून असा इकडे आलों, इतकेंच सांगितलें.

तें ऐकून शेतकऱ्याला त्याची थोडीशी दया आली. त्याणें त्याला आपल्या घरीं नेलें, व त्याचा आपल्या शक्तीप्रमाणें उत्तमप्रकारें परामर्श घेतला. **प्रतापसेना**ची मुद्रा गोष्टी दर्शनीय होती. त्याच्या चेहऱ्यावरून हा मोठ्या योग्यतेचा मनुष्य आहे, असें सहज लक्षांत येई. शेतकऱ्यानें त्याला स्नानाला पाणी वगैरे देऊन यथास्थित भोजन घातलें, व त्याच्या श्रमाचा परिहार व्हावा म्हणून त्यानें आपल्या मुलांकरवीं घटकाभर त्याचे पाय दाबविले. एकंदरींत त्याच्या योगानें **प्रतापसेना**ला बरेंच समाधान वाटलें, व सारा दिवस श्रम झाल्यामुळें त्याला झोंप येऊं लागली.

शेतकऱ्यानें त्याला एक नवीशी घोंगडी हांतरायला दिली व तीवर **प्रतापसेन** स्वस्थ निजला. सारी रात्र त्याला चांगली गाढ झोंप लागली. पहांटेस

ह्याला एक स्वप्न पडलें. त्यांत त्याणें असें पाहिलें कीं, एका मोठ्या राजकन्येनें आपल्या गळ्यांत माळ घातली आहे, व आपण मोठ्या ऐश्वर्यावर विराजमान झालों आहें. याप्रमाणें स्वप्नाचें सुख अनुभवून लौकरच तो जागा झाला, आणि पाहतो तों ती राजकन्या वगैरे कांहीं एक नसून त्या शेतकऱ्याच्या भिकार घरांत कांबळ्यावर आपण निजलों आहें, असें त्याला दिसून आलें. स्वप्नांतल्या अनुपम सुखाचा एकाएकीं वियोग झाल्यामुळें थोडावेळ त्याला दुःख वाटलें; पण लौकरच पूर्वस्थितीवर येऊन आतां पुन्हा शिकारीला जाण्याचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले.

स्वप्नें हीं नेहमींच खोटीं होतात असें नाहीं. एकादे वेळीं तीं अशीं अनुभवास येतात कीं, जसें त्यांत दिसतें तसेंच घडून येतें. **प्रतापसेन** वयानें लहान होता. अर्थात् जगाचा अनुभव त्याला फारच कमी किंवा मुळींच नव्हता, असें म्हटलें तरी चालेल. त्याला जें हें स्वप्न पडलें होतें तें खरोखर भावी गोष्टीचें सूचक चिन्ह होतें; तरी त्याबद्दल त्याला फारसें कांहीं वाटलें नाहीं. एरवीं स्वप्नें पडतात त्याप्रमाणेंच हें एक स्वप्न आहे असेंच तो समजला. प्रातःकाल होतांच त्याणें शौच मुखमार्जनादि विधि आटपून पोषाख चढविला, व धनुर्बाण हातांत घेऊन मोठ्या कृतज्ञतेनें शेतकऱ्याचा निरोप घेतला. शेतकऱ्यानें, आतांच कशाला जातां? जेऊन खाऊन कां जाना? असें सांगितलें. तरी **प्रतापसेन**—आपल्या घरीं लोक वाट पहात असतील, तेव्हां मला लौकर गेलें पाहिजे, असें सांगून लवकर निघाला.

त्या गांवांतून निघून **प्रतापसेना**नें थेट जंगलाची वाट धरली. शेतकऱ्याकडे त्याणें **कांचीपुरी**चा मार्ग रात्रींच विचारून घेतला होता व त्या धोरणानें नदी उतरून जावें असें त्याच्या मनांत होतें; पण त्या गांवाच्या जवळच दुसरें एक मोठें जंगल असून तेथें पुष्कळ शिकार मिळते, असें समजल्यावरून **प्रतापसेन** तिकडे निघाला.

तो शिकार पहात पहात बराच दूरवर गेला. शूर पुरुषांला शिकार हें एक विलक्षण व्यसन आहे. जशी एखाद्या जुगारी मनुष्याला खाण्यापिण्याची देखील शुद्ध नसते, तशीच शिकारीच्या व्यसनांत गुंतलेल्यास कशाचीही शुद्ध नसते. **प्रतापसेन** मोठमोठ्या दऱ्याखोऱ्यांतून एकसारख्या शिकरी करीत चालला होता. त्यानें पुष्कळ श्वापदें मारलीं, तरी नेमका कानांत बाण मारून श्वापद हाविळपर्यंत त्याला मुळींच मारण्याची सवड मिळाली नाहीं. आईचें बोलणें त्याच्या मनांत पक्कें बिंबलें होतें. तिनें सांगितल्याप्रमाणें शिकार केल्याशिवाय परत जाण्याचें नाहीं, हा तर त्याचा दृढ निश्चय होता. याप्रमाणें फिरतां फिरतां ऐन दोनप्रहर झाले. ते दिवस थंडीचे होते, तरी चालण्याच्या श्रमानें व उन्हाच्या तापानें **प्रतापसेन** अंमळ थकल्यासारखा झाला. यावेळीं तो एका सुंदर सरोवराच्या कांठीं येऊन पोहोंचला होता. व तेथून जवळच **चोल**देशाची मुख्य राजधानी **चंद्रपूर** येथें जाण्याचा रस्ता त्या सरोवराच्या जवळूनच जात होता.

कांचीपूर व त्याच्या आसपासचा सर्व प्रदेश हा **चोल**देशाच्या राजाच्या ताब्यांत होता. त्याची मुख्य राजधानी **चंद्रपूर** या ठिकाणीं असून तेथें सांप्रत एक

मोठा समारंभ चालला होता. **चंद्रपूर**च्या राजाची **कुमुदिनी** नांवाची एक अत्यंत रूपवती कन्या होती. ती उपवर झाल्यामुळें क्षत्रियांला उचित असा पण लावून **चोल**राजानें मुलीच्या लग्नाची तयारी केली होती. त्याच्या घरीं दोघे मोठे मदोन्मत्त बैल होते. जो राजपुत्र त्या बैलांना वेसण घालील, त्याला आपली मुलगी द्यावयाची; असा **चोल**राजानें पण लावला होता. यामुळें हें पणाचें वर्तमान ऐकून निरानिराळ्या देशांतून पुष्कळ राजपुत्र **चंद्रपुरा**कडे निघाले होते.

प्रतापसेन ज्या सरोवराच्या कांठीं उतरला होता, तेथेंच **चोल**देशाच्या राजकन्येशीं विवाह करून घेण्याकरतां निघालेला **कर्नाटक**देशचा राजपुत्र **पतंगवर्मा** हाही उतरला होता. तें सरोवर बरेंच मोठें होतें. **पतंगवर्मा** याच्याबरोबर राजकीयथाटाप्रमाणें हत्ती, घोडे, फौजफांटा वगैरे होतें. तो आपल्या फौजेला, येथें भोजन वगैरे आटपण्यास रहावें असा हुकूम देऊन आपण त्या सरोवरांत स्नान करण्याकरतां आला. त्याचवेळीं **प्रतापसेन**ही तेथें स्नान करण्याच्या तयारींत होता. ते दोघेही जवळ जवळच होते.

पतंगवर्मा स्नानाला तेथें आला, तेव्हां त्याच्या बरोबरचे लोक **प्रतापसेना**ला पैस पैस ह्मणूं लागले. 'सरोवर विस्तीर्ण आहे, व तुमच्या यजमानाला मी जवळ असल्यानें कांहीं कमीपणा येईल, असें वाटत असल्यास पाहिजे तर त्यानें दुसरीकडे स्नान करावें. मी थकून भागून येथें येऊन बसलों आहें. मला उगीच कां उपद्रव देतां?' असें सांगून **प्रतापसेना**नें त्याचें समाधान केलें; पण त्यांना तें कसें पसंत वाटेल? कारण, राजे लोक स्वतः उन्मत्त नसतात;

पण त्यांच्याजवळचे चाकर लोक व त्यांतूनही हलक्या प्रतीचे चाकर फारच उन्मत्त असतात. प्रतापसेनानें सौम्यपणानें सांगितलें तें पतंगवर्म्याच्या चाकरांला कांहींच वाटलें नाहीं. हा कोणी तरी यःकश्चित् मनुष्य आहे, असें समजून त्यांतला एक चाकर ह्मणाला, 'भल्या गोष्टींनें पलीकडे होतोस कीं हात धरून ओढून काढलें पाहिजे तें सांग.'

प्रतापसेन गरीब झाला तरी क्षात्रियाचा बच्चा होता. यःकश्चित् चाकराचें उद्दामपणाचें बोलणें त्याला कसें सहन होईल? त्याणें—'बरें बरें, ये पाहूं पुढें, कसा ओढून टाकतोस तो टाक,' असें सांगितलें. तेव्हां पतंगवर्म्याच्या चाकरांपैकीं एकानें प्रतापसेनाचा हात धरला. प्रतापसेनाला यावेळीं इतका त्वेष आला कीं, त्याणें सपाट्यासरशी, जवळच तरवार ठेविलेली होती, ती उपसून तत्काल त्या मनुष्याचें डोकें उडविलें! हें पाहतांच मोठा कलह पेटला. आणखीं पुष्कळ लोकांनीं त्याच्यावर एकदम हल्ला केला; पण त्या शूर प्रतापसेनाला त्यांचें कांहींच भय वाटलें नाहीं. यावेळीं तरवारीचा विशेष उपयोग होणार नाहीं, असें समजून त्याणें हातांत धनुष्य घेतलें, व भराभर बाणांची वृष्टि करून आपल्यावर हल्ला करणाऱ्या लोकांपैकीं पुष्कळांना ठार केलें.

याप्रमाणें प्रतापसेनानें आपला प्रताप गाजवितांच राजपुत्र पतंगवर्मा हा स्वतः पुढें आला. प्रतापसेनाचें शौर्य पाहून तो प्रसन्न झाला होता, व विनाकारण कलह करून प्राणहानि करणें योग्य नाहीं, असें समजून त्याणें आपल्या लोकांना मागें सारलें. वस्तुतः त्यांना मोठा चेव आला होता, तरी धन्याची आज्ञा मान्य करणें भाग होतें

ह्मणून निरुपायास्तव ते लोक मागें हटले. नंतर **पतंगवर्मा प्रतापसेना**च्या जवळ जाऊन स्नेहपूर्वक त्याला ह्मणाला, 'शूर पुरुषा, स्वल्प कारणावरून उगीच एवढा कलह माजवावा हें तुझ्यासारख्याला योग्य नाहीं. यद्यपि मला तुझी विशेष माहिती नाहीं, तरी ह्या तुझ्या कृत्यावरून तूं कोणी तरी क्षत्रिय अमून मोठा पराक्रमी आहेस, यांत कांहीं संशय नाहीं. मला तुझा पराक्रम पाहून फार आनंद झाला. आतां माझ्या सेवकांपासून तुला मुळींच उपद्रव होणार नाहीं. तुझें जें काय नित्यनैमित्तिक करावयाचें असेल तें खुशाल कर.'

याप्रमाणें त्या राजपुत्रानें सांगितलेलें ऐकून **प्रतापसेना**नें आपलें धनुष्य खालीं ठेविलें, व त्यानें **पतंगवर्म्या**चे मोठे आभार मानले. तो ह्मणाला, 'मी तुझ्या इतक्या सेवकांला मारलें असून त्याच्याबद्दल कांहीं विरोध न बाळगतां उलट माझें समाधान केलेंस, हें पाहून मी अत्यंत उपकारी झालों आहें. हें तुझें सौजन्य खरोखर अवर्णनीय आहे. बरें असो, माझ्या हातून जो कांहीं अपराध झाला असेल त्याची क्षमा कर. तुझ्याप्रमाणेंच मलाही तुझी विशेष माहिती नाहीं; तरी तुझ्या ह्या मोठ्या परिवारावरून तूं कोणी तरी राजा अथवा राजपुत्र आहेस यांत कांहीं संशय नाहीं. व ह्मणूनच तुझ्याशीं मैत्री व्हावी असें मला मनापासून वाटतें. तरी तुझी व आपली योग्यता पाहून तसें सांगण्यास मला लाज वाटते. इतकेंही असून औदार्यपूर्वक तूं मित्रत्वानें माझा स्वीकार करशील तर मला फारच संतोष होईल.'

पतंगवर्मा प्रतापसेनाचा पराक्रम पाहून फार खुष

झालाच होता. तो ह्मणाला, 'ऐश्वर्य हें फार क्षुद्र आहे. तुझ्या अंगीं पराक्रमरूपी जें एक मोठें ऐश्वर्य वसत आहे, त्याच्या योगानें तूं मोठ्या सार्वभौमराजाचा देखील मित्र होण्यास योग्य आहेस, मग माझ्या सारख्याचा मित्र होण्यास योग्य आहेस यांत काय विशेष आहे? मी मोठ्या प्रेमानें तुझ्या मैत्रीचा स्वीकार करतों.' असें बोलून **पतंगवर्म्या**नें त्याचा हात धरला व दोघेही परस्परांचे मित्र झाले.

आमच्या वाचकांना या दोघां क्षत्रियपुत्रांची इतक्या लौकर कशी दोस्ती झाली, याचें मोठें आश्चर्य वाटेल, पण वस्तुतः त्यांत तसें कांहीं नाहीं. स्नेहाला बाह्य उपाधि मुळींच कारणीभूत नसतात. कांहीं अंतरंग गोष्टीवरून स्नेह होत असतो, व तो होण्याला मुळींच वेळ लागत नाहीं. परस्परांची गुणांवर दृष्टि असली ह्मणजे स्नेहाला बाधक अशाप्रकारच्या ज्या कांहीं गोष्टी असतात, त्या सर्व एकीकडे राहून फक्त गुणच दिसत असतात. असो; **प्रतापसेन** आणि **पतंगवर्मा** हे उभयतां मित्र झाले. नंतर त्यांनीं त्या सरोवरांत यथेच्छ स्नान केलें. **प्रतापसेना**जवळ भोजनाची वगैरे कांहींच सामुग्री नव्हती, व कोणी नोकरचाकरही नव्हता, तेव्हां अर्थात् **पतंगवर्म्या**बरोबरच त्याचें भोजन झालें. जेवण आटपल्यावर ह्या नवीन मित्राला बरोबर घेऊन **पतंगवर्मा** विश्रांति घेण्याकरतां तयार केलेल्या तंबूंत गेला. व तेथें दोघेही परस्परांची हकीकत एकमेकांस सांगूं लागले.

प्रतापसेनानें आपण कोण, कोठला व कशाकरतां बाहेर निघालों व येथें कसा आलों, तें सर्व सांगितलें.

नंतर **पतंगवर्म्या**नेंही आपली सर्व हकीकत सांगितली, व सांप्रत आपण **चोलदेश**च्या राजाची कन्या **कुमुदिनी** इच्या स्वयंवराला जात आहें असें त्यानें सांगितलें. **प्रतापसेन** जरी ऐन तारुण्यांत आला होता व त्यामुळें विवाह करून घेण्यास योग्य असें त्याचें वय होतें, तरी हावेळपर्यंत स्त्रियांच्या हावभावाकडे त्याचें मुळींच लक्ष गेलें नव्हतें, व त्यांच्या प्रेमकटाक्षांचा अनुभव त्याला बिलकुल झाला नव्हता. पण **पतंगवर्म्या**नें जी स्वयंवराची हकीकत सांगितली, ती ऐकून आपणही तिकडे जावें असें त्याच्या मनांत आलें.

पतंगवर्म्याच्या हावेळपर्यंतच्या वर्तनावरून तो मनाचा उदार होता, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. **प्रतापसेना**नें आपण स्वयंवराला येतों, असें अद्याप तोंडावाटे काढलें नव्हतें; तरी त्याच्या मनांत ही गोष्ट आली आहे, असें **पतंगवर्म्या**च्या लक्षांत आलें; व तो म्हणाला, 'मित्रा, आतां आकस्मिक दैवयोगानें आपणा उभयतांची मैत्री घडून आली आहे, तर त्याप्रमाणें हा संबंध चिरकाल चालावा, व तुझा आमचा वियोग होऊं नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे. तूं ज्या शिकारीच्या नादास लागला आहेस, ती म्हणजे असाध्य आहे असें नाहीं. तुझ्या पराक्रमावरून, तूं एकदां सोडून शंभरदां तशा रीतीनें शिकार मारशील, अशी माझी खात्री आहे. तूं आतां तो नाद घटकाभर एकीकडे ठेव, आणि माझ्या बरोबर **चंद्रपुरा**ला चल. आपण दोघेही तेथें समारंभ पाहूं आणि नंतर तुला आपल्या घरीं पोंचवून मी पुढें जाईन.'

हें ऐकून **प्रतापसेन** म्हणाला, 'ठीक आहे. मला

तुझें सांगणें मान्य आहे; पण एका आमिषावर झडप घालणारे दोघे वाघ कितीही मित्र असले, तरी त्यांच्यांत कलह झाल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां तुझ्याबरोबर मी स्वयंवराला आलों तर आपली उभयतांची मैत्री वाढणें हें तर एकीकडसेच राहील; पण उभयतांत वैरभाव मात्र उत्पन्न होईल. याकरतां मी तुझा निरोप घेवून येथूनच आपल्या घराकडे जाण्याचा मार्ग धरतों.'

प्रतापसेनाच्या बोलण्याचा हेतु काय तो पतंगवर्म्याच्या लक्षांत आला. जसा मी कुमुदिनीवर लक्ष ठेवून तिला वरण्याच्या उद्देशानें जात आहें, तसाच हाही आला तर तिला वरण्याचा हेतु धरूनच येईल, व त्या निमित्तानें उभयतांत कलह होईल, असा त्याच्या बोलण्याचा अभिप्राय होता. तो समजून पतंगवर्मा म्हणाला, छे छे! तूं भलतेच विचार मनांत आणलेस. अरे, ती कुमुदिनी म्हणजे माझी बायको झाली आहे असें कांहीं नाहीं. जसें जुगारांत द्रव्य लावतात तशीच तिलाही एक प्रकारच्या जुगारांतच मांडली आहे. ज्याचा जय होईल त्याला ती मिळणार. माझा जय झाला नाहीं तर ती मला मुळींच मिळावयाची नाहीं. तूं माझ्या बरोबर आलास आणि सुदैवानें तुझा जय होऊन ती तुला मिळाली, तर मी मोठा आनंदी होईन. तसें न होतां कदाचित् आह्मां उभयतांतून कोणाचा नाश झाला तरीही ती गोष्ट आपल्याला भूषणच आहे. आह्मां क्षत्रियांला स्वयंवर आणि संग्राम दोन्ही सारखेच असून मोठे आनंदकारक आहेत. तेव्हां तूं तिकडे येण्याच्या संबंधानें कोणत्याही प्रकारची शंका घेऊं नकोस.'

आपल्या मित्राचें हें भाषण ऐकून **प्रतापसेना**लाही स्फुरण आलें. **चोलदेशा**चा राजा मोठा पराक्रमी असून त्याच्या कन्येचा स्वयंवर! तेव्हां आपण अशा प्रसंगांत जावें तर आपल्याला तितकी योग्यता कोठें आहे? असें प्रथम त्याच्या मनांत आलें होतें. पण **पतंगवर्म्या**नें इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून त्याचा उत्साह वाढविल्यामुळें **प्रतापसेना**नें स्वयंवरास जाण्याचा निश्चय केला.

उघडच आहे, मनुष्याच्या अंगीं मोठमोठ्या आशा, व प्रयत्न करण्याचें सामर्थ्य असो किंवा नसो; पण त्या गोष्टी मनांत येणें हें अगदीं साहजिक आहे. तरी त्याला जे प्रसंग प्राप्त झालेले असतात, व त्याची जी स्थिति असते तीवरून केव्हां केव्हां त्याच्या आशा, व मनोरथ फारसे लांब जात नाहींत. संस्काररूपानें ते त्याच्या मनांत असतात; पण इतर अनेक कारणांनीं मनाची धांव कुंठित होते. **चोलदेशा**च्या राजासारख्या मोठ्याच्या मुलीशीं विवाह करून घ्यावा, ही गोष्ट **प्रतापसेना**च्या मनांत मुळींच नव्हती असें नाहीं, तरी आपल्या स्थितीचा विचार केला म्हणजे त्याला ती गोष्ट मनांत आणणें अयोग्य असें वाटत होतें. म्हणून तो त्याविषयीं कांहींसा उदास होता; पण त्याच्या त्या आशेच्या अंकूराला **पतंगवर्म्या**नें उत्साहोदकानें सिंचन केल्यामुळें त्याला मोठा जोर आला व **प्रतापसेना**चें शिकारीकडचें लक्ष्य सुटून तो त्या **कुमुदिनी**च्या प्राप्तीविषयीं विचार करूं लागला. असो.

राजपुत्र **पतंगवर्मा** आणि **प्रतापसेन** हे उभयतां मार्ग क्रमण करीत करीत एक दोन दिवसांत **चंद्रपूर** येथें प्राप्त झाले. **चोल**राजानें आपल्या कन्येच्या स्वयंवराची क-

डेकोट तयारी केली होती. स्वयंवराकरतां जे राजपुत्र तेथें येतील त्यांची उत्तम बरदास्त रहावी, अशा विषयीं त्याणें चांगला बंदोबस्त केला होता. निरानिराळ्या ठिकाणचे शेंकडों राजपुत्र व सरदार वगैरे तरुण तरुण क्षत्रिय वीर तेथें जमले होते. त्या कुमुदिनीचे गुण ऐकून, प्रत्येकाला ती आपली अर्धांगी व्हावी, असें वाटत होतें. व त्या संबंधानें ते पुष्कळ वेळ मनोराज्यांत विहार करीत असत. तथापि बैलांचा पण लावला होता त्याचें स्मरण झालें म्हणजे ते निराश होत. याप्रमाणें कुमुदिनीला वरण्याकरतां प्राप्त झालेल्या तरुण पुरुषांच्या मनाची स्थिति झाली होती. जो तो आपल्या ठिकाणीं बैलांना जिंकण्याविषयीं काय उपाय करावा, या फिकिरींत पडला होता.

राजपुत्र व सरदारपुत्र इत्यादि मंडळींचा जमावयाचा तितका जमाव जमला, असें पाहून चोलराजानें दिवस निश्चित करून, पण पुरा करण्याचा ठराव केला. मंडप वगैरेची पूर्ण तयारी आधींच करून ठेविलेली होती. उद्यां सकाळीं तो प्रसंग व्हायचा असा निश्चय होतांच चोलराजानें एकवेळ सर्वांला सन्मानपूर्वक आमंत्रण केलें. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळींच स्नान संध्या वगैरे नित्य नेम आटपून सर्व मंडळी त्या मंडपांत जमली. चोलराजाच्या दिवाणानें ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें सर्वांला बसविलें. सर्व मंडळी आसनावर बसल्यानंतर चोलराजांचा पुत्र अवंतिवर्मा हा उठून सर्व राजपुत्रादिकांला उद्देशून म्हणाला, 'हे शूर राजकुमारहो, हे इतर क्षत्रियांनो, मी आपणां सर्वांना विनयपूर्वक कळवितों,

तिकडे लक्ष्य देण्याचा अनुग्रह करावा. ही माझी बहीण कुमुदिनी हिचा विवाह करण्याचा निश्चय झाल्यावरून तिच्या उत्तम रूपानें व गुणांनीं आपणां सर्वांला येथें पाचारण केलें आहे. आपण तिच्याच गुणांनीं आकर्षित होऊन आलां आहां; तरी तिला त्यांत विशेष निवड करावयाची आहे, म्हणून हा बैलांचा पण लावला आहे. हे पहा दोन बैल समोर उभे केले आहेत. हे फारच मस्त आहेत. त्यांच्या नेहमींच्या ओळखीच्या रक्षकांवांचून हे दुसऱ्या कोणाला जवळ येऊं देत नाहींत. अशा या बैलांला जो कोणी राजपुत्र ताब्यांत आणील, त्याला वरावें असा माझ्या बहिणीचा निश्चय ठरला आहे. व ही गोष्ट आमचे वडील, मातुश्री, व इतर आप्त यांना पसंत झाली आहे.

हा पण ऐकूनच आपण इतक्या दूर आलां आहां, यावरून तो जिंकण्याचा आपला इरादा असलाच पाहिजे. तर आपल्या कुलाची कीर्ति वाढवीत होत्साते आपण जर हा पण जिंकाल, तर माझी भगिनी जिंकणाराची धर्मपत्नी अवश्यमेव होईल.'

असें बोलून त्याणें सर्वांला प्रोत्साहन दिलें. पणाकरतां लावलेले दोघे मोठे प्रचंड बैल मंडपाच्या शेजारींच, एक बंदोबस्ताची जागा करून तींत सोडले होते. स्वयंवराला आलेले राजपुत्र मोठें धैर्य करून त्या ठिकाणीं प्राप्त झाले. सभोंवतीं एक लहानशी भित बांधून मधल्या मोकळ्या जाग्यांत बैल सोडलेले होते. त्या बैलांला जिंकण्याविषयीं इच्छा करणारे राजपुत्र व इतर प्रेक्षक लोक यांचा

सभोंवतीं गराडा पडला होता. कित्येक राजपुत्र मोठ्या अवसानानें त्या भिंतीवर चढून उभे राहिले; पण बैलांकडे पाहतांच पुष्कळांची गाळण झाली. कित्येक तर धैर्य खचल्यामुळें निराश होऊन मागें सरले!

ते मदोन्मत्त बैल वरचेवर डुरकावण्या देत होते, व आपल्या गर्जनेनें, जणुं काय राजकन्येला वरायाला आलेल्या राजपुत्रांचें धैर्य ढासळवीत होत्साते ते त्या पटांगणांत इकडे तिकडे संचार करीत होते. बराच वेळ झाला तरी कोणी पुढें सरेना, असें पाहून कुमुदिनीच्या बंधूनें आणखीं एकवेळ सर्वांस वीरश्री चढेल अशाप्रकारचें भाषण केलें. त्यावरून कांहीं राजपुत्रांनीं दृढनिश्चय करून आंत उड्या टाकल्या, व बैलांच्या अंगावर चाल केली, पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ते बैल फारच मदोन्मत्त झालेले असून त्यांना अनोळखी मनुष्याचा वास देखील सहन होत नव्हता. जे राजपुत्र त्यांच्या अंगावर गेले, त्यांतून कोणाला त्यांणीं शिंगांनीं भोंसकलें, कोणाला पायाखालीं तुडविलें, कोणाला अलग उचलून दूर झुगारून दिलें, याप्रमाणें सर्वांची दशा झाली.

राजकन्या **कुमुदिनी** त्या जाग्याच्या जवळच एका सुंदर गच्चीवर सख्यांसहवर्तमान हा प्रसंग पहात बसली होती. तिच्या आसपास घरांतल्या व बाहेरच्या शेंकडों स्त्रिया होत्या. त्या **कुमुदिनी**चें अप्रतिम लावण्य व तिचा तो मनमोहक चेहरा पाहून कित्येक राजपुत्र आपल्या जिवावर उदार होऊन त्यांणीं त्या बैलांला वळविण्याविषयीं आपल्याकडून होती तितकी पराकाष्ठा केली; पण शेवटीं त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांतल्या एकानें

तर—काय होणार तें होवो; पण या बैलांची खोड मोड-ल्यावांचून तर राहणार नाहीं, अशी गर्जना करून वेगानें एकदम त्यांच्या अंगावर चाल केली. व प्रथमच एका बैलाच्या गळ्याला मिठी घालून गळा दाबण्याचा प्रयत्न केला; पण उपयोग काय? तो बिचारा प्राणास मात्र मुकला! त्यानें आपल्या गळ्याला मिठी घातली असें पाहून बैलानें त्याला झुगारून देण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केला; पण कांहीं केल्या तो मिठी सोडीना. तेव्हां त्या दुष्ट वृषभानें त्यास जमिनीवर लोळवून लोळवून व आपल्या भाराखालीं त्याला चिरडून तेथल्या तेथें ठार केला! त्याचें प्रेत बैलाच्या गळ्यांत बराचवेळ लोंबत होतें. व त्यामुळें बैल चवताळून सैरावैरा धांवत होता. अखेरीस तें प्रेत छिन्न विछिन्न होऊन खालीं पडलें!

हर! हर! काय चमत्कार आहे पहा! केवळ एका स्त्रीच्या लाभाकरतां बिचारा राजपुत्र अमोलिक अशा आपल्या प्राणास मुकला! विषयाचा लोभ मोठा विलक्षण आहे. त्या राजपुत्राची काय व्यवस्था झाली ती कुमुदिनी व इतर स्त्रिया गच्चीवरून पहात होत्या. तो मरण पावला हें पाहून सर्व स्त्रियांला फार वाईट वाटलें. कुमुदिनी तर फारच खिन्न झाली. व बापानें असा हा भयंकर पण केला आहे यांचें देखील तिला मोठें वाईट वाटलें. उघडच आहे, आपल्याकरतां दुसऱ्याचा जीव जावा, अथवा त्याची फजिती व्हावी, हें कोणाही चांगल्या मनुष्याला योग्य वाटणार नाहीं. मग कुमुदिनीसारख्या कोंवळ्या मनाच्या मुलीला तें कसें बरें वाटेल? यापूर्वीं ज्या कित्येक राजपुत्रांची हबेलंडी उडाली ती पाहून प्रेक्षकांला मौज वाटत होती. व

मोठा हशाही पिकत होता; पण तो राजपुत्र मेला तेव्हां मात्र सर्वांला वाईट वाटलें.

स्वतः चोलराज व त्याचा पुत्र तेथें जवळच होते. राजपुत्र मेला तरी त्याबद्दल त्यांनीं फारसा विषाद मानला नाहीं. कारण त्यांला तो प्रसंग पार पाडायाचाच होता. बापानें सूचना केल्यावरून चोलराजाचा पुत्र पुढें येऊन सर्वांला उद्देशून ह्मणाला, 'अहो! काय ही दुःखाची गोष्ट आहे. तुह्मी एवढे एवढे मोठे शूर राजपुत्र प्राप्त झालां असून अद्यापि या बैलांला जिंकण्याचें एकाचेंही सामर्थ्य होत नाहीं, ही गोष्ट मोठी दुःखाची आहे! शूरहो, नाहींना तुमच्या हातून या बैलांचा पराभव होत? आज सर्व पृथ्वी निर्वीर आणि निःक्षत्रिय झाली काय? कोणी क्षत्रियाचा बच्चा असेल तर त्याणें अद्याप पुढें सरावें!'

हें त्या राजपुत्राचें भाषण ऐकून जमलेल्या सर्व मंडळीला फार वाईट वाटलें; पण करतात काय? पूर्वी गेलेल्यांची काय दशा झाली, ती पाहून पूढें जाण्याची कोणाचीच छाती होईना. आमच्या **प्रतापसेनाला** बरोबर घेऊन येणारा राजपुत्र **पतंगवर्मा** हा उगीच तेथें मौज पहात बसला होता. तो **कुमुदिनीला** वरण्याच्या हेतूनें आला होता, तरी ते बैल अजिंक्य आहेत असें समजून त्याणें मुळींच पुढें पाऊल टाकलें नाहीं, व हें काम आपल्या हातून होणार नाहीं, असें समजून तो आपला प्रेक्षक बनला होता. **कुमुदिनी**च्या भावानें 'पृथ्वी निर्वीर झाली काय?' ह्मणून विचारिलें व 'कोणी क्षत्रियपुत्र असेल तर त्याणें पुढें यावें' असें ह्मटलें, ते शब्द **पतंगवर्म्या**च्या

काळजाला फार झोंबले. पण ती गोष्ट अशक्य असल्यामुळें तो पुढें सरला नाहीं.

प्रतापसेन त्याच्या जवळच बसला होता. त्याच्या साहसी व हूड स्वभावाप्रमाणें त्याला ते शब्द सहन न होऊन तो दांत ओंठ खाऊं लागला. त्याची मुद्रा कांहीं निराळ्याच प्रकारची झाली, असें पाहून हा आतां पुढें सरतो असें वाटल्यावरून **पतंगवर्म्या**नें त्याला दाबण्याविषयीं प्रयत्न केला. पण **प्रतापसेना**नें त्याचें ऐकलें नाहीं. तो ताडदिशीं उडी मारून पुढें जाऊन उभा राहिला आणि **चोलराज** व इतर राजपुत्र यांला उद्देशून म्हणाला, 'आतां नुक्तेच येथें जे शब्द उच्चारण्यांत आले, ते फारच वाईट असून सर्व क्षत्रियांला ते मोठे अपमानकारक आहेत. असा सर्व क्षत्रियजातीचा आपमान करणें योग्य नव्हे. असो; हा पहा मी पुढें आलों आहें. या दुष्ट बैलांला जिंकीन अथवा त्यांच्याकडून मरेन यावांचून तिसरा कोणताच मार्ग स्वीकारणार नाहीं.' असें बोलून आपला पोषाख वगैरे सांवरून दंड थोपटून **प्रतापसेन** बैलांच्या समोर गेला व त्यांला त्याणें दंड थोपटून बोलाविलें.

आधींच पशूची जात म्हणजे अत्यंत वेडी. त्यांतून यापूर्वी ज्यांणीं त्यांच्यावर चाल केली होती, त्यांणीं त्यांला पुष्कळ त्रास दिल्यामुळें ते फारच चवताळले होते. सभोंवतीं हजारों मनुष्यांचा गराडा पडलेला असल्यामुळें त्या बैलांची स्थिति फारच भयंकर झाली होती. अशा वेळीं शूर **प्रतापसेन** एकदम त्यांच्या अंगावर गेला. त्याणें प्रथमच एका बैलाच्या पोटाखालीं जाऊन चटकन त्याचा वृषण इतका घट्ट धरला कीं, तेथें फार रग लागल्यामुळें तो

विशाळ व मस्त प्राणी तत्काळ व्याकूळ झाला. जों जों तो बैल अधिक तडफड करूं लागला, तों तों प्रतापसेनानें अधिकच पिळ दिला. शेवटीं पुष्कळ हालचाल करून तो बैल उताणा पडला. त्याबरोबर प्रतापसेनानें तत्काल त्याचें नाक टोंचून वेसण घातली! याप्रमाणें एका बैलाची अवस्था झाली. तेव्हां—हा वीर खरोखरच पण पुरा करील, असें वाटून जिकडे तिकडे सर्व लोकांनीं शाबासक्यांची त्याच्यावर वृष्टि केली. प्रतापसेन गाफल न राहतां त्याणें तत्काल दुसऱ्याही बैलाचा त्याचप्रमाणें समाचार घेऊन त्याला वेसण घातली व दोन्ही बैल लीलेनें डाव्या हातांत धरून चोलराजाच्या पुढें आणून उभे केले!

मग काय विचारतां! राजाच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. कुमुदिनी व इतर स्त्रिया—ज्यांणीं हें कृत्य पाहिलें, त्या प्रतापसेनावर आशीर्वादांची लाखोली वाहूं लागल्या. जिकडे तिकडे पुष्पवृष्टि सुरू झाली. कुमुदिनीला वरण्याची बळकट आशा धरून जे राजपुत्र आले होते, त्यांतून पुष्कळांना वाईट वाटलें. कित्येक तर तेथून उठून तडक आपल्या राजधानीकडे चालते झाले. जे कोणी शांत व गुणग्राही होते त्यांणीं प्रतापसेनाची प्रशंसा केली. राजपुत्र पतंगवर्मा हा तर प्रतापसेनाचा मित्रच होता. त्याणें तें साहस आरंभलें, तेव्हां पुढें काय होईल याची त्याला मोठी काळजी लागली होती. आपण याला बरोबर मुद्दाम आणलें असून कदाचित् दुर्दैवानें याचा नाश झाला तर आपण बळेंच त्याला मृत्यूच्या तोंडांत घातलें असें होईल; ह्मणून तो फार कष्टी

झाला होता; पण **प्रतापसेन** विजयी झाला हें पाहून त्याचा हर्ष गगनांत मावेनासा झाला. तो तत्काल आपल्या आसनावरून उठून धांवत जाऊन **प्रतापसेनाला** त्याणें मिठी मारली व त्याला आपल्या आसनाजवळ परत घेऊन आला. याप्रमाणें थोडावेळ बरीच जिकडे तिकडे गडबड उडाली. नंतर सर्व मंडळी स्थिर झाल्यावर **चोल**राजानें सन्मानपूर्वक **प्रतापसेन** व त्याचा मित्र **पतंगवर्मा** या उभयतांला राजवाड्यांत नेलें.

प्रतापसेनानें बैलांला वेसणी घातल्या तेव्हांच **कुमुदिनी** त्याची स्त्री झाली होती; तथापि यथाविधि विवाहसंस्कार व्हावयाचा होता. **चोल**राजानें लौकरच मुहूर्ताचा निश्चय करून—देव, ब्राह्मण, अग्नि इत्यादिकांच्या समक्ष आपली कन्या **कुमुदिनी** त्या प्रतापशाली **प्रतापसेनाला** यथाविधि अर्पण केली. त्या निमित्तानें नगरांत कांहीं दिवस मोठा उत्सव चालला होता. **पतंगवर्मा** हा जरी मोठ्या राजाचा मुलगा होता, तरी एरव्हीं **चोल**राजाच्या येथें त्याचा एवढा मोठा सत्कार झाला नसता, निदान त्याच्याविषयीं फारसें अगत्य तरी बाळगण्यांत आलें नसतें; पण **प्रतापसेन** आपला जांवई झाला, व **पतंगवर्मा** हा त्याचा परम मित्र, ह्मणून **चोल**राजानें जांवयाप्रमाणेंच त्याचेंही विशेष गौरव केलें. **प्रतापसेन** हा एक साधारण प्रतीचा मनुष्य होता, ह्मणजे त्याच्याजवळ ऐश्वर्य होतें असें मुळींच नाहीं. त्याचा बाप शेतीभाती करून खाऊनपिऊन सुखी होता, इतकेंच कायतें. **प्रतापसेनानें** तर अद्याप द्रव्य संपादन करण्याचा मार्गच स्वीकारला नव्हता. अर्थात् त्याचा पोशाख वगैरे बेताबाता-

चाच असावयाचा. त्यांतूनही तो शिकारीला निघाला होता यामुळें जंगलांत फिरण्याजोगताच त्याचा पोषाख होता, तरी त्याचा मित्र **पतंगवर्मा** यानें त्याचें कोणत्याही प्रकारें न्यून पडूं दिलें नाहीं. त्यानें आपल्यासारखा त्याचा सर्व थाटमाट केला होता. यामुळें सासुरवाडीच्या लोकांना तो घरचा गरीब आहे हें बिलकूल समजलें नव्हतें. लग्न होण्यापूर्वी **कुमुदिनी**च्या भावानें व इतर मंडळीनीं त्याच्याविषयीं विशेष चौकशी केली होती. तरी तीवरून हा राजा नाहीं एवढेंच त्यांला समजलें होतें. शेतकी करणाऱ्या साधारण मनुष्याचा हा मुलगा आहे, हें त्यांला मुळींच माहीत नव्हतें.

लग्नसमारंभ आटपेपर्यंत **प्रतापसेन** व त्याचा मित्र **पतंगवर्मा** हे उभयतां **चोल**राजाच्या येथें मोठ्या चैनींत होते. सर्व सोहाळे व शिष्टाचार वगैरे झाले, तेव्हां **पतंगवर्म्या**नें **चोल**राजाजवळ निरोप मागितला. जांवयाला निरोप देणें म्हणजे आवडत्या कन्येचा वियोग स्वीकारणें असें होतें. व **चोल**राजाला ती एकुलती एक मुलगी असल्यामुळें **कुमुदिनी**चा वियोग त्याला असह्य वाटला होता; तरी निरुपायास्तव त्याला निरोप देणें भाग पडलें. **कुमुदिनी**च्या जाण्याची तयारी सुरू झाली. **चोल**राजानें आपल्या पराक्रमी जांवयाला पुष्कळ वस्तु आंदण दिल्या. एकंदरींत त्याचें मन संतुष्ट व्हावें म्हणून त्यांनें आपल्याकडून कांहींच कमी केलें नाहीं. तरी **प्रतापसेन** कांहींसा उदास व नाखूष दिसत होता.

वस्तुतः अत्यंत रूपवती अशी एका मोठ्या राजाची कन्या मिळाली, जिकडे तिकडे आपली वाहवा झाली,

पतंगवर्म्यासारखा मित्र मिळाला, ह्या सर्व गोष्टी प्रतापसेनाच्या आनंदाची वृद्धि करणाऱ्या व्हाव्यात व यावेळीं त्याणें खरोखर मोठ्या सुखांत असावें; पण तो उलट असंतुष्ट होता, याचें वाचकांस मोठें आश्चर्य वाटेल. तरी खरोखर विचार करून पाहतां त्याच्या मनांत ज्या गोष्टी येत होत्या, त्यांवरून तो नाखूष होता हें योग्यच आहे. कुमुदिनी ही एका मोठ्या राजाची कन्या. तिचा थाटमाट कसा आहे तो प्रत्यक्ष त्यानें पाहिलाच होता. तिच्याशीं विवाह झाला हें चांगलें झालें; पण ती आतां आपल्याबरोबर तिकडे येणार, व आपलें घर पाहिलें तर तेथें सर्व गोष्टींचा आनंदच झटला तरी चालेल! कुमुदिनी ज्या थाटामाटानें बापाच्या घरीं आहे, तो थाट तिला आपल्या घरीं कोठून प्राप्त होणार? अर्थात् तिला पुष्कळ दुःख भोगावें लागणार, यामुळें आपला या मोठ्या राजाच्या कन्येशीं विवाह झाला ही गोष्ट चांगली झाली नाहीं. लहानपणापासून ऐश्वर्यांत वाढलेल्या कुमुदिनीला आपण मोठ्या दुःखांत घालण्यास कारण झालों. ह्या गोष्टी प्रतापसेनाच्या डोळ्यांपुढें उभ्या होत्या व त्यामुळें त्याला समाधान वाटत नव्हतें.

पतंगवर्म्यानें या संबंधानें त्याचें पुष्कळ प्रकारें समाधान केलें; तरी त्याला तें योग्य वाटलें नाहीं. शेवटीं आज सायंकाळीं घरभरणी निघणार असा निश्चय झाला, तेव्हां त्याणें पतंगवर्म्याकरवीं चोलराजाला अशी विनंती केली कीं, 'यावेळीं मी आपल्या कुटुंबाला बरोबर घेऊन जात नाहीं. कांहीं दिवसांनीं आपण तिला घेऊन जाऊं. तोंपर्यंत तिला येथेंच असूं द्यावें. मला आपली जी कांहीं

व्यवस्था करावयाची आहे ती झाली ह्मणजे आपणच तिला घेऊन जाईन. तोंपर्यंत वरचेवर येथेंच तिचा आमचा भेटीचा योग येत जाईल.'

पतंगवर्म्याला हे त्याचे विचार मान्य नव्हते. तो ह्मणाला, 'श्रीमान् अथवा दरिद्री या गोष्टीचा मुळींच विचार करावयास नको. तूं आपल्या पराक्रमानें ही बायको संपादन केली आहेस. ती मोठ्या ऐश्वर्यावर वाढली हें खरें आहे, तरी तिला तुझ्या घरीं जी ओलीकोरडी भाकर मिळेल तीच खाऊन राहिलें पाहिजे. मग त्याबद्दल इतका विचार तो कसला?'

पतंगवर्मा असें सांगत होता; पण **प्रतापसेना**ला तें त्याचें सांगणें आवडलें नाहीं. व शेवटीं त्याच्या आग्रहास्तव **पतंगवर्म्या**नें त्याचा हेतु काय आहे तें **चोल**राजाच्या कानावर घातलें. तेव्हां **चोल**राजाला त्याच्या मनांत काय असावें तें समजून आलें. त्याणें **प्रतापसेन** व त्याचा मित्र **पतंगवर्मा** या उभयतांला एकांतीं नेऊन त्यांना सांगितलें कीं, 'येऊंनजाऊन तुह्मांला कायती हीच अडचण ना? माझी मुलगी भाग्यावर वाढली असली, तरी ती आपल्या पतीच्या घरीं मिळेल ती ओली कोरडी भाकर खाण्यास कधींही कंटाळणार नाहीं. तिच्या नशिबीं असेल तर राज्यही तिला प्राप्त होईल. व कदाचित् ती सार्वभौम राजाची पत्नी ह्मणवून घेणार नाहीं, हें तरी कशावरून? तें कसेंही असो; मी आपल्या मुलीच्या निर्वाहाकरतां ह्मणून **कांची**नगराच्या आसपासचा प्रदेश जहागीर करून देतों. वस्तुतः अशा प्रतापशाली जांवयाला सर्व राज्य दिलें तरी थोडेंच आहे. तथापि पुत्र त्याचा अधिकारी असल्यामुळें माझ्यानें तसें

करवत नाहीं.' असें बोलून त्याणें कांचीपरगणा प्रतापसेनाला जहागिरि करून दिला.

याप्रमाणें प्रतापसेनाच्या मनांत ज्या गोष्टीविषयीं संकोच होता, तिचा परिहार झाल्यावरून त्याला मोठा आनंद झाला, व तो आपल्या बायकोला बरोबर नेण्याविषयीं तयार झाला. यद्यपि सासऱ्यानें दिलेलें ऐश्वर्य घेऊन आपण श्रीमान् व्हावें हें त्याला लाजिरवाणें वाटलें, तथापि सांप्रत आपली स्थिति शोचनीय आहे, असें समजून त्याणें त्या गोष्टीचा आनंद मानला. तरी त्याच्या मनांत दुसरेच कांहीं विचार घोळत होते व ते लौकरच सिद्ध करीन अशी त्याची उमेद होती. असो.

चोलराजानें मोठ्या समारंभानें जांवयाची रवानगी केली. कुमुदिनी आपले आईबाप, आप्त, इष्टमित्र, इत्यादिकांचे आशीर्वाद घेऊन भर्त्याबरोबर जाण्यास निघाली. स्वतः चोलराजा नगराच्या बाहेर बराच दूरवर जावयाला पोहोंचविण्यास आला होता. नंतर तो परत निघून गेला; पण कुमुदिनीचा बंधु—बहिणीच्या लोभास्तव व नवीन दिलेल्या जहागिरीची नीट व्यवस्था लावावी याकरतां—प्रतापसेनाबरोबर थेट कांचीपुरापर्यंत गेला. याप्रमाणें ह्या आपल्या प्रतापसेनाला मार्ग क्रमण करण्यास लावून आपण त्याच्या घराकडे काय वर्तमान झालें तें पाहूं या.

प्रतापसेन ज्या दिवशीं घरांतून निघून गेला, त्या दिवशीं सायंकालपर्यंत त्याच्या आईला फारसें कांहीं वाईट वाटलें नाहीं. पोरगा रागारागानें गेला आहे सुख-

रूपपणें घरीं यावा, असें ती ह्मणत होती. **कांतिसेन** कोठें बाहेर गेला होता, तो संध्याकाळीं परत घरीं आला. **प्रतापसेन** रागावून गेल्याचें वर्तमान त्याला मुळींच माहीत नव्हतें. त्याणें मुलाची चौकशी केली, तेव्हां **विजयेनें** झालेली सर्व हकीकत त्याला सांगितली. कोठून तरी संध्याकाळीं परत घरीं येईल, अशी त्या उभयतांला आशा होती. हां हां ह्मणतां संध्याकाळ झाला, व सुमारें प्रहर रात्र होऊन गेला, तरी **प्रतापसेन** घरीं आला नाहीं. यामुळें त्या उभयतांला मोठी काळजी लागली. एकुलता एक मुलगा असल्यामुळें त्या दोघां स्त्रीपुरुषांचा काय तो त्याच्यावरच टकळा होता. इतकी रात्र झाली तरी **प्रतापसेन** आला नाहीं, तेव्हां **कांतिसेनानें विजयेला** फार दोष दिला. 'तूं त्याला वर्मीं लागण्यासारखें बोललीस, तो किती अभिमानी आहे, हें तुला माहीत असून तूं अशी गोष्ट केलीस, हें फार वाईट झालें. तो रागानें गेला आहे, तेव्हां आतां काय करील कुणास ठाऊक!' असें **कांतिसेनानें विजयेला** ह्मटलें.

जसजशी रात्र अधिक होऊं लागली तसतशी त्या स्त्री-पुरुषांची काळजी व दुःख अधिक वाढूं लागलें. त्या रात्रीं त्यांला जेवण खाण वगैरे कांहीं एक सुचलें नाहीं. कोणाचीं पावलें वाजलीं, किंवा वाऱ्यानें कांहीं हाललें, तरी आपला **प्रतापसेन** आला काय, असें त्यांला वाटे. याप्रमाणें त्या दोघांनीं सारी रात्र मोठ्या दुःखांत काढिली. नंतर पहांट होतांच **कांतिसेन** आपल्या एका दोघां मित्रांला बरोबर घेऊन अरण्यांत पुत्राचा शोध करायला निघाला. तो पुष्कळ ठिकाणीं फिरला; पण **प्रतापसेनाचें** कांहींच

वर्तमान समजलें नाहीं. मध्यें मध्यें कांहीं श्वापदें प्रतापसेनानें मारलीं होतीं, तीं त्याच्या दृष्टीस पडलीं. व त्यांच्या अंगांत रुपलेले बाण ओळखून हीं आपल्या पुत्रानेंच मारलेलीं सावजें आहेत असें तो समजला. प्रतापसेन रात्रीं ज्या नदीच्या कांठीं बसला होता, तेथपर्यंत तो गेल्याचा पत्ता लागला; पण पुढें मात्र कांहींच खाणखूण पाहण्यांत आली नाहीं. त्यानें नदीच्या पलीकडे जाऊन शोध केला; पण कांहीं वर्तमान समजलें नाहीं. तेव्हां तो निराश होऊन मागें परतला. तरी एकंदरींत जंगलांत त्याचा कांहीं घात झाला असेल, असें जें त्याला पूर्वीं वाटलें होतें ती शंका मात्र दूर झाली. प्रतिज्ञा केल्याप्रमाणें त्याच्या हातून घडून आलें नाहीं, यामुळें कदाचित् तो पुढें कोठें तरी भटकत गेला असेल; असें त्याला वाटलें.

कांतिसेन सकाळींच मुलग्याच्या शोधार्थ गेला होता, तो सुमारें प्रहर रात्रीं परत आपल्या घराकडे आला. तेंपर्यंत—जिचें वांसरूं चुकलें आहे अशी गाय, जशी कोवरी चावरी होते, त्याप्रमाणें **विजये**ची स्थिति झाली होती. मुख्यत्वें—आपण त्याला वाईट बोललें, म्हणून असा परिणाम झाला, ही गोष्ट तिच्या जिवाला विशेष लागली होती. **कांतिसेन** कांहींतरी शोध लावून येईल, अशी तिला मोठी आशा होती; पण ती अगदीं व्यर्थ गेली. **कांतिसेन** सारा दिवसभर पुत्राला शोधीत शोधीत, तो न मिळाल्यामुळें निराश होऊन जीव टाकायला कसा तरी रात्रीं घरीं येऊन पोहोंचला. त्याच्या चर्येवरूनच **प्रतापसेना**नें कांहीं वर्तमान समजलें नाहीं असें **विजये**च्या लक्षांत

आलें व याकामीं आपणच अपराधी आहें, असें समजून तिणें नवऱ्याला त्याबद्दल कांहींच विचारिलें नाहीं.

कांतिसेन घरीं आल्यावर त्याणें ती रात्र मोठ्या दुःखांत काढली. मुलगा कोठें गेला त्याचा मुळींच कांहीं पत्ता लागत नाहीं; ह्मणून तो मोठ्या काळजींत पडला होता. दुसरे दिवशीं एका ज्योतिष्याला त्याणें प्रश्न विचारला; तेव्हां ज्योतिष्यानें, 'मुलगा खुशाल असून त्याच्या भाग्याचा उदय झाला आहे,' असें सांगितलें. व लौकरच त्याची भेट होईल, अशी **कांतिसेना**ची त्याणें खात्री केल्यावरून त्याला अंमळ बरें वाटलें.

हूड स्वभावाच्या तरुण मुलांना घरचें अगत्य विशेष नसतें. जिकडे त्यांचा मोरचा फिरेल तिकडेच ते मोठ्या चैनींत असतात. त्यांना मागची आठवण फार थोडीच असते. यामुळें **कांतिसेना**ला मुलगा परत येईल किंवा नाहीं याची मोठी काळजी होती. ज्योतिष्यानें खात्रीपूर्वक येईल, असें सांगितल्यावरून तो आनंदित होऊन घरीं गेला व तें वर्तमान त्याणें **विजये**ला सांगितलें. याप्रमाणें **कांतिसेन** व **विजया** हीं उभयतां रात्रंदिवस **प्रतापसेना**विषयीं काळजी करीत होतीं. इतक्यांत ईश्वरकृपेनें त्यांचे मनोरथ पूर्ण झाले.

प्रतापसेन मोठ्या थाटामाटानें **कुमुदिनी**सहवर्तमान **कांचीपुरा**च्या जवळ जवळ येऊन पोहोंचला. **पतंगवर्मा** त्याचा निरोप घेऊन परभारें आपल्या राजधानीकडे जाण्यास इच्छित होता; पण **प्रतापसेना**नें आपल्या घरापर्यंत येण्याविषयीं विशेष आग्रह केल्यावरून तो त्याच्या बरोबर आला. ही सर्व मंडळी **कांचीपुरां**त

येऊन पोहोंचली, त्यावेळीं सायंकाळ झाला होता. यावेळीं प्रतापसेनाबरोबर हत्ती, घोडे वगैरे इतमाम असून तो आपल्या मित्रासह एका हत्तीवर सोन्याच्या अंबारींत बसला होता. तरी घराच्या जवळ पोहोंचतांच तशा डौलानें घरांत जावें हें त्याला योग्य वाटलें नाहीं. तो तत्काल हत्तीवरून खालीं उतरला व पायींच चालूं लागला. त्याच्याबरोबर त्याचा मित्र **पतंगवर्मा**, व **कुमुदिनी**चा बंधु हेही पायींच चालूं लागले.

प्रतापसेनाला यावेळीं खरोखर झटला तर गर्व व्हावा; पण तसें कांहीं नसून त्याची वृत्ति तो घरांतून गेला त्यावेळीं जशी होती तशीच यावेळींही होती. त्यानें बापाला पूर्वी सांगून वगैरे कांहीं पाठविलें नव्हतें. अवशीची सुमारें चार घटका रात्र झाली आहे, अशा वेळीं तो एकाएकीं त्या आपल्या लहानशा घरांत शिरला. त्याचें घर लहानच पण टुमदार होतें. पुढें मोठें आंगण असून कांहीं फुलझाडें वगैरे लावलेलीं होतीं व सभोंवतीं एक लहानसें कुसूं घातलेलें असून समोर दरवाजा लावला होता. **प्रतापसेनानें** बरोबरच्या सर्व मंडळीला दरवाज्याच्या बाहेरच उभें राहण्यास सांगितलें व तो एकटा **पतंगवर्म्या**ला बरोबर घेऊन आंत गेला.

प्रतापसेनानें घरीं प्रथम खबर दिली नव्हती, तरी त्याच्याबरोबर जो लवाजमा होता त्याच्या योगानें सर्व शहरभर हालचाल सुरू झाली होती. हत्तीच्या घाटांचा आवाज, घोड्यांच्या टापांचा शब्द व गाड्या वगैरे यांच्या चाकांचा ध्वनि यांचें मिश्रीकरण होऊन बराच गलबला झाला. त्यामुळें हें काय आहे, म्हणून चकित झालेल्या लो-

कांच्या झुंडी त्याला पाहण्यास जमल्या. तो घांटांचा वगैरे आवाज आपल्या दरवाज्यापर्यंत येऊन एकाएकीं बंद झाला, हें पाहून **कांतिसेन** व **विजया** हीं दोघेंही पाहण्यास बाहेर येत होतीं. इतक्यांत त्यांचा प्रियपुत्र **प्रतापसेन** विजयी होत्साता त्यांच्या समोर एकाएकीं आला, व त्याणें त्या उभयतांच्या पायांवर मस्तक ठेविलें. दरवाज्यांत हत्ती, घोडे वगैरेंची गर्दी झालेली अमून एकाएकीं **प्रतापसे**नानें त्या उभयतांचे पाय धरले, तेव्हां त्यांना मोठा अचंबा वाटला. रात्रीची वेळ असल्यामुळें अंधक अंधक दिसत होतें. जरी दरवाज्याबाहेरच्या मशालींचा अंगणांत उजेड पडला होता तरी **प्रतापसेना**चा पोशाख वगैरे एखाद्या राजपुत्रासारखा अमोलिक असल्यावरून **कांतिसेन** व **विजया** दोघेंही क्षणभर अगदीं तटस्थ झालीं. **प्रतापसेन** हात जोडून त्यांच्या पुढें उभा राहिला होता. **प्रतापसेनानें** यावेळीं एक मेलेला हरिण स्वतः आपण उचलून आणलेला अमून त्याणें तो आपल्या आईच्या पुढें ठेविला होता. एवढें ऐश्वर्य मिळालें, **कुमुदिनी**सारख्या राजकन्येचा लाभ झाला, तरी तो आपली मूळची प्रतिज्ञा विसरला नव्हता. कानांत वाण मारून शिकार मिळवीन, तरच परत घरीं येईन अशी जी त्याणें आईजवळ प्रतिज्ञा केली होती, तीप्रमाणें येतेवेळीं त्याणें मुद्दाम एका जंगलांत मुक्काम करून तेथें तशा रीतीनें शिकार साधली होती.

'**कांतिसेन** व **विजया** यांला, बराच वेळ झाला तरी **प्रतापसेना**ची ओळख पटली नाहीं, परंतु जेव्हां तो मेलेला हरिण **प्रतापसेनानें** पुढें ठेवला, तेव्हां त्याच्या-

वर दृष्टि जातांच **विजये**ला पूर्वीच्या गोष्टीचें स्मरण झालें. व हा आपला प्रियपुत्र **प्रतापसेन**च आहे, असें समजून तिनें एकदम त्याला पोटाशीं धरलें. तेव्हां **कांतिसेन**ही हा आपला पुत्र असें समजला. दोघांनींही प्रेमपूर्वक त्याला कुरवाळून व आनंदाश्रूनीं स्नान घालून घरांत नेलें. **पतंगवर्मा** यावेळीं त्याच्या जवळ होता. आईबापांच्या प्रेमाचा पूर अंमळ ओसरल्यावर **प्रतापसेना**नें आपला मित्र **पतंगवर्मा** याची आणि पित्याची ओळख करून दिली. व मला जें काय प्राप्त झालें आहे तें सर्व याच्या स्नेहाचें फळ आहे, असें सांगितलें. तेव्हां **कांतिसेना**नें **पतंगवर्म्या**चें मोठें गौरव केलें.

प्रतापसेनाच्या हुकुमाप्रमाणें सर्व मंडळी दरवाज्यांत उभी होती. **प्रतापसेना**ला आपण बायको आणली आहे हें सांगण्यास मोठी लाज वाटली. म्हणून तें काम त्याचा मित्र **पतंगवर्मा** यानें केलें. तो **कांतिसेना**ला म्हणाला, 'आपली सून बंधूसहवर्तमान बाहेर तिष्ठत आहे; तर तिला आंत येण्याविषयीं आज्ञा करावी.'

हें ऐकून **कांतिसेन** मोठ्या आनंदानें लौकर लौकर बाहेर जाऊन त्यानें **कुमुदिनी**ला अंबारींतून खालीं उतरवून तिला बंधूसहवर्तमान आंत घेऊन आला, व तिला आपली स्त्री **विजया** हिच्या हवालीं केलें. तिच्या बंधूचा स्वतः त्यानें सत्कार केला. नंतर बरोबर आलेली सर्व मंडळी सवडीप्रमाणें ज्याला ज्याला जेथें जेथें राहायला मिळालें तेथें तेथें ती राहिली. सर्व मंडळीचा **कांतिसेना**च्या आंगणांत समावेश होण्यासारखा नव्हता; म्हणून त्यानें शे-

जाऱ्यापाजाऱ्यांच्या येथें आपल्या दैवशाली पुत्रावरोबर आलेल्या मंडळीची सोय लावली.

याप्रमाणें **कांतिसेन** हा एक सामान्य मनुष्य असतांही भाग्यशाली पुत्राच्या योगानें त्याला मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें. **कुमुदिनी**चा बंधु, आपल्या बापानें **प्रताप-सेना**ला दिलेली जहागीर योग्य व्यवस्थेनें त्याच्या स्वाधीन करण्याकरितां आला होता. त्याप्रमाणें त्याणें **कांचीपूर** व त्याच्या आसपासच्या मोठमोठ्या गांवांतील सर्व लोकांना बोलावून आणून, 'आजपासून तुमचा राजा **प्रतापसेन** झाला आहे व सर्वांनीं त्याच्याच आज्ञेंत वागावें, व करभारही त्यालाच द्यावा' असें कळविलें. व **प्रतापसेना**चा मुलूख त्याच्या स्वाधीन करून, तो लौकरच बहीण आणि मेव्हणा यांचा निरोप घेऊन परत आपल्या राजधानीकडे गेला.

पतंगवर्म्याचें **कांचीपुरांत** येण्याचें दुसरें कांहीं कारण नव्हतें. तो केवळ **प्रतापसेना**च्या स्नेहाला वश होऊनच आला होता. त्या उभयतांचें असें कांहीं विलक्षण प्रेम जडलें होतें कीं, परस्परांचा वियोग व्हावा हें दोघांलाही मोठें कठीण व असह्य झालें होतें. **प्रतापसेना**नें, आज जाशील उद्यां जाशील, असें करून मोठ्या आग्रहानें त्याला पुष्कळ दिवस ठेवून घेतलें. शेवटीं कधीं तरी आपणां उभयतांला वियोग सहन केलाच पाहिजे, तेव्हां आतां आपण आपल्या घरीं जातों, असें सांगून **पतंगवर्म्या**नें **प्रतापसेना**चा निरोप घेतला. व त्यालाही निरुपायास्तव ती गोष्ट मान्य करणें भाग पडलें. वरचेवर परस्परांच्या भेटी व्हाव्या, व एकमेकांचा क्षेम समाचार उभयतांला

कळवीत असावा, इत्यादि प्रकारचे पुष्कळ नियम करून घेऊन **प्रतापसेनानें** त्या आपल्या उपकारी मित्राला निरोप दिला.

कांतिवर्मा विशेष संपन्न नसल्यामुळें, त्याच्या रहाण्याची तऱ्हा सामान्य होती; पण आतां मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें, तेव्हां अर्थात् त्याला शोभेल अशा थाटामाटानें तो राहूं लागला. हत्ती, घोडे, दास, दासी, नौकरचाकर वगैरे पुष्कळ सेवकजन त्याच्या आश्रयाला राहिले. गांवांत जिकडे तिकडे लोक त्याची वाखाणणी करूं लागले. जो तो, **कांतिसेन** मोठा भाग्यशाली म्हणून त्याला असा कुलदीपक पुत्र झाला, व त्याला ऐश्वर्य प्राप्त झालें, असें म्हणूं लागला. **विजया** ही पूर्वी खाऊन पिऊन सुखी अशा एका सामान्य गृहस्थाची स्त्री होती, ती आतां मोठ्या योग्यतेला चढली. पुरुषापेक्षां बायकांला द्रव्याची मोठी चाड असते. शेजारणीपाजारणी व इतरही स्त्रिया विजयेची वाखाणणी करूं लागल्या. जो तो म्हणूं लागली, कीं 'बाई, तूं मोठी दैवाची म्हणूनच असला पुत्र तुला झाला, नाहीं तर आमच्यासारख्यांला काय थोडी पोरें झालीं आहेत. पण उपयोग काय? खायाला काळ आणि धरणीला भार, अशीं खंडीभर पोरें असून काय उपयोग? तुला एकच मुलगा झाला; पण त्याणें नशीब काढलें.'

या व अन्य रीतीनें त्या उभयतां स्त्रीपुरुषांची गांवांत जिकडे तिकडे तारीफ होऊं लागली. **प्रतापसेनाला** एवढें मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें; तरी त्याला त्याचा कांहींच अभिमान नव्हता. तो पूर्वीप्रमाणेंच आपल्या आईबापांच्या आज्ञेंत वागत असे. जहागिरीचे मालक काय ते तेच.

ते देतील तें खावें व सांगतील तें करावें, इतकेंच आपलें कर्तव्य; असें तो समजत असे. कुमुदिनी त्याच्यावर मनापासून विशेष प्रीति करीत असे, व ती सर्वगुणसंपन्न असल्यामुळें सासूसासरे व इतर आप्तसंबंधी वगैरे सर्व लोकांना ती फारच प्रिय झाली होती. प्रतापसेनही तिच्यावर प्रीति करीत नव्हता असें नाहीं; तरी एकंदरींत त्याला तिचा विशेष नाद लागला होता, असें म्हणतां येत नाहीं.

सांप्रतची स्थिति प्राप्त होण्यापूर्वीं प्रतापसेनाला कसलीच विशेष आशा नव्हती व त्यावेळीं त्याचें वयही लहानच होतें. दिवसेंदिवस तो वाढत चालला असून त्याच्या बरोबर त्याची आशा व महत्वाकांक्षा ह्याही वाढूं लागल्या. "लाभ झाला म्हणजे लोभ वाढतो" असें जें अनुभविक लोकांचें म्हणणें आहे, तें कांहीं खोटें नव्हे. शेतकीवर निर्वाह करणाऱ्या मनुष्याच्या मुलाला एक मोठा प्रांत जहागीर मिळाला; मोठ्या राजकन्येशीं विवाह झाला; घरांत सर्व प्रकारें थाटमाट उत्तम झाला; तर आतां तेवढ्यावर तृप्ति व्हावी कीं नाहीं; पण ह्या ऐश्वर्याचा लाभ झाल्यामुळें **प्रतापसेनाला** अधिक लोभ सुटला! त्यामुळें त्याची महत्वाकांक्षा इतकी अनावर झाली कीं, लवकरच फौजफांटा जमवून मोठें राज्य काबीज करण्याची त्याणें तयारी चालविली. आतां या **प्रतापसेना**ला लढाईच्या तयारींत गुंतवून आपण **मंत्रदत्त** आणि **शांति** यांचें काय झालें तें पाहूं.

मंत्रदत्त हा **विद्यानिधी** नांवाच्या मोठ्या पंडिताच्या येथें अध्ययन करीत होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तो

मुलगा जन्मतः मोठा सद्गुणी होता. **विद्यानिधी** व त्याची स्त्री **शारदा** हीं उभयतां त्याच्यावर फार ममता करीत असत, व तोही त्यांच्या आज्ञेबाहेर एक पाऊल देखील टाकीत नसे. **मंत्रदत्त** आपल्या गुरूच्या सेवेंत तत्पर असून विद्येचा अभ्यास करण्यांत निमग्न असे. त्याचें त्या विद्यानंदांत मन इतकें रमलें होतें कीं, वय लहान असतांही त्याला त्यापुढें खेळ अथवा दुसरी कोणतीच गोष्ट सुचत नसे. त्याचे आईबाप वरच्यावर त्याला घरीं घेऊन जात. तितक्या वेळांत आपला व्यासंग बुडतो, ह्मणून त्याला घरीं जाणें देखील आवडत नसे. तरी वडीलांच्या आज्ञेबाहेर चकारशब्द देखील काढायाचा नाहीं, असा त्याचा स्वभाव असल्यामुळें तो मुकाट्यानें आईबाप सांगतील त्याप्रमाणें वागत असे.

देवशर्म्याची घरची स्थिति फार गरिबीची होती. बहुतकरून भिक्षुकीवर त्याचा निर्वाह चालत असे. बाप मुलावर प्रीति करतो, तरी या जगाच्या नियमाप्रमाणें ती प्रीति देखील निरपेक्ष असत नाहीं. मुलगा आपल्या उपयोगीं पडावा, ह्मणूनच बाप त्याच्यावर प्रीति करतो. त्याप्रमाणेंच **देवशर्मा**—पुत्राला दोन अक्षरें येऊन त्याची लोकांत मानमान्यता व्हावी व त्यापासून दोन पैसे मिळून संसाराची ददात चुकावी, अशी इच्छा करीत होता. **मंत्रदत्त** बरेच दिवस गुरूच्या गृहांत राहिला होता, त्यावेळीं त्याचें वय सुमारें १८ वर्षांवर झालें होतें. त्याच्या मनांत आणखीं पुष्कळ दिवस असेंच विद्येच्या व्यासंगांत रहावें, असें होतें; पण **देवशर्म्या**चे विचार याहून अगदीं निराळे होते. तो यापूर्वीच त्याला, भिक्षुकी करून दोन पैसे

मिळविण्याच्या उद्योगास लावण्याविषयीं सांगत होता. पण **विद्यानिधी**च्या सांगण्यावरून तो बेत रहित होऊन त्याचें अध्ययन हावेळपर्यंत सतत चाललें.

मुलगा आतां प्रौढ झाला, तेव्हां त्याचें लग्न करावयाचें असा विचार करून **देवशर्मा** मुलगी पाहण्याच्या प्रयत्नास लागला. **विद्यानिधी**, आणखी कांहीं दिवस मुलाला आपल्या जवळ असूंदे असें सांगत होता, तरी **देवशर्म्या**नें तें ऐकलें नाहीं. तो हातापायां पडून त्याचीं फार आर्जवें करूं लागला. व कसें तरी करून **मंत्रद**त्ताला आतां आपण संसार करण्यास लागण्याची परवानगी द्या, अशी त्याणें विनंती केली. तेव्हां त्याचे भिडेस पडून **विद्यानिधी**नें लौकरच त्याला आज्ञा देण्याचें कबूल केलें. **देवशर्मा** पुत्राच्या विवाहाविषयीं पुष्कळ प्रयत्न करीत होता; पण तो सिद्धीस गेला नाहीं. ईश्वरी योगायोग कांहीं निराळेच असतात. **देवशर्म्या**नें ज्यांच्या ज्यांच्या जवळ मुलीबद्दल मागण्या घातल्या, त्यांणीं त्यांणीं कांहींतरी निमित्त सांगून ती गोष्ट लांबणीवर टाकली. असें झालें तरी **ब्रम्हदेवा**नें निराळीच योजना करून ठेविली होती व ती अनायासानें आपोआप घडून आली.

कांचीपूर हें एकप्रकारें ब्राह्मणी शहर होतें असें झटलें तरी चालेल. कारण, तेथें ब्राह्मण लोकांची वस्ती फार असून त्यांत मोठे मोठे विद्वान् व प्रतिष्ठीत असे लोक पुष्कळ होते, व तेथें नेहमीं अनेक शास्त्रीय विषयांच्या चर्चा होत असत. त्याप्रमाणें एके दिवशीं एक मोठा प्रसंग सहज जमून आला. एक पंडित देशोदेशाच्या

पंडितांशीं वादविवाद करीत व आपलें मत स्थापन करीत फिरत होता. तो मोठा वादेली व उद्दाम स्वभावाचा होता, ह्मणून लोकांनीं त्याला **उद्दंडपंडित**, असें नांव ठेविलें होतें. त्याची विद्याही असाधारण होती. तो द्वैत मताचा अभिमानी असून जेथें जाईल तेथें अद्वैतवाद्यांला जिंकून त्यांच्याकडून द्वैत मत मान्य करवीत चालला होता. दक्षिणदेशांत **कांचीपूर** हें एक प्रसिद्ध विद्यापीठ असल्यामुळें **उद्दंडपंडिताची** स्वारी तेथें प्राप्त झाली.

कोणी द्वैत वादी पंडित दिग्विजय करीत येत आहे, ही बातमी चोहोंकडे पसरली होती. त्यामुळें **उद्दंडपंडिताचा** लौकिक **कांचीपुरांत**ल्या विद्वान् लोकांला तो येण्यापूर्वींच माहीत झाला होता. व हें प्रकर्ण आतां कधींतरी आपल्यावर येणार, असें समजून तेथील प्रमुख प्रमुख विद्वान् मंडळी वादाच्या तयारीस लागली होती. **कांचीपुरांत** द्वैतवादी कोणी मुळींच नव्हते असें नाहीं; पण त्यांची संख्या फार थोडी असून त्यांच्यांत मोठे नामांकित विद्वान् असे कोणीच नव्हते. यामुळें तेथें अद्वैत वाद्यांचेंच प्रमुखत्व होतें. त्यावरून विद्वत्तेच्या संबंधानें **कांचीपूर** हें अद्वैत वाद्यांचें मुख्य स्थान, असें लोक समजत असत. तेव्हां हा आपला लौकिक राखण्याविषयीं त्या मताच्या विद्वान् मंडळींत बरीच चळवळ सुरू झाली होती.

अशा संधीस दिग्विजय करीत आलेले **उद्दंडपंडित** यांचीही स्वारी तेथें येऊन पोहोंचली. हा पंडित मोठमोठ्या राजधान्या जिंकून आला होता. पुष्कळ लोक त्याच्या संप्रदायाचे झालें होते, यामुळें त्याचा मोठा थाटमाट होता. त्याची स्वारी ह्मणजे लहानशा एखाद्या राजाचीच

स्वारी ह्मणण्यास कांहीं हरकत नव्हती. बरोबर लवाजमाही पुष्कळ होता. स्वतः तो तर पंडितच होता; पण त्याच्याबरोबर दुसरे कितीएक जाडे जाडे विद्वान् होते. ह्या **उद्दंडपंडिताची** स्वारी **कांचीपुरांत** येतांच तेथील विद्वान् मंडळींत मोठी गडबड झाली. **उद्दंडपंडितानें कांचीपुरांत तुंगभद्रा** नदीच्या कांठीं एका मोठ्या विस्तीर्ण विष्णुमंदिरांत तळ दिला होता. त्याच्या आसपास सवडीप्रमाणें त्याच्या बरोबरची मंडळी राहिली होती.

गांवांतील शिष्ट मंडळीनें ह्या पंडिताचा मोठा सत्कार केला. त्याला सत्काराची विशेष अपेक्षा नव्हती. मुख्यत्वें वादविवाद पाहिजे होता, तो आपला हेतु त्याणें कळविल्यावरून प्रमुख मंडळींनीं सभेची तयारी केली. सभेचा दिवस निश्चित होऊन सर्व तयारी झाली. या दिवशीं **कांचीपुरांतले** झाडून सारे विद्वान् ब्राह्मण व इतर मोठमोठे प्रतिष्ठित लोक त्या सभेला आले होते. **मंत्रदत्ताचा** गुरु **विद्यानिधि** हा त्या पुरींतल्या प्रमुख विद्वानांपैकीं एक असल्यामुळें तोही तेथें प्राप्त झाला होता. त्याच्याबरोबर त्याचा प्रिय शिष्य **मंत्रदत्त** हा मुद्दाम तो चमत्कार पाहण्याकरतां आला होता.

पूर्वजन्मींची **सुंदरी** अथवा सांप्रतची **शांति** हिचा बाप **यज्ञपति** हाही मोठा प्रमुख विद्वान् होता, हें पूर्वी सांगितलेंच आहे. या सभेंत **यज्ञपति** आला होता. **शांति** ही **यज्ञपती**ची फार आवडती मुलगी असून ती मोठी विदुषी होती. **यज्ञपति** तिला आपल्या मुलग्यापेक्षां अधिक समजत असे. वस्तुतः अशा मोठ्या सभेंत बायकांनीं येण्याचा संप्रदाय नव्हता, तथापि ती सभा विद्वान् लोकांचीच होती, व जे कोणी विद्वान्—मग तो

पुरुष असो अथवा बायको असो —असेल त्याला तेथें येण्याविषयीं कांहीं मनाई नव्हती. त्यांतून यज्ञपतीला आपल्या मुलीच्या विदुषीत्वाविषयीं मोठा अभिमान वाटत असल्यामुळें त्याणें **शांतीला** मुद्दाम बरोबर आणलें होतें.

संकेताप्रमाणें सर्व मंडळी जमली, तेव्हां प्रमुखाच्या संमतीनें वादविवादाला सुरवात झाली. **उद्दंडपंडित** हा प्रथमपासून उगीच बसला होता. त्याच्या बरोबरची मंडळीच पक्षप्रतिपक्ष करीत होती. **कांचीपुरां**तल्या विद्वानांचा समुदाय मोठा होता तरी व्यवस्थित रीतीनें एक एकानें काय तें बोलावें, असा कडक नियम असल्यामुळें वादांत गडबड झाली नाहीं. **उद्दंडपंडिता**च्या बरोबरचे विद्वान् लोकही मोठे शास्त्रपारंगत होते. त्यांणीं प्रतिपक्ष्यांच्या कोट्यांचें समर्थन करावें, व **कांचीपुरां**तल्या विद्वानांनीं त्यांच्यावर नव्या नव्या कोट्या कराव्या, आणि त्यांच्या समर्थनाचें खंडण करावें. याप्रमाणें द्वैत आणि अद्वैत या संबंधाचा तो जंगी वाद चालला होता, व इतर सर्व लोक चित्रवत् स्वस्थ बसून वादिप्रतिवाद्यांचा कोटिक्रम ऐकत होते.

विषय मोठा गहन व व्यापक असून दोन्ही पक्षांकडे जाडे जाडे विद्वान् असल्यामुळें तो वाद लवकर तुटला नाहीं. पुष्कळ दिवसपर्यंत नियमित वेळीं सभा चालल्या होत्या. गांवांत जिकडे तिकडे याच विषयांच्या संबंधानें चर्चा चालली होती. द्वैत आणि अद्वैत हे शब्द सर्वतोमुखीं झाले होते. कधीं **उद्दंडपंडिता**चा जय होत असे, व कधीं **कांचीपुरकरां**चा जय होत असे, याप्रमाणें घनचक्कर चालली होती. शेवटीं **कांचीपुरां**तल्या पंडितांनीं

उद्दंडपंडिताबरोबरच्या एक एक विद्वानाला कुंठित करून सर्वांचा पराभव केला, तेव्हां स्वतः त्या पंडितराजाला कंबर बांधावी लागली. अद्वैत वादी वाटच पहात होते. त्यांच्यांतली प्रमुख प्रमुख मंडळी अद्यापपर्यंत पुढें आलीच नव्हती. **उद्दंडपंडित** वादाला येईल, त्यावेळीं आपण बोलूं, असा त्यांचा विचार होता, तो मनोरथ पूर्ण झाला.

बरोबरच्या मंडळीचा पराभव झाला, तेव्हां स्वतः **उद्दंडपंडित** वादाला आला. अद्वैतवाद्यांच्या तर्फेनें प्रथम **यज्ञपति** वादाला पुढें सरला. त्या उभयतांचा कोटिक्रम मोठा वर्णनीय झाला. तथापि तो शास्त्रीय गहन विषय असल्यामुळें आमच्या साळ्याभोळ्या वाचकांना त्यांत कांहीं समजणार नाहीं; म्हणून आम्ही तो येथें देत नाहीं. **यज्ञपती**शीं पुष्कळ दिवस **उद्दंडपंडिता**ची चर्चा चालली होती. शेवटीं एके दिवशीं **यज्ञपति** मोठा जाडा विद्वान् होता तरी **उद्दंडपंडिता**ची त्याच्यावर छाप बसली असें वाटलें, तेव्हां मंडळीनीं त्या दिवशीं वाद तहकूब केला.

दुसऱ्या दिवशीं पुनः सर्व मंडळी जमा झाल्यावर वादाची सुरवात झाली. **यज्ञपती**नें प्रतिपक्ष्याच्या कोट्या खंडण करण्याची बरीच तयारी केली होती. व कांहीं वेळ **यज्ञपति** विजयी होतो असें वाटलें होतें, तरी पुन्हा त्याची घांदल उडाली. यावेळीं **मंत्रदत्त** तेथें जवळच बसला होता, त्याणें वाद करण्याविषयीं आपल्या गुरूजवळ आज्ञा मागितली. व याच्या मानानें त्याची योग्यता कमी होती, तरी विद्येनें ती विशेष होती. शिष्यानें आज्ञा मागितली; तेव्हां **विद्यानिधी**ला फार आनंद झाला. व त्याणें **यज्ञपती**ला सांगून **मंत्रदत्ता**ला पुढें बसविलें. अठरा एकोणीस वर्षांच्या वयाचा

मुलगा आपल्याशीं वाद करायाला आला, याचें त्या उद्दंडपांडिताला मोठें नवल वाटलें. व कांचीपुरस्थ विद्वा-मांनीं हा आपला एकप्रकारें उपमर्दच केला, असें समजून तो—या मुलाशीं आपण वाद करणार नाहीं म्हणून कांहीं वेळ स्तब्ध बसला. तरी पुष्कळांच्या सांग-ण्यावरून शेवटीं त्याला सुरवात करावी लागली.

मंत्रदत्तानें फार उत्तम प्रकारचा कोटिक्रम केला. ईश्वर हा जगाला कारण आहे किंवा नाहीं, याविषयीं बोलणें चाललें होतें. तो विषय मंत्रदत्तानें चिनतोड यु-क्तीनें शास्त्रप्रमाणाला अनुसरून प्रतिपादन केल्याव-रून सभेंत जिकडे तिकडे त्याची वाहवा झाली, यज्ञपतीची कन्या शांति ही यावेळीं जवळच होती, व ती वयानें प्रौढ म्हणजे मंत्रदत्ताच्या बरोबरीची असून शास्त्रांत निपूण असल्यामुळें मंत्रदत्ताचा कोटिक्रम तिला फार पसंत वाटला. व तो कोटिक्रमच पुढें जो प्रसंग घडून आला त्याला कारणीभूत झाला.

याप्रमाणें उद्दंडपांडिताचा मंत्रदत्ताशीं जो वादविवाद चालला होता, त्यावरून आतां हा मुलगा या महापं-डिताला खास जिंकतो, असें सर्वांला वाटलें होतें; पण ईश्वरी संकेताप्रमाणें तें यश शांतीला प्राप्त व्हावयाचें होतें! बराच वेळ वादविवाद झाल्यावर उद्दंडपांडितानें निमित्तकारणाशीं समानाधिकरण्य कसें होतें, या संबंधानें कोटी केली. तेव्हां मंत्रदत्ताला चटकन् तिचें समर्थन करतां आलें नाहीं. असें होतांच सभेंत जिकडे तिकडे गोंगाट सुरू झाला. अद्वैत वाद्यांचे तर्फेनें काय-तो मंत्रदत्तच वाद करीत होता. त्याचा पराभव झाला

ह्मणजे उद्दंडपंडित विजयी झाला असें सिद्ध झालें होतें. अशा वेळीं मंत्रदत्ताला कांहीं उत्तर सुचेना असें होतांच, उद्दंडपंडिताकडचे लोक जिकडे तिकडे "जितमस्माभिः" असें ह्मणूं लागले.

वस्तुतः ती वेळ मोठी आणिबाणीची होती. क्षणभर अवकाश लागला असता तर अद्वैतवाद्यांचा पराभव झाला असता. त्या कांचीपुराच्या अधिदेवतेला किंवा शारदादेवीला तो द्वैतवाद मान्य नव्हता, ह्मणूनच कीं काय त्या वेळीं—ती, विदुषी मुलगी शांति इच्यांत संचार करून—त्यांणीं तत्काल त्या महापंडिताचा पराभव केला. मंत्रदत्त कुंठित झाला असें पाहतांच, यज्ञपतीच्या जवळ बसलेली शांति पुढें येऊन तिनें तत्काल उद्दंडपंडिताचा कोटिक्रम खंडित केला. व तिणें जें खंडन केलें त्यावर प्रतिखंडन करण्याची द्वैतवाद्यांपैकीं कोणाचीच प्राज्ञा नाहींशी झाली. उद्दंडपंडित अगदीं निरुत्तर झाला. काय झालें असेल कोणास ठाऊक! पण यावेळीं त्याची वाचा घरल्यासारखें होऊन तो खिन्न होत्साता खालीं पाहूं लागला. हा अपूर्व चमत्कार होतांच जमलेल्या मंडळींत एकच गोंगाट झाला. सर्व लोक शांतीची तारीफ करूं लागले. अद्वैतवाद्यांचा समुदाय मोठाच होता, व जमलेल्या इतर सर्व लोकांला कांचीपुरकरांचा विजय व्हावा, हें मनापासून इष्टच होतें. तेव्हां उद्दंडपंडित स्तब्ध होतांच जिकडे तिकडे "जितमस्माभिः; जितमस्माभिः; "असा ध्वनि निघाला.

ब्राह्मणलोक हे स्वभावतः कांहींसे गडबडे असून ज्या त्या कामांत त्यांची उतावळी फार असते. पुष्कळ देशदे-

शांतरांतील पंडितांला जिंकून आलेल्या **उद्दंडपंडिताला** आह्मीं **कांचीपुरकरांनीं** जिंकला, या गोष्टीचा त्यांना इतका आनंद झाला कीं, त्यामुळें सर्व मंडळी तुफान झाली. प्रमुख प्रमुख शिष्ट, नको नको ह्मणत असतां, कांहीं लोकांनीं त्या द्वैतवादी पंडिताची फजिती करण्यास आरंभ केला. कोणीं त्याचीं जयपत्रें हिसकावून घेतलीं, कोणीं त्याचा उपहास केला, असा अनेक प्रकारें लोकांनीं त्याचा पाणउतारा केला. **विद्यानिधि, यज्ञपति** इत्यादि समंजस लोकांना तसें करणें अयोग्य वाटत होतें; पण मंडळीपुढें त्यांचा कांहीं इलाज चालेनासा झाला. शेवटीं पराजित झालेला तो बिचारा **उद्दंडपंडित** तेथून पळून गेला.

याप्रमाणें द्वैत आणि अद्वैत या संबंधानें मोठा वाद होऊन अद्वैतवादी विजयी झाले, ही एक गोष्ट झालीच; पण तीपासून आमच्या कथेचे नायक व नायिका यांच्यावर कांहीं निराळ्या प्रकारचा परिणाम घडला. आह्मांस त्या वादाशीं कांहींच प्रयोजन नाहीं. त्यापासून जें कार्य घडलें त्याचेंच येथें विशेष विवरण केलें पाहिजे.

शांति व **मंत्रदत्त** या उभयतांचा वर सांगितलेल्या वादाच्या प्रसंगीं कसा योग घडून आला होता तें पूर्वीं सांगितलेंच आहे. **मंत्रदत्ता**ला **शांती**विषयीं विशेष प्रेम उत्पन्न झालें, व तिलाही **मंत्रदत्ता**विषयीं प्रीति उत्पन्न झाली. ती उभयतां एकाच शहरांत रहात होतीं, तरी हावेळपर्यंत त्यांचा असा कधीं समागम घडण्याचा योग आला नव्हता. पूर्वजन्मींचा संस्कार बलवत्तर होता, व उभयतां पूर्वजन्मींचीं स्त्रीपुरुषें असून दोघांलाही आपल्या पू-

वींच्या जन्मांतल्या वृत्ताची—**गोरक्षनाथा**च्या कृपेनें व त्यांच्या पुण्याच्या प्रभावानें—चांगली आठवण होती; तरी तो संस्कार उज्वल झाला नव्हता. कोणत्याही प्राण्याला पूर्वजन्माचें स्मरण असलें तरी जन्मांतर घेतांच त्याच्यावर एक प्रकारचें अज्ञानाचें पटल येतें. नाटकांत नाटकीजन खरोखर सोंगें घेत असतात. त्यांत वास्तविकपणाचा कांहींच अंश नसतो; तरी त्यांला तात्कालिक कांहीं विकार निराळेच उत्पन्न होतात. व ज्याचें ज्या मनुष्यानें सोंग घेतलें असेल, त्याला तेवढ्यावेळा पुरती तरी, आपण तोच आहें अशी भावना होते. हाच दृष्टांत जन्मांतराच्या संबंधानें देखील लागू होतो. हे संस्कार असे कांहीं विलक्षण आहेत कीं, प्राणी ज्यावेळीं ज्या देहाचा स्वीकार करतो, त्याशीं तेव्हांच त्याचें तादात्म्य होऊन जातें यामुळें पूर्वजन्माचें स्मरण असलें, तरी त्याच्या त्या संस्काराला जागृत होण्याविषयीं कांहीं कारणांची अपेक्षा असते.

ज्याला ज्या गुणाची विशेष चाड असेल, त्याला तो गुण ज्याच्या अंगीं दृष्टीस पडेल त्याच्यावर साहजिक अनुराग उत्पन्न होतो. **शांती**नें जो कोटिक्रम केला तो पाहून **मंत्रदत्ता**ला ही आपली बायको होईल तर फार चांगलें, असें वाटलें. व **मंत्रदत्ता**ची विद्वत्ता पाहून **शांती**ला हा आपला पति होईल तर उत्तम असें वाटलें. तात्पर्य, त्या वादाच्या वेळीं उभयतांचे गुण उभयतांला स्पष्ट दिसून आल्यामुळें त्यांची परस्परांवर प्रीति जडली. ईश्वरीसूत्र तसेंच होतें. जसा **देवशर्मा** आपल्या पुत्राला मुलगी पहात होता, तसाच **यज्ञपती**ही आपल्या मुलीला स्थळ पहात होता.

मुलगी देण्याच्या संबंधानें आपापल्या जातीला, कुळाला, उचित असे गुण ज्याच्या अंगीं असतील तसलाच वर पहात असतात. **यज्ञपति** हा एक विद्वान् ब्राह्मण होता, तेव्हां अर्थात् कोणी तरी विद्वा र् व कुलीन अशा वराला आपली मुलगी द्यावी, हें त्याच्या मनांत येणें अगदीं साहाजिक आहे, व तो योग आपोआप घडून आला. **देवशर्मा** हा मोठा विद्वान् नसल्यामुळ प्रतिष्ठितांत मोडत नव्हता. तरी तो कुलीन होता व त्याचा मुलगा **मंत्रदत्त** याची योग्यता तर **यज्ञपतीनें** प्रत्यक्ष पाहिलीच होती. त्यावरून **यज्ञपतीनें** आपली मुलगी **शांति** हिला **मंत्रदत्ता**ला द्यायची, असा विचार केला. व ती गोष्ट त्याच्या स्त्रीला व स्वतः **शांतीला** विशेष मान्य झाली, यावरून त्याणें **विद्यानिधी**च्या द्वारें तो योग जमवून आणला. **देवशर्म्या**ला एकदांचें आपल्या मुलाचें लग्न होऊन तो कधीं संसार करायला लागेल असें झालें होतें. **विद्यानिधीनें** त्याला सांगतांच त्याणें तत्काल ती गोष्ट मान्य केली. व **मंत्रदत्ता**ला ती गोष्ट इष्टच होती, यावरून उभयतांचा विवाह करण्याचा निश्चय ठरला. **यज्ञपति** खाऊनपिऊन घरचा सुखी होता. **देवशर्म्या**सारखी त्याची विशेष गरिबी नव्हती; ह्मणून लग्नाचा सर्व खर्चवेंच त्याणेंच केला व मोठा विद्वान् असून सुशील अशा जांवयाचे आपल्या शक्तीप्रमाणें पुष्कळ लाड पुरविले. ह्या विवाहाचा प्रसंग साधारणतः बऱ्याच थाटामाटानें झाला. त्या समारंभांत पुष्कळ विद्वान् ब्राह्मणमंडळीचा समाज जमला होता. कार्य आटपल्यावर **मंत्रदत्त** त्या आपल्या प्रिय पत्नीसहवर्तमान स्वगृहीं प्राप्त झाला. **मंत्रदत्ता**च्या

शांत स्वभावाप्रमाणें त्याला स्त्रीही, उत्तम मिळाली. ती केवळ नांवानेंच **शांति** होती असें नाहीं, खरोखरी ती प्रत्यक्षच शांति होती. नेहमीं हास्यमुख, असेल त्यांत संतुष्ट, सासूसासऱ्यांच्या आज्ञेंत वागणारी, नवऱ्यावर मनापासून प्रेम करणारी, व सदाचारी अशा प्रकारची स्त्री ही केवळ लक्ष्मीच आहे. व तशा स्त्रिया ज्या घरांत असतील त्याला घर म्हणण्यापेक्षां देवांचें **नंदनवन** म्हणणें विशेष योग्य आहे. **शांति** ही वर सांगितल्याप्रकारचीच स्त्री होती. तिच्या योगानें **देवशर्मा**, त्याची स्त्री व **मंत्रदत्त** यांला अतिशय समाधान व सुख होऊं लागलें.

याप्रमाणें पूर्वजन्मींच्या त्या स्त्रीपुरुषांचें या जन्मांत देखील नवरा बायकोचें नातें जडलें. **मंत्रदत्ता**ला **शांती**पासून, व **शांती**ला त्याच्यापासून फारच आनंद झाला. तीं एकमेकांवर अतिशय प्रीति करीत असत. **प्रतापसेना**प्रमाणें **मंत्रदत्ता**चें मन आपल्या स्त्रीविषयीं साधारण उदासीन असें नव्हतें, हा त्या उभयतांचा पूर्व जन्मींचा संस्कार होय. पूर्वजन्मांत **मंत्रदत्ता**ला आपली बायको अतिशय आवडत होती व तिलाही नवरा आवडत होता. त्यामुळें या जन्मांतही त्यांच्या मनोवृत्ति तशाच झाल्या. **प्रतापसेना**ची स्त्री **कुमुदिनी** ही कोणत्याही गुणांनीं न्यून नसतांही तिच्यावर त्याचें असावें तितकें प्रेम नव्हतें, असें जें पूर्वीं सांगितलें आहे, त्याचेंही कारण जन्मांतरीय संस्कारच होय. ज्यावेळीं **वसंतसेना**नें **सुंदरी**ला पहिल्याप्रथम पाहिली त्या वेळीं तो इतर सर्व स्त्रियांविषयीं अगदीं निरिच्छ होऊन केवळ एकट्या **सुंदरी**वरच आसक्त झाला होता, व तशाच स्थितींत त्याचा देहान्त झाला. नंतर तो

चंद्रगुप्त झाला तरी त्याही जन्मांत त्याची तिच्यावरच आसक्ति होती, व तिच्याच नादांत त्याचें देहावसान झालें. सांप्रत जरी त्याला दुसरा देह प्राप्त झाला आहे, तरी प्राक्तनसंस्कार नष्ट झाला नाहीं. हावेळपर्यंत शांति त्याच्या दृष्टीस पडली नव्हती, व ती कोठें आहे व कसली आहे अथवा ती आहे किंवा नाहीं याविषयीं त्याच्या मनांत कल्पना देखील नव्हती. कुमुदिनीवर त्याचें मन आसक्त झालें नाहीं, यावरून त्याला स्त्रीविषय नको होता, असें मुळींच नव्हतें. एकंदरींत कोणत्याही स्त्रीवर त्याचें मन विशेष आसक्त होत नव्हतें इतकेंच कायतें. सांप्रत तो मोठा श्रीमान् झाला असल्यामुळें पुष्कळ चांगल्या चांगल्या स्त्रिया वरण्याची त्याला शक्ति होती. श्रीमान् लोकांत अनेक स्त्रिया करणें हा एक परिपाठच होता; तरी प्रतापसेनाला तसें करावेंसें वाटलें नाहीं, इतकेंच नव्हे; तर रात्रंदिवस त्याची मर्जी राखण्याविषयीं जपत असलेल्या कुमुदिनीचा देखील वियोग झाला असता तर त्याला त्याबद्दल फारसें दुःख वाटलें नसतें!

याप्रमाणें ते तिघेही एकाच गांवांत जन्मास येऊन निरनिराळ्या रीतीनें व पूर्वजन्मींचे संस्काराप्रमाणें ते आपापले धंदे करूं लागले. प्रतापसेनाला हावेळपर्यंत या दंपत्याचा मुळींच समागम घडला नाहीं. तो मोठा श्रीमान् व त्या नगराचा अधिकारी झाला असून मंत्रदत्त हा यःकश्चित् भिक्षुक ब्राह्मण होता. शांति हीही त्या भिक्षुकाची स्त्री असल्यामुळें तिचा आणि प्रतापसेनाचा समागम होण्याचा कांहींच संबंध घडून आला नाहीं. शांतीचा बाप यज्ञपति हा मोठा प्रतिष्ठित विद्वान् होता. तसाच तिचा

पति **मंत्रदत्त** याचाही विद्येच्या संबंधानें चोहोंकडे लौकिक पसरला होता. **उद्दंडपंडिता**सारख्या प्रचंड विद्वानाला कुंठित केल्यामुळें **शांती**ची तर जिकडे तिकडे अतिशय तारीफ झाली होती तरी, तिच्यावर पूर्वजन्मीं अतिशय आसक्त झालेल्या **प्रतापसेना**ला हावेळपर्यंत तिचें दर्शन झालें नव्हतें. क्षात्रतेज धारण करणाऱ्या **प्रतापसेना**च्या मनाची प्रवृत्ति दुसरीकडेच होती. त्याचें वय अत्यल्प असून अंगांत वीरश्री मुसमुसत होती, व तितका पोक्तपणाही अद्याप आला नव्हता. यामुळें विद्वान् लोकांशीं परिचय करणें, त्यांचा मान सन्मान करणें, त्यांच्या सहवासाचा लाभ घेणें ह्या गोष्टी त्याच्या गांवीं देखील नव्हत्या. त्याचें लक्ष कोणीकडे लागलें होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्या महत्त्वाकांक्षेनें ग्रासल्यामुळें सार्वकाळ त्याचें लढाया वगैरेकडे लक्ष लागलें होतें. वस्तुतः यावेळीं तो त्या प्रदेशाचा राजा होता. **कांचीपुरां**तील सर्व लोक त्याची रयत होती. **उद्दंडपंडिता**शीं वाद करण्याचा जो मोठा प्रसंग झाला त्या प्रसंगीं त्याच्यासारख्यानें—जिज्ञासेनें नाहीं तरी केवळ मौज पाहण्याकरितां म्हणून तरी—क्षणभर तेथें येणें हें अगदीं साहजिक होतें; पण त्याच्या मनांत जे विचार घोळत होते त्यांपुढें त्याला दुसरें कांहींच सुचत नव्हतें. तें मोठें वाग्युद्ध झालें, त्याची हकीकत देखील त्याच्या ध्यानांत नव्हती किंवा कोणीं लक्ष्यपूर्वक सांगितली तरी ती त्याणें ऐकिलीही नाहीं! प्रत्यक्ष त्याचा बाप **कांतिसेन** हा या सभेंत एक दोन वेळां गेला होता, व त्याणें सभेची व्यवस्था ठेवण्याविषयीं पुष्कळ साह्यही केलें; पण **प्रतापसेना**नें मात्र डोळे उघडून कधीं, तिकडे पाहिलें देखील नाहीं.

प्रतापसेनाला मोठी महत्वाकांक्षा लागली असून तो लढाया वगैरे करून मोठें राज्य संपादन करण्याच्या नादांत गुंतला होता. यावेळीं त्याला द्रव्याचें बरेंच आनुकूल्य होतें यामुळें त्याणें हळुहळु पुष्कळ फौज जमविली. प्रथम त्याणें हा आपला हेतु त्याचा परममित्र **पतंगवर्मा** याला कळविला व त्याची सम्मति मिळाल्यावर त्याणें हा आपला हेतु सासऱ्याला म्हणजे **चोल**राजाला कळविला. त्याणेंही संमति दिली. तेव्हां प्रथम कोणत्या राजावर स्वारी करावी व तिला कोणतें निमित्त करावें, याविषयीं तो विचार करूं लागला. **केरल**देशचा राजा मोठा प्रबल असून तो **प्रतापसेना**चा सासरा **चोल**राजा याला वरचेवर उपद्रव देत होता. **चोल**राजानें कांद्यानें कांटा काढण्याचा बेत करून **प्रतापसेना**ला **केरल**देशच्या राजावर स्वारी करण्याविषयीं भर दिली. **प्रतापसेना**ला जहागीर म्हणून जो प्रदेश **चोल**राजानें दिला होता तेथून जवळच **केरल**देशच्या राजाची सरहद्द होती. **प्रतापसेना**नें फूस दिल्यावरून कांहीं लोक **केरल**देशच्या राज्याच्या हद्दींत जाऊन लुटालूट करूं लागले. प्रथम कांहीं दिवस ही गोष्ट त्या राजाच्या कानापर्यंत गेली नव्हती; पण हळुहळू आपल्या रयतेला फारच उपद्रव होतो असें समजून केरलराजानें त्याचा कांहीं तरी प्रतिबंध करण्याचा विचार केला.

प्रतापसेन हा **चोल**राजाचा एक सरदार असें समजून केरलराजानें प्रथम **चोल**राजाकडे वकील पाठवून—आपल्या रयतेला उपद्रव होतो त्याचा त्वरित बंदोबस्त करण्याविषयीं सांगितलें. **चोल**राजाला मुद्दाम कळागत लावाय-

चीच होती. त्याणें, **प्रतापसेन** हा आपल्या ताब्यांतला नसून तो अगदीं स्वतंत्र आहे, त्याच्यावर आपली कांहीं-एक सत्ता नाहीं, तुह्मांला कांहीं विचारायचें असेल तर प्रत्यक्ष त्यालाच जाऊन विचारावें, आपण त्या संबंधानें कांहीं सांगूं शकत नाहीं, असें साफ सांगितलें.

याप्रमाणें **चोलराजानें** हें प्रकार्ण अंगावाहेर टाकलें; तेव्हां **केरलदेशचा** राजा **मित्रवर्मा** याणें **प्रतापसेना**कडे वकील पाठविला. **प्रतापसेना**ची त्याला मुळींच कांहीं पर्वा वाटली नव्हती. आपण धमकावणी देतांच तो ताळ्यावर येईल, अशी त्याला मोठी उमेद होती; पण **प्रतापसेनानें** तो त्याचा हेतु सफल होऊं दिला नाहीं. वकिलानें **मित्रवर्म्या**चा जो निरोप त्याला कळविला त्यावरून **प्रतापसेनानें** सरळ उत्तर मुळींच दिलें नाहीं. **प्रतापसेन** हा एक सामान्य जहा-गिरदार आहे असें समजून वकील त्याचा अखेरचा जबाब मोठ्या सक्तीनें घेण्याचा प्रयत्न करूं लागला. तेव्हां त्या-वर **प्रतापसेनानें** जें भाषण केलें, त्यावरून लढाई केल्या-वांचून गति नाहीं, असें समजून आलेला वकील परत आपल्या धन्याकडे निघून गेला, व त्याणें लढाईची तयारी करण्याविषयी सल्ला दिला.

केरलराजा हा मोठा प्रबल असून त्याणें आस-पासच्या लहान मोठ्या पुष्कळ राजांचीं राज्यें बळकावलीं होतीं. वस्तुतः त्याचें राज्य ह्मटलें ह्मणजे **सह्याद्रि** आणि समुद्र यांच्या मधली जी लांबचलांब एक चिरोटी आहे तेवढ्याच प्रदेशाचें होतें; पण तो बलाढ्य झाल्यामुळें त्याणें **सह्याद्री**च्या वरचा प्रदेश फार दूरवर आक्रमण केला

होता; व ह्मणूनच त्याच्या राज्याची हद्द **प्रतापसेना**च्या जहागिरीला येऊन भिडली होती. त्या घाटमाथ्यावरच्या प्रदेशाच्या पूर्वीच्या राजाला, **मित्रवर्म्या**नें त्याचें राज्य हरण करून, कैदेंत टाकलें होतें. त्याचा पुत्र कांहीं आश्रय नसल्यामुळें **कांचीपुरां**त येऊन एखाद्या साधारण मुखवस्तु मनुष्याप्रमाणें रहात होता. त्याला बगलेंत मारून **प्रतापसेना**नें **मित्रवर्म्या**शीं लढाई करण्याचें प्रकर्ण आरंभलें! कांहीं योग्य कारण नसतां आपण दुसऱ्या राजाशीं लढाई सुरू केली तर लोक आपल्याला दोष देतील; ह्मणून तो त्या दीन झालेल्या राजपुत्राला—'त्याचें वंशपरंपरागत राज्य शत्रूनें हरण केलें आहे तें परत देवविण्याविषयीं आपण प्रयत्न करीत आहें' असें लोकांस सांगूं लागला! असो.

वर सांगितल्याप्रमाणें **मित्रवर्म्या**चा वकील परत गेला तेव्हां त्याणें लढाईची तयारी कडेकोट केली. **प्रतापसेन** तर सिद्ध होताच. उभयतांनीं आपापलीं सैन्यें सरहद्दीवर आणलीं, व लढाई सुरू झाली. **केरल**राज मोठा बलाढ्य होता तरी तो **प्रतापसेना**इतका स्वतः शूर नव्हता. **प्रतापसेन** स्वतः विलक्षण योद्धा असल्यामुळें त्या लढाईंत **केरल**राजाचा सर्वस्वीं पराभव होऊन **प्रतापसेन** विजयी झाला.

या लढाईंत **केरल**राजाचा सर्वस्वीं मोड झाल्यावरून त्याला निरुपायास्तव **प्रतापसेना**च्या ह्मणण्याप्रमाणें त्याच्या सर्व मागण्या कबूल करून तह करावा लागला, व लढाईच्या खर्चाबद्दल पुष्कळ द्रव्य द्यावें लागलें. तशीच आपल्याला वरचेवर उपद्रव न व्हावा ह्मणून

प्रतापसेनाला प्रतिवार्षिक खंडणीदाखल कांहीं रक्कम देण्याचेंही कबूल करावें लागलें! याप्रमाणें आपल्याला इष्ट होत्या त्या सर्व गोष्टी सिद्ध करून घेऊन प्रतापसेनानें केरलराजाला अभय देऊन त्याला परत जाऊं दिलें. या लढाईपासून प्रतापसेनाला फारच मोठा लाभ झाला.

लढाई उत्पन्न करतेवेळीं प्रतापसेनानें, केरलराजानें ज्याला सर्वस्वीं लुटलें अशा अनाथ झालेल्या राजपुत्राला त्याचें वंशपरंपरागत राज्य देण्याकरितां म्हणून लढाई सुरू केली होती, व त्यावरून त्यानें लोकांत आपल्या महत्वाकांक्षेवर भक्कम प्रावर्ण घातलें होतें; पण तें फार वेळ टिकलें नाहीं. लढाईनंतर झालेल्या तहाप्रमाणें घाटमाथ्यावरचा जो मोठा प्रदेश, व नगदी द्रव्य प्रतापसेनाला मिळालें त्यांतून त्याणें त्या दीन झालेल्या राजपुत्राला कांहींच दिलें नाहीं. त्यालाही हक्कानें मागण्यासारखें सामर्थ्य नव्हतें, व त्याच्या हातून लढाईच्या कामांतही कांहीं साह्य झालें नव्हतें; तेव्हां तो मागणी करणार कोणत्या तोंडानें? प्रतापसेनानें त्याला आपल्या फौजेंत एका पतकाचा मुख्य अधिकारी करून त्याचें समाधान केलें, व मिळालेला सर्व प्रदेश आपल्या राज्यास जोडला. राजकीय-प्रामाणिकतेचें स्वरूप कांहीं निराळेंच आहे. मोठमोठे धर्मिष्ठ व सत्यवचनी म्हणविणारे पुरुष प्रसंग येईपर्यंत हव्या तशा औदार्याच्या व प्रामाणिकपणाच्या गोष्टी बोलतात; पण वेळ आली म्हणजे तें सर्व एकीकडे गुंडाळून ठेवून आपल्यास वाटेल त्याप्रमाणें वर्तन करतात! हा फार प्राचीनकाळापासून एक संप्रदायच पडत चालला आहे. तेव्हां प्रतापसेनाला तरी दोष काय म्हणून द्यावा?

त्यानें जगाच्या रूढीला अनुसरूनच केलें असें म्हटलें म्हणजे पुरे आहे.

या लढाईचा परिणाम फार निराळ्या प्रकारचा झाला. प्रतापसेनाला केवळ एका मोठ्या प्रदेशाचा व पुष्कळ द्रव्याचाच लाभ झाला असें नाहीं; तर याहून निराळ्या प्रकारचे त्याला अनेक लाभ झाले. दक्षिणदेशांत केरलाधिपति राजा मित्रवर्मा हा यावेळीं मोठा प्रबल होता. इतर लहान मोठे पुष्कळ राजे होते तरी ते सर्व मित्रवर्म्याला वचकत असत. अशा बलाढ्य मित्रवर्म्याला प्रतापसेनानें अगदीं जेरीस आणला व त्याला केवळ आपला मांडलिक केला, ही गोष्ट ऐकून इतर सर्व राजे फार भयभीत झाले. प्रतापसेन हा मोठा योद्धा अमून नेहमीं युद्धास तयार आहे; तेव्हां आज केरलराजावर त्यानें स्वारी केली, उद्यां आपल्यावर तो मोर्चा फिरवणार नाहीं कशावरून? असें समजून दक्षिणेंतील सर्व राजे त्याच्याशीं स्नेहाचा तह करण्याविषयीं प्रयत्न करूं लागले. चोलराज हा त्याचा प्रत्यक्ष सासरा होता तरी राजकीय संबंधांत नात्याचा फारसा उपयोग पडणार नाहीं, असें समजून त्यानें आणखी कांहीं प्रदेश देऊन प्रतापसेनाशीं दोस्ती केली. कर्नाटकचा राजा पतंगवर्मा हा सांप्रत त्याचा पिता परलोकवासी झाल्यावरून मुख्य राज्याधिकारी झाला होता. त्यानेंही स्नेहपूर्वक मोठा नजराणा देऊन व आपल्या राज्यापैकीं कांहीं भाग देऊन प्रतापसेनाशीं तहनामा केला. याप्रमाणेंच पांड्यदेश, त्रिगर्तदेश, कुंतलदेश वगैरे ठिकठिकाणच्या राजांनीं प्रतापसेनाशीं दोस्ती संपादन केली.

याप्रमाणें दक्षिणेंतील सर्व राजांनीं त्याच्याशीं नम्रपणानें व स्नेहानें तह केल्यावरून **प्रतापसेना**चें प्रस्थ फारच मोठें झालें. तो आपण दक्षिणेंतला सार्वभौमराजा असें म्हणवून घेऊं लागला. खरोखरी त्याची तितकी योग्यताही वाढली होती. सासऱ्यानें लहानशी जहागीर दिली व तिच्यावर ज्याणें आपल्या प्रतापानें सार्वभौम म्हणवून घेण्याइतकी योग्यता संपादन केली, त्या शूर **प्रतापसेना**ला हावेळपर्यंत राज्याभिषेक झाला नव्हता. **चोल**-राजानें केवळ त्याला एक जहागिरदार बनविलें होतें. त्यावेळीं देखील तो आपल्याला त्या प्रदेशाचा राजाच म्हणवून घेत होता; तरी विधिपूर्वक त्याला राज्याभिषेक झाला नव्हता. **सांप्रत** सर्वप्रकारें आपण तो संस्कार करून घेण्यास योग्य आहों, असें समजून **प्रतापसेना**नें पट्टाभिषेक करून घेण्याची तयारी चालविली.

एक दिवस नियमित करून त्या दिवशीं त्याणें आपल्या अथवा मांडलिक दोस्त झालेल्या सर्व राजांला येण्याविषयीं सूचना पाठविल्या. देशदेशांहून मोठेमोठे विद्वान् व प्रतिष्ठित अशा लोकांना आमंत्रणें पाठविलीं. वाचकांला या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटेल कीं, थोड्या दिवसांपूर्वी ज्याच्या घराशेजारीं विद्वान् लोकांचा मोठा समाज जमला असून तिकडे ज्याणें ढुंकून देखील पाहिलें नाहीं, त्या **प्रतापसेना**ला इतक्या लौकर विद्वानांची योग्यता कशी समजूं लागली, व त्याणें त्यांला आमंत्रणें तरी कशीं पाठविलीं? वस्तुतः ही गोष्ट खरी आहे, तथापि त्यावेळच्या आणि सांप्रतच्या **प्रतापसेना**च्या स्थितींत मोठें अंतर होतें. लक्ष्मीचें असें म्हणणें आहे कीं, 'मी ज्याच्यावर अनुग्रह

करतें त्याला अतिशय नम्र व मनमिळाऊ असा बनवितें.' प्रतापसेनानें मोठें राज्य मिळविलें म्हणून तो यावेळीं मोठा विद्वान् झाला होता असें नाहीं, तरी त्याचा हूडपणा जाऊन सांप्रत तो पुष्कळ निवळला होता. यावेळीं तो ज्या मोठ्या योग्यतेवर आरूढ झाला होता तिला साजेल अशा प्रकारचें त्याला वर्तन ठेवावें लागत होतें, व लक्ष्मीनें त्याला अत्यंत नम्रही केलें होतें, यामुळें सांप्रदायाप्रमाणें विद्वानांला बोलावणें हें आवश्यक असें समजून त्याणें त्याप्रमाणें व्यवस्था केली, यांत फारसें आश्चर्य नाहीं. असो.

ठरलेल्या दिवशीं मोठ्या समारंभानें प्रतापसेनाला कुमुदिनीसहवर्तमान रत्नखचित सिंहासनावर बसवून अनेक विद्वान् ब्राह्मणांनीं यथाविधि राज्याभिषेक केला. छत्रचामरादि राजचिन्हें त्याच्याकडून धारण करविलीं. त्या समारंभाला आलेल्या सर्व लहान मोठ्या राजांनीं त्याला नजर नजराणे केले. बंदी, भाट वगैरे स्तुतिपाठक लोक त्याचें यश गाऊं लागले. ब्राह्मणांनीं आशीर्वादांची वृष्टि केली. वारांगना नृत्य करूं लागल्या. त्यावेळच्या मंगलकारक वाद्यांचा ध्वनि कर्णविवरांत प्रविष्ट होऊन द्वेष्टचांच्या हृदयांला संताप, व मित्रांच्या हृदयांला आनंद देऊं लागला. जिकडे तिकडे सर्व लोकांनीं त्याचा जयजयकार केला. पुत्राचें ऐश्वर्य पाहून, कांतिसेन व विजया यांच्या डोळ्यांवाटे आनंदाश्रूंच्या धारा गळूं लागल्या. जें कांचीपूर यापूर्वीं मोठें क्षेत्र म्हणून प्रसिद्ध होतें, तें आतां दक्षिणदेशच्या सार्वभौमराजाची राजधानी या नात्यानें प्रसिद्धीस आलें.

महाराज प्रतापसेन भुजबलानें संपादन केलेल्या

ऐश्वर्याचा यथायोग्यप्रकारें उपभोग घेत होत्साता सुखानें राज्य करूं लागला. तो एवढें मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें तरी कधीं उद्दाम झाला नाहीं. शत्रूशीं मात्र तो मोठ्या ताठ्यानें वागत होता; पण आपल्या प्रजेशीं कधीं उद्दामपणानें वागला नाहीं. वाकी सर्व गोष्टींत त्याला मोठा आनंद वाटत होता; पण बायकोच्या संबंधानें मात्र त्याचें मन फारसें संतुष्ट नव्हतें. पूर्वजन्मांतील संस्कारानें परवश झाला म्हणूनच कीं काय, तो एकप्रकारें ब्रह्मचारीच बनला होता. त्याच्या कामवासनेला जागृत करणारी **शांति** अथवा पूर्वजन्मींची **सुंदरी** हिचें अद्याप त्याला दर्शन झालें नव्हतें, व प्राक्तन संस्काराला उद्बोधित करणारा समागमाचा योग तर मुळींच आला नव्हता. त्याच्या त्या असंतोषाचा परिहार करावा म्हणूनच कीं काय, **शांति** त्याच्या हातीं सांपडली, व तो पुन्हा तिच्या भोंवतीं घिरट्या घालूं लागला!

मंत्रदत्त आणि त्याची स्त्री **शांति** हीं आपल्या घरीं संसार करून रहात होतीं, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. **मंत्रदत्ताला** भिक्षुकी करणें आवडत नव्हतें; तरी बापाच्या आग्रहास्तव त्याला तिचा स्वीकार करणें भाग पडलें. व संसार चालविण्यास पाहिजे तितकें द्रव्य मिळण्याचें दुसरें कांहीं साधनही नव्हतें; तेव्हां भिक्षुकी न करून कसें चालणार? तो विद्वान् असल्यामुळें भिक्षुकीसंप्रदायाप्रमाणें त्याला नेहमीं आमंत्रणें येत असत. कोठें कांहीं हव्यकव्य झालें तर त्यांत **मंत्रदत्ताला** आमंत्रण नाहीं असें बहुधा होत नसे. एके दिवशीं **कांचीपुरा**च्या उत्तरेस सुमारें चार कोसांच्या अंतरावर एक मोठा

अग्रहार[1] होता. तेथें एका ब्राह्मणाच्या घरीं चातुर्मास्य नांवाचा यज्ञ असून त्याणें त्याकरतां **मंत्रदत्ताला** सकुटुंब बोलावून नेला होता. ज्या गृहस्थानें त्याला बोलावून नेलें होतें, त्याच्या घरचें कृत्य यथासांग आटपलें; तेव्हां **मंत्रदत्त** आपल्या स्त्रीसहवर्तमान परत आपल्या घरीं जाण्यास निघाला तो अग्रहार व **कांचीपूर** यांच्या दरम्यान एक लहानशी पर्वताची ओळ असून तीवर बरीच झाडी होती. त्या झाडींत केव्हां केव्हां श्वापदांचा व चोरांचिलटांचा उपद्रव होत असे. **प्रतापसेनानें** आपल्या कारकीर्दींत

---

१ अग्रहार हा शब्द दक्षिणेंत फार प्रसिद्ध आहे. तरी आपल्या महाराष्ट्र देशांत तो सर्वांस माहीत असण्याचा संभव नाहीं. याकरतां त्याचें थोडेंसें येथें वर्णन केलें पाहिजे. आपल्या महाराष्ट्र देशांत बहुधा तितका निर्बंध नाहीं. ब्राम्हणाच्या घराला लागून मुसलमानाचें किंवा दुसऱ्या पाहिजे त्याचें घर असलें तरी त्याबद्दल कोणी विधिनिषेध मानीत नाहींत; पण मलबार, द्रविड, तैलंग, वगैरे देशांत अद्याप देखील याविषयीं मोठा निर्बंध मानतात. ब्राह्मणलोकांच्या वस्तींत इतर जातींचीं घरें बिलकूल असावयाचीं नाहींत. सर्व ब्राम्हण एकाच निवांत प्रदेशांत रहावयाचे. शहरांत व्यापारधंदा किंवा रोजगार करणाऱ्या लोकांची गोष्ट निराळी; पण जे लोक आपल्या ब्राह्मणी संप्रदायाप्रमाणें वागतात ते तरी वर सांगितल्याप्रमाणें राहतात. ज्या प्रदेशांत ब्राह्मणांची वस्ती असेल त्याला अग्रहार ह्मणण्याची चाल आहे. हे अग्रहार बहुतकरून विद्वान् ब्राह्मणाला दान दिलेले असतात. कोंकणपट्टींत कांहींशी अशाच प्रकारची स्थिति असल्याचें दिसून येतें. तेथें बहुतकरून गांव व त्याच्या जवळच भटवाडी म्हणून एक असते. वर सांगितलेल्या देशांतले अग्रहार व भटवाडी यांचें पुष्कळ सादृश्य आहे. भटवाडींत इतर लोकांची वस्ती बहुतकरून नसते.

व्यवस्था उत्तम ठेवल्यामुळें चोरांचा उपद्रव नाहींसा झाला होता; तरी श्वापदें त्या वाटेनें जाणाऱ्यायेणाऱ्याला केव्हां केव्हां पछाडीत असत.

मंत्रदत्त आपली प्रियपत्नी **शांति** इच्यासहवर्तमान त्याच झाडींतून **कांचीपुरा**कडे चालला होता. तो अग्रहारांतून भोजन करून निघाला होता. हळुहळु बायकोशीं गोष्टी बोलत बोलत **मंत्रदत्ता**ची स्वारी त्या टेंकडीवर येऊन पोहोंचली. गोड गोड पदार्थ खाल्ल्यामुळें यावेळीं त्याला फार तृषा लागली होती. रस्त्यावर कोठें जलाशय नव्हता; तरी उजव्या बाजूला जवळच त्या टेंकडीच्या एका शिखराच्या पायथ्याशीं उत्तम जलाशय होता. **मंत्रदत्ता**नें आपल्याला तहान लागली असें सांगितल्यावरून उभयतां त्या तळीवर येऊन पोहोंचलीं. त्याच्या खांद्यावर कांहीं थोडें सामान बांधलेलें होतें तें खालीं ठेवून **मंत्रदत्त** तळींत उतरला, व हस्तपाद प्रक्षालन करून त्याणें यथेच्छ उदक प्राशन केलें, व **शांती**लाही पाजलें. नंतर कांठावर येऊन उभयतां अंमळ विश्रांति घेत बसलीं.

योगायोग मोठे विलक्षण असतात. तें दंपत्य त्या तळीच्या कांठीं विश्रांति घेत बसलें आहे, इतक्यांत त्यांच्यावर मोठें अरिष्ट आलें. त्या टेंकडीच्या जवळच चढणीवर एक मोठी गुहा होती, व तिच्या तोंडाशीं लहान वेलींचा एक सघन कुंज बनलेला होता. वाघाचें त्या ठिकाणीं नेहमीं वास्तव्य असे. दुर्दैवानें प्रेरणा केली म्हणूनच कीं काय, **मंत्रदत्त** त्या तळीवर केवळ मृत्यूच्या मुखांत पडण्याकरतांच गेला होता. उदक पिऊन तो तेथून लौकर निघाला असता तर कदाचित् त्याचे प्राण वांचले असते;

पण पुढें होणाऱ्यासारखी बुद्धि होत असते; म्हणून पोटा-वरून हात फिरवीत तेथेंच विश्रांति घेत बसावें, असें त्याला वाटलें! गुहेत बसलेला वाघ आपल्याला कोणी भक्ष्य येतो कीं काय, याची वाटच पहात होता. हें दुर्दैवी दंपत्य तेथें बसलेलें त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां तत्काल त्या क्रूर प्राण्यानें एक उडी इतकी जोरानें मारली कीं, तो सपाट्यासरसा त्यांच्या जवळ येऊन पोहोंचला. **मंत्रदत्त** त्या गुहेकडच्या बाजूला पाठ करून बसला होता, व **शांति** अंमळ पलीकडे होती. त्या क्रूर श्वापदानें भयंकर गर्जना क-रून दुर्दैवी **मंत्रदत्तावर** झडप घातली! मग काय विचारतां! प्रत्यक्ष व्याघ्रच तो! शांतिरस्तु पुष्टिरस्तु करणाऱ्या मंत्रद-त्तभटजीला त्याच्या तडाक्यांतन कसें सुटतां येणार! त्याणें तत्काल त्याच्या नरडीचा घोंट घेऊन त्याला आपल्या पाठीवर टाकून तो परत आपल्या बिळांत शिरला.

शांति जवळच होती, तिच्या तो वाघ दृष्टी पडला, व त्याणें जी प्रथमच मोठ्यानें गर्जना केली, तिच्या योगानें तिच्या काळजांत धडकी भरून तत्काल ती मूर्च्छित झाली. **मंत्रदत्ताला** वाघानें मारून त्याचें प्रेत आ-पल्या बिळांत नेलें तरी तिला त्याचें वर्तमान देखील न-व्हतें. ती अगदीं बेशुद्ध होऊन पडली होती, ती लौकर सावध झाली नाहीं. खरोखर यावेळीं तिला कोणी सावध करणारा भेटला नसता तर तिचे प्राण गेलेच असते; पण आयुष्याची दोरी सबळ होती. वाघ असो, सर्प असो, किंवा, प्रत्यक्ष यमराज असो, ईश्वराची आज्ञा सर्वांला प्रतिबंधक आहेच. **मंत्रदत्त** आणि **शांति** हे दोन प्राणी तेथें होते. वाघानें **मंत्रदत्तावरच** कां उडी घातली? **शांतीवर**

झडप घालण्याची त्याला कां बुद्धि झाली नाहीं ? किंवा दोघांलाही त्याणें कां मारलें नाहीं? या प्रश्नांचें उत्तर इतकेंच कीं, जगन्नियंत्याची आज्ञा. त्याचा हुकूम झाला, म्हणूनच **मंत्रदत्ता**वर तसा प्रसंग गुदरला, व **शांति** त्या सभाव्यांतून बचावली असें झालें तरी तिला सावध करणारा तेथें कोणी नव्हता; पण ईश्वरानें तोही यावेळीं हजर केला.

प्रतापसेनाला लहानपणापासून शिकारीचें मोठें व्यसन होतें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. विशेष महत्वाचें असें राजकीय काम नसलें तर तो प्रति दिवशीं लहान मोठी शिकार केल्यावांचून रहात नसे, व तिचा त्याला इतका नाद होता कीं, एक एक दोन दोन दिवस तो जंगलांतच फिरत असे. जेवणाखाणाची त्याला मुळींच परवा वाटत नव्हती. दैवयोगानें यावेळीं **प्रतापसेन** त्याच प्रदेशांत शिकार शोधीत फिरत होता. त्या दिवशीं शिकार लवकर मिळाली नाहीं; म्हणून तो तिसरा प्रहर होऊन गेला तरी जंगलांतच होता. **मंत्रदत्ता**वर उडी घालतेवेळीं वाघानें जी गर्जना केली होती ती व त्याचें भयंकर स्वरूप पाहून मूर्च्छित होण्यापूर्वी **शांती**नें जी किंकाळी फोडली ती, हे दोन्ही आवाज **प्रतापसेना**ला ऐकूं आले होते. त्या प्रदेशांत जिकडे तिकडे लहान लहान झाडें असल्यामुळें इकडे जलाशयावर काय अनर्थ झाला तो त्याच्या दृष्टीस पडला नव्हता; तरी जो प्रथम ऐकूं आला तो वाघाचा शब्द व नंतर ऐकूं आला तो कोणातरी मनुष्याचा शब्द, हें त्याणें पुरतेपणीं ओळखलें.

प्रतापसेनाला शिकार पाहिजेच होती. येथें वाघ आहे

पण पुढें होणाऱ्यासारखी बुद्धि होत असते; म्हणून पोटा-वरून हात फिरवीत तेथेंच विश्रांति घेत बसावें, असें त्याला वाटलें! गुहेत बसलेला वाघ आपल्याला कोणी भक्ष्य येतो कीं काय, याची वाटच पहात होता. हें दुर्दैवी दंपत्य तेथें बसलेलें त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां तत्काल त्या क्रूर प्राण्यानें एक उडी इतकी जोरानें मारली कीं, तो सपाट्यासरसा त्यांच्या जवळ येऊन पोहोंचला. **मंत्रदत्त** त्या गुहेकडच्या बाजूला पाठ करून बसला होता, व **शांति** अंमळ पलीकडे होती. त्या क्रूर श्वापदानें भयंकर गर्जना क-रून दुर्दैवी **मंत्रदत्ता**वर झडप घातली! मग काय विचारतां! प्रत्यक्ष व्याघ्रच तो! शांतिरस्तु पुष्टिरस्तु करणाऱ्या **मंत्रद-त्त**भटजीला त्याच्या तडाक्यांतन कसें सुटतां येणार! त्याणें तत्काल त्याच्या नरडीचा घोंट घेऊन त्याला आपल्या पाठीवर टाकून तो परत आपल्या बिळांत शिरला.

शांति जवळच होती, तिच्या तो वाघ दृष्टी पडला, व त्याणें जी प्रथमच मोठ्यानें गर्जना केली, तिच्या योगानें तिच्या काळजांत धडकी भरून तत्काल ती मूर्च्छित झाली. **मंत्रदत्ता**ला वाघानें मारून त्याचें प्रेत आ-पल्या बिळांत नेलें तरी तिला त्याचें वर्तमान देखील न-व्हतें. ती अगदीं बेशुद्ध होऊन पडली होती, ती लौकर सावध झाली नाहीं. खरोखर यावेळीं तिला कोणी सावध करणारा भेटला नसता तर तिचे प्राण गेलेच असते; पण आयुष्याची दोरी सबळ होती. वाघ असो, सर्प असो, किंवा, प्रत्यक्ष यमराज असो, ईश्वराची आज्ञा सर्वांला प्रतिबंधक आहेच. **मंत्रदत्त** आणि **शांति** हे दोन प्राणी तेथें होते. वाघानें **मंत्रदत्ता**वरच कां उडी घातली? **शांति**वर

झडप घालण्याची त्याला कां बुद्धि झाली नाहीं ? किंवा दोघांलाही त्याणें कां मारलें नाहीं? या प्रश्नांचें उत्तर इतकेंच कीं, जगन्नियंत्याची आज्ञा. त्याचा हुकूम झाला, म्हणूनच **मंत्रदत्ता**वर तसा प्रसंग गुदरला, व **शांति** त्या संकट्यांतून बचावली असें झालें तरी तिला सावध करणारा तेथें कोणी नव्हता; पण ईश्वरानें तोही यावेळीं हजर केला.

प्रतापसेनाला लहानपणापासून शिकारीचें मोठें व्यसन होतें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. विशेष महत्वाचें असें राजकीय काम नसलें तर तो प्रति दिवशीं लहान मोठी शिकार केल्यावांचून रहात नसे, व तिचा त्याला इतका नाद होता कीं, एक एक दोन दोन दिवस तो जंगलांतच फिरत असे. जेवणाखाणाची त्याला मुळींच परवा वाटत नव्हती. दैवयोगानें यावेळीं **प्रतापसेन** त्याच प्रदेशांत शिकार शोधीत फिरत होता. त्या दिवशीं शिकार लवकर मिळाली नाहीं; म्हणून तो तिसरा प्रहर होऊन गेला तरी जंगलांतच होता. **मंत्रदत्ता**वर उडी घालतेवेळीं वाघानें जी गर्जना केली होती ती व त्याचें भयंकर स्वरूप पाहून मूर्च्छित होण्यापूर्वीं **शांती**नें जी किंकाळी फोडली ती, हे दोन्ही आवाज **प्रतापसेना**ला ऐकूं आले होते. त्या प्रदेशांत जिकडे तिकडे लहान लहान झाडें असल्यामुळें इकडे जलाशयावर काय अनर्थ झाला तो त्याच्या दृष्टीस पडला नव्हता; तरी जो प्रथम ऐकूं आला तो वाघाचा शब्द व नंतर ऐकूं आला तो कोणातरी मनुष्याचा शब्द, हें त्याणें पुरतेपणीं ओळखलें.

प्रतापसेनाला शिकार पाहिजेच होती. येथें वाघ आहे

असें समजून तो त्याच्या शब्दाच्या ध्वनीवरून थेट त्या तळीच्या काठीं येऊन पोहोंचला. तेथें त्याला वाघ तर कोठें दिसला नाही; पण बेशुद्ध होऊन पडलेली **शांति** मात्र त्याच्या दृष्टीस पडली. तेथें जवळच कांहीं रक्ताचे थेंब पडले होते, त्यावरून वाघानें या स्त्रीच्या बरोबरच्या कोणा मनुष्याला मारलें असावें, व त्यामुळें ही भयभीत होऊन मूर्च्छित झाली आहे, असें तो समजला. जरी तो यावेळीं शिकारीच्या नादांत होता, तरी त्या अनाथ **शांती**ला मूर्च्छित पडलेली पाहून तिला आधीं सावध करून मग वाघाचा समाचार घ्यावा, असें त्याच्या मनांत आलें, व त्यानें तत्काल आपल्या अंगावरचा शेला भिजवून **शांती**च्या अंगावर पिळला. व ओंजळीनें पाणी आणून तिच्या डोळ्यांवर व मस्तकावर घातलें, व वारा घालूं लागला; तेव्हां कांहीं वेळानें, तिच्यावर अगदीं प्रेतकळा आली होती ती जाऊन, ती हातपाय हालवूं लागली, व लौकरच जांभया देत उठूनही बसली. प्रीति, स्नेह वगैरे मनोविकार हे कांहीं आकस्मिक व जन्मांतरार्जित संस्कारांनीं घडत असतात. महाराज **प्रतापसेन** हा सार्वभौम होता. हजारों पद्मिणीसारख्या सुंदर स्त्रिया त्याच्या सेवेंत तत्पर असण्याविषयीं इच्छा करीत होत्या. स्वतः त्याची पत्नी **कुमुदिनी** अत्युत्तम रूपवती केवळ लक्ष्मीच अशी होती; तरी त्या सर्वही ज्याचें मन हरण करण्याला समर्थ झाल्या नाहींत, त्या शूर व धैर्यशाली **प्रतापसेना**च्या मनाला सामान्य एका भिक्षुकाची स्त्री—जिच्या अंगावर दागिने नाहींत, उंची वस्त्रें नाहीं, व नीट केशसंस्कारादिक देखील नाहींत अशा **शांती**नें तत्काल हरण केलें! **शांति** अद्याप पुरतीशी सावध झाली नव्हती. तिच्या उरांतील

धडकी अद्याप कमी न झाल्यामुळें तिनें प्रतापसेनाकडे लक्ष्यपूर्वक पाहिलें देखील नव्हतें; पण तो मात्र तिच्याकडे चित्रवत् एकसारखा टक लावून पहात उभा राहिला. त्याचें मन इतकें मोहित झालें कीं, तो एवढा धैर्यशाली असतांही तत्काल तिला मिठी मारण्याविषयीं त्याची प्रवृत्ति झाली.

इकडे **शांति** चांगली सावध होऊन उठून उभी राहिली. तिला **मंत्रदत्ताला वाघानें** नेलें हें दिसलें नव्हतें; तरी तो तेथें दृष्टीस पडला नाहीं यावरून खचीत त्याचा नाश झाला असेल, अशी तिची खात्री झाली. दुःखानें घाबरून गेल्यामुळें तिला बराच वेळ रडूं देखील आलें नाहीं. खालीं मान घालून ती तटस्थ उभी होती, व नंतर हळुहळु तिच्या डोळ्यांतून टपटप अश्रुबिंदु गळूं लागले. तिनें रडें सांवरून धरण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केला, तरी अनावर होऊन तें एकदम बाहेर पडलें व उंचस्वरानें ती रडूं लागली.

इकडे राजा **प्रतापसेन** चित्रवत् तो चमत्कार पहात उभा राहिला होता. त्याची वृत्ति तिच्या ठिकाणीं तल्लीन झाल्यामुळें **शांती**चें समाधान करावें किंवा तिला मिठी मारावी किंवा शिकार साधावी, यांतून त्याला एक देखील सुचेनासें झालें. इकडे **शांति** एकसारखी बराच वेळ रडून रडून थकली. तिनें आपल्या दुःखरूपी तलावाला रडें हाच एक पाट फोडून त्यांतलें अतिरिक्त झालेलें उदक बाहेर घालविलें; तेव्हां अर्थात् लौकरच आपोआप तिचें रडें बंद झालें. रडें बंद झालें तरी उभयतां तशींच तटस्थ उभीं राहिलीं होतीं. परस्परांला कांहीं विचारण्याचें देखील सुचलें नाहीं. मुळींच

शांतीला पाहून स्वतः **प्रतापसेना**च्या मनांत तिच्याविषयीं स्नेह उत्पन्न झाला; तसाच **प्रतापसेना**ला पाहून तिलाही स्नेह उत्पन्न झाला. उभयतांच्या स्नेहांत अंतर इतकेंच होतें कीं, राजाच्या मनांत कामवासना होती व तिच्या मनांत तो विकार मुळींच नव्हता. पति तर जवळ नाहीं, व त्याचा नाशही झाला आणि हा कोणी भाग्यशाली पुरुष आपल्या जवळ उभा राहिला आहे; पण कांहीं बोलत नाहीं, असें पाहून आपलें मन स्थिर करून शांति हळुच बोलण्यास प्रवृत्त झाली. तिला यावेळीं कोणाचें तरी साहाय्य पाहिजे होतें व **प्रतापसेना**वांचून यावेळीं जवळ दुसरा कोणी नव्हता. इतकेंही असून तिचें धैर्य पक्कें होतें, यामुळें राजाच्या मुद्रेवरून तो आपल्याकडे वाईट हेतूनें पहात आहे असें जरी तिच्या लक्षांत आलें, तरी त्याची कांहीं पर्वा न बाळगतां ती गंभीरपणानें त्याच्याशीं बोलण्यास प्रवृत्त झाली.

शांति डोळ्यांतले अश्रु पुसून खालीं मान घालून दीन-स्वरानें **प्रतापसेना**ला ह्मणाली, 'महाभागा, आपण कोण, याची मला चांगलीशी माहिती नाहीं; तरी आपली तेजःपुंज मुद्रा माझ्या डोळ्यांला दिपवीत असल्यामुळें आपण कोणीतरी महानुभाव राजे अथवा मोठे संपन्नपुरुष आहां असें वाटतें, व आपल्या मुद्रेवरूनच मजसारख्या अनाथ गाईचें रक्षण करण्याविषयीं आपण अनमान करणार नाहीं, अशी माझ्या मनाची खात्री होते. मी यावेळीं कोणत्या संकटांत आहें हें आपल्याला सांगितलें पाहिजे असें नाहीं; तर या संकटांतून मज अबलेला रक्षण करून आपण आपल्या थोरपणाचें सार्थक करावें.'

शांति असें बोलत असतां, जरी तिच्या मुखावर दुःखाचा भाव स्पष्ट दिसत होता, तरी तिचें बोलणें एखाद्या प्रौढ व शांत मनुष्यासारखें होतें. तें ऐकून प्रतापसेनाला मोठें आश्चर्य वाटलें. तिला काय उत्तर द्यावें याविषयीं त्याच्या मनांत थोडावेळ गोंधळ पडला. जरी ती या-वेळीं अगदीं अनाथ होती, तरी तिच्या तोंडावर बुद्धीचें व साध्वीपणाचें जें तेज होतें तें झांकलें नव्हतें. राजा अतिशय कामातुर झाला होता; तरी एकदम तशा प्रकारचें भाषण करण्याविषयीं त्याला धैर्य झालें नाहीं. त्यानें तिचें भाषण शांतपणानें ऐकून अंमळ विचार केला. व एकंदरींत ही आपल्या हातांत सांपडलीच आहे; तेव्हां एव्हांशींच उतावळी करण्यापेक्षां आधीं हिचें सांत्वन करून मग आपल्या हेतूच्या संबंधानें हिच्या जवळ गोष्ट काढावी, असें त्याच्या मनांत आलें.

प्रतापसेन शांतीला म्हणाला, 'जशी तुला माझ्याविषयींची विशेष माहिती नाहीं, तशीच मलाही तुझ्याविषयीं कांहीं माहिती नाहीं. शिकारीचा शोध करीत फिरत असतां वाघाची गर्जना व लगेच कोणा मनुष्याची किंकाळी ऐकून मी येथें आलों. ती किंकाळी बहुतकरून तुझीच असावी, असें तुला पाहिल्यावर माझ्या लक्षांत आलें. तूं बेशुद्ध पडली होतीस, म्हणून मीं तुला सावध करण्याविषयीं कांहीं प्रयत्न केला. एकंदरींत तूं अत्यंत भयभीत झाली आहेस, व तुझा कोणी अत्यंत मनुष्य व्याघ्रानें भक्षण केला असावा असें वाटतें. यद्यपि त्या दुष्टानें तसें केलें असेल तर आतां त्याविषयीं माझा कांहीं उपाय नाहीं; तथापि त्याला शिक्षा करून मी एकप्रकारें तुझें सांत्वन

करावें अशी इच्छा करीत आहें. यावांचून दुसरें कांहीं तुझें दुःख असलें तर तें सांग. त्याचें निवारण करण्याविषयीं मी मनापासून प्रयत्न करीन.'

शांतीनें रडें आवरून धरलें होतें; पण प्रतापसेनानें आप्तांचें नांव घेतलें तेव्हां तिला पुन्हा रडें कोसळलें. तरी ती मोठी विचारी होती. व्यर्थ शोक करून कांहीं उपयोग नाहीं असें समजून तिनें आलेला उमाळा जागच्याजागीं मोठ्या प्रयत्नानें दाबून टाकला, आणि प्रतापसेनाला म्हणाली, 'माझा आप्त म्हणजे काय? ज्याला ह्या जगांत परम आप्त म्हणावयाचें त्याचाच नाश झाला आहे! तो दुष्ट प्राणी त्यांला कोठें घेऊन गेला, तें मीं पाहिलें नाहीं; तरी ह्या समोरच्या झाळकींतून तो बाहेर निघाला होता हें मात्र मीं पाहिलें होतें. त्याचा सूड घेतल्यानें माझा जो सर्वस्वी घात झाला आहे तो म्हणजे भरून येईल असें नाहीं; तरी अडाणीसमजुतीनें त्याचा नाश झाला असतां मला कांहींसें बरें वाटेल. पण अशा ह्या साहसाविषयीं आपल्याला प्रवृत्त करण्यास मी कारण होऊं इच्छित नाहीं. परमेश्वर करो आणि तसा प्रसंग वैऱ्यावर देखील न येवो. आपण तर माझे साह्यकर्तेच आहां, तेव्हां त्या मेल्या घातकी प्राण्यावर आपण चालून जा, असें मी कधींही सांगायची नाहीं.'

शांतीच्या बोलण्यावरून, तिचा पतीच वाघानें भक्षण केला, हें प्रतापसेनाला समजलें. प्रतापसेनानें वाघावर चालून जावें हें तिला मान्य नव्हतें, तरी तिच्या देखत त्या प्राण्याचा नाश करून क्षणभर तिला समाधान होईसें करावें, असें त्याच्या मनांत आलें. व आजच्या साऱ्या दिवसांत शिकार

न मिळाल्यामुळें आपल्याला जो खेद झाला आहे तो नाहींसा होऊन एकांत दोन कामें होतील; असें समजून —'तं अंमळ येथेंच स्वस्थ उभी रहा. माझ्याविषयीं कांहीं काळजी करूं नको. मी आतांच त्या दुष्टाचा नाश करतों, 'असें सांगून **प्रतापसेन** त्या वाघाच्या ढोली-कडे गेला. शिकारीचीं सर्व साधनें त्याच्या बरोबरच होतीं. त्याणें आपल्या अंगांत चिलखत घातलें असून हातांत धनुष्यबाण, पाठीला भाता व कमरेला तरवार अशी त्याची तयारी होती. यावेळीं धनुष्याचा कांहीं उपयोग नाहीं असें समजून, त्याणें तें दंडांत अडकविलें आणि नागवी तरवार हातांत घेऊन ढोलीजवळ गेला. तेंथें वाघाला मोठ्यानें हांक मारून त्याणें त्याला खूप राग येईल असें केलें. तेव्हां तत्काल तो क्रूर प्राणी चवताळून त्याच्या अंगावर आला. **प्रतापसेन** सावधच होता वाघानें अंगावर उडी टाकण्याच्या पूर्वीच त्याणें तर-वारीनें त्याच्या शरीराचीं दोन शकलें केलीं; तेव्हां तो तत्काल गतप्राण झाला. नंतर त्याचें शेंपूट धरून ओढीत ओढीत त्याला **शांती**च्या पुढें आणून टाकला. व 'ज्या दुष्टानें तुझ्या प्रिय भर्त्याचा नाश केला, त्याचा प्राण घेऊन मी तुझ्या नवऱ्याचा सूड उगविला,' असें त्याणें शांतीला सांगितलें.

खरोखर शौर्य ही एक अजब चीज आहे. बाकी सर्व गुण एकीकडे आणि केवळ शौर्य एकीकडे. स्त्रियांला शौर्याची मोठी चाड असते. त्या शूर पुरुषाला विशेष चाहतात. **प्रतापसेन** वाघाच्या ढोलीजवळ गेला, तेव्हां **शांती**ला नवेंच एक दुःख उत्पन्न झालें होतें. जरी तिचा त्या-

च्याशीं स्नेह नव्हता; तरी त्याणें आपल्याला सावध केलें, व तो केवळ आपल्या नवऱ्याचा मूड उगविण्या करतांच ह्या साहसाला प्रवृत्त झाला, हें पाहून तिच्यावर तें एक प्रकारचें संकटच आलें होतें; पण **प्रतापसेनानें** त्या वाघाला मारून आणला तेव्हां तिला फार संतोष झाला. यावेळीं तें त्याचें साहस व तें विलक्षण सामर्थ्य पाहून ती क्षणभर अगदीं तल्लीन होऊन गेली; तरी तिच्या मनाची मात्र चलबिचल झाली नाहीं. दुसरी एखादी अल्प समजुतीची स्त्री असती, तर खरोखर यावेळीं ती आपण होऊन **प्रतापसेनाला** अनुसरली असती; पण त्या दृढनिश्चयी **शांती**च्या मनांत दुष्ट विकारांचा गंध देखील आला नाहीं.

प्रतापसेनानें जें कृत्य केलें त्याबद्दल ती त्याची अतिशय आभारी झाली; तरी **वाघा**च्या ढोलींत आपल्या भर्त्याच्या अस्थि पडल्या असतील त्या मिळाल्या तर आपण सहगमन करावें असें तिच्या मनांत आलें. ह्मणून तिणें **प्रतापसेनाला** विनंति केली कीं, 'आपण दयाळु होऊन इतकें केलें तशा मला तेवढ्या अस्थि द्याव्यात्.' वस्तुतः सती जाण्यांत दोन प्रकार आहेत. सहगमन आणि अनुगमन. अर्थात् बरोबर जाणें आणि मागाहून जाणें. ब्राह्मणस्त्रियांला सहगमनच विहिब आहे. ब्राह्मणी अनुगमन करीत नसत. क्षत्रिय बहुतकरून कोठें तरी युद्धांत मरण पावतात, तेव्हां त्यांच्या स्त्रियांला सहगमन करतां येत नाहीं; ह्मणून त्यांला अनुगमन शास्त्रकारांनीं विहीत सांगितलें आहे. **शांति** मोठी विदुषि होती. तिला शास्त्राचें रहस्य माहित होतें, असें असून तिणें सांप्रत अनुगमनाविषयीं तयारी केली; हें पाहून **प्रतापसेनाला** मोठें आश्चर्य

वाटलें. तो म्हणाला, 'तूं अमक्या जातीची स्त्री आहेस, हें मला अद्याप माहीत नाहीं, तरी लक्षणांवरून तूं ब्राह्मणी असावीस असें वाटतें. आणि ब्राह्मणीनें अनुगमन केल्याचें आपण कधीं कोठें ऐकलें नाहीं. सहगमन करण्याचा त्यांचा सार्वत्रिक प्रचार आहे. असें असून तूं अनुगमन करणार म्हणतेस हें काय? तें मला बरोबर समजत नाहीं.'

कोणत्याही रितीनें तिनें देहत्याग करूं नये हाच प्रतापसेनाचा मुख्य हेतु होता, व त्याणें अनुगमन करण्याची चाल ब्राह्मणांत नाहीं असें सांगितलें ती गोष्टही अगदीं प्रसिद्ध होती. त्याचें भाषण ऐकून, शांति म्हणाली, 'आपण सांगितलें तें खरें आहे, व मलाही तो नियम माहीत आहे, तथापि अनुगमन हा एक गौणपक्ष स्वीकार केल्यानें माझ्या सर्व दुःखांचा परिहार होईल. म्हणून मीं तसें करणार म्हणतें. यावेळीं मीं अगदीं निराश्रित झालें आहें. सासुसासरे अत्यंत वृद्ध असून गरीब आहेत. माहेर चांगलें होतें; पण वडील व मातुश्री परलोकवासी झाले असून बंधु दुराचारी आहेत, यामुळें मला तिकडचाही आश्रय नाहीं. तेव्हां वैधव्यदुःख आणि त्यांतच ही काळजी यांच्या योगानें मला अतिशय संताप होणार आहे. बरें इतकेंही करून प्राण धारण केले, तरी त्यांचा उपयोग काय? ज्याच्या करतां हें माझें शरीर विधात्यानें निर्माण केलें तो तर लोकांतराला गेला. आतां हें असून आणि नसून सारखेंच आहे! तेव्हां गौणपक्षाचा स्वीकार कां होईना; पण अनुगमन करून सर्व दुःखांचा शेवटा करावा हेंच मला योग्य आहे.'

शांति मोठी विदुषि असल्यामुळें प्रतापसेनासारख्या शास्त्रानभिज्ञ मनुष्याच्या हातून तिचें काय समाधान होणार? प्रतापसेन ह्मणाला, 'तें तुझें कांहीं असो. तूं आपल्या निर्वाहाची जी अडचण दाखविलीस तिच्याविषयीं कांहींच काळजी नाहीं. गौण असो, किंवा मुख्य असो, विनाकारण शरिराचा नाश करणें हें मला योग्य वाटत नाहीं व तसें करणाराला धर्माधिकाऱ्यानें प्रतिबंध करणें हें त्याचें कर्तव्य आहे; ह्मणून मी तुला ही गोष्ट करूं देणार नाहीं.'

प्रतापसेनाच्या या भाषणावरून सहज दुसऱ्या एका गोष्टीचा खुलासा झाला. हा कोण हें शांतीला मुळींच ठाऊक नव्हतें, व दुसऱ्याच विषयाकडे तिचें लक्ष असल्यामुळें तिणें त्याबद्दल प्रश्नही केला नाहीं; पण प्रतापसेनाच्या तोंडांतून 'धर्माधिकाऱ्यानें प्रतिबंध केला पाहिजे' हीं अक्षरें सहज निघालीं त्यावरून हा राजा आहे, असें ती समजली. ती ह्मणाली, 'धर्माधिकारी असेल त्याणें प्रतिबंध करावा असें ह्मणतां तर आपण खरोखरच तसे अधिकारी आहां काय? आणि असलां तर कोणत्या ठिकाणचे?'

प्रतापसेनाला आपण महाराज आहें इतकें देखील स्वमुखानें सांगण्याविषयीं लाज वाटत होती. तो ह्मणाला, 'त्याची चौकशी करून तुला काय करायचें आहे. आतां तूं कोणत्याही गोष्टीची काळजी करूं नकोस. कालगतीनें जें व्हावयाचें होतें तें झालें. माझ्या बरोबर तूं शहरांत चल. तुला कोणत्याही गोष्टीची ददात अथवा कसलेंही संकट मुळींच पडणार नाहीं. तुझी सर्व कांहीं व्यवस्था लागेल.'

शिष्ट संप्रदायाविरुद्ध असल्यामुळें अनुगमन करणें हें शांतीलाही चांगलेंसें वाटलें नव्हतें; ती दुःखाच्या आवेशांत अनुगमन करणार असें बोलून गेली, तरी प्रतापसेनानें त्याचा निषेध केल्यावरून तिनें तो बेत रहित केला. प्रतापसेनानें आपलें रक्षण करण्याचें कबूल केलें आहे, व त्याप्रमाणें तो करीलही; पण त्यापासून आपल्यावर कुकर्माचरणाचें संकट येऊं नये याविषयीं काय तोड काढावी, या विषयीं शांतीला मोठा विचार पडला. पुरुषांच्या सामान्य स्वभावावरून व प्रतापसेनाच्या वर्तनावरून तो आपल्याविषयीं सकाम आहे हें त्या चतुर स्त्रीच्या लक्ष्यांत येण्याविषयीं विलंब कशाला लागेल? सांप्रत ती ज्या संकटांत होती, त्यांतून आपली मुक्तता करून घेणें व पुढें आपला प्रतिपाळ होणें ह्या दोन गोष्टी तिला अत्यंत अपेक्षित होत्या. यद्यपि अन्य जन्मांत तिनें विशेष तप केलें होतें, व ती मोठी विदुषि होती, तथापि एखाद्या गोसाव्या वैराग्याप्रमाणें वर्तन करणें तिला अशक्य होतें, व तिची तशी इच्छाही नव्हती. आपला पालक होता तो तर गेलाच, तेव्हां आतां आपल्या सुखदुःखाचा विभागी—जो आपल्यावर डोळा ठेवील तोच होईल, हें तिच्या लक्षांत येऊन चुकलें होतें; तेव्हां अन्याचा आश्रय करण्यापेक्षां ज्यानें आपल्याला अशा संकटकाळीं साह्य केलें, त्याचाच आश्रय करावा, व ह्या रितीनें एकप्रकारें त्याचें उतराई व्हावें, असा विचार करून तिनें राजा प्रतापसेनाच्या ह्मणण्याला अनुमोदन दिलें; तेव्हां प्रतापसेन मोठ्या आनंदानें तिला घेऊन घराकडे निघाला.

शांति ही मोठी विदुषि असल्यामुळें तिची गांवांत

निदान ब्राह्मणमंडळींत तरी विशेष प्रख्याति होती. राजाबरोबर जाणें हं तिला एकप्रकारें लाजिरवाणें होतें; ह्मणून तिणें **प्रतापसेनाला** असें सांगितलें कीं, 'आपल्याला प्रसिद्धपणें शहरांत जातां कामा नये, यांकरितां कांहीं तरी दुसरा उपाय करून कोणाला नकळत मला घेऊन चला. स्त्रियांच्या वर्तनावर लोक इतकी टीका करतात कीं, सज्जन देखील त्या कामीं दुर्जन बनतो. तारुण्य व चांगलें रूप आणि निपुणता या गोष्टी मला अनुकूल असल्यामुळें मी प्रसिद्धपणें तुमच्याबरोबर गेलें तर लोक माझ्यावर भलतेच आरोप ठेवितील. गरीब भिक्षुक पतीचा घात करून ही राजाला भुलून त्याला अनुसरली, असेंही ह्मणण्यास लोक चुकणार नाहींत; तेव्हां गुप्तपणें जावें हं फार चांगलें.'

त्या शहाण्या स्त्रीचें हें भाषण **प्रतापसेनाला** फार आवडलें. व त्यावरून ही आपल्याला अनुकूल होईल अशी त्याला थोडीशी आशाही उत्पन्न झाली. यावेळीं संध्याकाळचा समय होत आला होता. घटका दोन घटकांनीं अंधकाराचें साम्राज्य चहूंकडे पसरणार होतें; तेव्हां दुसरी कांहीं तजवीज करण्यापेक्षां अंधार पडेपर्यंत आडवाटेनें वेषांतर करून हळु हळु चालून रात्र पडल्यावर **कांचीपुरांत** प्रवेश करावा, अशी योजना करून **प्रतापसेनानें** त्या रितीनें कोणाला नकळत तिला युक्तीनें आपल्या घरीं नेली. यद्यपि त्याणें वाईट हेतूनें तिला नेली होती, तथापि सुदैवानें त्या **शांती**पासून **प्रतापसेनाला** खरोखरीचीच शांति मिळणार होती, व ह्मणूनच असा आकस्मिक योग येऊन उभयतांच्या गांठी पडल्या होत्या!

प्रतापसेन हा अधर्मी नव्हता. त्याचीं इंद्रियें भाग्यमदानें तुफान झालेलीं नव्हतीं. असें असून—परस्त्री त्यांतून ही एका विद्वान् ब्राह्मणाची स्त्री त्यांतून विधवा व अनाथ झालेली; अशीवर त्याची इतकी आसक्ति उत्पन्न व्हावी ही गोष्ट मोठी चमत्कारिक आहे. यावरून तो दुराचारी व अविवेकी होता, असाही कदाचित् भास होईल; पण वस्तुस्थिति फार निराळी होती. कोणत्याही एकाद्या वस्तूवर अमक्या मनुष्याचें प्रेम कां बसलें, व कसें बसलें, याची मीमांसा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्रेम हें आंधळें आहे. तें ज्याच्या मनांत भरतें त्याला आपल्या विवक्षित हेतूच्या विरुद्ध असलेल्या गोष्टी मुळींच दृष्टीस पडत नाहींत. प्रेमांध झालेल्याला कार्याकार्य विवेक मुळींच रहात नाहीं, व असें होण्याला मुख्यकारण काय तर प्रारब्धयोग. तो इतका बलवत्तर आहे कीं, या जगांत अमक्या एका मनुष्याच्या हातून अमुक चांगली अथवा वाईट गोष्ट व्हायची नाहीं, असें मुळींच म्हणतां येत नाहीं. कोणत्यावेळीं कोणाची कशी बुद्धि फिरेल व त्याच्या हातून काय होईल, याचा नेमच नाहीं. सूक्ष्मदृष्टीनें पाहणाऱ्या मनुष्याला अशाप्रकारच्या विलक्षण गोष्टी नेहमीं शेंकडों दृष्टीस पडतात. असो.

याप्रमाणें जिच्यावर एकसारखा दोन जन्म पर्यंत राजा **प्रतापसेन** आसक्ति ठेवित होता, तिची या जन्मांतही त्याला प्राप्ति झाली. त्याणें जशी एखादी देवता देव्हाऱ्यांत पुजून ठेवितात, त्याप्रमाणें आपल्या घरांत तिला मोठ्या सुखासमाधानांत ठेविली होती. प्रत्येक दिवशीं सवड मिळतांच तो तिच्या भेटीला जात असे. तो वरचेवर कांहीं

तरी विलासाच्या व चैनीच्या गोष्टी काढी; पण ती त्या गोष्टींला दुसरेंच रूप देऊन त्याच्या मनाला शांति व समाधान प्राप्त होण्याविषयीं प्रयत्न करीत असे. स्त्रीविषय हा अगदीं तुच्छ आहे. एकंदरींत कोणताही विषय असो, त्याचें सेवन करण्यांत सुख आहे असें अडाणी लोकांला मात्र वाटतें; पण वस्तुतः तें दुःखच आहे. ज्या सुखाचा क्षणभर उपयोग झाल्यावर असह्य दुःख भोगावें लागतें, त्याला सुख असें अविचारी लोक पाहिजे तर म्हणोत; पण ज्ञाते कधींही म्हणणार नाहींत. एकंदरींत ह्या जगांत सुख हा पदार्थच नाहीं, केवळ सुखाचा आभास आहे. इत्यादिप्रकारच्या समाधानाच्या गोष्टी सांगून ती विदुषि (शांति) प्रतापसेनाचें मन रंजवीत असे. तो तिच्याकडे येतेवेळीं—आज खरोखर तिच्या जवळ गोष्ट काढायची व ती आपल्याला अनुकूळ होते किंवा नाहीं, याचा काय तो निकाल करायचा, असा निश्चय करून येत असे; पण तिच्या जवळ आला म्हणजे ती आपल्या मधुर व सुविचारपरिपूरित अशा भाषणांनीं त्याला इतकी खुषकरीत असे कीं, तो त्याचा आवेश वगैरे सर्व जाऊन तो अगदीं शांत होऊन परत जाई. अशा विदुषि व चतुर स्त्री-जवळ आपण हलकट गोष्ट कशी काढावी याचीच त्याला लाज वाटत होती.

याप्रमाणें पुष्कळ दिवस गेले. शांतीचे सासुसासरे हे दुःखसागरांत पडले होते. त्यांची अत्यंत वृद्धदशा होती, त्यांचा प्रतिपाल करणारा काय तो मंत्रदत्त; पण त्याचा मुळींच ठिकाण नाहीं. मंत्रदत्ताला व्याघ्रानें भक्षण केलां, व शांति काणाला नकळत राजवाड्यांत येऊन राहिली,

यामुळें **मंत्रदत्ता**चें व **शांती**चें काय झालें याचा त्यांला मुळींच ठावठिकाण लागला नाहीं, व तसें होण्याला कांहीं साधनही नव्हतें. अग्रहारांत ज्याच्या घरीं **मंत्रदत्त** गेला होता, त्याच्या घरीं **देवशर्म्या**च्या सांगण्यावरून शेजाऱ्यापाजऱ्यांनीं जाऊन चौकशी केली; पण तो सकुटुंब परत गेला, इतकेंच तेथें त्यांना समजलें. बरेच दिवस झाले तरी कोठेंच कांहीं ठावठिकाण न लागल्यावरून **देवशर्म्या**ला असें वाटलें कीं, **मंत्रदत्त** आणि **शांति** हीं उभयतां संसाराची दगदग सोडून कोठें तरी देशांतराला गेलीं असावीं. **मंत्रदत्त** हा लहानपणापासूनच घरसंसाराविषयीं अंमळसा उदासीन होता, व **शांति** मोठी विदुषि असून पतीच्या अर्ध्या वचनांत होती; तेव्हां न जाणों दोघांचाही एक विचार होऊन कदाचित् तीं देशांतराला गेलीं असतील असें त्याला वाटलें. तथापि तीं उभयतां सुशील व गुरुसेवक असल्यावरून आपल्याला अशा वृद्धदशेंत संकटांत सोडून देऊन निघून जातील इतका निष्ठूरपणा त्यांच्या हातून होईल असेंही **देवशर्म्या**च्या लक्ष्यांत येत नव्हतें.

याप्रमाणें तीं उभयतां वृद्ध स्त्रीपुरुषें संकटांत होतीं, व **शांति** इकडे राजवाड्यांत मोठ्या चैनींत होती; तरी तिला त्यांचें विस्मरण झालें नाहीं. आपण अमुक ठिकाणीं आहें हें कळविलें तर त्यांना फार वाईट वाटेल, ह्मणून तिनें ती गोष्ट तर केली नाहींच; पण **प्रतापसेना**ला सांगून त्या उभयतांचा योगक्षेम उत्तम रितीनें चालेल अशी तिनें व्यवस्था केली; व त्यांची सेवाचाकरी करण्याविषयीं विश्वासूक मनुष्यांचीही योजना करविली. राजा हा दीन, अनाथ वगैरे प्रकारच्या लोकांचा प्रतिपालकच आहे; तेव्हां **प्रताप**-

सेनानें एकाएकीं आपली अशी व्यवस्था ठेविली याबद्दल देवशर्म्याच्या मनांत संशय येण्यास कांहीं कारण नव्हतें. 'तुमच्या पुत्राचा व सुनेचा नाश झाल्यावरून तुमची विशेष आपत्ति होत आहे असें समजून महाराजांनीं तुमची व्यवस्था नीट ठेवण्याविषयीं सांगितलें आहे,' असें अधिकाऱ्यांनीं देवशर्म्याला कळविलें. व त्याबद्दल तो मोठा आभारी होऊन राजाला धन्यवाद देत होत्साता त्याणें दिलेल्या द्रव्यावर व ठेवलेल्या व्यवस्थेवर आपल्या स्त्रीसहवर्तमान निर्वाह करूं लागला.

शांतीला पुर्वजन्मींची चांगली आठवण होती. त्यावेळीं जो आपल्यावर आसक्त झाला होता तोच राजा **वसंतसेन** जन्मांतरीं **प्रतापसेन** होऊन सांप्रत आपल्या नादीं लागला आहे असें तिला समजलें. यद्यपि तिचा पति मरण पावला होता, तथापि तो योगसिद्ध आहे, व **गोरक्षनाथा**च्या कृपेनें त्याचा आपला पुनः समागम झाल्यावांचून राहणार नाहीं याविषयीं तिला पक्की खात्री होती; म्हणून पतिवियोगानें जरी ती दुःखीत होती, तरी पुढच्या आशेवर तिच्या मनाला बराच आधार मिळाला होता. आपल्या देहाचें प्रारब्ध मोठें चमत्कारिक आहे, असें पाहून तिला फार आश्चर्य वाटत असे. मागच्या दोन जन्मांत आपण कोणाची स्त्री होतें, व कोणत्या रितीनें आपण **वसंतसेना**च्या हातीं सांपडलें, व तो आपल्यावर किती ममता करीत होता. व सांप्रतही आपण त्याच्या हातीं कशी मिळालें, या सर्व गोष्टी तिला फारच चकित करीत होत्या. ती कधीं मोठ्या आनंदांत असे, कधीं फार दुःखी होत असे, व कधीं उदासीन होऊन उ-

गीच विचार करीत बसे. परस्पर विरुद्ध असे अनेकप्रकारचे मनोविकार निरानिराळ्या वेळीं तिला पछाडीत असत.

इकडे प्रतापसेनाचा वर सांगितल्याप्रमाणें नित्यक्रम चालला च होता. जरी तिच्या भाषणानें त्याची वृत्ति तेव्हढ्या वेळापुरती बदलून तो शांत होत होता, तरी पुन्हा कांहींवेळानें त्याच्या मनांत दुसरेच विचार येत असत. कधीं कधीं त्याला असें वाटे कीं, अशा विदुषि स्त्रीपासून आपण चांगल्या चांगल्या गोष्टी समजून घेऊन तिचा तशा रितीनें उपयोग करून घ्यावा. कधीं कधीं तिच्या दीनवाण्या स्थितीकडे पाहून त्याला तिची दया येत असे, व सर्वस्वीं जी आपल्यावर विश्वास ठेवून आपल्या ताब्यांत आली आहे, तिच्यावर बळजबरी करणें किंवा दुसऱ्या रितीनें तिला छळणें, हा मोठा अधमपणा आहे, असें त्याला वाटे. पुन्हां त्याच्या मनांत असे विचार येत कीं, असें उत्तम स्त्रीरत्न आपल्याला प्राप्त झालें असून, आपण त्याचा उपभोग न घेतला तर त्यांत काय अर्थ आहे. लोक कदाचित् तसें न म्हणोत; पण निदान आपलें मन तरी आपल्याला अरसिक व मूर्खपणाचा दोष लावल्यावांचून राहणार नाहीं! व आलेला समय फुकट घालविला तर जन्मभर ही गोष्ट आपल्या मनाला खाल्ल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां कसेंही करून तिला अनुकूल करून घ्यावें हेंच योग्य आहे. पुन्हां त्याला असें वाटे कीं, ही स्त्री मोठी तेजस्वी आहे; तिचें आचरण शुद्ध व सरळ आहे, तिचें पातिव्रत्य मोठें प्रबल आहे; तेव्हां तिच्यावर आपण बलात्कार केला व ती गोष्ट तिला मान्य न झाली तर कदाचित् ती प्राणत्याग करील, किंवा आपल्याला शापून भस्म करील.

साध्वीस्त्रियांचा शाप वणव्यापेक्षांही प्रखर आहे; तेव्हां तिच्याजवळ भलतीच गोष्ट काढावी तर कदाचित् ती आपल्या नाशास कारण होईल. इत्यादि प्रकारचे अनेक विचार त्याच्या मनांत घोळत होते, व त्यामुळें अमुक एक उपाय करावा असा निश्चय करतां येत नव्हता.

याप्रमाणें मुग्ध स्थितींत पुष्कळ दिवस गेले. **प्रतापसे-**नाला—अनेक विचारांनी त्याच्या मनाचा गोंधळ झाल्या-मुळें—जें दुःख होत होतें तें सहन होईनासें झालें. शेवटीं त्याणें असा निश्चय केला कीं, एकदां तिला आपला हेतु कळवावा व आशा पूर्ण करून घ्यावी, किंवा अगदीं निराशा तरी करून टाकावी. ह्या दोहोंतून कोणचा तरी एक प्रकार केल्यावांचून राहूं नये. असा निश्चय करून एके दिवशीं तो तिचे भेटीस गेला. एकांतीं बराचवेळ उभयतांच्या गोष्टी झाल्या. **प्रतापसेना**ची मुद्रा यावेळीं कांहींशी खिन्न दिसत होती, व मनोव्यथेनें त्याचा चेहरा उतरल्यासारखा झाला होता; तेव्हां **शांति** त्याचें गौरव करून म्हणाली, 'देवाच्या दयेनें आपल्याला सर्व गोष्टी अनुकूल आहेत. का-ळजी अथवा शोक करण्यासारखें कांहीं कारण, निदान माझ्या तरी ध्यानांत येत नाहीं; असें असून आपलें हें सुंदरमुख कोमेजलें आहे. व गात्रें विकळ झालीं आहेत! चिंतेच्या छायेनें आपल्याला पूर्ण ग्रासलें आहे असें दिसतें, याचें कारण काय? जर मोठी राजकारणाची गुप्त गोष्ट असेल तर तेथें माझा कांहीं इलाज नाहीं; पण इतर कांहीं कारण असल्यास सांगाल तर बरें होईल.'

हा तिचा प्रश्न ऐकून **प्रतापसेन** सुस्कारा सोडून कांहींसा दीनवाणीनें म्हणाला, 'काय सांगावें! तूं म्हणतेस

त्याप्रमाणें ईश्वरानें सर्व कांहीं अनुकूल केलें आहे; पण एका गोष्टीची प्राप्ति होत नसल्यामुळें माझी अशी स्थिति झाली आहे. जी गोष्ट व्हावी असें मीं इच्छितों ती पाहिजे त्यारितीनें सिद्ध करण्यास मी समर्थ आहें; पण तसें करावें असें माझ्या मनांत येत नाहीं. मला जी वस्तु पाहिजे आहे ती फारच अमोलिक आहे. ती यावेळीं माझ्या हातांत आहे; तरी सुवासिक फूल तुडवून टाकावें हें योग्य नाहीं. आपोआप त्या वस्तूचा उपभोग होण्याचा संभव नाहीं व बलात्कारानें केला तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें असल्यामुळें एकंदरींत माझी स्थिति फार दुःखकारक झाली आहे. मी त्या वस्तूचा नाद सोडावा ह्मणून पुष्कळ प्रयत्न करतों; पण कांहीं केल्या तो सुटत नाहीं, व तिची प्राप्तिही होत नाहीं. यामुळें जें अनिवार दुःख होत आहे, त्याच्या योगानें माझी अशी वाईट स्थिति झाली आहे, व याच दुःखांत कदाचित् माझा शेवट होतो कीं काय, असेंही मला वाटतें.' असें बोलून तो स्तब्ध झाला.

प्रतापसेनानें आपल्या भाषणांत प्रत्यक्ष शांतीचा निर्देश केला नाहीं, तरी त्याच्या चर्येवरून व पूर्वसंबंधावरून व या उद्गारावरून त्याच्या दुःखाला कारण आपणच आहें हें शांतीच्या लक्ष्यांत येऊन चुकलें. ही गोष्ट ह्मणजे तिला आजच समजली होती असें नाहीं, तथापि यावेळचें सर्व भाषण आपल्याच संबंधानें आहे असें ती समजली. आणि क्षणभर विचार करून राजाला ह्मणाली, 'महाराज, आपण सूज्ञ आहां. आपल्याला मी बोध करावा असें कांहीं नाहीं; पण कांहीं एक मनोविकाराला वश

झालेल्या मनुष्याची बुद्धि स्वतः विचार करण्याला असमर्थ होते, व तशा प्रसंगीं दुसऱ्याच्या सयुक्तिक बोलण्याचा कधीं कधीं मोठा उपयोग होतो, ह्मणून मी दोन शब्द बोलतें त्याचा आपण नीट विचार करावा. आपल्याला ज्या वस्तूवर इतकी आसक्ति उत्पन्न झाली आहे, तिच्याविषयीं विशेष विचार करून ती आसक्ति कमी केली, व तिचा त्याग करण्याविषयीं प्रयत्न केला, तर सर्व दुःखांचा परिहार होईल. असें असून आपण तसें करण्याविषयीं कां प्रयत्न करीत नाहीं?'

हें ऐकून **प्रतापसेन** ह्मणाला, 'पुन्हां तेंच तेंच काय बोलतेस, मी तुला सांगितलेंना कीं, ती वस्तु मनांतून काढून टाकण्याविषयीं मी पुष्कळ प्रयत्न केला, तरी कांहीं केल्या जात नाहीं. याविषयीं माझा निरुपाय आहे.'

शांति ह्मणाला, 'कदाचित् ती वस्तु आपल्याला मनांतून जाण्याचा कांहीं उपाय मिळाला तर आपल्याला तिच्या जाण्यापासून सुख वाटेल किंवा दुःख वाटेल?'

प्रतापसेन ह्मणाला, 'त्याविषयीं माझ्यानें खात्रिपूर्वक कांहींच सांगवत नाहीं. पुढ मनाचा स्थिति कशी होईल तें आतांच माझ्यानें कसें सांगवेल.'

शांति ह्मणाली, 'अहा महाराज, ती वस्तु आपल्याला सुखासमाधानानें प्राप्त होत नाहीं अशीतर आपल्या मनाची पूर्ण खात्री झाली आहेना?'

प्रतापसेन ह्मणाला, 'होय. निदान यावेळीं तरी तशी स्थिति आहे खरी. बलात्कार केल्यावांचून तिची प्राप्ति होईल अस बहुतकरून वाटत नाहीं.'

शांति ह्मणाली, 'पण बलात्कारानें तरी ती आपल्याला

लाभेल असें वाटतें काय? व कदाचित् लाभली तरी त्यांत कांहीं आनंद आहे काय?'

प्रतापसेन ह्मणाला, 'नाहीं नाहीं. त्यापासून कसलें सुख वाटणार, व बलात्कारानें तिचा किती दिवस लाभ होणार. फार झालें तर मी बाहेरून कडेकोट बंदोबस्त ठेवान; पण तिच्या प्राणाचा बंदोबस्त माझ्यानें ठेववणार नाहीं. तेव्हां कदाचित् ती आत्मघात करून न घेईल हें तरी कशावरून?'

शांति ह्मणाली, 'तरमग अशी स्थिति असल्यामुळें आपल्याला बलात्कारानें खात्रीपूर्वक सुखप्राप्ति होण्याची विशेष उमेद नाहींना?'

प्रतापसेन ह्मणाला, 'हो, बिलकूल नाहीं.'

शांति ह्मणाली, 'तर मग त्या वस्तूच्या नादांत पडण्यांत काय अर्थ आहे? आपण सुखाकरतां ह्मणून तिचा स्वीकार करणार तें सुख तर मुळींच प्राप्त होण्याची आशा नाहीं. व तिच्यावर आसक्ति असल्यामुळें दुःखाचा मात्र अनुभव द्यावा लागत आहे. तेव्हां एकंदरींत ती वस्तु आपल्याला सुखदायक नसून उलट दुःखदायकच आहे असें सिद्ध होतें कीं नाहीं?'

यावर **प्रतापसेन** ह्मणाला, 'होय तूं ह्मणतेस तसें आहे खरें.'

शांति ह्मणाली, 'तर मग अशा दुःख देणाऱ्या वस्तूवर आसक्ति ठेवण्यांत काय अर्थ आहे! तिचा नाद सोडून द्यावा हेंच योग्य नाहीं का?'

प्रतापसेन ह्मणाला, 'होय, तसें करणें योग्य आहे;

पण तीं वस्तु हवीशी वाटते. व तिचा लोभ सुटत नाहीं याला काय करावें?'

शांति म्हणाली, 'याविषयीं अगदीं सुलभ उपाय आहे. जी वस्तु आपल्याला अगदीं पाहिजेच असेल, व ती ज्या दृष्टीनें पाहिजेशी वाटत असेल, ती दृष्टी सोडावी म्हणजे झालें.'

प्रतापसेन म्हणाला, 'तसें कसें करतां येईल?'

शांति म्हणाली, 'त्यांत काय अशक्य आहे. आसक्ति ही गुणांची अपेक्षा ठेवीत असते. मग खरोखरी ते दोषकां असेनात; पण त्यांना गुण म्हणून स्वीकार केल्यावांचून आसक्ति केव्हांच उत्पन्न होत नाहीं. तेव्हां जे गुण म्हणून मानले असतील, त्यांला दोषदृष्टीनें पहावें म्हणजे झालें. गुण आणि दोष यांची कांहीं नियमित स्थिति आहे असें नाहीं. तें मानणाराच्या मनावर आहे. कोणतीही वस्तु जेव्हां आपल्याला ती मनांतून काढून टाकावयाची असेल, तेव्हां तिच्यावर दोषारोप करण्याचा प्रयत्न करावा. दोषदृष्टीनें तिच्याकडे पाहूं लागलें, म्हणजे सहज तिच्याविषयींची आसक्ति कमी होते. किंवा एखादवेळ तिचा असा तिटकारा येतो कीं, पुन्हां तिचें नांव देखील नकोसें होतें; तेव्हां त्या वस्तूला आपण दोषदृष्टीनें पहा म्हणजे झालें.'

प्रतापसेन म्हणाला, 'छे, छे; मला तसें तर मुळींच कर्तव्य नाहीं. आणि त्या वस्तूच्या ठिकाणीं दोष असतील तर माझी त्यांच्याकडे दृष्टी जाईल. दोषांचा लवलेशदेखील तेथें नाहीं; तेव्हां तसें कसें करतां येईल?'

शांति म्हणाली, 'ही गोष्ट मात्र खरी म्हणतां येत

नाहीं. या जगांत निर्दोष अशी एकदेखील वस्तु मिळावयाची नाहीं. मग आपण जिची इच्छा करतां त्या वस्तूंत दोष नसेल ही गोष्ट होईल तरी कशी? तिच्या ठिकाणीं पुष्कळ दोष असतील; पण आपल्या प्रेमानें त्या सर्वांवर गुणांचें पांघरूण घातलें आहे, यामुळे ते आपल्याला दिसत नाहींत. अनावर झालेले मनोविकार अंमळ आवरून धरून आपण पक्षपात सोडून तिच्याविषयी विचार करा म्हणजे आपल्याला हवे इतके दोष दृष्टीस पडतील.'

प्रतापसेन म्हणाला, 'याविषयीं माझ्यानें खात्रीनें कांहीं सांगवत नाहीं; तथापि तूं सांगतस तसें कदाचित् करतां येईल. मी दोष शोधूं लागलों, आणि कदाचित् माझा ग्रह विपरीत झाला, तर तुझ्या म्हणण्याप्रमाणें एखादवेळ मला तिचा तिटकारा येईल; पण तसें तर मला मुळींच करायचें नाहीं. कोणत्याही रितीनें त्या वस्तूचा त्याग व्हावा हें मला सुतराम् मान्य नाहीं.'

यावर **शांति** म्हणाली, 'ती वस्तु तर पाहिजे. तिचा त्याग करायचा नाहीं. आणि सांप्रतच्या स्थितींत तिच्यापासून सुख तर होत नाहीं, असें जर आहे तर मी दुसरा एक उपाय सांगतें तो आपण करा, म्हणजे बरें पडेल. आपण त्या वस्तूचा ज्या बुद्धीनें अथवा ज्या मनोविकाराला वश होऊन स्वीकार केला आहे, व ज्या दृष्टीनें तिला आपण पाहतां, ती दृष्टी सोडून ज्या रितीनें ती आपल्याला सुखकर होऊन तिच्यासीं आपला वियोगतर होणार नाहीं, व पुन्हा दुःख कधींही प्राप्त होणार नाहीं, अशा रितीनें तिचा स्वीकार करा, व त्या दृष्टीनें तिच्याकडे पहा. आणि आपले जे मनोविकार सांप्रत ज्याप्रकारचे असतील

त्यांहून ते निराळ्याप्रकारचे करा, म्हणजे ती आपल्याला मुखकर होईल.

प्रतापसेन म्हणाला, 'हें जें तूं सांगितलेंस तें सांगण्याला व ऐकण्याला सुलभ आहे; पण तसें घडून येणें मात्र फार अशक्य आहे.'

शांति म्हणाली, 'छे, छे; त्यांत अशक्य असें कांहींच नाहीं. ती गोष्ट सहज होऊं शकेल. मात्र तशा दृष्टीनें पाहिली पाहिजे म्हणजे झालें. याविषयीं मी आपल्याच अनुभवाची एक गोष्ट सांगतें ती ऐकावी. एके दिवशीं मी आटींव दूध करण्याचा बेत करून, त्याप्रमाणें दूध तापत ठेविलें. दुसरीकडे कामांत माझें लक्ष गुंतल्यामुळें दुधाची आठवण राहिली नाहीं. त्या दिवशीं आमच्या घरीं श्राद्ध होतें, व श्राद्धाला आटींव दूध वाढायचें असें आमच्या मामंजींनीं सांगितलें होतें. आधींच त्यांणीं कोठें यजमानाच्या येथें मागून तें दुध आणलें होतें. तशांतून दुर्लक्ष्यामुळें तें फार आटलें, आणि त्याचें दुधाचें स्वरूप जाऊन ती बासुंदी बनली; तेव्हां मामंजी माझ्यावर पुष्कळ रागावले. मी कधीं त्यांच्या बोलण्यावर उत्तर देत नव्हतें; तरी बासुंदी झाली, यांत कांहीं बिघडलें नमून उगाच त्यांच्या मनाला दुःख होत आहे, असें पाहून, म्यां म्हटलें. 'यांत दुधाचें तर कांहीं रूपांतर झालें नाहींना? ब्राह्मणांला आटींव दूध वाढायचें होतें त्या ठिकाणीं त्याच्याहीपेक्षां सरस अशी बासुंदी झाली, हें एकप्रकारें चांगलेंच झालें. दुधाचा संकल्प होता तो सोडून बासुंदीचा संकल्प करा म्हणजे झालें, असें केल्यानें ब्राह्मणांला एक उत्तम पदार्थ घातला असें होईल, व आपल्या मनाला जो विनाकारण संताप

होत आहे तो होणार नाहीं. पदार्थ तोच आहे. फक्त संकल्पाचा भेद करा, म्हणजे झालें. हें माझें बोलणें त्यांना फार पसंत वाटलें, व तत्काल ते अतिशय खुष झाले.'

तात्पर्य ही गोष्ट अगदीं साधारण आहे, तरी तिच्यापासून फार मोठा बोध घेतां येईल. या जगांतली प्रत्येक वस्तु स्वतः प्रिय अथवा अप्रिय मुळींच नाहीं, तर आपला तिच्यावर जसा अभिनिवेश असेल तदनुसार ती वाटते. मग एकाच अभिनिवेशाला धरून बसून त्याप्रमाणें सिद्ध झालें नाहीं; म्हणून दुःख करावें, त्यापेक्षां त्या अभिनिवेशांतच थोडासा फेरबदल केला तर चांगलें कीं नाहीं? तसें केल्यानें त्या वस्तूचा आपल्याला लाभ होतो, व विनाकारण होणारी तळमळ नाहींशी होते, तेव्हां ही गोष्ट सुलभ असून कां करूं नये यांचें कारण मला समजत नाहीं.'

हें ऐकून **प्रतापसेन** कुंठित झाल्यासारखा होऊन बराचवेळ निश्चलदृष्टीनें तिच्याकडे पहात बसला. फार वेळ झाला, तरी त्याणें कांहीं उत्तर दिलें नाहीं; तेव्हां **शांति** म्हणाली, 'आपण असे स्तब्ध कां झालां? माझें बोलणें योग्य आहे किंवा नाहीं तें सांगा?'

प्रतापसेन म्हणाला, 'तुझ्या भाषणाला अयोग्य असें कोण म्हणेल. तें फार समर्पक व ग्राह्य आहे. तें मला समजलें, तरी त्याचा नीट उमज पडला नाहीं; म्हणून माझ्यानें कांहीं बोलवत नाहीं.'

यावर **शांति** म्हणाली, 'आपण हावेळपर्यंत लाक्षणिक रीतीनें बोललां. व मीही आपणांस तशाच रीतीनें उत्तरें दिलीं. मी सांगितलेली शेवटची युक्ति आपल्याला विशेष व्यक्त

करून दाखवितां येईल; पण आपला जो कांहीं हेतु असेल, तो उघड उघड सांगा ह्मणजे बरें पडेल. लाक्षणिक रितीनें त्याचा उमज व्हायचा नाहीं.

हें ऐकून **प्रतापसेना**ला आपला हेतु सांगण्यास मोठी लाज वाटूं लागली. बराच वेळ त्याणें आणखीही अशाच रितीनें प्रत्यक्ष निर्देश न करतां भाषण केलें. **शांती**ला त्याचा हेतु केव्हांच समजला होता; तरी, उघड रितीनें त्याच्या तोंडानें वदवून मग त्याला त्यापासून परावृत्त करावें, असा विचार करून तिणें कायतें स्पष्ट सांगण्याविषयीं आग्रह केला. तेव्हां **प्रतापसेन** ह्मणाला, 'तुझ्यासारख्या चतुर स्त्रीला मी अगदीं उघड करून सांगितलें पाहिजे काय? माझा हेतु काय, हें केव्हांच तुझ्या लक्षांत आलें असेल, तरी तूं आग्रह करितेस; ह्मणून लज्जेला अंमळ एकीकडे ठेवून मीं सांगतों. मी जी वस्तु ह्मणतों ती प्रत्यक्ष तूंच आहेस, व तुझ्यावर माझा वाईट रितीचा अभिनिवेश आहे. मी असें बोललों याची क्षमा कर. तूंच आग्रह केल्यावरून मी हा निलाजरेपणा केला आहे.'

शांतीचा हेतु निराळाच होता. ती ह्मणाली, 'कांहीं चिंता नाहीं. आपण ह्मटलें त्याचा मी राग मानित नाहीं. मनोविकाराला कोणी प्रतिबंध करूं शकत नाहीं. आपल्या मनांत जसें आलें तसें आपण बोललां; पण खरोखर असें सांगा कीं, आपल्याला ही आपली वासना दुष्ट व अतिशय निंद्य आहे, असें वाटत नाहीं का?'

प्रतापसेन ह्मणाला, 'याविषयीं माझ्यानें सरळ उत्तर देववत नाहीं. संसारांत असे प्रसंग येतात कीं, एखादी गोष्ट वाईट व लाजिरवाणी असें समजलें तरी, पुष्कळ

थोर थोर विचारी ह्मणविणाऱ्यांच्या हातून देखील तसल्या गोष्टी घडून येतात; तेव्हां त्या संबंधानें काय सांगावें.'

शांति ह्मणाली, 'घडून येणें हें स्वतंत्र आहे; पण अमुक गोष्ट ही वाईट असें त्यांच्या मनांत येतेंना!'

प्रतापसेन ह्मणाला, 'हो हो, यांत काय शंका आहे? तसें अलबत येतेंच.'

शांति ह्मणाली, 'तर मग मी अनाथ, त्यांतून ब्राह्मणी, आपल्यापेक्षां उंच वर्णाची किंवा घटकाभर आपल्याला आमची जात वंद्य आहे असें ह्मटलें तरी चालेल. ज्यापेक्षां मी एका भिक्षुक व विद्वान् ब्राह्मणाची स्त्री आहें त्यापेक्षां कांहीं हव्यकव्याच्या निमित्तानें कां होईना; पण आपण मला नमस्कार करण्यास योग्य आहां. तशांतून मी सर्वस्वीं आपल्या आधीन झालें आहे. वरें इतकेंही असून आपल्याला जो संबंध इष्ट वाटतो, तो मला मनापासून नको आहे; तेव्हां अशा स्थितींत आपण जी गोष्ट करण्याविषयीं प्रवृत्त झालां आहां, ती वाईट व पूर्वी सांगितल्याप्रमाणें आपल्याला इहपरलोकीं दुःखदायक असून, नरकाचें साधन व अपेशाचें मूळ आहे असें आपल्याला वाटतेंना?'

प्रतापसेन ह्मणाला; 'पण तुझा समागम कोणत्याही रितीनें मला पाहिजेच आहे.'

शांति ह्मणाली, 'तर मग मी सांगितलेला उपाय करा. मी जी दुधाची हकिकत सांगितली आहे, ती याचकरितां. आपण जसे माझ्यावर प्रीति करतां, तशीच मीही अतिशय उपकारी असून आपल्यावर मनापासून प्रेम करणारी आहें. मला आपल्या सहवासापासून

फार सुख होणार आहे, व तो इष्ट ही वाटतो व आपल्यालाही त्यापासून सुख होणार आहे. याकरितां आपला जो अभिनिवेश आहे, तो बदला ह्मणजे झालें. प्रीति ही केवळ आपल्या माघुकावरच असते व त्याच दृष्टीनें पुरुषांला स्त्रियांवर प्रीति करतां येते, असें नाहीं. मुलगी, बहीण, आई ह्याही अत्यंत प्रीतीला पात्र आहेत. व सर्व जनांला त्यांचा अनुभवही आहे; तेव्हां जी वाईट बुद्धि ठेऊन आपण मजवर प्रीति करतां, तिचा त्याग करून मी सांगितलेल्या तिहींतून योग्य वाटेल तिचें नातें माझ्या ठिकाणीं कल्पना करून त्या दृष्टीनें माझ्याकडे पहा व मजवर प्रीति करा. सांप्रत जी वाईट दृष्टि आपण मजवर ठेविली आहे, तिच्यांतील दोष मनांत आणा, ह्मणजे आपल्या दुःखाचा परिहार होऊन उभयतांलाही अतिशय सुख होईल.'

शांति आणखीही कांहीं बोलणार होती; पण तिच्या भाषणानें **प्रतापसेन** अगदीं सद्गदीत होऊन तत्काल उठला. त्याच्या मनांत जो दुष्ट विकाररूपी पिशाच संचरला होता, तो तिच्या भाषणरूप मंत्रानें दूर गेल्यामुळें त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू निघाले. व एकाएकीं **शांती**च्या गळ्याला मिठी मारून ह्मणाला, 'बसबस. प्रिय भगिनी, आतां यापुढें कांहीं बोलूं नकोस. त्या गोष्टी सोडून दे.'

प्रतापसेनाला आपण हावेळपर्यंत जी वाईट वासना धरली होती, तिच्या बद्दल मोठा पश्चात्ताप झाला. तो **शांती**चे पाय धरून ह्मणाला, 'प्रियभगिनी, मी मोठा चांडाळ आहें. हावेळपर्यंत तुझ्यावर दुष्टवासना ठेवून मी विनाकारण तुला दुःख दिलें, याबद्दल तूं मला पाहिजे ती

शिक्षा कर. तूं शिक्षा केल्यावांचून त्या घोर पापांतून मी मुक्त होणार नाहीं.

याप्रमाणें एखाद्या उन्मत्त हत्तीला चतुर महातानें अंकुशानें वश करावा, त्याप्रमाणें बोधरूपी अंकुशानें वश केलेला **प्रतापसेन**रूपी मत्तगज तिच्या पायांवर पडून रडूं लागला. तेव्हां तिला त्याची फार दया आली. व प्रेमपूर्वक तिनें त्याचें समाधान करून अज्ञानानें झालेल्या गोष्टीबद्दल आपल्या मनांत कांहींएक दुःख नाहीं, व आपण सर्व अपराधांची क्षमा केली आहे, असें सांगून तिनें त्याचें समाधान केलें.

याप्रमाणें तीनजन्मपर्यंत तिच्यावर आषक झालेल्या राजा **प्रतापसेना**ला बोध करून **शांती**नें त्याचा वाईट हेतु समूळ नाहींसा केला व त्याला आपला बंधू करून घेतला. त्या दिवसापासून तीं उभयतां बहीणभावंडाच्या नात्यानें वागूंलागलीं. **शांती**ला जें दुःख वाटत होतें तें नाहींसें होऊन तिला त्याचा सहवास अत्यंत आनंदकारक झाला. तिची बुद्धि व चातुर्य याचा **प्रतापसेना**ला मोठा फायदा झाला. ती प्रत्येक कामांत त्याला चांगला बुद्धिवाद सांगत असे. लहान मोठ्या सर्व गोष्टींत उत्तम सल्ला देणारी **शांति** ही एक त्याचा प्रधानच झाली होती. याप्रमाणें शुद्ध व निर्दोष असें उभयतांनीं एकमेकांवर प्रेम ठेवून आयुष्याचा क्षय होई तोंपर्यंत सुखाचा उपभोग करीत आनंदांत दिवस घालविले.

नंतर कालें करून दोघांचेंही देहावसान झालें. नंतर तीं दोघें काशीक्षेत्रांत एका विद्वान् व तपोनिष्ट ब्राह्मणांच्या घरीं जन्मास आलीं. **मंत्रदत्त** तर पूर्वीच मृत झाला होता;

तो यांच्या पूर्वीच त्याच क्षेत्रांत एका ब्राह्मणाच्या घरीं जन्मास आला होता. राजा **प्रतापसेन** व **शांति** हीं उभयतां बहीणभावंडें झालीं. व पुन्हा **मंत्रदत्ता**चा आणि **शांत**चिा विवाहसंबंध होऊन आकस्मिक योगानें तीं तिघेंही एकत्र कांहीं दिवस वास करून, नंतर बदरिकाश्रमांत तप करण्याकरितां गेलीं. तेथें एकाचवेळीं तिघांचेही देहविसर्जन होऊन, **गोरक्षनाथा**च्या शापापासून मुक्त होत्साती तपाचरणानें संपादन केलेल्या दिव्यलोकाप्रत जातीं झालीं.

समाप्त.

पोतदारांचीं
अतिस्वस्त शालोपयोगी व इतर पुस्तकें
ह्यांविषयीं महत्वाची सूचना.

पोतदारांचीं सर्व प्रकारचीं शालोपयोगी व इतर पुस्तकें विक्रीस तयार आहेत. टपालखर्चसुद्धां रोख पैसा पाठविला असतां पुस्तकें तावडतोब रवाना करूं किंवा 'व्हॅल्युपेएबल पार्सल' नें मागविलीं असतां तशीं पाठवूं. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' नें मागाविलीं असतां बंगीवर जो किमतीचा आंकडा लिहिला असेल तो पाहून तितके पैसे टपालांत भरले ह्मणजे झालें. 'व्हॅल्युपेएबल पार्सल' बद्दल मनी आर्डरचा जो खर्च, तोच सरकार घेतें. वाटेल त्या रीतीनें पुस्तकें मागवावीं. पुस्तकें उधार पाठविलीं जाणार नाहींत, 'व्हॅल्युपेएबल पार्सल' मागविलें असतां तें परत घेतलें जाणार नाहीं. अगोदरच विचार करून 'व्हॅल्युपेएबल पार्सल' मागवावें. तें परत आलें असतां त्याचा कायदेशरि रीतीनें बंदोबस्त करतां येतो. याकरितां अगोदरच खबरदारी घेतली तर बरें. 'बुकपोस्टा'नें बंगी पाठविली असतां ती रजिस्टर करीत जाऊं. रजिस्टर करण्याबद्दल दोन आणे चार्ज जास्त पडेल. रजिस्टर न करितां तशीच पाठवा असें लिहून आन्ल्यास ती गहाळ झाली असतां त्याची जबाबदारी आह्मांवर नाहीं.

विशेषसूचना—पोतदारांचीं शालोपयोगी पुस्तकें फारच स्वस्त, सुबक, लहान मुलांस फारच उपयुक्त, लोकप्रिय व सुलभ अशीं असल्याबद्दल सर्वत्र प्रसिद्धि आहे. पुस्तकांचा कागद व छापणी हीं विशेष मोहरेदार असतात. सारांश, जेणेंकरून विषयाची दुर्बोधता घालवून सुबोधता आणवेल व पुस्तकें शाळांतील मुलांस अत्युपयोगी होतील अशी तजवीज केली आहे. पुस्तकांच्या किमर्तीच्या स्वल्पतेनें तर सर्व पुस्तकांस हटविलें आहे. एकदम पुष्कळ पुस्तकें घेणाऱ्या व्यापाऱ्यास भरपूर कमिशन मिळेल. कमिशनचे दर व पुस्तकांच्या वगैरे माहिती करितां अर्धा आण्याचें तिकिट पाठविलें असतां आमचा छापी कॅटलाग पाठवून देऊं.

नं०.	पुस्तकांचीं नांवें	आ.	पै.
37	A Hand-Book for young Students ...	0	9
३८	सर्व देशी व विलायती चालीच्या कोष्टकांचें पुस्तक ..	०	९
३९	मार्कबुक, सर्व मराठी व इंग्रजी शाळांत चालणारें...	०	६
४०	लेखनदीपिका अथवा मराठी शुद्ध लिहिण्याचे सोपे नियम	१	०
४१	व्याकरणबोध ...	२	०
४२	मराठी शब्दरूपावलि व धातुरूपावलि	१	६
४३	सुबोधव्याकरण ...	४	०
४४	वाक्यमीमांसा [प्रो० आगरकरकृत] ...	९	०

न०.	पुस्तकांचीं नांवें.	आ.	पै.
	भाषांतराकरितां उतारे.		
४५	चवथे इयत्तेकरितां	३	०
४६	पांचवे ,, ...	७	०
४७	सहावे ,, ...	८	०
४८	सातवे ,, ...	९	०
४९	धुळाक्षर शेंकडां १॥ दीड रुपया प्रत्येकास किंमत ...	०	६
५०	किल्ले मोडी नं० १ पासून नं०६ पर्यंत व किल्ले बालबोध शेंकडा १॥ रु. दर किल्यास .. धुळाक्षर व किल्ले शेंकड्यावर घेणारास वेगळें कमिशन नाहीं.	०	६

मनोरंजक व नीतिपर पुस्तकें.

नं०	पुस्तकांचीं नांवें.	रु.	आ.	पै.
१	जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग १	०	१४	०
२	जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग २ ...	१	२	०
३	सुशिक्षितस्त्री ...	०	१०	०
४	सुंदरी आणि वसंतसेन भाग(१मूळ हिंदीभाषेंतील एका गोष्टीवरून रचिलेलें) ...	०	४	०
५	सुंदरी आणि वसंतसेन भाग २ (सदरप्रमाणें.) ..	०	६	०
६	यशवंत विजया नाटिका ..	०	४	०
७	सुंदराबाई (एक चटकदार गोष्ट.)	०	१	०
८	चातुर्य रत्नावलि भाग १. ...	०	०	६
९	चातुर्य रत्नावलि भाग २. ...	०	०	६
१०	चातुर्य रत्नावलि भाग ३. ...	०	०	६
११	चातुर्य रत्नावलि भाग ४. ...	०	०	६
१२	विचारमाला उपदेशपरवाक्यें...	०	०	६

पोतदारांचीं धर्मविषयक पुस्तकें.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें चांगलीं शुद्ध करून सुंदर टैपानें सफाईदार जाड कागदावर आम्हीं छापविलीं आहेत.

नं०.	पुस्तकांचीं नांवें	आ.	पै.
१	शिवलीलामृत, पदच्छेद करून शुद्ध केलेली व कठिण शब्दांवर टीपा देऊन मोठ्या टैपानें उत्तम ग्लेज व जाड कागदावर छापलेली पोथी ...	१२	०
२	आरतीसंग्रह (आरती संख्या ३१०) पदच्छेद करून शुद्ध केलेली आवृति ३ री	१२	०
३	भूपाळ्या संग्रह (भूपाळ्या संख्या ८६)	३	०
४	बालहितोपदेशिका सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. लहान मुलांचे फारच उपयोगी ...	३	६
५	शब्दरूपावलि, अव्यय व समासविचार एकत्र ...	३	०
६	श्रीमाहात्म्य नांचा मोठा व जाड टाइप	२	६
७	एकादशी माहात्म्य सुधारलेलें ,, ...	२	०
८	सत्यनारायण कथा प्राकृत ओंवीबद्ध शुद्ध केलेली ..	२	०

नं०.	पुस्तकांचीं नांवें	आ.	पै.
९	व्यंकटेशस्तोत्र ओंव्या	१	०
१०	करुणामृतस्तोत्र ,,	१	०
११	रामदासकृत मनाचे श्लोक	१	
१२	शनिमाहात्म्य लहान टाइप उत्तम छापलेलें बुक (ओंव्या)	१	०
१३	आशौचनिर्णयसंस्कृत	१	०
१४	पाळीचीकारिका...	१	०
१५	विष्णुसहस्रनाम मूल.	१	०
१६	धांवे संख्या ६० ..	१	०
१७	सावित्री आख्यान ओंव्या	१	०
१८	गयासुरआख्यान ,,	१	०
१९	श्रीदत्तजन्म ,, ...	१	०
२०	संगीत पद्यावलि (नवीन)	१	०
२१	संस्कृत सत्यनारायण पूजा व कथा (सुधारलेली) ..	१	०
२२	पांडुरंगस्तोत्र ओंव्या	१	०
२३	चक्रविभु ,, ...	१	०
२४	प्रश्नावलि (गर्गाचार्यकृत)	१	०
२५	पाळणे (संख्या ३०)	१	०
२६	मनोरंजक स्त्रीगीत.	१	०
२७	प्रातःस्मरण मोठे ..	१	०
२८	सुदामचरित्र (सुधारलेलें)	१	०
२९	तुळसी आख्यान ..	१	०

नं.	पुस्तकांचीं नांवें	आ.	पै.
३०	स्वाध्याय (प्राकृत अर्थासह शुद्ध केलेला)	१	०
३१	अंगदशिष्टाई प्रकार १ ला	१	०
३२	अंगदशिष्टाई प्रकार २ रा	१	०
३३	दामाजीपंताचेंचरित्र	१	०
३४	सोळा सोमवार कथा ओंव्या . .	१	०
३५	मारुतिजन्म ओंव्या	१	०
३६	गर्भावळी (गर्भकांड ओंव्या)... ..	१	०
३७	समासचक्र... ..	१	०
३८	समासचंद्रिका ...	१	०
३९	शब्दरूपावलि संस्कृत	१	०
४०	बावनश्लोकी गुरुचरित्र ओंव्या ..	०	९
४१	शिवकवच ..	०	९
४२	शिवमहिम्नस्तोत्र .	०	९
४३	राममंत्राचे श्लोक .	०	९
४४	ज्ञानदेवकृत हरिपाठ.	०	९
४५	एकनाथकृत हरिपाठ	०	९
४६	चोविसनामाचे अभंग	०	९
४७	नित्यपाठाचे अभग.	०	९
४८	शिवपाठाचे अभंग.	०	९
४९	तुकारामकृत हरिपाठ	०	९
५०	गुरुपाठाचे अभंग ..	०	९
५१	कबिराची पदें ...	०	९
५२	पोतदारकृत नवीन संगीत आरत्या...	०	६
५३	जीवितस्तोत्र ...	०	६
५४	रामरक्षा	०	६
५५	ध्रुवाख्यान.. .	०	६
५६	द्रौपदीवस्त्रहरणाचे अभंग	०	६
५७	एकाक्षरी श्लोक ...	०	६
५८	तुकारामकृत स्वर्गारोहणाचे अभंग ..	०	६
५९	संस्कृत तुळसीमाहात्म्य	०	६
६०	शिवापराधक्षमापन स्तोत्र	०	६
६१	ज्योतिर्लिंग स्तोत्र	०	६
६२	गुरुदत्त पंचक ...	०	६
६३	गणपतीचे श्लोक ...	०	६
६४	शिवस्तुति	०	६
६५	लक्ष्मीस्तोत्र संस्कृत	०	६
६६	मारुतिस्तोत्र व भीमाष्टक ..	०	६
६७	गणपतिस्तोत्र ओंव्या	०	६
६८	मिराबाई चरित्राचे अभंग	०	६
६९	स्थालीपाकाचे अभंग	०	६
७०	दुर्गास्तोत्र ओंव्या...	०	३
७१	चर्पटपंजरी	०	३
७२	शिवरक्षा ...	०	३
७३	देव्यपराधक्षमापनस्तोत्र	०	३
७४	शिवमानसपूजा ..	०	३
७५	शिवतांडवस्तोत्र ...	०	३
७६	नवग्रहस्तोत्र ...	०	३
७७	ज्वरस्तोत्र ..	०	३
७८	संकटनाशनस्तोत्र	०	३
७९	दत्तात्रेयस्तोत्र ..	०	३
८०	गोविंदाष्टक ...	०	३
८१	गंगाष्टक... .	०	३
८२	नर्मदाष्टक... ...	०	३
८३	अन्नपूर्णाष्टक . .	०	३

नं०.	पुस्तकांचीं नांवें.	आ.	पै.
८४	सूर्यस्तुति	०	३
८५	रामस्तुति... ..	०	३
८६	नारायणस्तोत्र ...	०	३
८७	शनिस्तोत्र ...	०	३
८८	कालभैरवाष्टक ...	०	३
८९	मणिकर्णिकाष्टक ..	०	३
९०	बिंदुमाधवाष्टक ..	०	३
९१	गजेंद्रमोक्ष प्राकृत.	०	३
९२	लक्ष्मीस्तोत्र प्राकृत.	०	३

नं०.	पुस्तकांचीं नांवें.	आ.	पै.
	स्त्रीपुरुषांनीं एकमेकांचीं नांवें घेण्याची पद्धत आणि मनोरंजक उखाणे व म्हणी.		
९३	भाग १.	०	३
९४	भाग २.	०	३
९५	भाग ३.	०	३
९६	भाग ४.	०	३
९७	हरिहराष्टोत्तरशतनामावलीस्तोत्र ...	०	३

प्राकृत ग्रंथ व पुस्तकें विक्रीस तयार.

	कि. रु.	आ.
सिद्धांतबोध ..	...६	०
भक्तलीलामृत .	.. ५	०
ज्ञानेश्वरी ...	..४	८
संतविजय ..	...४	०
नवनाथ भक्तिसार	.४	०
नवनाथ भक्तिसार	...३	०
एकनाथी भागवत	...५	०
पांडवप्रतात ...	..४	०
पांडवप्रतात ...	..३	०
पांडवप्रताप ...	...२	०
भक्तविजय ...	...३	८
भक्तविजय ...	...२	८
रामविजय ...	.. ३	०
रामविजय फळ्या व वेष्टणासह ..	...२	०
रामविजय साधा	..१	८
रामाश्वमेध ..	...३	०
हरिविजय कागद ग्लेज	२	८
हरिविजय कागद जाड व शब्दकोश ...	. २	०
हरिविजय दुसरा	...१	८
हरिविजय बुक...	...१	८

	कि. रु.	आ.
संतलीलामृत ..	. २	०
संतलीलामृत (बुक)...	१	८
नाथलीलामृत ...	. २	०
दासबोध	.. २	०
दासबोध दुसरा	..१	१२
दासबोध (पु० बांधलेले)	१	१२
कथासारामृत ...	..३	०
जैमिनीअश्वमेध	...३	८
जैमिनीअश्वमेध (बुक)...	२	८
श्रीगुरुचरित्र मोठें	...३	०
श्रीगुरुचरित्र लहान	..१	१०
श्रीगुरुचरित्र गुटका	.. २	०
काशीखंड ...	...४	८
काशीखंड ..	. ३	८
शिवलीलामृत रेशमी बांधलेले चित्रांसह...	०	८
शिवलीलामृत रेशमी गुटका ...	..०	७
गणेशलीलामृत सुटी पोथी	०	८
,, रेशमी बांधलेली ...	०	१२
पंढरीमाहात्म्य पोथी अध्याय ३१ .. .	...०	१२

	किं.	रु.	आ.
नाशिकेतोपाख्यान	.. १		०
अर्जुनगीता प्राकृत ओवी-बद्ध	..	..०	४
तुकाराम चरित्र	. १		८
भागवतसारामृत	...५		०
मूळस्तंभ लहान	..०		४
मूळस्तंभ मोठा...	...२		०
विवेकसिंधु	...	..१	४
अमरसार (संस्कृत इंग्रेजी आणि इंग्रेजी संस्कृत कोश)...	...	...१	४
सरस्वतीमंडल (ब्राह्मण लोकांचा इतिहास)...		१	८
अमनिरास ' जशास्तसें ' या पुस्तकाचें खंडण		०	८
श्रीरामचरित्र गद्य	.. १		४
श्रीकृष्णचरित्र गद्य	...१		०
पांडवचरित्र गद्य	.. २		८
विक्रमचरित्र गद्य	...०		१०
भारतेतिहाससार	.. १		०
सार्थगीता (भगवद्गीता मराठी टीकेसह रे-शमी)	...	...०	१२
गीता सुबोधचंद्रिका	..०		१०
धर्मसिंधु (संस्कृत म० भाषांतरासह)	.. ६		०
तुकारामाचा गाथा	...२		८
कीर्तनतरंगिणी भाग १ ला.	०		१४
" " भाग २ रा.	१		२
" " भाग ३ रा.	०		१४
उपयुक्त कथासंग्रह भाग १ ला	...	...२	०
उपयुक्त कथासंग्रह भाग २ रा	...	..२	०

	किं.	रु.	आ.
केसरीतील निवडक निबंध भाग १	...	.. १	०
" " भाग २	..	१	०
शिक्षणसार	...	...०	९
हरिविजय कथारस.	...१		७
पांडवप्रताप कथारस.	...१		४
रामविजय कथारस.	...१		४
संतलीलामृत कथारस....	१		४
भक्तिविजय कथारस.	.. १		४
जैमिनिअश्वमेध कथारस.	१		८
शिवलीलामृत कथारस.	०		१०
राजपुत्र शूरसेन...	...१		०
हंसपालिका कादंबरी	.. १		८
नारायणराव आणि गोदावरी...	...	.. १	४
वेणु (कादंबरी)..	...१		०
चंद्रकला (कादंबरी)	.१		४
बृहत्कथासागर भाग १ ला (कादंबरी)...	...२		४
गुलबंकावली मराठी	.. १		४
मंजुघोषा ...	...१		४
वसंतकोकिला...	...१		८
मित्रचंद्र... ...	...१		४
मदनमंजरी ...	...२		०
विचित्रपुरी ...	२		०
विदुरनीति ...	...०		४
सिंहासनबत्तिशी ..	...०		३
वेताळपंचविशी...	...०		६
स्त्रीचरित्र रावजी डाक्टर पैकीं भाग १।२।३।४ दर भागास...	..२		०
महाराष्ट्रभाषेतील मनोरंजक गोष्टी भाग ५ प्रत्येकीं ..	...	१	८

वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदेवाडी, मुंबई.

सुन्दरी आणि वसंतसेन

भाग १ ला.

हें पुस्तक

पंडित वामनशास्त्री इसलामपूरकर

यांनीं लिहिलें.

सन्तुष्टाऽलोलुपा दक्षा धर्मज्ञा प्रिय सत्यवाक् ।
अप्रमत्ता शुचिःस्निग्धा पतिं त्वपतितं भजेत् ॥

याज्ञवल्क्यः

वासुदेव मोरेश्वर पोतदार

यांनीं

मुंबईंत

"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९२.

किंमत चार आणे.

[हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व प्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.]

प्रस्तावना.

उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासांत जे कांहीं लाभ झाले त्यांत हिंदुस्थानी भाषा व तींतील अनेक ग्रंथांचे अवलोकन व त्यांचा व्यासंग, हा एक मोठा लाभ झाला. राजपुताना इलाख्यांत भरतपूर ह्मणून एक राजधानी आहे. तेथें कांहीं कार्यसंबंधानें आमचें बरेच दिवस राहणें झालें होतें. तेथील प्रसिद्ध दरबार वकील जानी बेहारीला या विद्वान् गृहस्थाशीं आमचा विशेष परिचय झाला होता. हे गृहस्थ मोठे मार्मिक, व शोधक असून हिंदीभाषेंत फारच प्रवीण आहेत. यांनीं संस्कृत व्याकरणाच्या पद्धतीवर त्या भाषेंत एक मोठें अत्युत्तम व्याकरण लिहिलें आहे. त्यांनीं हिंदी भाषेंतील प्रसिद्ध कवि व ग्रंथकार यांच्याशीं आमचा चांगला परिचय करून दिला. प्रकृत गोष्ट ही मूळ हिंदी भाषेंत बऱ्याच वर्षांपूर्वीं मोहनसेन नांवाच्या कोणी मनुष्यानें लिहिली होती. ती कधीं व कोणत्या ठिकाणीं लिहिली याबद्दल कांहीं विशेष माहिती मिळाली नाहीं.

मूळ पुस्तक बरेंच मोठें असून लिहिणाराची भाषासरणी व भाषापटुत्व याची उत्तम साक्ष देतें. आह्मीं तें पुस्तक वाचलें, तेव्हां आम्हांस तें फार पसंत पडलें. व आमच्या विद्वान् मित्रानीं त्याचें मराठींत भाषांतर करण्याविषयीं आग्रह केला त्यावरून आम्हीं तें काम हातीं घेतलें. मूळ पुस्तकांत कांहीं फेरबदल न करितां अक्षरशः भाषांतर करण्याविषयीं प्रयत्न करावा, असा इरादा होता व त्याप्रमाणें साधेल तसें मूळाला न सोडतां हें भाषांतर केलें आहे. यद्यपि

स्थलविशेषीं महाराष्ट्र भाषेंत आणावी तितकी गोडी आणतां आली नसेल, तथापि मूळ उद्देश व या गोष्टीचें पर्यवसान यावर लक्ष्य ठेवून आम्हीं हें पुस्तक लिहिलें. यांतील नायिकेच्या तिन्ही जन्मांतील हकीगतीचें निरनिराळें वर्णन असून त्याचे एकापेक्षां एक मोठे असे तीन भाग झाले आहेत. ही गोष्ट आम्हीं सन १८८३ च्या आगष्ट महिन्यांत लिहिली असून इतर कामाकडे विशेष लक्ष्य लागल्यामुळें, ही तशीच सांदींत पडली होती. पण आमचे मित्र रा. रा. वासुदेव मोरेश्वर पोतदार यांणीं प्रसिद्ध करण्याचें मनावर घेऊन उत्तेजन दिल्यामुळें ही वाचकांच्या दृष्टीला गोचर झाली. याबद्दल त्यांचे आभार प्रदर्शित केल्यावांचून राहावत नाहीं

वा. शा. इ.

॥ श्रीराधारमणो जयति ॥

श्रीमद्राधारमणं वन्दे स्वाभीष्टदेवतां सिद्धये ॥
यत्पदकञ्जपरागस्पर्शः किं किं न साधयेदिष्टम् ॥ १ ॥
श्रीमद्गणेशवाणी देवीच्या चरणपङ्कजा नमुनी ॥
विघ्नध्वान्तविनाशा प्रतिभातेजोदयासि याचिं मनीं ॥ २ ॥

एके दिवशीं स्वतः निरीच्छ असून सकल स्थावर-जंगमात्मक जगाचें कल्याण करण्याविषयीं ज्यांचा अवतार व जे आपल्या इच्छामात्रें करून पाहिजे तें करण्यास समर्थ, असे श्रीगोरखनाथस्वामी समाधीचें विसर्जन करून आसनावर स्वस्थ बसले होते. तों इतक्यांत तीर्थयात्रेला जावें असें त्यांच्या मनांत आलें. वस्तुतः त्यांला तीर्थांत जाऊन स्नानदानादिक करून कांहीं पुण्य संपादन करावयाचें अथवा पापाचा क्षय करावयाचा होता असें मुळींच नव्हतें. कारण त्यांच्यासारख्या साधूंच्या हृदयांत सदैव वास्तव्य करणारा परमेश्वर त्यांच्या सर्व अशुभांचा क्षय करीत असतोच. पण महात्मे पुरुष जीं तीर्थयात्रादिक कर्में करितात त्यांचा मुख्य उद्देश असा असतो कीं, यात्रेच्या निमित्तानें अनेक प्रदेशांत संचार होतो, व त्यामुळें अनेक पाप्यांचा उद्धार होतो. आणि त्या सत्पुरुषांनीं तीर्थांत स्नान केलें म्हणजे तींच स्वतः पवित्र होतात. तात्पर्य, श्रीगोरखनाथाला तीर्थयात्रा करून कांहीं साधावयाचें नव्हतें. केवळ परोपकारार्थच यात्रा करण्याचा त्यांच्या मनांत विचार आला.

तेव्हां लगेच आसनावरून उठून उत्तराभिमुख प्रयाण

करण्यास आरंभ केला. कारण, इतर लोकांप्रमाणें त्यांला वाटेंत फराळ पाण्याची वगैरे कांहीं तयारी करावयाची नव्हती. पाठीमागून हजारों शिष्यमंडळी जाऊं लागली. त्यां सर्वांस, ही स्वारी आतां कोणीकडे जाणार, हें मुळींच कांहीं समजलें नाहीं. कारण, अमुक एक नियमित स्थलीं जावयाचें असें मुळींच नव्हतें. जिकडे इच्छा होईल तिकडे जावयाचें, तेंव्हा त्यांणीं समजावें तरी काय? असें होतें तरी गुरुजींस विचारण्याचें कोणासही धैर्य झालें नाहीं. ही शिष्यांची झुंड बरेच दूरपर्यंत गुरुजीच्या पाठीमागून गेली; पण रानावनांतून निःशंकपणें यथेच्छ गमन करणाऱ्या गुरुजीचा उद्देश कांहींच न कळल्यामुळें निरुत्साह होऊन बहुतेक शिष्यांनीं हळुहळू मागचा रस्ता धरला. त्यांतून जे कांहीं निःसीम गुरुभक्त होते तेवढे मात्र गुरुजीच्या चरणकमलाचें ध्यान करीत मोठ्या आनंदानें नाथाच्या पाठीमागून चालू लागले.

इकडे गोरखनाथस्वामी हृदयांत परमेश्वराचें ध्यान करीत करीत थेट उत्तर दिशेस चालले होते. मार्गांत अनेक नद्या, पर्वत, वृक्ष, पाषाण इत्यादिकांची शोभा अवलोकन करून परमेश्वराच्या विराट्स्वरूपाचें साश्चर्य अवलोकन करीत होत्साते हिमालयाच्या पायथ्याशीं प्राप्त झाले. तेथें कांहीं वेळ विश्रांति घेऊन मानससरोवराचा रस्ता धरला. त्या हिमालयपर्वतावर अनेक हत्त्या, गेंड्या व सिंह, वाघ वगैरे घातक जनावरें असतांही, परमेश्वराकार अंतःकरण अशा गोरखनाथस्वामीला तो मार्ग केवळ सुखकारकच वाटला. यावेळीं दृढनिश्चय करून गुरुजीच्या पाठीमागून येणाऱ्या पट्टशिष्यांची देखील मजल थकली. त्यांस गोर-

ग्वनाथावरोवर जाण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें. त्यांनीं अनेक प्रकारें प्रार्थना केली; पण त्यांची परीक्षा पाहण्याकरितांच कीं काय, गोरखनाथ त्यांस कांहीं उत्तर न देतां थेट मानससरोवराकडेस जाऊं लागले. तेव्हां निरुपायास्तव वरोवर आलेल्या शिष्यांसही सहजच मागें फिरावें लागलें.

इकडे गोरग्वनाथ त्या पर्वताची शोभा अवलोकन करीत करीत अल्प काळानें मानससरोवराजवळ प्राप्त झाले. या सरोवराची दिव्य शोभा किती तरी वर्णन करावी? तें त्याचें सफेत उदक, व आसमंतात् देवदारु, मंदार इत्यादि दिव्य वृक्षांची शोभा, तसेंच त्यांत प्रफुल्लित झालेल्या सुवर्णमय कमलांच्या सुवासास लुब्ध होऊन व त्यांतिल मधु प्राशन करून एखाद्या मद्यप्यासारखे उन्मत्त होऊन गुंजारव करीत असलेले भ्रमर आणि त्याच्या अगाध उदकांत इतस्ततः संचार करीत असलेले सुवर्णमय मत्स्य, कच्छप इत्यादि जलचर, असमंतात् असणाऱ्या दिव्य वृक्षांवर वसून मनोहर गायन करीत असलेले हंस, कारंडव, चक्रवाक, सारस, क्रौंच, कोकील इत्यादि पक्षी पाहून नाथाला मोठें कौतुक वाटलें. सिद्ध, गंधर्व, यक्ष, किन्नर इत्यादिकांच्या स्त्रिया त्या सरोवरांत स्नान करीत होत्या, व त्यांच्या अंगास लागलेल्या केशर कस्तूरी इत्यादिकांच्या मिश्रणानें त्याचें उदक अत्यंत सुवासित झालें होतें. अशा त्या मानससरोवरास अवलोकन करून त्यांस फारच आनंद झाला.

सरोवराच्या तीरावर गेल्यावर त्याची शोभा अवलोकन करीत व मंद सुगंध वायूचें सेवन करीत करीत, गोरखनाथस्वामीनें तेथें कांहीं वेळ विश्रांति घेतली. आणि स्नान करण्या-

करितां त्या दिव्य सरोवरांत प्रवेश करणार इतक्यांत तेथें एक अपूर्व चमत्कार घडून आला. तो असा कीं, त्या सरोवराच्या उदकांत एक हंस आणि त्याची स्त्री हंसी हीं दोन्ही यथेच्छ जलक्रीडा करीत होतीं. त्यांतल्या हंसीनें गोरखनाथ जवळ आले आहेत असें पाहून आपल्या पतीस म्हटलें, 'दूर व्हा. यावेळीं माझ्या अंगाला स्पर्श करूं नका. हे पहा ! मोठे तपस्वी गोरखनाथस्वामी आपल्या समोर उभे आहेत. न जाणों, आमचें वर्तन पाहून त्यांच्या मनांत काय येईल कोणास ठाऊक ? कारण हे महात्मे साधु थोड्याशा गोष्टीनें संतुष्ट होतात आणि प्रसंग विशेषीं असंतुष्ट होऊन शापही देतात ! तेव्हां अशांच्या समोर मर्यादेनें राहणें हेंच योग्य आहे.' याप्रमाणें तिनें आपल्या पतीला सांगितलें तें गोरखनाथांच्या कानीं पडल्यावरून प्रथम त्यांस—हे पक्षी असून यांस मनुष्यासारखें शुद्ध कसें बोलतां आलें? याचें मोठें आश्चर्य व त्यांची मर्यादशीलता पाहून समाधान वाटलें. आणि त्याविषयीं ते विचार करुं लागले. नंतर क्षणमात्र विचार करून दिव्यदृष्टीनें त्या हंसमिथुनाचें पूर्ववृत्त जेव्हां त्यांस समजलें, तेव्हां अत्यंत क्रोधायमान होऊन त्या उभयतांची त्यांनीं फारच निंदा केली व तत्काळ रागानें आपल्या हातांतला दंड दोघांवरही फेंकून दिला. त्याच्या प्रहारानें हंसी तर तत्काल गतप्राण झालीच; पण हंसाला म्हणण्यासारखी कांहीं इजा झाली नाहीं. तो तेथून कांहींसा दूर उडून दुसरीकडे गेला आणि तेथें बऱ्याच वेळानें सावध झाला. कांहीं वेळानें त्यास ओझरता लागलेल्या दंडप्रहाराची वेदनाही हळु हळु कमी झाली.

आतां या हंसाच्या जोडप्याचें पूर्ववृत्त कसें काय होतें

व त्याबद्दल गोरखनाथांला एवढा राग कां आला याची जिज्ञासा सहज उत्पन्न होते. व ती पूर्ण करण्याकरितां त्याचें पूर्ववृत्त थोडेंसें येथें सांगितलें पाहिजे. तें असें कीं, पूर्वजन्मीं हा हंसपक्षी व त्याची स्त्री हीं दोघेंही पांचाल देशांत एका सुशील व विद्वान् अशा ब्राह्मणाच्या कुलांत उत्पन्न झालीं होतीं. या हंसाचें पहिलें नांव धर्मदत्त आणि त्याच्या स्त्रीचें नांव पद्मिनी. उभयतांनीं यथाविधि यथा-शास्त्र बहुत कालपर्यंत गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून यज्ञ-याग इष्टा-पूर्त इत्यादि अनेक कर्में करून परमेश्वराची एकनिष्ठपणें उत्तम सेवा केली. तेथें त्यांस इतर सर्व सौख्य मिळालें होतें पण एका पुत्रसुखाचा मात्र त्यांस लाभ झाला नाहीं, तथापि—ही एक परमेश्वराची आपल्यावर कृपाच आहे व गृहपाश तोडण्यास निपुत्रिकता हें मोठें साधन आहे, असें समजून मोठ्या आनंदानें आपल्या घरांतील सर्व स्थावर जंगम वित्ताचें दान-धर्माच्या कामीं सार्थक करून उभयतांनीं तीर्थयात्रा करण्याचा संकल्प करून पुनः घरीं न येण्याच्या निश्चयानें प्रयाण केलें.

अनेक तीर्थें व क्षेत्रें परिभ्रमण करून शेवटीं तीं दोघेंही मानससरोवरावर प्राप्त झालीं. तें स्थान अवलो-कन करून अंतःकरण फार प्रसन्न झाल्यामुळें उभयतांनीं राहिलेलें आयुष्य तेथेंच ईश्वरसेवनांत घालविण्याचा दृढ-निश्चय केला. कांहीं कालानें त्यांच्या उग्र तपश्चर्येनें भग-वान् शंकर सुप्रसन्न होऊन त्यानें त्यांस दर्शन दिलें आणि अंतःकरणांतले विषयाचे संस्कार समूळ नष्ट होईपर्यंत तेथेंच राहून तपश्चर्या करण्याविषयीं आज्ञा केली. नंतर त्यांनीं विषयसेवनाचा अगदींच त्याग करून अत्यंत उग्र

तपश्चर्येस आरंभ केला. पण यांचें प्रारब्धकर्म कांहीं विलक्षण प्रकारचें होतें त्यामुळें मध्येंच विघ्न आलें !

तें असें कीं, एके दिवशीं हीं उभयतां प्रातःस्नान करून ईश्वराचें आराधन करीत बसलीं असतां, हरिणाचें रूप धारण करणारा एक ऋषि कामार्त होऊन एका हरिणीच्या मागें लागला होता. तीं उभयतां धांवत धांवत धर्मदत्त आणि पद्मिनी हीं स्त्रीपुरुषें जेथें तपश्चर्या करीत बसलीं होतीं तेथें एकाएकीं प्राप्त झालीं. यद्यपि धर्मदत्त स्त्रीसह तपश्चर्येस बसला होता तथापि त्यानें हिंस्र पशूपासून आपलें रक्षण होण्याकरितां एक उत्तम खड्ग आपले सन्निध ठेविला होता. प्रथम त्यांतील हरिणी धांवत धांवत यांच्या जवळ आली. तेव्हां अकस्मात् तिच्या धांवण्याचा शब्द श्रवण करून, कोणी तरी श्वापद आपल्या अंगावर येत आहे असें समजून, डोळे मिटून बसलेल्या धर्मदत्तानें नीट अवलोकन न करितां एकदम तरवार त्याच्या अंगावर फेंकली. त्या शस्त्राचा प्रहार हरिणीच्या अंगावर लागला व तेणेंकरून ती तत्काल गतप्राण झाली.

हें कृत्य अवलोकन करून तो कामार्त झालेला हरणाचें रूप धारण करणारा ऋषि अत्यंत शोकाकुल झाला व त्याला मोठा रागही आला. त्याच्या आवेशांत त्यानें या उभयतांस शाप दिला कीं,—'ज्याकरितां तुम्हीं कामार्त झालेल्या माझ्या इच्छेचा भंग केला आणि अपराधावांचून या माझ्या प्रियेचा (हरिणीचा) वध केला, त्याकरितां तीन जन्मपर्यंत तुम्हां उभयतांस अनेक दुःखें भोगावीं लागतील व कोणत्याही रीतीनें परस्परांचा समागम घडून येणार नाहीं ! व समागम करण्याविषयीं जेव्हां जेव्हां प्रयत्न कराल तेव्हां

तेव्हां कांहीं अनिवार्य विघ्न उपस्थित होईल.' याप्रमाणें त्यानें शाप दिला तेव्हां भयाभीत होऊन उभयतां स्त्रीपुरुषांनीं त्या ऋषीची अनेक प्रकारें प्रार्थना करून त्याला प्रसन्न करून घेतलें. तेव्हां त्यानें दिलेला शाप तर फिरविला नाहींच, पण—'तमें झालें तरी उभयतांच्या प्रेमांत कधींही अंतर पडावयाचें नाहीं, व व्यभिचार घडणार नाहीं. आणि तिसऱ्या जन्माच्या शेवटीं तुह्मीं उभयतांही या ठिकाणीं येऊन पोहोंचाल. व येथें तप आचरण करून ईश्वर-कृपेनें उत्तम पदास जाल,' असें वरदान दिलें आणि तो तेथेंच गुप्त झाला. आतां पुढें काय करावें? ह्मणून धर्म-दत्त व त्याची स्त्री चिंताक्रांत होऊन विचार करीत होतीं. इतक्यांत त्या ऋषीच्या शापाप्रमाणें उभयतांस तत्काल देहांतर प्राप्त झालें. तीं दोघेंही हंसाचें रूप धारण करून तेथें वास्तव्य करूं लागलीं. तथापि त्यांस ऋषीच्या अनु-ग्रहानें पूर्वजन्माचें स्मरण होतें. हें त्या हंसाच्या जोड-प्याचें पूर्वजन्मांतलें वृत्त झालें. आतां गोरखनाथाला त्यांचा राग येण्याचें कारण असें कीं,—तशी उग्र तपश्चर्या केली व त्यापासून परलोक साधावयाचा, तें एकीकडेच राहून त्यांणीं केवळ अविचारानें हा शाप मिळविला. बरें, आतां तरी लवकर लवकर तिन्ही जन्म भोगून आपला पुढचा मार्ग पहावा तें सोडून हीं उभयतां खुशाल विषयसुखांत रममाण झालीं आहेत, हें गोरखनाथाला खपलें नाहीं म्हणून त्याला राग आला. महात्म्यांचा राग देखील कल्याण-कारकच होतो. निदान या हंसाच्या देहांतूनें तरी यांस मुक्त करावें म्हणून गोरखनाथानें त्यांच्यावर आपल्या दंडाचा प्रहार केला. त्यापासून हंस तर वांचलाच, पण

त्याच्या स्त्रीला तत्काल देहांतर प्राप्त झालें. ती उत्तम रूपवती स्त्री होऊन गोरखनाथापुढें हात जोडून उभी राहिली. तेव्हां त्यांनीं तिला 'तूं काळजी करूं नकोस. थोडक्याच दिवसांत हा तुझा पतिही मनुष्यरूपी होऊन तुला भेटेल,' असें सांगितल्यावरून ती फार आनंदित झाली. गोरखनाथही कांहीं वेळ तेथें राहून इष्ट दिशेला निघून गेले.

इकडे सुंदर स्त्रीचें रूप धारण करणारी ती हंसी त्याच सरोवराच्या कांठीं संचार करीत करीत त्याची दिव्य-शोभा अवलोकन करीत आहे इतक्यांत अकस्मात् मोठा सोसाट्याचा वारा सुटून जिकडे तिकडे एकच कल्होळ होऊन गेला. या गडबडींत ती स्त्री अतिशय भयाभीत होऊन—कोठें तरी आश्रयास उभें राहावें—अशी इच्छा करून एका मोठ्या झाडाकडे जात आहे तों वायूनें—त्या सुंदरीच्या सर्व शरीराची शोभा व्यक्त करण्याकरितांच कीं काय, तिचें वस्त्र हरण केलें. तें सांवरून धरण्याविषयीं तिनें पुष्कळ प्रयत्न केला. पण वातरूपी राक्षसापुढें त्या बिचाऱ्या अबलेचें काय चालणार आहे? याप्रमाणें ती नग्न झाल्यामुळें अतिशय लज्जित होऊन देह झांकण्याकरितां सरोवराच्या उदकांत जाऊन बसली.

इतक्यांत वसंतसेन नांवाचा नेपाळ देशाचा राजा, मृगया करीत करीत सहज त्या प्रदेशांत प्राप्त झाला. दोन-प्रहरच्या समयीं क्षुधा व तृषा यांनीं अतिशय पीडित झाल्यामुळें कोठें तरी विश्रांति द्यावी म्हणून तो त्या सरोवराच्या तीरावर आला. आपल्या घोड्यावरून खालीं उतरून राजानें त्या दिव्य सरोवराचें उदक यथेच्छ प्राशन केलें आणि तेथें घटकाभर विश्रांति घेत बसला. कांहीं

वेळानें–परत माघारें जावें, असा विचार करीत आहे तों त्या सरोवरांत उदकांतर तुरंगत असल्या सारखें दिसणारें त्या सुंदर स्त्रीचें मुख त्याच्या दृष्टीस पडलें. प्रथम तर राजाला हें कमलच असावें असें वाटलें. पण कांहीं वेळ नीट अवलोकन केल्यावर तें केवळ कमल नसून स्त्रीचें मुखकमल आहे अशी त्याची खातरी झाली. व ही काय जलदेवता आहे, अथवा यक्षिणी आहे किंवा कोणी तपस्विनी आकंठपर्यंत उदकांत राहून तपश्चर्या करीत आहे किंवा ही आहे तरी कोण? असा राजा वसंतसेन विचार करीत आहे, तों त्या सुंदरीनें आपले कटाक्षबाण आकर्ण ओढून राजाच्या हृदयांत इतके खच्चून मारले, कीं तेणेंकरून तो तत्काल मूर्च्छित पडला. नंतर कांहीं वेळानें सावध होऊन तिला म्हणाला, 'हे सुंदरी! तूं कोण आहेस? काय तूं राजकन्या आहेस? किंवा अप्सरा आहेस? किंवा साक्षात् रती आहेस? हें कांहीं समजत नाहीं. या उदकांत पडून राहण्यासारखें तुझ्यावर असें काय संकट प्राप्त झालें आहें तें सांग.' हें भाषण ऐकून ती स्त्री म्हणाली:–

'आपण विचारलेल्या स्त्रियांपैकीं मी कोणही नाहीं. व माझ्यावर तसें विलक्षण कालचक्रही फिरलेलें नाहीं. अकस्मात् वस्त्रहीन झाल्यामुळें मी या उदकांत प्रवेश केला आहे. वस्त्र जाण्याचें कारण काय म्हणाल, तर दैव–दुर्विलसितावांचून दुसरें कांहीं नाहीं'!

हें वाक्य ऐकून राजास तिची मोठी करुणा आली व कदाचित् ही सुंदरी आपणांस प्राप्त होईल म्हणून फार आनंदही झाला. आणि तिचा हेतु समजून घेण्याकरितां तो पुनः तिला म्हणाला, 'हे सुंदरी, तूं माझ्यावरोवर

येशील काय? तुझ्या सारख्यांना या भयंकर रानावनांत राहणें योग्य नाहीं. तूं राजमाहालांत बसून सुखानें या देहाचीं आणि माझ्या सर्व राज्याची स्वामिणी हो. मी तुझी लज्जा रक्षण करितों'.

हें वाक्य ऐकून त्या स्त्रीला राजाचा हेतु समजला. व तिला तो बिलकूल मान्य नव्हता तरी निरुपायास्तव तिला त्याचा धिक्कार करतां आला नाहीं. युक्ति प्रयुक्तीनें त्याचें समाधान करून आपला कार्यभाग करून घ्यावा असा विचार करून ती त्याला म्हणाली, 'मी वस्त्रहीन आहें म्हणून या उदकांत शिरलें आहें, तर प्रथमतः मला कांहींतरी वस्त्र द्या म्हणजे उदकाच्या बाहेर येऊन नंतर तुमचें म्हणणें काय आहे तें पाहीन आणि माझी सर्व हकीगतही तुम्हाला निवेदन करीन.'

हें तिचें भाषण ऐकून राजानें झटकर आपल्या आंगावरचा शेला काढून त्या सुंदरीस दिला. त्याचें परिधान करून ती तीरावर आली, आणि चोहोंकडे न्याहाळून पाहूं लागली. हा वेळपर्यंत राजा केवळ तिचें मुखारविंद अवलोकन करूनच इतका मोहित झाला होता, त्याच्या तो तिचा दिव्य देह समग्र दृष्टीस पडतांच त्याची अवस्था फारच विलक्षण झाली. मदनबाणांनीं व्यथित झालेल्या राजास केव्हां एकवेळ तिला आलिंगन देईन असें झालें होतें, व तो अतिशय बावरा झाला होता. तथापि त्या सुंदरीचें दिव्य तेज अवलोकन करून राजास तिच्या अंगाला स्पर्श करण्याचें धैर्य झालें नाहीं. तो अत्यंत उत्कंठित होऊन एकसारखा तिच्याकडे टक लावून चित्रवत् उभा राहिला होता.

इकडे त्या सुंदरीनें चोहोंकडे पाहतां क्षणतां—मन उदास होऊन एका वृक्षावर चिंताक्रांत बसलेल्या आपल्या पतीस (हंसास) पाहिलें आणि त्याला ह्मणाली—'ललाटीं लिहिलेलें कोणाच्यानेंही अन्यथा करवत नाहीं. मी आतां या राजावरोवर जातें. पण कांहीं काळानें तुलाही शोधून काढून आपल्याजवळ घेऊन जाईन'.

हें वाक्य ऐकून हंस दुःखित होऊन ह्मणाला, 'तूं तर चतुरच आहेस. पण मीही तुला एक गोष्ट सांगतों ती ध्यानांत ठेव. तूं कशासही भुलून जाऊं नकोस. आणि सांगितल्याप्रमाणें माझा शोध कर ! आतां या राजाच्या स्वाधीन तर होशीलच पण धर्माचें विस्मरण होऊं देऊं नको ! कारण, परलोकीं तोच एक आपलें साह्य करणारा आहे. राजगृहांत अनेक छल, माया, कपट, इत्यादिकांत प्रवीण अशीं मनुष्यें असतात. त्यांच्या जाळ्यांत कधींही सांपडूं नकोस. वाकी आणखी तुला कांहीं विशेष सांगावें असें नाहीं. तूं सर्व जाणतच आहेस.' हें बोलत असतां त्याच्या डोळ्यांतून ढळढळां अश्रूचे प्रवाह चालूं लागले. त्याला प्राणापेक्षांही अत्यंत प्रिय अशा आपल्या धर्म-पत्नीचा वियोग सहन करण्याचा प्रसंग हा प्रथमच प्राप्त झाल्यामुळें तो त्यास फारच दुःसह झाला होता. पण करतो काय ? निरुपायास्तव सहन करणें प्राप्त झालें.

इकडे त्या सुंदरीनें,—'मी तुझ्या आज्ञेचें कधींही उल्लंघन करणार नाहीं व जरी मीं अशा संकटांत पडलें आहें तरी सर्वसाक्षी धर्म निरंतर माझें रक्षण करील. तूं माझ्याविषयीं कांहींच काळजी करूं नकोस' असें सांगितलें. आणि ती राजाच्या सन्निध प्राप्त झाली. राजा

तिच्या रूपाकडे पाहून अगदीं तल्लीन झाला होता व हीं उभयतां हंसपक्षाच्या भाषेनें बोलत होतीं यामुळें राजास त्यांचें भाषण कांहींच समजलें नाहीं. ती स्त्री मिळाली असें समजून तो आनंदसमुद्रांत अगदीं लीन होऊन गेला होता. सुंदरीनें त्याला हाक मारतांच एकाएकीं डोळे उघडून पाहातो तों ती मनमोहिनी त्याच्या दृष्टीस पडली. मग काय विचारतां ! तो घाबऱ्या घाबऱ्यां तिला मिठी मारण्यास प्रयत्न करूं लागला. हें पाहून तिनें अंमळ त्यास दरडाविलें, तेव्हां अंमळ शुद्धीवर येऊन राजानें—तुझी काय आज्ञा आहे ? म्हणून तिला विचारलें. तेव्हां ती म्हणाली, 'मीच तुमची आज्ञा मान्य करण्यास सिद्ध झालें आहें. मी विवस्त्र असतां तुम्ही आपलें वस्त्र देऊन माझी लज्जा रक्षण केलींत तेव्हां तुमचे मजवर अतिशयित उपकार झाले आहेत. ते माझ्या हातून कधींही फिटावयाचे नाहींत. मी तुमचें प्रिय करीन व तुमची आज्ञा मान्य करीन. पण तुम्ही अकार्य करण्याविषयीं मात्र मला आग्रह करूं नये. माझीं कांहीं गुप्तव्रतें आहेत तीं प्रसंग विशेषीं तुम्हाला मी कळवीन; पण त्यांच्या आड मात्र तुम्ही येतां कामा नये, म्हणजे मला तुमच्या गृहांत राहणें फारच सुखकर होईल.' असें तिचें भाषण ऐकून राजानें तिचें सांगणें मान्य केलें. तेव्हां समाधान प्रदर्शित करून ती त्याच्याबरोबर नगरांत जाण्यास सिद्ध झाली.

त्या स्त्रीचें नांव गांव वगैरे राजाला कांहीं माहीत नव्हतें. त्यानें तिला सामान्यतः प्रथम सुंदरी म्हणून हाक मारली त्याप्रमाणें पुढेंही सुंदरी ह्याच नांवानें हाक मारीत असे, अर्थात् तेंच तिचें नांव पडलें. राजा वसंतसेन

कामरूपी पिशाचानें अगदीं वेडा झाला होता. त्याला तिच्या भाषणाचें मर्म कांहींच कळलें नाहीं. तो, ही आतां आपली पट्टराणी झालीच असें समजून, मोठ्या आनंदानें तिला बरोबर घेऊन आपल्या नगरास जाण्यास निघाला. मार्गांत अनेक पशु, पक्षी व मोठमोठीं वनें यांच्या शोभेकडे अवलोकन करून वरचेवर त्या सुंदरीस तो चमत्कार दाखवीत होता. व त्यांच्यांतील विशेषगुणाशीं तिच्या अवयवांचें सादृश्य कल्पून, तिच्या रूपाचें अनेक प्रकारें वर्णन करीत होता. इतक्यांत हरिणांचा कळप सामोरा आलेला पाहून राजा त्या स्त्रियेस म्हणाला:—

"हे सुंदरी, तुझ्या नेत्रांचे सुंदर चाळे अवलोकन करून ह्या हरिणी लज्जित होत्साल्या दूर पलायन करीत आहेत. ही तुझी अत्यंत बारीक कंबर अवलोकन करून सिंह तर लज्जायमान होत्साते गिरिकंदरांत दडून बसत आहेत. ह्या चमरी (वनगायी) तुझ्या केशपाशाची शोभा पाहून बहुत दिवस धारण केलेला आपल्या चंवराच्या सौंदर्याचा गर्व सोडून गलित होत आहेत. तुझ्या मंद सुंदर गतीला अवलोकन करून हे वनगज आपला अभिमान सोडीत आहेत. ह्या यक्ष, किन्नर इत्यादिकांच्या स्त्रिया तुझ्या निरुपम सौंदर्याला पाहून लज्जित होत्साल्या जणूं काय निरभिमान होऊन तपश्चर्या करण्याकरितां ह्या हिमालयाच्या शिखरावर आरोहण करीत आहेत. मी ज्या ज्या सुंदर स्त्रिया आजपर्यंत अवलोकन केल्या, त्या त्या तुझ्या सौंदर्याच्या सोळाव्या कलेला देखील पात्र नाहींत असें आतां मला वाटतें. जन्मांतरीं मीं जें कांहीं सुकृत केलें होतें त्याचा परिपाक होऊनच आज मला

तुझें दर्शन झालें. यामुळें मी आज आपणास कृतकृत्य मानतों. आज तुझ्या सहवर्तमान मला अवलोकन करून इंद्रादि देव देखील लज्जायमान होतील. लक्ष्मीसहवर्तमान विष्णुच आला कीं काय, असें सर्व लोक मानतील."

याप्रमाणें कामी मनुष्याला उचित अशीं अनेक प्रकारचीं तो भाषणें करीत होता. पण हीं त्याचीं बोलणीं अगदीं व्यर्थ होतीं. निस्सीम पतिप्रेमानें जिचें अंतःकरण भरलें आहे अशा त्या सुंदरीला ही त्याची वल्गना श्रवण करून समाधान तर मुळीं वाटलें नाहींच पण उलट अतिशय क्रोध मात्र आला. तथापि ती मोठी चतुर व मनाची गंभीर असल्यामुळें तिनें आपला खरा भाव मुळींच व्यक्त न करितां त्याचें तें भाषण ऐकलें न ऐकलेंसें करून दुसरीच कांहीं गोष्ट मध्यें काढली. तेव्हां अर्थात् त्याचे प्रेमालाप माजी पडले. ती मार्गांत जीं अनेक रमणीय स्थलें दृष्टीस पडत होतीं त्यांची शोभा पाहून त्यांच्या संबंधानें राजास वरचेवर प्रश्न करूं लागली. हें स्थल कोणाचें? या पर्वतशिखराचें नांव काय? हा आश्रम कोणाचा? असे प्रश्न करीत असे. तेव्हां तिनें केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देतां देतां आपल्या मनांतील गोष्टी बोलण्यास राजाला अवसरच मिळाला नाहीं.

असो, याप्रमाणें तीं उभयतां मार्ग क्रमण करीत करीत सायंकाळीं आपल्या नगरास येऊन पोंहचलीं. राजा तिला नगराची शोभा दाखवून त्याचें वर्णन बहुतसें करूं लागला. तेव्हां—आपलेस फार क्षुधा व तृषा लागली आहे; याकरितां लौकर घरींच चला—असें निमित्त करून तिनें एकदाचा राजवाडा गांठला. राजानें तिला एका उत्तम

शृंगारलेल्या महालांत नेऊन ठेविलें, आणि दास दासी वगैरे परिजनांस तिच्या सेवेंत तत्पर असण्याविषयीं हुकूम दिला. इकडे भोजनाची तयारी झाल्ली तेव्हां राजानें आपल्या ताटांत भोजन करण्याविषयीं तिला फार फार आग्रह केला. पण, 'कोणाचेंच उच्छिष्ट खावयाचें नाहीं अमा माझा नियम आहे,' असें सांगून मोठ्या संकटानें तिनें तो प्रसंग टाळला व निरनिराळ्या ठिकाणीं बसून उभयतांनीं यथेच्छ भोजन केलें. भोजनसमयीं त्या सुंदरीला आपल्या प्रियपतीचें स्मरण होऊन फारच दुःख झालें. पण प्राप्त झालेल्या गोष्टीस उपाय नाहीं, असें जाणून कोणत्यातरी युक्तीनें आपल्या पतीची भेट होईल असें करावें, या विषयींचा दृढ निश्चय करून तिनें आपल्या मनाचें समाधान केलें.

याप्रमाणें उभयतांचें जेवण खाण आटपलें व सारा दिवस फार श्रम झाल्याकारणानें सुंदरीस निद्रा येऊं लागली. पण कामातुर झालेल्या राजास दुसरें कांहींच सुचत नव्हतें. तो तिला खोदून खोदून अनेक गोष्टी विचारीत होता, व ती त्याला निराश न करितां कसेंतरी करून टाळाटाळ करीत होती. शेवटीं तिनें, 'मला फार श्रम झाले आहेत, व निद्रा येत आहे, तर आतां आपणही विश्रांति घ्यावी,' अशी मोठ्या नम्रतेनें राजाची विनवणी केली. तों इतक्यांत राजानें पूर्वीं आज्ञा केल्याप्रमाणें 'शेजेची तयारी करून ठेविली आहे,' असें सेवकांनीं येऊन सांगितलें. तेव्हां राजानें, 'चल शयन करावयास जाऊं,' असें म्हणून तिला शेजघरांत घेऊन गेला. खरोखर ही वेळ मोठीच आणिबाणीची होती. व

या वेळीं तिचें पातिव्रत्य राहणें फार कठीण होतें. तथापि, त्या चतुर व धूर्त स्त्रीला राजाचरोचर शेजघरांत प्रवेश करतांनादेखील कांडीमात्र भय वाटलें नाहीं. उघड च आहे. बुद्धिमान् व दृढनिश्चयी मनुष्याला कसलाही बिकट प्रसंग आला तरी त्याचें कठीण वाटत नाहीं. त्यास यांतून पार पडण्याची युक्ति तेव्हांच सुचते. असो, सुंदरीनें त्या शयनगृहांत कांहीं आढेवेढे घेतल्याशिवाय प्रवेश केला. हें पाहून राजाला फारच समाधान वाटलें, व तो तिच्याशीं अगदीं लगट करूं लागला. त्यानें अनेक प्रकारें तिच्या विनवण्या करून उभयतांचा आजच समागम व्हावा अशाविषयीं त्याणें फार प्रयत्न केला. त्या चतुर स्त्रीनेंही आपल्यावरचा हा प्रसंग टळावा म्हणून त्याची बहुत प्रकारें समजूत केली; पण तो कांहीं केल्या ऐकेना.

तेव्हां कांहीं युक्ति काढून त्यास अगदीं खरें वाटेल अशी तिनें एक गोष्ट सांगितली. ती म्हणाली, 'मी आजपर्यंत 'कुमारिका' आहें. मला अद्यापि पुरुषाचा स्पर्श देखील झालेला नाहीं. तेव्हां आपण माझ्याशीं यथाविधि विवाह करून द्यावा म्हणजे मी आपल्याला वश होईन आणि असें केल्यानें माझीं मातापितरें अधोगतीस जाणार नाहींत. मी तुमची धर्मपत्नी झालें म्हणजे आपणांस कांहीं दोष लागणार नाहीं आणि ऐहिक व पारलौकिक सुखास उभयतांही पात्र होऊं' हें तिचें भाषण राजास खरेंसें वाटलें व तें विचाराला अनुसरून असल्यामुळें त्याच्यानें अमान्य करवलें नाहीं. त्यानें आपलें मनही किंचित् आवरून धरिलें. पण इतक्यांत गांधर्वविधीचें स्मरण होऊन, 'आतांच तुझ्याशीं विवाह करून घेतों', म्हणून त्यानें

आग्रह धरला. तेव्हां ती म्हणाली, 'मी एका ऋषीची कन्या आहें. मला तुझ्यासारख्या क्षत्रियाशीं विवाह करून घेणें उचित नाहीं. तथापि ज्यापेक्षां तूं माझी लज्जा रक्षण केलीस व मींही तुला वचन दिलें त्यापेक्षां जरी हा विवाह प्रतिलोम आहे, तरी मी तो मान्य करीन. कारण दैव-योगानें तसाच प्रसंग प्राप्त झाला आहे. तथापि गांधर्वविधीनें मी तुझ्याशीं कदापि विवाह करूं इच्छित नाहीं. व तूंही धर्मज्ञ असून व प्रजेचें पालन करणारा साक्षात् विष्णु आहेस, तेव्हां गांधर्वविधि ब्राह्मणांस उचित आहे किंवा काय हें तुलाही माहीत असेलच. अतएव माझी प्रार्थना मान्य कर, आणि कांहीं दिवस दम धर. मी आतां सर्व-प्रकारें तुझ्या आज्ञेंतच आहें. माझे आईबाप, एके ठिकाणीं तपश्चर्या करीत आहेत त्यांचा तुला मी ठाव ठिकाण सांगेन. मग तूं त्यांस बोलावून आण आणि त्यांच्या हस्तें ब्राह्म-विधीनें तूं माझा स्वीकार कर, म्हणजे धर्माचें रक्षण होईल व माझ्या वृद्ध मातापितरांस फार आनंद होऊन तीं तुला आशीर्वाद देतील. आणि मीं बहुत दिवस पर्यंत जी तपश्चर्या केली व मनांत दृढ संकल्प धारण केला आहे त्याचेंही साफल्य होईल. याशिवाय, मला आपली धर्म-पत्नि करून घेणार असें तूं म्हणतच आहेस तेव्हां माझ्या पोटीं जो पुत्र उत्पन्न होईल त्याला तुझ्या पश्चात् राज्या-धिकार मिळाला पाहिजे व असें व्हावयाचें म्हटलें म्हणजे ही गोष्ट सर्व प्रजाजनांस मान्य झाली पाहिजे. तूं असा गुप्तपणें माझ्याशीं विवाह केलास तर लोक भलत्याच शंका घेतील. ते म्हणतील कीं, राजास कोठें चांगलीशी स्त्री मिळाली तिला हा भुलून गेला. आणि तिला आपल्या

घरांत आणून ठेविली. मला धर्मपत्नी असें कोणीही कबूल करणार नाहीं. तेव्हां तिकडूनही माझी व तुझी लोकांत अपकीर्तीच होणार आहे. याकरितां या सर्व गोष्टींचा विचार करून माझी प्रार्थना मान्य कर. म्हणजे सर्वप्रकारें उभयतांचें कल्याण होईल. कामवश होऊन माझा अतिक्रम करशील तर त्यापासून सुखाचा लवलेश न मिळतां अनिवार दुःखें मात्र तुला भोगावीं लागतील. जा ! आतां तुलाही फार श्रम झाले आहेत व मीही श्रमलें आहें. बहुत दिवस झालेल्या वियोगानें व्यथित झालेल्या तुझ्या अंतःपुरांतील स्त्रिया, आज तूं घरीं आलास हें आनंदकारक वर्तमान ऐकून, तुझ्या दर्शनाविषयीं तृषित होऊन चातकाप्रमाणें वाट पाहात बसल्या असतील त्यांच्या डोळ्यांचें पारणें फेड. आपल्याकरितां तळमळणाऱ्या अबलाजनांस दुःखसमुद्रांत टाकणें हें सत्पुरुषाला योग्य नाहीं.'

याप्रमाणें तिचें खडखडीत भाषण श्रवण करून उन्मत्त झालेला हत्ती वर्मावर लागलेल्या अंकुशानें जसा ताळ्यावर येतो, त्याप्रमाणें राजाचा तो सर्व भ्रम जाऊन तो खाडदिशीं पूर्वस्थितीवर आला. तिचें भाषण असें कांहीं मार्मिक होतें कीं, राजास त्याचें इंगित मुळींच कळलें नाहीं. व त्यास तिचें भाषण कठोर वाटून क्षणभर तिच्याविषयीं तो निराश झाला. पण पुनः तिनें आपल्याशीं विवाह करून घेण्याचें वचन दिलें आहे ही गोष्ट मनांत आणून त्याची आशा पुनः दृढ झाली. एकंदरींत या वेळीं त्याच्या मनाची स्थिति कांहीं चमत्कारिक झाली होती. सारा दिवसभर—आजच तिच्या अधरामृताचा आस्वाद घेण्याचा संकल्प करून जे त्यानें अनेक विचार

योजून ठेविले होते ते सर्व व्यर्थ जातात म्हणून त्यास फारच दुःख झालें. आणि बलात्कारानें देखील आपला हेतु सिद्धीस न्यावा असें त्याच्या मनांत आलें. पण तिच्या कोमल व तेजःपुंज शरीराकडे पाहून अशा नाजूक स्त्रीवर बलात्कार करणें हें त्यास अयोग्य वाटलें. यद्यपि तो अतिशय मदनानें पीडित झाला होता व कोणत्याही रीतीनें आपला मनोरथ आतांचे आतांच पूर्ण करून घ्यावा असें त्याच्या मनांत येत होतें; तथापि, ती कोणीतरी तपस्विनी आहे व कदाचित् ती असंतुष्ट होईल तर आपला नाश होईल, असें जाणून राजास तिच्याविषयीं बरीच भीति वाटूं लागली. शेवटीं निरुपायास्तव त्यानें आपलें मन शांत करून तिच्या वचनाप्रमाणेंच वागण्याचा विचार केला. तो अंतःपुरांत जाण्यास निघाला तरी त्याचें मन या सुंदरीकडे गुंतून गेल्यामुळें त्याच्यानें तेथून दुसरीकडे जावेना. इतक्यांत श्रांत झालेल्या त्या सुंदरीलाही निद्रेनें गांठलें. तिचे डोळे वरचेवर झांकत आहेत उघडत आहेत, वरचेवर जांभया येत आहेत, अशा स्थितींत निद्रालस झालेल्या त्या सुंदरीच्या मुखचंद्राच्या आड जाण्यास कांहीं केल्या त्याला धैर्य होईना. तथापि, कांहीं वेळानें तिला गाढ निद्रा लागली असें पाहून सेवकजनांस नीट बंदोबस्त ठेवण्याविषयीं आज्ञा करून उद्विग्न झालेला राजा मोठ्या संकटानें आपल्या अंतःपुरांत निघून गेला.

तेथें बहुत दिवसांच्या वियोगानें पीडित झालेल्या आपल्या स्त्रीला त्यानें दर्शन दिलें. तिनें मोठ्या आनंदानें आपल्या पतीची पूजा वगैरे करून त्याच्याशीं नानाप्रकारचे

विलास केले, पण सुंदरीवर आसक्त हृदय झालेल्या राजास त्यापासून कांहींच आनंद झाला नाहीं. त्याला ती रात्र एखाद्या कल्पाप्रमाणें मोठी झाली होती. केव्हां एकदांचें उजाडेल आणि मी तिचें मुखारविंद पाहीन म्हणून तो अगदीं उत्कंठित झाला होता. त्याच्या राणीनें हरतऱ्हेनें त्याचें मन रंजविण्याचे प्रयत्न केले, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. याप्रमाणें तळमळतां तळमळतां त्याचा अंमळ कोठें डोळा लागला.

याप्रमाणें त्या सुंदरीला मोहित झालेल्या राजा वसंतसेनाची मोठ्या संकटानें एकदांची ती रात्र सरली. प्रातःकाल होतांच दुसरें कांहीं कामकाज वगैरे न पाहतां मोठ्या गडबडीनें तो तिच्या भेटीस गेला. आणि त्यानें डोळेभर तिला निरखून पाहिलें, तेव्हां त्याच्या आत्म्यास अंमळ समाधान वाटलें. कांहीं वेळानें राजानें, 'पुढची इतिकर्तव्यता काय आहे?' म्हणून प्रश्न केला. तेव्हां ती सुंदरी म्हणाली, "तुला मी आपल्या मनांतील उद्देश सांगतें तो शांतपणें ऐकून घे. व ज्या ज्या गोष्टी सांगेन त्या सर्व लौकर सिद्ध करण्याविषयीं तजवीज कर." यावर राजानें "फार चांगलें आहे. मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें सर्व तयारी करतों." असें कबूल केल्यावर ती म्हणाली, "प्रथमतः मला राहण्याकरितां एक उत्तम प्रकारचें स्वतंत्र गृह तयार करीव. ज्यांत दुसऱ्यानें वास्तव्य केलें असेल अशा घरांत मी राहणार नाहीं. आणखी मला लागेल तितकें द्रव्य दे. मी त्याचा बहुतकरून धर्मकृत्यांतच व्यय करीन. याशिवाय मला हंसपक्ष्यांची फार आवड आहे म्हणूनच मी मानससरोवराच्या कांठीं राहत होतें. तेथें घटकाभर

मनाला विश्रांति व्हावी ह्मणून मी एक हंस पाळला होता. तो तुझी माझी गांठ पडली त्याच दिवशीं प्रातःकाळीं माझ्या हातांतून निसटून गेला तो पुनः सांपडला नाहीं. त्याच गडबडींत एकाएकीं एकचे एकच असलेलें माझें वस्त्रही वायूनें हरण केलें. तेव्हां मला दुसरीच चिंता लागल्यामुळें त्या हंसाचा शोध करण्याचें काम तसेंच राहिलें, व पुढें तर तुझ्या समागमें येथें आलें.

"तेव्हां त्या हंसाचा शोध लागण्याची मुळीं देखील आशा नाहींशी झाली आहे. पण माझें मन त्याच्यावर अतिशय जडलें असल्य.मुळें त्याच्यावांचून मला घटकाभर देखील करमत नाहीं. याकरितां तुझी माझ्यावर खरी प्रीति असेल तर मी सांगतें त्याप्रमाणें माझ्या प्रिय हंसाचा शोध कर, ह्मणजे मला फारच आनंद होईल. तुझ्या राज्यांत असणाऱ्या सर्व पारध्यांस एकमा हुकूम दे कीं, जो कोणी हंसपक्षी जिवंत धरून आणील त्यास मोठें इनाम दिलें जाईल. अशा रीतीनें प्रयत्न केला तर इनामाच्या आशेनें ते लोक अनेक हंस धरून आणतील आणि त्यांत कोठें तरी माझा तो क्रीडाहंस मला मिळेल. पारधी लोकांस विशेषतः मानससरोवराच्या आसपासचे हंस धरून आणण्याविषयीं आज्ञा कर ह्मणजे त्यांत तो मिळेल अशी माझी खात्री आहे. शेवटीं तुला आणखी एक कार्य सांगतें तें असें कीं, नैमिषारण्यांत माझीं प्रिय मातापितरें उग्र तपश्चर्या करीत आहेत त्यांस आमंत्रण पाठीव ह्मणजे नवीन तयार होणाऱ्या महालांत माझ्या आईबापांच्या हस्तें माझें यथाविधि दान तूं ग्रहण कर, व असें करशील तर मला फार संतोष होईल. स्त्रीपुरुषांच्या प्रेमाचा संबंध हा कांहीं

विलक्षण असून फार नाजूक आहे, व तो एकमेकांच्या अनुकूल वर्तनानें दृढ होतो. कोणी बलात्कारादिकें करून आपला मनोरथ पूर्ण करून घेण्यास इच्छितात. स्त्रियांपेक्षां पुरुषाच्या अंगीं सामर्थ्य विशेष असल्याकारणानें तो त्यांचा हेतु कधीं कधीं सिद्धीसही जातो. पण मला वाटतें कीं, अशा राक्षसीरीतीनें आपली इच्छा तृप्त करून घेणारे लोक अरसिकशिरोमणी व महामूर्ख होत. कारण, सुवासिक पुष्प मस्तकावर धारण करणें ही त्याची स्वाभाविक योग्यता आहे. पायानें चोळून टाकणें किंवा नाहींसें करणें हें कदापि योग्य नाहीं. असें आहे, तेव्हां परम कोमल व जिच्यापासून आपणास मोठा आनंदाचा लाभ व्हावयाचा अशा स्त्रीस युक्तिप्रयुक्तीनें आपल्यावर अनुरक्त करून घ्यावयाचें सोडून बलात्कार करणारांस दुसरीं कोणतीं विशेषणें द्यावींत, हें समजत नाहीं. उभयतांचा परस्परांवर अनुराग बसून दोघांचींही अंतःकरणें प्रेमरसार्द्र झालयावांचून त्यांत कितीसा आनंद उत्पन्न होणार आहे? अनुरक्त स्त्रीचा बळजोरानें उपभोग घेणाऱ्या पुरुषाला नरपशु म्हटलें तर चालेल. सारांश, या स्त्रीपुरुषांच्या व्यवहारांत अनुराग हाच मुख्य आहे. व तो परस्परांनीं परस्परांच्या मनाला अनुकूल वर्तन केल्यावांचून कधींही दृढ व्हावयाचा नाहीं. याकरितां राजा वसंतसेना ! तुला परम नम्रतेनें प्रार्थना करून सांगतें कीं, तूं भलते सलते विचार मनांत न आणितां पूर्वी सांगितल्याप्रमाणें वाग, व मीं मागितलेल्या वस्तूंची सिद्धता करून दे. तूं कुलीन व चतुर असून मोठा रसिक कही आहेस. माझ्यासारख्या दैवदुर्विलसितानें दीन झा-

लेल्या तापसी स्त्रीनें, तुझ्यापुढें पांडित्य करावें असें नाहीं. पण कामक्रोधादिक शत्रु हे केवळ पिशाचरूपी असून ते ज्याच्या बुद्धींत अधिष्ठित होतात त्याच्या विवेकास व बुद्धीस अगदीं झांकून टाकतात. असें असल्याकारणानें मीं तुला या दोन गोष्टी सांगितल्या आहेत याचा नीट विचार कर. स्त्रिया, अत्यंत क्रूर अशा व्याधास देखील अनुकंप्य आहेत, असें म्हणतात. मग तुझ्यासारख्या उदार व दयाळु पुरुषाला तर दयेस पात्र असतीलच यांत काय संशय?"

असो, याप्रमाणें त्या सुंदरीनें मोठ्या नम्रतेनें जी प्रार्थना केली ती श्रवण करून राजाचें मन बरेंच शांत झालें. यद्यपि गेल्या रात्रीं त्याचें मन जितकें खवळलें होतें तितकें या वेळीं खवळलें नसून तें बरेंच स्थितीवर आलें होतें. तथापि पुनः पुनः त्याच्या मनांत अनेक प्रकारच्या लहरी जेव्हां जव्हां येत असत तेव्हां तेव्हां त्याची स्थिति कांहीं विलक्षण होत असे. गेल्या रात्रींत त्यानें अनेक प्रकारचे विचार मनांत आणिले होते. शेवटीं बलात्कारानें देखील आपली इच्छा पूर्ण करून घ्यावी असा त्याचा संकल्प झाला होता. पण सुंदरीचें हें हृदयद्रावक गंभीर भाषण ऐकून व तिची ती सौम्य व कांहींसी उदास झालेली सुंदर मूर्ति अवलोकन करून त्याचें मन अगदीं विरघळून गेलें व तिच्याविषयीं कोणत्याही प्रकारचा आवेश त्याच्या मनांत मुळींच राहिला नाहीं. तिच्यावर होईल त्या रीतीनें दया करून तिचें प्रियच करावें असा त्याचा दृढ संकल्प झाला. खरोखर अशा सुंदर स्त्रीनें मोठ्या चतुराईनें व शांतपणानें केलेला बोध कोणाच्या मनांत भरणार नाहीं!

राजा वसंतसेन अगदीं प्रसन्न होऊन त्या सुंदरीला म्हणालाः—"हे चतुर स्त्रिये! तुझ्या या भाषणानें मी अत्यंत प्रसन्न झालों आहें. कामी पुरुष आपली वासना पूर्ण न झाली म्हणजे फार क्षुब्ध होतात; व त्यांच्या मनांत भलभलत्या कल्पनाही येत असतात. ते पाहिजे त्या रीतीनें आपला हेतु पूर्ण करून घेण्यास मागेंपुढें पाहत नाहींत. त्याचप्रमाणें माझ्याही मनांत बरे वाईट विचार येणें हें अगदीं साहजिक आहे. पण तुझ्या ह्या बोधामृतानें ते कुत्सित प्रसंग सर्व नाहींसे होऊन माझें मन अगदीं प्रसन्न झालें. आतां तूं माझ्या घरांत सुखानें रहा. मी तुला कोणत्याही प्रकारें दुःख देण्यास प्रवृत्ति होणार नाहीं. तूं माझ्या सर्व भाग्याची स्वामिणी आहेस. सर्व राज्यांत तुझी आज्ञा शिरसा मान्य करतील. तुला पाहिजे तितकें द्रव्य घेव त्याचा हवा तसा विनियोग कर. सारांश, तुला जें योग्य वाटेल तें तें करण्याविषयीं माझी कांहींच मनाई नाहीं. तूं सांगितलेल्या सर्व गोष्टी सिद्ध करण्याविषयीं मी मनोभावानें प्रयत्न करीन." असें सांगून एक सत्यशील नांवाचा प्रामाणिक व वयोवृद्ध असा आपला कारभारी राजानें तिच्या दिमतीस दिला. आणि सुंदरीला सांगितलें कीं, "तुला ज्या ज्या वेळीं जी जी गोष्ट कर्तव्य असेल ती या सत्यशीलास सांगत जा. हा नेहमीं तुझ्या आज्ञेंत राहील. हा मोठा बुद्धिमान् व इमानी आहे. यानें बहुत दिवस माझी एकनिष्ठपणें सेवा केल्यामुळें याच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. व तूंही त्याच्याजवळ कोणत्या प्रकारची शंका न घेतां मोकळया मनानें वागण्यास अनमान करूं नको."

राजा वसंतसेनाचें हें भाषण ऐकून सुंदरीला फार संतोष झाला. हावेळपर्यंत तिच्या मनांत मोठेंच भय होतें. तें असें कीं, मी सर्वस्वीं या राजाच्या हातीं सांपडलें आहें, तेव्हां यानें कदाचित् आपल्यावर बलात्कार केला तर इतके दिवस मोठ्या यत्नानें रक्षण केलेलें आपलें एक-निष्ठपणाचें व्रत नष्ट होईल, व अशा प्रसंगीं आपण कदाचित् त्याच्यावर क्रोध केला तर दीर्घकाल संचित केलेल्या तपाचा नाश होईल, आणि त्यापासून एका कठिण प्रसंगीं आपल्यावर उपकार करणाऱ्या मनुष्याचा नाश केल्याचें अपयशही प्राप्त होईल. वरें, कदाचित् आपण त्याचा तिरस्कार केला आणि त्यास राग येऊन त्यानेंही आपला तिरस्कार केला तर पतीचा शोध करण्याचा जो आपला इष्टहेतु तो मुळींच सिद्धीस जावयाचा नाहीं—अशा अनेक प्रकारच्या कठिण विचारांत तिचें मन अगदीं गोंधळून गेलें होतें. तें इतकें कीं, त्या वेळीं तिला आपल्या प्रियपतीचें स्मरण देखील करण्यास सवड मिळाली नाहीं. पण राजानें आपल्या सर्व गोष्टी मान्य केल्या व त्याचें प्रेमही आपल्यावरचें मुळींच कमी झालें नाहीं आणि त्याच्या अंतःकरणांतला तो कामरूप पिशाच विवेकरूपी पंचाक्षऱ्यानें अगदीं स्तब्ध करून टाकला आहे, असें पाहून तिचा जीव स्वस्थ झाला. आतां आपली सर्व कार्यें सिद्ध होतील अशी तिला उमेद आली.

तिनें मोठ्या नम्रतेनें राजाचे फार फार उपकार मानिले. आणि त्याच्या बुद्धीच्या शांतपणाची फार तारीफ करून त्यास म्हणाली, "मी आज मोठी धन्य आहें. पहा ! या संकटकालीं देखील तुझ्यासारख्या उदार,

विचारशील व रसिक प्रभूच्या हातीं मला ईश्वरानें दिलें आहे, हें एक माझ्या पूर्वपुण्याचेंच फल असावें असें मला वाटतें. आतां तुझे मजवर जे उपकार झाले आहेत त्याची उतराई होण्यास माझें काय सामर्थ्य आहे? तथापि मनोभावानें त्याचें मला जन्मजन्मांतरीं विस्मरण मात्र व्हावयाचें नाहीं. अस्तु. याविषयीं मीं आतां फार बोलत नाहीं."

असें सांगून तिनें राजाच्या समक्ष सत्यशीलास सांगितलें कीं, "या राज्यांत जितके ह्मणून फांसे पारधी असतील त्या सर्वांस हंसपक्षी धरून आणण्याविषयीं ह्याही फिरीव. विशेषतः मानससरोवराच्या आसपासचे हंसपक्षी धरून आणण्याविषयीं हुकूम दे, व त्याप्रमाणें जे हंस धरून आणतील त्यांस योग्य पारितोषिक मिळेल असेंही सर्वांस कळीव. या राज्यांत जे कोणी गोरगरीब, अनाथ, पंगु, तीर्थयात्रा करणारे वगैर लोक असतील त्यांनीं एक वेळ तरी मला दर्शन देऊन जावें, असेंही सर्वत्र प्रसिद्ध कर. हीं दोन्ही कार्यें होतील तितक्या त्वरेनें झालीं पाहिजेत." हें या नूतन स्वामिनीचें भाषण ऐकून सत्यशील 'बहुत बरें' ह्मणून उभयतांस मुजरा करून जाऊं लागला, तेव्हां राजानें पुनः त्यास हीं कामें लौकर करण्याविषयीं आज्ञा करून निरोप दिला, आणि राजा वसंतसेन त्या सुंदरीचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन स्नानसंध्यादि नित्य कृत्य करण्यास निघून गेला.

इकडे सुंदरी ही आपलें आन्हिक आटपून मोकळी होत आहे तोंच हजारों भिकाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी— ती ज्या महालांत राहत होती त्याच्या दरवाज्यासीं

येऊन थडकल्या. त्यांचा तो गोंगाट ऐकून सुंदरीनें एका-एकीं खिडकींतून खालीं पाहिलें तों या लोकांचा थवा तिच्या दृष्टीस पडला. त्यांस पाहून तिच्या अंतःकरणांत आनंद व दया तत्काल उत्पन्न झाली. राजा वसंतसेनानें आपल्या सर्व कामदार लोकांस ती सांगेल तें करण्याविषयीं सक्त आज्ञा केलीच होती. त्याप्रमाणें सुंदरीचे आज्ञेवरून धान्य, वस्त्रें, अन्न वगैरे सर्व सामान कामदार लोकांनीं त्यांस देण्याकरितां तयार केलें. मग सुंदरीनें योग्य वाटेल त्याप्रमाणें ज्याला जें पाहिजे होतें तें देण्यास आरंभ केला. कित्येक रोगी वगैरे होते त्यांस औषध पाण्याची तजवीज करून दिली. सारांश, ज्याला ज्याला जें जें पाहिजे होतें तें तें तिनें दिलें, व ते लोक संतुष्ट होत्साते तिला दुवा देऊन आपआपल्या ठिकाणीं निघून गेले.

याप्रमाणें दररोज एकसारखा क्रम चालला होता. तिच्या औदार्याची जिकडे तिकडे ख्याती झाल्यामुळें दिवसें दिवस भिक्षेकरी लोकांची संख्या झपाट्यानें वाढूं लागली. तसेंच सायंकाल होतांच तिच्या महालाच्या दरवाज्याशीं पारधी लोकांच्या झुंडीच्या झुंडी, खांद्यावर कावडी घेऊन येत असलेल्या लोकांच्या दृष्टीस पडूं लागल्या. पारध्यांनीं जे जे हंसपक्षी आणले त्या सर्वांस सुंदरी लक्ष्यपूर्वक पाहून प्रत्येक दिवशीं निरनिराळ्या एका उत्तम गृहांत त्या हंसांस ठेवीत असे. व तेथें त्यांच्या खाण्यापिण्याची उत्तम प्रकारें तजवीज ठेवावी, व पारध्यांस मोठमोठीं इनामें द्यावीं. याप्रमाणें एकसारखा नित्यक्रम चालला होता. एके दिवशीं एका पारध्यानें बहुतसे हंस धरून आणले होते. त्यांतच अतिशय कृश झालेला व

दुःखित असा एक हंस तिच्या दृष्टीस पडला. त्याकडे ही निरखून पाहूं लागली, तेव्हां त्यानें तिला ओळखलें आणि एक वेळ टवकारून तिच्याकडे पाहून मान खालीं घातली. नंतर सुंदरीलाही त्याची ओळख पटून, आपला प्रियकर हंस तो हाच, असें जाणून तिनें त्याला आपल्या महालांत नेलें. आणि त्या हंसाला धरून आणणाऱ्या पारध्यास मोठें बक्षीस देऊन, यापूर्वी जे हंसपक्षी प्रतिबंधांत ठेविले होते त्या सर्वांस तत्काल सोडून देण्याविषयीं सत्यशीलास आज्ञा केली. व आजपासून हंस धरून आणण्याची मनाई करण्याविषयीं हुकूम देऊन ती आपल्या महालांत गेली.

नंतर तिनें तो हंस अतिशय कृश व दुःखित आणि उदास झालेला पाहून अनेक प्रकारें त्याचें समाधान केलें. त्याला उत्तम उत्तम पदार्थ खावयास दिले, मधुर, सुगंधिक, शीतळ पाणी पिण्यास दिलें, स्वतः आपल्या हातांत पंखा घेऊन वारा घातला पण कांहीं केल्या त्याचें मन प्रसन्न झालें नाहीं. तो वारंवार सुस्कारे टाकून डोळ्यांस पाणी आणीत होता. यद्यपि मोठ्या प्रयासानें आपल्या प्रियपतीची भेट झाली म्हणून सुंदरीला फारच आनंद झाला होता, व तिची मुखश्री प्रफुल्लित दिसत होती तथापि हंसाला समाधान वाटत नाहीं असें पाहून ती फार दुःखित झाली. तिचा तो सर्वांवर एकसारखा चालत असलेला हुकूम, तसेंच मोठें ऐश्वर्य व तिचा थाटमाट वगैरे पाहून हंसाचें मन तिच्याविषयीं फारच दूषित झालें होतें. त्याच्या मनांत तिच्या वर्तनाविषयीं अनेक वाईट कल्पना आल्या व शेवटीं ती राजा वसंतसेनाशीं रत झाली असावी असा

त्याच्या मनाचा पक्का निश्चय देखील झाला. त्याला तिचें तें लडिवाळपणाचें भाषण, आंजारणें गोंजारणें, तसेंच अनेक प्रकारच्या लीला, खाणेंपिणें इत्यादिकांचा फारच तिटकारा येऊं लागला. आपली स्त्री धडधडीत परपुरुषावर आसक्त झाली आहे हें समजून तिनें दिलेल्या भक्ष्यभोज्यादिकांवर किंवा तिच्या मनोहर चाळ्यांवर कोण पुरुष प्रीति करणार आहे? हंसाला तें सारें विषासमान वाटत होतें. तरी तो मुकाट्यानें त्याचें सेवन करीत होता. काळजीनें तो दिवसेंदिवस अत्यंत क्षीण होत चालला. कारण मनाची समाधानता असल्यावांचून कितीही खाल्लें प्यालें तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. पण हा सर्व प्रकार त्यानें कधींही व्यक्त करून दाखविला नाहीं.

इकडे त्या मोकळ्या मनानें वागणाऱ्या सुंदरीच्या अतःकरणांत हा त्याच्या मनांतील विपरीत भाव मुळींच आला नाहीं. ती मोठ्या प्रेमानें त्याचे लाड करीत असे व त्याच्या दर्शनानें तिला फारच संतोष होई. तिनें, हा आपला क्रीडाहंस मिळाला म्हणून, मोठ्या आनंदानें राजाला वर्तमान सांगितलें. सुंदरीच्या निमित्तानें राजाही त्या पक्ष्यावर फार प्रेम करूं लागला. तो स्वतः आपल्या हातानें त्यास कधीं कधीं खाऊं घालीत असे, पण हा सर्व प्रकार त्या हंसाला अतिशय दुःख होण्यास मात्र कारण झाला. असो.

राजा वसंतसेन लग्नाच्या सर्व तयारीस लागला होता. ती त्याची लवकरच पुरी झाली. सुंदरीनें सांगितल्याप्रमाणें त्यानें एक उत्तम गृह तयार केलें व तिनें सांगितलेल्या ठिकाणीं तिच्या मातापितरांचा शोध करण्याकरितां चतुर जासूद बरेच दिवसांपूर्वी पाठविले होते. त्यांनीं

त्यांचा क्षेम समाचार सुंदरीला कळविला. सुंदरीनें राजाला आपल्या आईबापांस आणविण्याविषयीं तजवीज करण्यास सांगितलें होतें, पण नंतर—तीं फार वृद्ध व अशक्त आहेत याकरितां जर त्यांची येण्याची खुषी असेल तर मात्र त्यांस संभाळून घेऊन या. नाहींपेक्षां त्यांच्या तपाला विघ्न करून त्यांस श्रम देऊं नका, असें जासूदांस गुप्तपणें सांगितलें होतें. व या कामगिरीबद्दल त्यांस मोठें बक्षीसही देण्याचें कबूल केलें होतें. तसेंच तुझ्याशीं मी विवाह करून घेणार ही गोष्ट धर्मशास्त्रास विरुद्ध आहे. तेव्हां एकाएकीं हा माझा विचार त्यांस कळेल तर त्यांचें अंतःकरण अप्रसन्न होईल, किंवा कदाचित् तीं उभयतांस शाप देखील देतील. याकरितां हा विचार प्रत्यक्ष तीं येथें आल्यावर युक्ति प्रयुक्तीनें मीच त्यांच्या कानावर घालून त्यांची आज्ञा घेईन, असें राजाला समजावून सांगितलें होतें, म्हणून विवाहाचा हेतु जासुदाकरवीं कळवूं नये ही गोष्ट त्यालाही पसंत पडली होती. अर्थात् जासुदांनीं क्षेम समाचार कळविला व त्यांचें उत्तर घेऊन आले.

राजानें—तीं कां येत नाहींत? म्हणून जासुदांस प्रश्न केला तेव्हां—तीं उभयतांही नेम धारण करून बसल्यामुळें त्यांचें इकडे येणें होत नाहीं असें त्यांनीं सांगितलें. हें एकून राजा वसंतसेन सुंदरीला म्हणाला, "आईबापांच्या येण्याची अट होती तीं तर आपोआपच नाहींशी झाली, नवीन महालही तयार झाला, तेव्हां आतां कोणत्या दिवशीं लग्न लावावयाचें हें सांगण्याला कांहीं अडचण आहे काय?" राजाचा हा प्रश्न ऐकून तीही मोठ्या विचारांत

पडली. गोरखनाथाच्या वचनाचें तिला पक्कें स्मरण होतें. तिनें राजाला लग्नाची तयारी करण्यास लावलें यांत तिचा हेतु निराळा होता. ह्मणून थोडक्याच दिवसांत आपला पति हंसरूपाचा त्याग करून मनुष्य होईल व मग हें सर्व वर्तमान राजाला सांगून, कसें तरी त्याचें समाधान करीन, असा तिचा संकल्प होता. आपल्या मातापितरांस आणविण्याची वगैरे जी तजवीज केली होती ती खरोखर नसून कसें तरी करून कांहीं दिवस लांबणीवर टाकण्या-करितां तिनें तो एक बाहाणा केला होता. त्यांतल्या त्यांत—बहुत दिवसपर्यंत त्यांचा कांहीं समाचार कळला नव्हता तो एका प्रसंगानें कळेल तर पहावें, असाही तिचा इरादा होता. सारांश, कांहींतरी निमित्त करून आपला पति मनुष्यदेह धारण करी तोंपर्यंत युक्ति प्रयुक्तीनें राजाचें मन न बिघडवितां त्याच्या जवळ रहावें; असा तिचा पहिल्या-पासूनच दृढ संकल्प होता. पण आतां मात्र ती मोठ्या कचाटांत पडली. कारण, तिनें सांगितलेल्या सर्व अडचणींचा उलगडा झाल्यामुळें, राजा विवाह करून घेण्याविषयीं फारच निकट करूं लागला. तेव्हां आतां त्याला काय सांगावें? याचें तिला मोठें संकट पडलें. तथापि तिचें चातुर्य व धैर्य विशेष असल्यामुळें तिनें ज्योतिष्यां-करवीं मुहूर्तनिश्चय करण्यास सांगितला! या वेळीं दैवयोगानें जोश्यांनीं जो मुहूर्त दिला त्याला थोड्या दिवसांचा अवकाश होता ह्मणून बरें झालें, नाहींतर तिचा जीव घोटाळ्यांत पडला असता.

मुहूर्ताला आणखी थोडे दिवस होते इतक्यांत एके दिवशीं ती आपल्या हंसरूपी प्रियपतीला जवळ घेऊन

लालन करीत होती. तेव्हां तो हंस फारच खंगलेला तिच्या दृष्टीस पडल्यावरून फार दुःखित होऊन तिनें अनेक प्रकारें त्याला क्षीण होण्याचीं कारणें विचारलीं. पण त्यानें त्याचें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ती त्याला उत्तम पदार्थ खाऊं घालूं लागली पण तो ते खाईना. हें पाहून सुंदरी त्याला म्हणाली, "अमृतासारखा ज्यांचा स्वाद असे हे उत्तम पदार्थ असून आपण खात नाहीं याचें कारण काय?"

हें ऐकून सुस्कारा टाकून हंस म्हणाला, "सांप्रत तूं अशा दिव्य राजमहालांत राहात आहेस व राजास योग्य अशा अनेक विषयांचा उपभोग घेत आहेस. आणि मी तर अगदीं गरीब असून अरण्यांत राहणारा व जंगली फलपुष्पांदिकांचें भक्षण करणारा पक्षी, त्या मला हे तुझे पदार्थ काय उपयोगाचे? पूर्वीं तुझी व माझी स्थिति एक-सारखीच होती, असें म्हणतां येईल. कदाचित् त्याची तुला आतां आठवण असेल किंवा नाहीं हें कांहीं सांगवत नाहीं. पण सांप्रत तुझ्या स्थितीशीं माझ्या स्थितीची कोणत्याही रीतीनें बरोबरी होईल असें वाटत नाहीं. मला पूर्वीचें स्मरण असल्या कारणानें त्या वेळच्या अनेक गोष्टी मनांत येऊन वरचेवर मला असह्य वेदना होतात; पण ज्या मनुष्याकरितां मी इतका तळमळत आहें, त्यास माझ्या विषयींची तिळमात्रही काळजी नसून तो मोठ्या आनंदांत आहे, हें पाहून मनाचें कितीही समाधान केलें तरी होत नाहीं. वरें असो. त्याविषयीं मी आतां अधिक बोलत नाहीं. प्रारब्धीं जें लिहिलेलें असेल तें खरें होणार. तुझी आणि आमची भेट होण्याचा योग होता त्याप्रमाणें झाली. पण यापुढें होण्याची संधी मिळणें कठिण दिसतें व ती—

विषयीं आतां आशा तरी कशाला पाहिजे? असो; इतके दिवस तूं उत्तम प्रकारें माझें पालन पोषण केलेंस व मला सुख देण्याविषयीं प्रयत्न केलास; पण माझ्या प्रारब्धीं त्याचा उपभोगच व्हावयाचा नाहीं त्याला तुझा काय उपाय आहे? तुझे मजवर अनंत उपकार झाले आहेत. कदाचित् जन्मांतरीं ते माझ्या हातून फिटले तर फिटतील असें देखील ह्मणवत नाहीं. शेवटीं तुला इतकेंच सांगणें आहे कीं, माझें विस्मरण मात्र होऊं देऊं नकोस आणि गोरखनाथाचें वाक्य आठवून त्याप्रमाणें वर्तन कर. आतां मी येतों. परमेश्वर तुझें रक्षण करो!" असें बोलून हंसानें दीर्घ श्वास सोडून तत्काल प्राणत्याग केला.

ही त्याची अवस्था पाहून ती सुंदरी अतिशयच दुःखित झाली आणि मोठ्यानें रडूं लागली. तिनें अनेक प्रकारें विलाप केला तो येथें वर्णन करणें फार कठिण आहे. वस्तुतः तिला हंसाच्या मरण्यानें आनंदच व्हावा, कारण तो मनुष्यदेह धारण करून पुनः तिच्या जवळ प्राप्त होईल अशी तिला आशा होती. पण त्याचें शेवटचें भाषण ऐकून तिला फार दुःख झालें. तिला असें वाटलें कीं, "मी पूर्वजन्माचें स्मरण करीत नाहीं व या राजाबरोबर खुशाल चैन भोगीत आहें. आणि त्याच्या संगतीनें मी दूषित झालें आहे व आपल्यावर माझें अंतःकरण मुळींच नाहीं, असा आपल्या प्रियपतीचा समज झाला असेल व ह्मणूनच तो इतके दिवस मी अनेक प्रकारें त्याची सेवा करीत असतां अगदीं झुरणीस लांगला होता व शेवटीं आपला उद्धार प्रगट करून त्यानें देहत्याग केला.

जर खरोखर त्याच्या मनाचा असा ग्रह झाला असेल तर दुसऱ्या जन्मांत तरी तो माझा स्वीकार कसा करील? फार तर काय? तो आतां मला दृष्टी देखील पडणार नाहीं. पुरुषाची जात फारच कपटी, असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. मी अगदीं वेडी. मला त्याच्या मनांतला गुप्त भाव जर यापूर्वी कळला असता तर केव्हांच त्याची खात्री केली असती. पण आतां उपयोग काय? असो. प्रारब्धीं जर त्याचें दर्शन होण्याचें लिहिलें असेल तर कधीं तरी होईलच होईल. नाहीं तर रडून तरी उपयोग काय? पण आम्हां स्त्रियांचें परम दैवत व ज्याच्या योगानें ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा लाभ व्हावयाचा त्या परम पूज्य व परम प्रिय अशा पतीला—मी स्वधर्मानें वागत असूनही संशय घेण्यास पात्रभूत झालें, याचें मोठें दुःख वाटतें. माझ्यामुळें त्याला अनंत दुःखें व कष्ट भोगावें लागले तेव्हां या आपल्या जन्मासच धिःकार असो.

एरव्हीं त्याला माझ्याविषयीं असे कुतर्क घेण्यास कांहींच कारण नव्हतें. पण हें माझें मनोहर शरीर व हें तारुण्य आणि सौंदर्य यांचा जो एकत्र संयोग झाला आहे हाच त्याच्या संशयाला कारण झाला असावा. ह्याच्यामुळेंच मी ह्या राजाच्या कचाटींत सांपडलें यांत संशय नाहीं. मी जर वेडीविद्री असतें तर त्याला संशय आला नसता व मी ह्या संकटांतही पडलें नसतें. असतु. ज्या तारुण्यादिकांमुळें पतीची अप्रीति झाली व मी त्याच्या अवकृपेस पात्र झालें त्याचें मला तरी काय करावयाचें आहे? तो पुनः मनुष्यदेह धारण करून येईल. ह्मणून मी या राजाला आजपर्यंत अनेक वायदे करून



कसा तरी आवरून धरला. पण आतां मात्र तो माझा एक शब्द देखील ऐकावयाचा नाहीं व माझ्यानेंही त्याच्याजवळ चकारशब्द देखील काढावयाचा नाहीं. बरें, आपला पति येईल म्हणावें तर तोही असंतुष्ट होऊन गेला. तेव्हां आतां आपली कोणत्याही रीतीनें धडगत दिसत नाहीं. मग हें दुष्ट शरीर तरी ठेवून मला काय करावयाचें आहे?

परमेश्वरानें मला अकस्मात् हें दिव्यशरीर दिलें म्हणून मी फार आनंदित झालें होतें. कारण फार दिवस वनवासांत दुःखें भोगून माझ्या प्रिय पतीस शीण झाला होता तो मी आतां त्याची सेवा करून निवृत्त करीन व त्यालाही माझें सौंदर्य पाहून फार आनंद होईल असें मला वाटलें होतें व हें समजूनच मी इतके दिवस या कलेवराचें धारणही केलें होतें. पण सर्वच गोष्टी उलट झाल्या. तर आतां हें शरीर तरी ठेवून काय करावयाचें आहे? असो. परमेश्वरा, तूं सर्वसाक्षी आहेस ! हे भूमि माते ! हे वायु, आकाश, अग्नि इत्यादि देवतांनों ! तुम्ही प्राणीमात्राच्या शुभाशुभ आचारणाचे साक्षी आहां ! जर काया-वाचा-मनेंकरून माझ्या हातून कांहीं पाप घडलें नसेल तर तुम्ही तत्काल मला आपल्या पोटांत घ्या. आणि निरपराधी अशा मजवर रुष्ट होऊन गेलेल्या माझ्या प्रियपतीस माझ्या शुद्ध आचरणाची साक्ष पटवा."

असें भाषण करून तिनें पतीच्या चरणकमलाचें स्मरण करून तत्काल देहाचा त्याग केला. आसमंतात् तिचे दासदासी इत्यादि सेवक जन तटस्थ उभे राहिले होते. पण त्या सुंदरीची मुद्रा फार गंभीर व सतेज असल्यामुळें

—हें तुम्ही काय करतां? असें विचारण्याचें कोणाचेंच सामर्थ्य झालें नाहीं व त्यांस तिचा हेतु मुळींच कळला नाहीं. ते चित्रवत् तिच्याकडे पाहत उभे राहिले होते. इकडे तिच्या शरीरांतून प्राण निघून जाऊन ती अचेतन होत्साती धाडकन भूमीवर पडली. तेव्हां सेवकजनांचा एकच कल्होळ होऊन ते मोठमोठ्यानें रडूं लागले.

राजा वसंतसेन सभेंत बसून राजकार्यें करीत होता त्यास इकडचें कांहींच वर्तमान ठाऊक नव्हतें. वरचेवर त्या सुंदरीचें स्मरण मात्र त्याला होत असे. तो त्या दिवशीं फार उमेदींत होता कीं,—आज सायंकालीं ती खास आपलें पाणिग्रहण करीलच करील. कारण, आतां तिच्या सर्व अटी परिपूर्ण झाल्या आहेत. तिनें स्वसंतोषानें आपला स्वीकार नाहीं केला तर आतां बळजबरी करण्यास देखील कांहीं हरकत नाहीं. याप्रमाणें तो आपल्या ठिकाणीं अनेक प्रकारचें मनोराज्य करीत असून बाहेरच्या म्हणजे खरोखरीच्या राज्याचीं कामें लौकर कधीं आटपतील असें त्याला झालें होतें. तों इतक्यांत सुंदरीची अत्यंत प्रीतिपात्र कुब्जा नांवाची दासी तोंडास पदर लावून रडत रडत समोर येतांना त्याच्या दृष्टीस पडली: तिला पाहतांच त्याचें अंतःकरण अगदीं अस्वस्थ झालें. आणि जवळच्या चोपदारास "ती कां रडते तें विचार" असें त्याणें सांगितलें. तो तिला विचारीत आहे, इतक्यांत बाबऱ्यां बाबऱ्यां राजा एकदम आपल्या आसनावरून उठला. त्याला धीर नाहींसा झाल्यामुळें तो त्या कुब्जेच्या जवळ जाऊन काय झालें म्हणून मोठ्यानें तिला विचारूं लागला. त्यासरशी तिनें एक किंकाळी फोडली आणि

उंच स्वरानें रडण्यास प्रारंभ केला. राजानें परोपरीनें तिला प्रश्न केले पण कांहींच उत्तर न देतां ती परत त्या सुंदरीच्या महालाकडे जाऊं लागली. तेव्हा कांहीं तरी अरिष्ट आहे असें जाणून राजाही तिच्या पाठोपाठ धांवत गेला. महालांत जाऊन पाहतो तों विगतप्राण झालेली सुंदरी त्याच्या दृष्टीस पडली ! मग काय विचारतां ! त्या-सरसा चिरकाल वृद्धिंगत झालेल्या मनोरथासह राजा एकाएकीं खालीं पडला आणि मोठ्यानें रडूं लागला. त्या त्याच्या करुणविलापानें केवळ राजवाड्यांतीलच नव्हे तर त्या संपूर्ण नगरांतील लोकांस रडविलें. प्रधान इत्यादि सेवकजन तर राजाची ती अवस्था पाहून धाय मोकळून कांहीं वेळ बेशुद्ध देखील झाले.

यद्यपि ती सुंदरी जिवंत होती तेव्हां राजानें तिच्या देहास स्पर्श करण्याविषयीं अनेक प्रयत्न केले होते, तथापि तिनें त्याला मुळींच आपल्या अंगास हात लावूं दिला नव्हता. या वेळीं तिच्या शरीरांत प्राणवायु मुळींच नव्हता तरी तें तिचें शरीर मोठें तेजःपुंज व रमणीय दिसत होतें. प्राण गेले तरी तिच्या सौंदर्यांत काडीभर देखील कमीपणा आला नव्हता. शोकाकुल झालेल्या राजास तिला मिठी मारावी अशी इच्छा होऊन त्यानें आपले हात पुढें केले तों—इतक्यांत कदाचित् ती जिवंत असेल तर आपल्यावर फारच रुष्ट होईल—असें मनांत येऊन तो स्तब्ध राहिला. फार वेळ ती अगदींच निश्चेष्ट पडलेली पाहून—ही खरोखरच गतप्राण झाली आहे, तेव्हां आतां आपण तिला मिठी मारली तर कांहीं हरकत नाहीं,—असा निश्चय करून एकदाचा त्यानें आपला मनोरथ पूर्ण करून

वेतला! तिचें तें कलेवर घट्ट आवळून धरल्यानें चिरकाल धारण केलेल्या वासनेचें कांहीं सार्थक झालें असें त्यास वाटलें. पण कांहीं वेळानें त्याला—आतां हें आलिंगन व्यर्थ आहे, असें वाटलें व दुःखही अनावर झालें तेव्हां तो तिला आपल्या मांडीवर घेऊन परोपरीनें विलाप करूं लागला.

राजा म्हणाला—"तुझ्या परलोकगमनानें आज माझें सर्वस्व नाहींसें झालें. मी कोणत्या तरी एखाद्या तुझ्या दोषाचें स्मरण करून तुझी विस्मृति व्हावी व तुझ्या विषयींचें प्रेम अंमळ तरी शिथिल व्हावें म्हणून आज-पर्यंत पुष्कळ प्रयत्न केला, पण मला लवलेश मात्रही दोष न दिसल्यामुळें निराश व्हावें लागलें ! तुझ्या सौंदर्यांत तरी कांहीं उणेपणा असता तर मीं त्याचें स्मरण करून दोषदृष्टीनें आपल्या मनाचें समाधान केलें असतें. तशीच बुद्धि, चालचलन अथवा इतर कोणत्याही गोष्टीकडे पा-हिलें तर त्यांत तरी कांहीं व्यंग असलें पाहिजे होतें; पण जिकडे पहावें तिकडे सर्व गुणमयच दृष्टी पडत होतें. दोषाचा लेशही कधीं दृष्टीस पडला नाहीं. अशा गुणरूपी बंधनानें मला बद्ध करून येथें ठेवलेंस आणि तूं मात्र एकाएकीं परलोकास निघून गेलीस, हें तुला योग्य वाटलें काय ? असा मी काय बरें अन्याय केला होता, कीं ज्यामुळें तूं मला आमरण ही बंधनाची शिक्षा दिली आहेस ? बरें, आतां तुझ्या गुणांनीं बद्ध झालेल्या मला तुझ्यावांचून दुसरा कोण बरें मुक्त करणार आहे ? हे चंद्रवदने सुंदरि, तुझ्या मनांत मला अधरामृताचा आस्वाद द्यावयाचा नव्हता तर खुशाल न दिला असतास तरी

चालतें. मी तुझ्या मुखचंद्राच्या अवलोकनानेंच, कामानलानें दग्ध झालेल्या आपल्या शरीरास शांत करून घेतलें असतें. पण तूं त्या चंद्राचाही एकाएकीं अस्त केलास, याचें मात्र फार दुःख होत आहे. हे मृगलोचने! तुझ्या प्रेमकटाक्षांला पात्र व्हावं, अशी माझी फार इच्छा होती ती तर त्वां पूर्ण केली नाहींसच, पण हीं आपलीं नेत्रकमलेंही अगदीं निस्तेज कां केलींस?

बरें! तूं ज्या आपल्या सेवकजनाला सदयदृष्टीनें पाहत होतीस; ते आज शोक करीत होत्साते तुझ्याकडे पाहत आहेत. त्यांच्यावर एक वेळ तरी दयार्द्र दृष्टि करण्याकरतां डोळे उघड. तूं ज्याला भोजन देत होतीस ते हे लोक बुभुक्षित होऊन तुला हाका मारीत आहेत, तसेच हे गरीब लोक तुझ्याजवळ वस्त्रें मागत आहेत, त्यांच्याकरितां तरी एक वेळ उठून त्यांस सुखी कर. तूं ज्या अनाथांस भोजन दिल्यावांचून एक ग्रास देखील खात नव्हतीस, व आपण भोजन टाकून प्रथम त्यांस जेऊं घालीत होतीस, ते आज अन्नाकरितां विलाप करीत आहेत हें तूं ऐकत नाहींस काय? तूं आपल्या हातानें चारा दिल्यावांचून जी कधीं कांहीं खात नाहीं व तुझ्यावांचून जिला क्षणभरही गमत नाहीं अशीही हरिणी व्याकुल होऊन तुझ्या पायांजवळ पडली आहे; इचें तरी एक वेळ समाधान कर. हे सुंदरि! आजपर्यंत तूं अनेक प्रकारें मला प्रेम लाविलेंस आणि मीही तुझ्यावर एकनिष्ठपणें विश्वास ठेविला पण तूं माझा एकही मनोरथ पूर्ण न करितां परलोकास निघून गेलीस हें तुझ्या दाक्षिण्याला उचित आहे काय?

हर हर! मला धिःकार असो! तूं कृतघ्न नाहींस, अशी माझी पूर्ण खातरी आहे. • तुला माझ्यापासून कांहीं तरी असह्य दुःख प्राप्त झालें असावें म्हणूनच तूं एकाएकीं देहाचा त्याग केलास! नाहीं तर या तुझ्या मनोहर व सकुमार मूर्तींत विश्वासघातासारखे क्रूर विकार कसे राहतील. बरें, पण तुझ्याजवळ मी किती नम्रपणानें वागत होतों; व आजपर्यंत मीं कधींही तुझ्या आज्ञेचें उल्लंघन केलें नाहीं, याचें तुला विस्मरण झालें काय? ज्या माझ्या कृतीचा तुला इतका वीट आला त्याबद्दल तूं मला एक अक्षर देखील सांगितलेंस नाहीं, तें कां बरें? असो. आतां विलाप करून तरी काय उपयोग? मीच तुझ्या मरणाला कारण झालों.

शिव शिव! माझ्यासारखा या जगांत दुसरा कोणी अधम असेल काय? सर्व लोकांच्या नेत्रांला आनंद देणारी व अनाथांचें रक्षण करणारी अशी तुजसारखी सुंदरी मजसारख्या दुष्टाला शरण प्राप्त झाली असून, मीं अधमाधमानें आपल्या वाईट वर्तनानें तुला प्राणत्याग करण्यास लाविलें यापरतें मोठें दुसरें पाप तें कोणतें? मला खरोखर परलोकीं उग्र यातना भोगाव्या लागतील! अस्तु. आतां हें जें घोर पातक लागलें आहे याचा परिहार इतर कोणत्याही प्रायश्चित्तानें व्हावयाचा नाहीं. त्याच्या निराकरणाकरितां देहांत प्रायश्चित्तच घेतलें पाहिजे! बरें, पण मला वांचून तरी आतां काय करावयाचें आहे! त्या सुंदरीवांचून मला हें सर्व जगत् अगदीं शून्यवत् झालें आहे! आतां व्यर्थ आपल्या देहास शीण देऊन तरी काय उपयोग आहे? याकरितां तिच्या पाठोपाठ जाऊन जर

कदाचित् तिचें दर्शन झालें तर प्रार्थना करून सर्व अपराधांची क्षमा मागावी हेंच आपलें कर्तव्य आहे ! मला राज्य नको, घर नको, दार नको, पुत्र नको, आप्त नको, कांहीं एक नको ! मी आपला या सुंदरीच्या बरोबर जाणार. न जाणों माझ्या अंतःकरणाची परीक्षा पाहण्याकरितांच मला नकळत ती पुढें जाऊन कोठें तरी वाट पाहत बसली असेल ! किती तरी माझें हृदय कठिण आहे हें ! अशा दुःखाचा प्रहार झाला असून अद्यापि तें शतधा विदीर्ण झालें नाहीं यांचेंच मला मोठें आश्चर्य वाटतें."

याप्रमाणें बहुत वेळ विलाप करून राजानें आपलें दुःख अंमळ कमी केलें. उघडच आहे. एखाद्या तळ्यांत पाणी तुडुंब भरून बांध फुटतो असें झालें, कीं त्यांतील थोडें पाणी वाहवावें लागतें. बाकीचें कायम राहतें. त्याप्रमाणें शोक अतिशय झाला ह्मणजे विलाप करून मनाला स्थिर करावें लागतें. नंतर त्याणें प्रधानादिकांस हाक मारून त्यांस आपल्या राज्याची व्यवस्था कशी करावयाची तें सर्व सांगितलें. याशिवाय त्याला जें जें कांहीं करावयाचें होतें तें सर्व करून आपण शोक करीत करीत दुःखाग्नीनें दग्ध झालेल्या शरीराचा तत्काळ त्याग केला. इकडे नगरांतील सर्व प्रजा हाहाःकार करीत व रडत होत्साती आपआपल्या घरीं निघून गेल्या. राजाच्या मरणाविषयीं निरनिराळे लोक निरनिराळ्या तऱ्हेनें आक्षेप घेऊं लागले. कोणी ह्मणाले, "तो अत्यंत कामी होता. त्या सुंदरीवर फारच त्याचें अंतःकरण आसक्त होतें, व शेवटीं त्याला तिच्या पायींच मरण आलें. पण काय हो चमत्कार ! ती तर त्याला मुळीं प्राप्तच झाली नव्हती. आणि यानें तिच्या-

करितां देहत्याग केला. हें काय मूर्खपण !" दुसरे म्हणाले, "त्यानें तिची परोपरीनें आर्जवें केलीं; पण ती राजी झाली नाहीं म्हणून तिला यानें विष देऊन मारिलें आणि पुढें पश्चात्ताप होऊन शेवटीं आपणही मरून गेला." कोणी म्हणाले, "तसें नाहीं, तो खरोखरच मोठा प्रेमळ होता. व त्या उभयतां स्त्रीपुरुषांचें एकमेकवर फारच प्रेम होतें व तेंच एकमेकांच्या नाशास कारण झालें." याप्रमाणें अनेक रीतीनें लोक तर्क करीत होते. इकडे प्रधान, सेनापति वगैरे मंडळींनीं राजास योग्य असे त्याच्या देहाचे अंत्य संस्कार करून पट्टराणीच्या संमतीनें व प्रजेच्या अनुमतानें ज्येष्ठ पुत्रास गादीवर बसवून सर्व कारभार यथास्थित चालविला.

उपसंहार.

याप्रमाणें ऋषीनें शाप दिलेल्या त्या स्त्रीपुरुषांची एका जन्मांतली गोष्ट झाली. आणखी पुढें दोन जन्मांत त्यांच्यावर कसकसे प्रसंग आले व त्या सर्वांतून पार पडून त्या उभयतांनीं एकमेकांवरच्या प्रीतींत तिळमात्रही अंतर न पडूं देतां कसें वर्तन केलें व मोठ्या चातुर्यानें आणि दृढ निश्चयानें दांपत्य-धर्म रक्षण केला तो प्रकार फारच मनोवेधक आहे, त्याचें सविस्तर निरूपण अनुक्रमानें पुढच्या भागांत येईल. आतां या भागांतील गोष्टीवरून आपण काय घ्यावयाचें त्याचा विचार करूं. प्रत्येक मनुष्याला ह्या संसारसमुद्रांत पोहत असतां सुखदुःखाचे अनेक प्रसंग येतात व अनिवार संकटेंही वरचेवर येतात, पण त्या संकटांतून पार पाडणारे लोक फारच विरळा. 'संकटकाळीं धैर्य व उदयकाळांत क्षमा असणें हीं मोठें-

पणाचीं लक्षणें आहेत' असें जें प्राचीन कवींचें म्हणणें आहे तें कांहीं खोटें नव्हे. पुरुषापेक्षां स्त्रियांवर फार वाईट प्रसंग येणें फार शोचनीय आहे. पुरुष प्रसंगीं धैर्य धरून कसातरी पार पडण्याचा प्रयत्न करील पण स्त्रियांविषयीं तसें नाहीं. त्या बोलून चालून अबलाच आहेत. तेव्हां विपत्ति सहन करण्याचें धैर्य त्यांच्या अंगीं असणें फार कठिण आहे. तथापि पुरुषापेक्षां त्यांच्या अंगीं एक गुण विशेष आहे, तो कोणचा म्हणाल तर नैसर्गिक चातुर्य हाच होय. पुरुषाला 'विद्याभ्यास, चतुर पुरुषांचा सहवास, देशाटन, राजदरबारांत वागणें इत्यादि साधनांनीं चातुर्य येतें पण स्त्रियांला तर तें अगदीं स्वाभाविक आहे' असें जें प्राचीन कवींचें मत आहे तें बहुतकरून अनुभवास येतें. ह्यावरून स्त्रिया म्हणजे जन्मतांच चौदा विद्या आणि चौसष्ट कळा ह्यांत प्रवीण असतात असें आम्हीं म्हणतों असें कोणी समजूं नये. तर त्यांच्या अंगीं स्वाभाविक चतुरपणा असतो व तो असल्यामुळें थोड्याशा अभ्यासानें अथवा विचारानें त्यांस कोणतीही गोष्ट चटकर अवगत होते. सारांश, स्त्रियांच्या अंगीं स्वाभाविक चातुर्य हा जो विशेष गुण आहे त्याची त्यांस प्रत्येक कामांत विशेष मदत होते. यामुळें शक्तिमान् मानलेल्या पुरुषाच्या हातून प्रसंग विशेषीं ज्या गोष्टी घडण्यास अशक्य असतात, त्या त्यांच्या हातून सहज होतात. याविषयीं दुसरीं अनेक उदाहरणें देतां येतील, पण त्यांच्यापेक्षां प्रकृत स्त्रीचें म्हणजे ह्या गोष्टीची नायिका सुंदरी हिचेंच उदाहरण घेतलें तर पुरे आहे. वस्तुतः स्त्रीला प्रत्येक कामांत साह्य करणें व ज्या वाईट प्रसंगांतून तिचें व

तिच्या अब्रुचें रक्षण करणें हें पुरुषाचें ह्मणजे तिच्या पतीचें मुख्य कर्तव्य आहे. त्याच्याकडून तें न घडेल तर स्त्रियेच्या हातून कांहीं वाईट वर्तन झालें तरी त्याबद्दल तिला विशेष दोष देतां येत नाहीं. कारण, निरुपायामुळें तिच्या हातून ती गोष्ट झाली व तसें न होऊं देणें हें तिच्या पतीचें कर्तव्य होतें तें त्याणें न बजाविल्यामुळें अर्थात् तिच्याकडून वांकडे पाऊल पडलें तर त्याचा दोष तिच्या पतीवरच येईल हें अगदीं उघड आहे. तथापि चतुर स्त्रिया अशा प्रसंगीं देखील आपल्या शाहणपणाच्या साह्यानें केवळ आपलीच नव्हे तर आपल्या पतीची देखील अब्रू संरक्षण करून संकटांतून पार पडतात. आमच्या ह्या छोटेखानी कथेची नाइका सुंदरी हिच्यावर केवढा मोठा कठिण प्रसंग आला होता बरें ? तिचा पति किंवा रक्षण करणारा कोठें दूर होता असें नाहीं; तो अगदीं तिच्याजवळच होता. तरी त्याच्यानें आपल्या स्त्रीच्या अब्रूचें रक्षण करवत नव्हतें. तें त्या सुंदरीनें दृढ निश्चय करून मोठ्या शहाणपणानें रक्षण केलें. तर ज्या दुर्दैवी स्त्रियांवर तसा विकट प्रसंग येईल त्यांणीं सुंदरीचा पक्का निश्चय व तिचें चातुर्य यांचें अनुकरण करून आपलें पातिव्रत्य रक्षण करावें. हें उदाहरण स्त्रियांनीं घ्यावें.

पुरुषांनीं स्त्री ह्मटली कीं, ती आपली भोग्य अशी बुद्धि धरूं नये. प्रथम तिच्या वृत्तीची परीक्षा करून तिच्यावर तसा भाव ठेवावा. नाहींपेक्षां ह्या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें आपल्या व तिच्या अशा उभयतांच्याही नाशास कारण होतें, हें वरील गोष्टीवरून ध्यानांत धरण्यासारखें आहे.

समाप्त.

सुंदरी आणि वसंतसेन.

भाग २ रा.

नंबर १४

हें पुस्तक

पंडित वामनशास्त्री इसलामपरकर

यांनीं लिहिलें.

सन्तुष्टाऽलोलुपा दक्षा धर्मज्ञा प्रिय-सत्यवाक् ।
अप्रमत्ता शुचिःस्निग्धा पतिं त्वपतितं भजेतू ॥

याज्ञवल्क्यः

पोतदारकृत
पुस्तकमाला.

मुंबईत

तत्त्वविवेचक छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति २ री.

हीं पुस्तकें वासुदेव मोरेश्वर पोतदार, यांचा बुक डिपो,
कांदेवाडी, मुंबई येथें विकत मिळतील.

सन १९०४.

किंमत सहा आणे.

[हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व प्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.]

प्रस्तावना.

• पहिला भाग नुकताच प्रसिद्ध झाला आहे. वाचकांना तो आवडला असें वाटल्यावरून हा दुसरा भाग प्रसिद्ध करण्यास उमेद आली. या भागांत सुंदरी, हंस आणि राजा वसंतसेन यांच्या दुसऱ्या जन्मांत काय काय झालें तें सांगण्यांत आलें आहे. हें पुस्तक मूळ हिंदी भाषेंतल्या एका पुस्तकावरून तयार केल्याचें पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत सांगितलेंच आहे. मूळ पुस्तकाचा दुसरा भाग अगदीं निराळ्या प्रकारचा आहे. त्यांत शृंगार इतका ओतप्रोत भरला आहे कीं, कोठें कोठें त्याला अगदीं दिगंबरत्व आल्यामुळें समंजस वाचकांना त्याचा कंटाळा आल्यावांचून राहणार नाहीं, असें होतें तथापि या भागांतील संविधानक मूळाला सोडून नाहीं. एकंदरींत पहिल्या भागाप्रमाणेंच हाही मूळाला धरूनच तयार करण्यांत आला आहे. या भागांतल्या कथानकांतील पात्रांचीं नांवें व त्यांचीं स्थळें मूळ पुस्तकांत आहेत त्याप्रमाणेंच घेतलीं असून मूळाला धरून चालतां आलें तितकें चालून कथेचा परिणाम मूळाशीं मिळविला आहे.

मूळांत नायक आणि नायिका यांच्या शृंगारचेष्टा पुष्कळ वर्णन केल्या आहेत, पण आम्हीं त्यांचें येथें विशेष वर्णन केलें नाहीं. कारण, प्रथम भागांत त्या आल्याच आहेत. तेव्हां एकाच विकाराचें वारंवार—एकाच पुस्तकांत—वर्णन करणें ठीक नाहीं, म्हणून आम्हीं त्याला येथें विशेष स्थळ दिलें नाहीं. आपले शास्त्रकार जन्मांतर मानतात,

व जन्मांतरींचे संस्कार ऐहिक वर्तनाला कारणीभूत आहेत, असें ते प्रतिपादन करतात. तेव्हां त्या संस्कारांच्या प्राबल्यानें प्रेम, आवेश वगैरे मनोविकार किती जोरानें चालतात, हें यांत मुख्यत्वें दर्शविलें आहे. कित्येक लोकांचें—जाती कूळ वगैरेंच्या विरुद्ध आचरण असल्याचें दिसून येतें, त्याचेंही कारण जन्मांतरीय संस्कार, हें यावरून उत्तम प्रकारें सिद्ध होईल असें वाटतें.

या पुस्तकाचा हा दुसरा भाग वाचकांस सादर केला आहे. याचा आणखी एक भाग राहिला असून त्यांत हें पूर्ण होणार आहे. एवढीं अघोर कृत्यें करणाऱ्या राजा वसंतसेनानें आपला शेवट किती गोड केला आहे हें त्या भागांत येईल.

शेवटीं आमचे मित्रवर्य रा० रा० वासुदेव मोरेश्वर पोतदार यांनीं पहिल्या भागाप्रमाणें हाही भाग छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं विशेष उल्हास दाखविल्याबद्दल त्यांचे आभार प्रदर्शित केल्यावांचून राहवत नाहीं.

मुक्काम मुंबई, पोर्तुगीज चर्च लाईन;
गिरगांव, घर नंबर २०.
ता० ८ मार्च सन १८८९ इ.

वा. शा. इ.

दुसरी आवृत्ति:—पहिली आवृत्ति खपून फार दिवस झाले. व लोकांच्या मागण्या फार येऊं लागल्यावरून ही दुसरी आवृत्ति चांगली तपासून पूर्वीप्रमाणें छापली आहे.

जानेवारी १९०४.

गोकुळ वासुदेव पोतदार.

सुंदरी आणि वसंतसेन.

भाग दुसरा.

पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें हंस, सुंदरी, आणि राजा वसंतसेन या तिघांचाही देहांत झाला. पुढें गोरखनाथाच्या वराच्या प्रभावानें तो हंस मारवाडदेशांतील प्रसिद्ध नगरी पुष्करावती येथील पुष्पामित्र नामक राजाच्या चंद्रानना नामक पट्टराणीच्या उदरीं जन्मास आला. पुष्पामित्र राजास वृद्धापकाळ प्राप्त झाला तरी त्याला पुत्रमुखदर्शनाचा लाभ हा वेळपर्यंत घडला नव्हता, म्हणून तो फारच दुःखित होता. त्याची परम प्रिय स्त्री चंद्रानना इनें व राजा पुष्पामित्र ह्यानें शंकराची बहुत सेवा केली. तेणेंकरून भगवान् प्रसन्न होऊन त्यानें राजास स्वप्नांत दृष्टांत दिला व त्याप्रमाणें हंसरूपाचा त्याग करणारा तो तापस त्याच्या पोटीं—शुभ मुहूर्त नक्षत्रादिकांच्या योगावर—जन्मास आला. फार दिवस पुत्रमुखदर्शनाविषयीं तृषित झालेल्या राजास मुलगा झाल्याचें वर्तमान समजतांच मोठा आनंद होऊन त्यानें त्याचें जातकर्म केलें. ब्राह्मणादिकांस गायी, भूमी, द्रव्य, इत्यादि असंख्य दानें दिलीं. नगरांत जिकडे तिकडे उत्सवाची एकच गर्दी उडाली. संपूर्ण प्रजाजनांस परमानंद झाला. राजानें बाराव्या दिवशीं त्या पुत्राचें नामकरण केलें. त्या वेळीं ज्योतिःशास्त्रवेत्त्या ब्राह्मणांस बोलावून त्यांचा परम सत्कार करून मुलाचा ग्रह-नक्षत्रादिकांचा

योग कसा काय आहे? म्हणून राजानें प्रश्न केला. तेव्हां ब्राह्मणांनीं त्याची जन्मकुंडली पूर्वीं तयार केलीच होती. तीवरून निरनिराळ्या ग्रहांचीं फलें उत्तम असल्याचें राजास निवेदन केलें. व जो तूं बहुत दिवस मुलाविषयीं अगदीं निराश होऊन दुःखित झाला होतास त्या तुला आज या पुत्राच्या जन्मानें परमानंद प्राप्त झाला आहे, व दिवसेंदिवस त्याची वृद्धि होणार आहे; या करितां ह्या पुत्राचें "आनंदवर्धन" असें नांव ठेवावें म्हणून सांगितलें. राजासही ती गोष्ट मान्य झाली व त्यानें याप्रमाणें मोठ्या समारंभानें आनंदवर्धन असें नांव ठेविलें. तो शुक्लपक्षांतल्या चंद्राप्रमाणें प्रतिदिवशीं वाढूं लागून त्याला अवलोकन करणाऱ्या राजाचा आनंद दिवसेंदिवस वृद्धिंगत झाला.

हंसाप्रमाणें सुंदरीनेंही देहत्याग केला, हें पूर्वीं वर्णन केलेंच आहे. तीही त्याच पुष्करावती नगरींत पद्मगुप्त नामक एक मोठा धनाढ्य व कुलीन सावकार होता त्याच्या घरीं जन्मास आली. ह्या पद्मगुप्ताची आणि राजा पुष्पमित्राची अतिशय मैत्री होती. ते दोघेही अगदीं लहानपणापासून एकमेकांवर लोभ करीत असत व दोघांचें वयही एकसारखेंच होतें. राजा पुष्पमित्राप्रमाणें पद्मगुप्तालाही आपत्यलालनाचें सौख्य फार दिवस प्राप्त झालें नव्हतें. पण तो कांहींसा विरक्त असून गंभीर होता. यामुळें त्याला मूल नाहीं याचें राजाइतकें दुःख वाटत नव्हतें व तो त्याच्याकरितां देवाची प्रार्थना करीत नव्हता. उघडच आहे कीं, ह्या संसाराची क्षणभंगुरता व त्यांतील पांथसंयोगाप्रमाणें असलेला आप्तजनांचा संयोग याचें खरें

स्वरूप ज्याच्या लक्षात आलें असेल त्याला त्यांचा संयोग आणि वियोग यांपासून हर्ष किंवा विषाद मुळींच होत नव्हींत. पद्मगुप्त याप्रमाणें जरी विरक्त होता तरी तो आपल्या वैराग्याचें कधीं प्राकट्य करीत नसे. व जन-रूढीप्रमाणें संतान नाहीं म्हणून आपणही दुःखी आहों असेंच लोकांस दाखवी. त्याची स्त्री सानुमती ही मात्र खरोखर नेहमीं फार दुःखी असे. तिला आपल्या पोटीं एक तरी मूल व्हावें अशी मोठी इच्छा होती. ती मुला-करितां नेहमीं देवाची आराधना करीत असे. मुलगा नाहींतर नाहीं पण एखादी कन्या तरी व्हावी म्हणून वारंवार देवाची प्रार्थना करीत होती. तिनें मनोभावें-करून पार्वतीची एकनिष्टपणें सेवा केली, त्यामुळें प्रसन्न होऊन पार्वतीनें—'तुला एक कन्या होईल' म्हणून स्वप्नांत वरदान दिलें. व देवीच्या कृपेनें गर्भधारण होऊन नऊ मास परिपूर्ण होऊन ज्या दिवशीं राजा पुष्पमित्रास पुत्र झाला त्याच्या दहाव्या दिवशीं पद्मगुप्त सावकाराला एक कन्या झाली. पद्मगुप्तानें तिचे यथाविधि संस्कार करून बहुत दानधर्म केला. व जोतिष्यांकरवीं तिचा ग्रहयोग वगैरे पाहून "शशिप्रभा" असें तिचें नांव ठेविलें. तीही आपल्या आईबापांच्या लाडास पात्रभूत झाली होती. व चंद्रिकेप्रमाणें प्रतिदिवशीं तिच्या कला वृद्धिगतच होत असून त्या कन्येच्या योगानें तिच्या आ-ईबापांस फारच आनंद होत होता.

याप्रमाणें त्या उभयतां स्त्रीपुरुषांचा मारवाडदेशांत जन्म झाला. इकडे मालवदेशांत उज्जयिनी नगरींत ईश-गुप्त नांवाचा धनाढ्य सावकार होता, तोही आपणांस पुत्र

व्हावा म्हणून फार दिवस ईश्वराची आराधना करीत होता. त्याची स्त्री रत्नप्रभा ही तर पुत्राकरितां रात्रंदिवस तळमळत होती. ईश्वरकृपेनें तिला एका सत्पुरुषानें प्रसन्न होऊन—'तुला पुत्र होईल,' म्हणून आशीर्वाद दिला. व त्याप्रमाणें पूर्वजन्मीं सुंदरीवर आसक्त होऊन तिच्या विरहाग्नीनें दग्ध झालेल्या राजा वसंतसेनास वासनेच्या जोरानें पुनः जन्म प्राप्त झाला. व तो या ईशगुप्ताच्या स्त्रीच्या उदरीं आनंदवर्धनाच्या जन्मदिवसाच्या तिसरे दिवशीं जन्मास आला! बहुत नवस सायास करून पुत्र झाला यामुळें ईशगुप्ताला फारच आनंद झाला. त्यानें ब्राह्मणांस दानें वगैरे बहुतशीं दिलीं व ज्योतिषवेत्त्या ब्राह्मणांच्या आज्ञेनें त्या पुत्राचें "चंद्रगुप्त" असें नांव ठेविलें. त्याच्या लालनेंकरून ईशगुप्ताच्या आनंदसमुद्राला भरती येत गेली.

याप्रमाणें गोरखनाथाच्या शापेंकरून तीं उभयतां स्त्रीपुरुषें व त्या सुंदरीवर आसक्तहृदय झाल्या कारणानें राजा वसंतसेन ह्या तिघांसही पुनर्जन्म प्राप्त झालें. तिघेंही आपआपल्या मातापितरांचीं एकुलतीं एक असून फारच लाडकीं होतीं. तिघांचेंही वय एकसारखेंच होतें. म्हणजे ज्या दिवशीं आनंदवर्धन जन्मास आला त्याच्या तिसरे दिवशीं चंद्रगुप्त जन्मला व दहावे दिवशीं शशिप्रभा जन्मास आली, हें वर सांगितलेंच आहे. या वरून यांचे जन्म जरी आगेमागें झाले, तरी या तिघांचा गर्भप्रवेश एकाच दिवशीं झाला होता. व पूर्वजन्मसंस्कारानें कांहीं विलक्षण रीतीनें या तिघांचा एकमेकांवर अनुराग कसा जडला, हें पुढें प्रसंगानुसार वर्णन करण्यांत येई-



लच. यांतून हंस आणि सुंदरी म्हणजे आनंदवर्धन आणि शशिप्रभा या उभयतांस—त्यांच्या पूर्वजन्मीं केलेल्या उग्र तपश्चर्येच्या प्रभावानें म्हणा किंवा गोरखनाथाच्या कृपेनें म्हणा—पूर्वजन्माचें स्मरण होतें व तीं उभयतांच नातें स्मरत होतीं. पण राजा वसंतसेन अथवा या जन्मींचा चन्द्रगुप्त यास पूर्वीचें बिलकुल स्मरण नव्हतें. मात्र त्याचा पुढें कांहीं कारणानें शशिप्रभेवर विलक्षण अनुराग जडला. तो जडण्याचें कारण म्हटलें तर पूर्वजन्मांत देहांत होईपर्यंत त्याची तिच्यावर जी विलक्षण आसक्ती होती तिचा संस्कार या जन्मांत देखील त्याला प्राप्त झाला असावा!

इकडे पुष्करावती नगरींत राजपुत्र आनंदवर्धन आणि पद्मगुप्ताची कन्या शशिप्रभा हीं दोघेंहीं दिवसोंदिवस वाढत असून आपआपल्या मातापितरांस बालपणींच्या क्रीडेनें फारच कौतुक व आनंद देत होतीं. या उभयतांचें वय सुमारें पांच वर्षांचें झालें, तेव्हां त्यांस त्यावेळच्या रीतीप्रमाणें विद्यारंभ करण्याचा समय प्राप्त झाला, असें जाणून राजा पुष्पमित्रानें आपल्या पुत्रास विद्यारंभ केला व पद्मगुप्तानेंही आपल्या कन्येस विद्या शिकविण्यास प्रारंभ केला. राजा पुष्पमित्र आणि पद्मगुप्त या उभयतांचा निरुपम स्नेह होता, हें पूर्वी सांगितलेंच आहे. तेव्हां त्यास अनुसरूनच आनंदवर्धन आणि शशिप्रभा हीं दोघेंहीं अगदीं लहानपणापासून बहुतकरून एकेच ठिकाणीं असत. पुष्पमित्रानें आपल्या मित्राची मुलगी नेहमीं आपल्याच घरीं ठेवून घेत जावें. कारण त्या एकुलत्या एका मुलास बरोबर क्रीडा करण्यास त्याच्या

समान वयाचें दुसरें कोणीतरी पाहिजे होतें, म्हणून त्यानें या उभयतांची अगदीं लहानपणापासून साथ जमवून दिली होती. आनंदवर्धन जर आपल्या बापाच्या येथें असला तर शशिप्रभाही तेथेंच त्याच्या संगातीं राहत असे. कदाचित् ती आपल्या पित्याच्या घरीं गेली तर हाही तिच्या बरोबर तिकडेच जात असे. सारांश, त्या उभयतांची सर्व कामांत अगदीं जोडी असून एकमेकांवांचून त्यांस चैन पडत नसे. या प्रकारचा हा त्या दोघांचा सख्यसंबंध परमेश्वरकृपेनें अथवा प्राचीन कर्मानें अगदीं लहानपणापासून जडला होता!

वर सांगितल्याप्रमाणें त्या दोघांस विद्यारंभ केल्यावर त्यांनीं थोडक्याच दिवसांत अक्षरग्रहण म्हणजे—लेखन आणि वाचन याचा अभ्यास पुरा केला. मग राजानें त्या उभयतांस पाठशाळेंत घातलें. तेथें अन्यही कित्येक मांडलिक राजांचे पुत्र व कन्या, आणि मोठमोठे सरदार व श्रीमान् लोक यांच्या कन्या व पुत्र विद्याभ्यास करित होते. त्या शाळेवरचा मुख्य गुरु ब्रह्मदत्त नांवाचा एक सुशील व विद्वान् असून चतुर्दशविद्या आणि चौसष्ट कला, व धनुर्वेद इत्यादिकांत पारंगत असा होता. आणखीही बहुतसे उपगुरु होते. ते प्रत्येक—एकेक विद्या विद्यार्थ्यांस पढवीत असत. त्या विद्यालयांत ज्या ज्या विद्यार्थ्यांस ज्या ज्या विद्येची विशेष अपेक्षा असेल व ज्या विद्येंत त्याच्या बुद्धीचा लौकर प्रवेश होत असेल व जी त्याच्या वर्णाश्रमधर्माला विहित असेल तीच विद्या त्यास पढवीत असत. मुख्य गुरु ब्रह्मदत्त यानें अशी कांहीं व्यवस्था करून ठेविली होती कीं, तिच्या योगानें सर्व विद्यार्थ्यांस उपयुक्त शिक्षण

मिळत असे. जे ब्राह्मणजातीचे विद्यार्थी तेथें अभ्यास करण्यास येत असत त्यांस चारी वेद, वेदांचीं अंगें, उपांगें, शास्त्रें, विविध दर्शनें, इत्यादि पढवीत असत. जे क्षात्रिय-पुत्र अभ्यास करण्यास येत असत त्यांस थोडासा वेद पढवून विविधशास्त्रांचें त्यांस थोडेंसें ज्ञान झाल्यावर राजनीति, युद्धकला व धनुर्वेद, हीं विशेषें करून शिकवीत असत. तसेंच वैश्य-जातीच्या विद्यार्थ्यांस वेदांचें सामान्य ज्ञान करून देऊन त्यांना विशेषतः व्यापारधंदा वगैरे करण्याचीं साधनें व ताद्विषयक शास्त्रीय नियम विशेषतः-शिकवीत असत. यावांचून शूद्र व इतर कारागीर वगैरे लोकांस सामान्य स्वधर्मविषयक विज्ञान करून देऊन त्यांस मुख्यत्वें आपआपला धंदा करण्यास उपयोगी पडेल या प्रकारची शिल्पविद्या वगैरे शिकवीत असत. त्या काळांत स्त्रियांला वेदादिकांचा अभ्यास करण्याची मोकळीक होती. ब्राह्मणादि उंच वर्णाच्या मुलींकडून वेद-शास्त्रादिकांचाही अभ्यास करवीत असत. व ज्यांस आजन्मपर्यंत अविवाहित राहून ब्रह्मचर्यानें आयुष्य घालवावयाची इच्छा असेल त्यांस वेदांचा अर्थ व तत्वविचारासारखे गहन विषय देखील उत्तम प्रकारें पढवीत. तसेंच पुरुष विद्यार्थ्यांसही चौसष्ट कलांतून थोड्या तरी सर्व साधारणतः अवश्यमेव शिकाव्याच लागत असत. याप्रमाणें त्या विद्यालयांत शिक्षणाची व्यवस्था असल्याकारणानें संपूर्ण विद्यार्थ्यांस यथायोग्य विद्या मिळत असे.

आनंदवर्धन आणि शशिप्रभा हीं उभयतांही या पाठशाळेंत गेलीं, त्यावेळीं प्रथमचा सामान्य अभ्यास होईपर्यंत बहुतकरून त्या उभयतांचा शिकण्याचा नियम

एकच असे. पण थोडक्याच दिवसांनीं आनंदवर्धन हा उपनयनास योग्य झाला आहे, असें जाणून त्याच्या गुरूनें त्यास वेदांगें पढविण्यास आरंभ केला. त्या दिवसापासून कलांचा अभ्यास करण्यापुरती मात्र शशिप्रभेची आणि त्याची जोडी रहात असे. बाकीच्या वेळांत आनंदवर्धनाचें शिक्षण निराळ्या प्रकारचें असल्याकारणानें शशिप्रभेची आणि त्याची एकत्र स्थिति होत नसे. तरी पण सवड सांपडेल तेव्हां उभयतां एकमेकांस भेटल्यावांचून राहत नसत. राजपुत्र आनंदवर्धन याचें थोडक्याच दिवसांत उपनयन झालें. तो वेदांचा अभ्यास करूं लागला. त्यानें उत्तम प्रकारें गुरूची आज्ञा संपादन करून सार्थ वेदांचें ग्रहण केलें. तशीच मीमांसादि गहन शास्त्रांचेंही अध्ययन केलें. धनुर्वेदांत प्रवीण झाला. नेहमीं तो आपल्या गुरूची आज्ञा एकनिष्ठपणें पाळीत असे. त्यानें गुरुगृहीं असते वेळीं समावर्तन होईपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्यव्रतधारण केलें होतें. तो ज्या त्या विषयांत आपल्या बरोबरच्या इतर सहाध्यायांपेक्षां लौकर प्रवीण होत असे. त्याची बुद्धि फारच तीव्र होती त्यामुळें गहन विषयांचें देखील तो त्वरित ग्रहण करीत असे. स्मरणशक्ति उत्तम असल्यामुळें ग्रहण केलेल्याचें त्यास कधींही विस्मरण होत नसे. ही त्याची धारणाशक्ति पाहून व आपल्यावर एकनिष्ठ भक्ति आणि त्याच्या अंगीं असलेले विनय-दाक्षिण्यादि गुण पाहून संपूर्ण गुरुजन त्याच्यावर फारच प्रीति करित असत. याच-प्रमाणें शशिप्रभाही मोठी बुद्धिमति असून फार मायाळू होती. ती आपल्या बरोबरीच्या इतर विद्यार्थ्यांशीं मोठ्या गोडीनें वागत असे व गोरगरीबांवर फारच दया

करी. तिनेंही एकनिष्ठपणें आपल्या गुरूची मर्जी संपादन करून त्यांस सुप्रसन्न करून घेतलें. राजपुत्रास विद्या तिला राजपुत्राचा वियोग मुळींच सहन होत नव्हता. तथापि निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करावयाचा असल्याकारणानें त्या उभयतांची गांठ पडण्यास प्रहराचे प्रहर अंतर पडत होतें. तरी पण त्या उभयतांनीं आपल्या गुरूच्या आज्ञेचें कधींही उल्लंघन केलें नाहीं! अस्तु.

याप्रमाणें या दोघांचा अभ्यास चालला असतां राजपुत्र आनंदवर्धन हा थोडक्याच दिवसांत वेदशास्त्र, धनुर्वेद, इत्यादि विषयांत पारंगत झाला व शशिप्रभाही संगीत, चित्रलेखन, नृत्य, वाद्यवादन, इत्यादि कलांत बरीच प्रवीण झाली, तथापि तिचा अभ्यास पुरा झाला नव्हता. तिला मुख्यत्वें संगीत आणि कविता ह्या दोन विषयांची मनापासून आवड होती. त्यांत प्रवीण व्हावें अशी तिची फारच इच्छा होती. इकडे राजपुत्र आनंदवर्धन याचाही इतर अभ्यास पूर्ण झाला असून त्यासही संगीताचा विशेष अभ्यास करावयाचा होता. तो हावेळ पर्यंत आपला नियमित अभ्यास झाल्यावर सवडीप्रमाणें संगीतादिकांचा अभ्यास करण्याविषयीं शशिप्रभेची साथ करीत असे. त्यास इतर कलाही थोडथोड्या माहीत झाल्या होत्या. गहन शास्त्रविषयाच्या अभ्यासांत त्याचें मन विशेष गढून गेल्यामुळें त्याचा संगीतादिकांवर त्यावेळीं फारसा भर नव्हता व त्यास तितका अवकाशही मिळत नव्हता. पण आतां तिकडून त्याची हळू हळू मोकळीक झाल्याकारणानें त्यास इकडे विशेष लक्ष्य देण्यास सवड मिळाली. तो संगीतादिकांचा झटून

अभ्यास करूं लागला. या कलांचा अभ्यास करतेवेळीं शशिप्रभेबरोबर आपणास फार वेळ अभ्यास करण्यास सांपडतो म्हणून उभयतांसही मोठा आनंद झाला. शशिप्रभा संगीतादिकांत बरीच प्रवीण झाली होती व राजपुत्र फार मागें होता. तेव्हां या उभयतां प्रेमळ सहाध्यायांची नेहमीं चढाओढ होत असे! शशिप्रभेनें एखाद्या वेळीं राजपुत्र चुकला म्हणजे त्याची थट्टा करावी. असें झालें म्हणजे त्याला फारच ईर्ष्या चढत असे. तो तिला चुकविण्याविषयीं प्रयत्न करून उसनें फेडून घेत असे. याप्रमाणें दोघांचीही नेहमीं झटापट होत असावी. कधीं कधीं या उभयतांचा एखाद्या विषयावर वाद जुंपत असे; व त्या वेळीं गुरुजीस मध्यस्थी करावी लागे! याप्रमाणें उभयतांही निरनिराळ्या कलांचा मोठ्या झपाट्यानें अभ्यास करीत असत. राजपुत्र आनंदवर्धन हा संगीताचा अभ्यास करण्यास लागून फारसे दिवस झाले नव्हते, तरी पण तो मोठ्या तीव्र बुद्धीचा असल्याकारणानें लौकरच त्यानें कांहीं विषयांत शशिप्रभेस मागें टाकलें. चित्रलेखन, कविता, गायन आणि नृत्य या विषयांत आनंदवर्धनाच्यानें तिची बरोबरी करवली नाहीं. हा शास्त्रीय रीतीप्रमाणें वरील कलांचें उत्तम विवेचन करीत असे; तथापि त्याची तिकडे नैसर्गिक प्रवृत्ति नसल्यामुळें त्याच्या हातून त्यांत शाबासकी मिळवली गेली नाहीं. शशिप्रभेचा कंठ फारच मधुर होता. स्त्रीजातीला कंठमाधुर्य हें उपजतच असतें तेव्हां ती तालादिकांत कधीं कधीं चुकत असे पण आलाफ वगैरे घेऊन आपल्या गायनानें ऐकणाराला थक्क करून सोडणें हा गुण तिच्या



अंगीं फारच अद्वितीय होता! [redacted] कविता इत्यादिकांतही तिची सरशी होती. तथापि राजपुत्राची आणि तिची साथ फारच जमत असे. याप्रमाणें आनंदवर्धन आणि शशिप्रभा या उभयतांचा विद्याभ्यास पूर्ण होत आला.

इकडे उज्जयिनींत जन्मास आलेला चंद्रगुप्त याचाही विद्याभ्यास झपाट्यानें चालला होता. उज्जयिनी हें शहर त्यावेळीं अनेक कारणांनीं साऱ्या भरतखंडांत विशेष महत्वाचें होतें. चंद्रगुप्ताचा बाप ईशगुप्त हाही मोठा संपन्न असून प्रतिष्ठित होता. त्याची तेथील राजा सिंहवर्मा याच्याशीं लहानपणापासून विशेष मैत्री होती. त्या राजाचा मुख्य खजानजी अथवा धनाध्यक्ष हाच होता. राजा सिंहवर्मा प्रत्येक लहानमोठ्या कामांत त्याच्या मसलतीचें साह्य घेत असून, तो त्याला आपल्या बरोबरीच्या नात्यानें वागवीत होता. एकावर एक सहा मुली होऊन वारल्या व त्यांच्या पाठीवर नवानवसांनीं ईशगुप्ताला हा पुत्र झाल्यामुळें राजाला फार आनंद झाला. चंद्रगुप्त अंमळ मोठा झाल्यावर तो त्याला बहुतकरून आपल्या मुलांच्या बरोबरच ठेवीत असे. सिंहवर्म्याला पुष्पसेन आणि वीरमित्र असे दोघे पुत्र होते. ते चंद्रगुप्ताला आपला बंधूच समजून बालक्रीडेंत नेहमीं त्याला बरोबर वागवीत असत. मुलगा रात्रंदिवस राजवाड्यांतच असतो व आपल्याला त्याचे लाड करायाला मिळत नाहींत म्हणून चंद्रगुप्ताची आई फार कष्टी होत होती. पण बाळपणापासून— आपल्या सौंगड्यांचा विशेष लळा लागल्याकारणानें— आईनें पुष्कळ आग्रह करून घरीं ठेवून घेतला तरी चंद्रगु-

साला तेथें चैन पडत नसे, यामुळें तो बहुतकरून राजपुत्रां-बरोबरच नेहमीं राहत होता.

उज्जयिनींत मोठी पाठशाळा असून तेथेंही पुष्कळ विद्यार्थी अभ्यास करीत होते. चंद्रगुप्ताचा बहुतेक अभ्यास त्या राजपुत्रांबरोबरच झाला. सहवासानें मनुष्याच्या स्वभावांत विलक्षण फरक पडतो. त्यांतून लहानपणांत तर संगतीचा आसर लवकर होतो. चंद्रगुप्त हा सावकाराचा मुलगा होता. त्याला व्यापारधंदा वगैरे आपल्या परंपरागत व्यवसायांकडे विशेष लक्ष्य दिलें पाहिजे होतें. पण अगदीं लहानपणापासून त्याला क्षत्रियांची सोबत लागली व त्या संगतींतच तो वाढत गेल्यामुळें त्याच्या सवयी देखील त्यांच्या सारख्याच झाल्या!

पाठशाळेंत त्यानें राजपुत्रांबरोबर आपला अभ्यास पुरा केला. अर्थात् क्षत्रियांच्या मुलाला उचित अशा प्रकारचेंच शिक्षण त्याला मिळालें. तो धनुर्विद्येंत व द्वंद्वयुद्धांत मोठा प्रवीण झाला. राजपुत्रांबरोबर नेहमीं शिकार वगैरे करण्याला तो जात असे. केव्हां केव्हां शिकार मारण्यांत राजपुत्रांना देखील त्यानें मागें टाकावें, इतका तो त्या विषयांत प्रवीण झाला होता! राजा सिंहवर्मा आपल्या पुत्रांचे गुण व शौर्य पाहून जसा संतुष्ट होत असे तसाच चंद्रगुप्ताचे गुण व शौर्य पाहूनही त्याला फार आनंद होत होता. क्रमाक्रमानें त्यांचा विद्याभ्यास पुरा होऊन ते विवाह करून घेण्याच्या स्थितींत आले. सिंहवर्म्यानें दोघां मांडलिक राजांच्या आपल्या पुत्रांला अनुरूप अशा कन्या पाहून त्यांच्याशीं उभयतांचे विवाह करण्याचा निश्चय केला. त्याबरोबर चंद्रगुप्ताचाही

विवाह करावा, असा त्याचा हेतु असून मुलीविषयीं शोध चालला होता.

इकडे राजपुत्र आनंदवर्धन आणि शशिप्रभा यांचाही अभ्यास पूर्ण झाला. आनंदवर्धन मोठा बुद्धिमान् असून त्यानें सर्व विद्या व कला अल्पकाळांत थोड्या श्रमानें साध्य केल्या. त्याचे गुण व आचरण फार उत्तम होतें. तथापि राजपुत्राला योग्य व त्याच्या अंगीं विशेषेंकरून अवश्य असलेच पाहिजेत असे गुण, आनंदवर्धनाच्या अंगीं नव्हते. राज्याचा अधिकार चालविणारा पुरुष केवळ सात्विक असून उपयोगाचें नाहीं. त्याच्या अंगीं राजस्, तामस्, हेही गुण थोडे असले पाहिजेत. अपराध्याला दंड करणें किंवा लढाईंत मोठ्या आवेशानें शत्रूचा पराभव करणें, हें काम सात्विक मनुष्याच्यानें होण्याचा संभव नाहीं.

आनंदवर्धन इतर सर्व गुणांनीं उत्तम होता, पण त्याची वृत्ति फारच सात्विक होती. त्यानें धनुर्वेदाचा अभ्यास केला होता. पण तिचा मुख्य उपयोग—अर्थात् प्राणिवध—करण्याला तो फार भीत असे! पदरचे सरदार वगैरे लोकांच्या आग्रहावरून कधीं कधीं तो शिकारीला जात असे. पण सावजांवर बाण सोडून त्यांचा जीव घेणें हें त्याला फारच अयोग्य वाटत असे. तो आपल्या बरोबरच्या लोकांना त्याबद्दल उलट उपदेश करी.

तो म्हणे, "अरे, तुम्ही ह्या निरपराधी प्राण्यांला कां मारतां? जसे आपण ईश्वरसृष्ट प्राणी आहोंत, तसेच हेही आहेत. मग ह्यांचा आपण जीव घ्यावा तो कां? जसे आपण यांना बाण मारतों तसेच आपल्याला

कोणी मारील, तर त्यापासून किती दुःख होईल बरें! मग ह्या गरीबांवर विनाकारण शस्त्र धरण्यांत काय अर्थ आहे! आपल्या जिभेची खाज भागविण्याकरितां ह्यांचा जीव घ्यावा, ह्यापरतें दुसरें अयोग्य कृत्य कोणतेंही नाहीं. तात्पर्य, आनंदवर्धनाची वृत्ति फार शांत व सत्वशील होती. तो एखाद्या तपस्वी ऋषीच्या मुलासारखा दिसे. वस्तुतः हा त्याचा स्वभाव मोठा वर्णनीय होता. ज्या प्रकारची आपली वृत्ति व्हावी, म्हणून मोठमोठे जपी तपी नेहमीं प्रयत्न करीत असतात तशी याला जन्मतःच प्राप्त झाली होती. पण तो ज्या स्थितींत व ज्या कुळांत जन्मास आला होता, तेथें या गुणाचें विशेष मोल नाहीं. यालां तो ब्राह्मणकुलांत उत्पन्न झाला असता, तर फार महत्व आलें असतें. असो.

बापाला त्याच्या शांत स्वभावाबद्दल फार आनंद वाटत असे. यद्यपि आपल्या मागें शत्रूच्या डोक्यावर पाय देऊन तो हें राज्याचें गाडें कसें चालवील, याची त्याला काळजी होती, तथापि त्याच्या इतर सद्गुणांनीं तो त्याला फार प्रिय झाला होता. त्याचा विद्याभ्यास पुरा झाल्यावरून—याचा विवाह करावा, असें बापाच्या मनांत येऊन त्यानें त्याबद्दल प्रयत्न चालविला.

शशिप्रभा आणि आनंदवर्धन हीं लहानपणापासून एकत्र राहून उभयतांचा अभ्यासही बरोबरच झाला व त्यांची अतिशय मैत्री होती, हें वर सांगितलेंच आहे. शशिप्रभा यावेळीं पूर्ण वयांत आली होती. तिचाही विवाह करण्याविषयीं तिच्या बापाचा प्रयत्न चालला होता. पद्मगुप्ताच्या मनांत आपली कन्या शशिप्रभा आनंदवर्धनाला द्यावी

असें होतें. त्याची आणि आनंदवर्धनाचा बाप राजा पुष्पमित्र याची मैत्री असून आनंदवर्धन आणि शाशिप्रभा यांचीही मैत्री होती, यामुळें त्यांचा परस्पर विवाहसंबंध व्हावा, असें सर्वांच्या मनांत येत होतें.

आनंदवर्धन आणि शाशिप्रभा यांच्या मनांत यापूर्वी अशा प्रकारचे कांहीं विचार येत नव्हते. तरी आतां तीं प्रौढ झाल्यावरून त्यांच्याही मनांत हे विचार घोळूं लागले. शाशिप्रभा लहानपणीं आनंदवर्धनाशीं बरोबरी करूं लागली, म्हणजे तिची आई म्हणे,-'अगे दांडगे पोरी, उगी रहा. त्याच्याशीं (आनंदवर्धनाशीं) हुजत घालूं नको. त्याची नि तुझी काय बरोबरी आहे? तो कोण? आपण कोण? याचा कांहीं विचार करीत चल. तो कसा झाला तरी राजपुत्र असून आपला धनी आहे. त्याची बरोबरी करणें हें कांहीं चांगलें नव्हे.'

आईनें असें दटावलें तरी शाशिप्रभेच्या अल्लड स्वभावामुळें तिला त्याचें कांहीं वाटत नव्हतें. ती म्हणे, '-हं: त्याचें काय? तो चुकतो कां? तो चुकला म्हणजे तसें बोलूं नये तर काय करावें? आमच्या बरोबरीचीं शाळेंतलीं दुसरीं मुलें नाहीं का आमची थट्टा करीत? तशीच मी करतें. तूं म्हणतेस तो आमचा धनी. असेना बापडा! धनी झाला तर आमचें काय करणार? आई, तूं असें म्हणतेस खरें, पण त्याला माझा मुळींच राग येत नाहीं. मी किती बोललें तरी तो पुनः आपला माझ्याजवळ तयारच असतो!' मुलीचें असें भाषण ऐकून आईला फार आनंद होत असे. ती हंसत हंसत म्हणे, 'अरे, तुम्ही एकमेकांचीं

नवरा बायको झालां, म्हणजे मग तुमचें कसें होईल ? सारा वेळ अशीच का हुजत घालीत बसाल ?'

वर सांगितल्याप्रमाणें शाशिप्रभेच्या आईकडे जमें बोलणें निघत असे, तसेंच आनंदवर्धनाच्या आईकडेही निघत असे. कधीं कधीं त्यांच्या बरोबरीचे शाळेंतले सोबती देखील त्यांची थट्टा करीत असत. एखादवेळ आनंद-वर्धन कांहीं चुकला, आणि तें शाशिप्रभेनें सांगितलें म्हणजे-बायकोनें हरवला रे हरवला!-म्हणून आनंदवर्धनाचे सोबती त्याला लाजवीत असत. कधीं शाशिप्रभा हरली, तर-नवऱ्यानें कशी हरवली?-म्हणून तिलाही लाजवीत असत. पण त्यावेळीं त्या उभयतांच्या मनांत त्याबद्दल कांहींच कल्पना नसल्यामुळें त्यांना विशेष वाटत नव्हतें. तीं जसजशीं प्रौढ होत गेलीं, तसतसे त्यांचे मनोविकार हळूहळू बदलत गेले. शाळा सोडण्याच्या संधीस तर तीं एकमेकांला कांहीं अंशीं नवराबायकोप्रमाणें समजून परस्परांची लाज धरूं लागलीं होतीं. उभयतांही आपआपल्या आईबापांच्या आज्ञेंत असून जें कांहीं करावयाचें तें, तीं करणार, म्हणून समजून होतीं. तरी त्यांनीं परस्परांला आपआपल्या मनांत वरल्यासारखें होतें.

पद्मगुप्ताला आपली मुलगी आनंदवर्धनाला द्यावी, हें इष्ट वाटत होतें. पण पुष्पमित्राला ती गोष्ट पसंत नव्हती. त्याचा विचार निराळा होता. एकतर आपण राजे व पद्म-गुप्तापेक्षां उंच वर्णाचे अर्थात् क्षत्रिय असल्यामुळें वैश्याची मुलगी आपल्या मुलाला करावी, हें त्याला विशेष प्रशस्त वाटत नव्हतें. तशांतून आनंदवर्धनाचा स्वभाव फार सत्वशील आहे. तेव्हां एखाद्या बलाढ्य राजाच्या

मुलीशीं त्याचा विवाह करून द्यावा; म्हणजे प्रसंगीं तो तरी याचा साह्यकर्ता होईल, असे अनेक विचार त्याच्या मनांत घोळत होते. यामुळें पद्मगुप्ताशीं शरीर-संबंध करावा असें त्याच्या मनांत नव्हतें. कदाचित् पद्मगुप्ताला फारच वाईट वाटत असल्यास पाहिजे तर शशिप्रभा ही आनंदवर्धनाला दुसरी एक बायको करून द्यावी. पण पट्टराणी करावयाची ती राजकन्याच असावी, असें त्याच्या मनांत होतें.

वस्तुतः त्यावेळच्या रीतीप्रमाणें वैश्याच्या मुलीशीं क्षत्रियपुत्राला विवाह लावून घेण्याबद्दल शास्त्राची तर मनाई नव्हतीच, पण रूढीचा देखील कांहीं प्रतिबंध नव्हता. प्रत्येक वर्ण आपल्यापेक्षां कनिष्ठ वर्णाशीं उघडपणें शरीरसंबंध करीत असे. पण पुष्पमित्राचा वर सांगितल्याप्रमाणें विचार असल्याकारणानें त्यानें सहज प्रसंगावरून पद्मगुप्ताला आपला मनोदय कळविला. व तोही निरुपायास्तव स्वस्थ बसला.

वधुवरांच्या बापांचे अशा प्रकारचे विचार झाले. पण स्वतः वधुवरांचे व त्यांच्या मातुश्रींचे विचार निराळेच होते. आनंदवर्धन आणि शशिप्रभा यांच्या मातुश्रीनीं, पाहिजे त्या रीतीनें आपलें विहिणींचें नातें करण्याचा पक्का निश्चय करून ठेविला होता. आणि त्याविषयीं त्यांचे सक्त प्रयत्न चालले होते. आनंदवर्धनाची आई आपल्या नवऱ्याचें मन वळविण्याविषयीं एकसारखा प्रयत्न करीत होती. शशिप्रभेचे गुण व आनंदवर्धनाची आणि तिची प्रीति यांचें वरचेवर वर्णन करून तिनें पुष्पमित्राच्या मागें अगदीं छकड लावली होती.

पद्मगुप्त हा मोठा गंभीर मनाचा होता. राजानें आपला हेतु कळविल्यापासून त्यानें मुलीच्या संबंधाची गोष्ट देखील त्याच्याजवळ काढायचें सोडलें. तो शशिप्रभेला दुसरें स्थळ पाहण्याच्या उद्योगास लागला. उज्जयिनींतील सिंहवर्मा राजाचा मित्र ईशगुप्त याची त्याला ओळख होती. व्यापाराच्या संबंधानें परस्परांचें बरेंच दळणवळण होतें. त्याचा पुत्र चंद्रगुप्त हा प्रौढ झाला असून विवाहाला योग्य आहे, व खुद्द राजा सिंहवर्मा त्याच्या लग्नाविषयीं प्रयत्न करीत आहे, असें समजल्यावरून पद्मगुप्तानें आपल्या मुनीमाच्या मार्फत शशिप्रभेबद्दल ईशगुप्ताकडे बोलणें लावलें. ईशगुप्त आपल्या मुलाच्या संबंधानें बरीवाईट कोणतीच गोष्ट करीत नव्हता. त्याचा काय तो भरिभार आपला राजा सिंहवर्मा ह्याच्यावर होता. पद्मगुप्ताच्या मुनीमानें गोष्ट काढली, तेव्हां त्यानें त्याबद्दल कांहीं एक उत्तर न सांगतां—या संबंधानें आमचे महाराज काय तें करतील. तुम्ही त्यांना कळवा, असें सांगून त्यानें त्याला सिंहवर्म्याकडे पाठविलें.

शशिप्रभा फार उत्तम गुणवती मुलगी आहे, हें सिंहवर्म्यालाही परंपरेनें ऐकून ठाऊक होतें. कुलशीलादिकें करून उभयतांची बरोबरी आहे असें पाहून, सिंहवर्म्यानें शशिप्रभा चंद्रगुप्ताला करून घेण्याचा निश्चय करून, त्याप्रमाणें पद्मगुप्ताच्या मुनीमाला निश्चयाचें वचन दिलें. याप्रमाणें निश्चय होतांच पद्मगुप्ताचा मुनीम परत आपल्या यजमानाकडे गेला, आणि झालेली सर्व हकीकत त्याला कळविली. हळू हळू ही बातमी सर्व शहरभर पसरली. पुष्पमित्राच्या मनांत काय विचार होता तो

कोणाला कांहीं कळला नव्हता. जवळच्या लोकांना आनंदवर्धन आणि शशिप्रभा यांचा विवाह होईल असें वाटलें होतें. पण ही नवी बातमी ऐकून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. पुष्पामित्राच्या राणीचें जसें त्याच्यामागें त्वष्ठ लागलें होतें, तसेंच पद्मगुप्ताच्या स्त्रीचेंही त्याच्यामागें लागलें होतें. पण—पुष्पमित्राशीं आपला इतका स्नेह असून तो आपली मुलगी करण्यास तयार नाहीं, तेव्हां उगीच खटपट करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें समजून तो चंद्रगुप्ताशीं शशिप्रभेचा विवाह लावून देण्याच्या तयारीस लागला.

हें वर्तमान ऐकून शशिप्रभा आणि आनंदवर्धन यांच्या मनाची स्थिति कांहीं विलक्षण झाली. त्यांनीं फार दिवसांपासून—पुढें आपण अमुक अमुक करूं, परस्परांशीं असें वागूं, इत्यादिप्रकारचे अनेक मनोरथ केले होते, ते सर्व जागच्याजागीं विरून जाण्याचा प्रसंग आला; म्हणून त्यांना अतिशय वाईट वाटलें. पण पराधीन असल्यामुळें त्यांचा कांहीं इलाज चालण्यासारखा नव्हता. तथापि कोणत्याही रीतीनें आपला इच्छित हेतु पूर्ण करून घ्यावा, असा त्यांचा संकल्प होता. आनंदवर्धनाची आई चंद्रानना व शशिप्रभेची मातुश्री सानुमती या दोघींनीं आपल्या व आपल्या मुलांच्या हेतूच्या विरुद्ध विवाह घडून येण्याचें घाटत आहे असें पाहून उभयतांनीं फारच आग्रह धरिला.

राजा पुष्पमित्र फारच उतार वयाचा होता, व थोडासा बायकोच्या तंत्रानें वागणारा होता, असें म्हटलें तरी चालेल. त्यानें फार दूरवर विचार करून शशिप्रभेशीं आनंदवर्धनाचा विवाह करण्याचें नाकारलें होतें. पण मुलगा

प्रौढ झाला असून त्यांचें लक्ष्य शशिप्रभेकडेच लागलें होतें. व राणीनें अतिशय आग्रह धरिला, तेव्हां बिचाऱ्याला आपला हेतु एकीकडे ठेवून बायकोचा हट्ट पुरवावा लागला! राणी चंद्राननेा हिणें एके दिवशीं सवड पाहून आनंदवर्धनाचा शशिप्रभेशींच विवाह करावयाचा या बद्दल पुष्पमित्राचें निश्चयात्मक वचन घेतलें.

पद्मगुप्तानें चंद्रगुप्ताला आपली मुलगी देण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें उज्जयिनीचा राजा सिंहवर्मा ह्याच्याजवळ करार केला होता. व लौकरच तिथिनिश्चय करून कार्य उरकून घ्यावयाचें ठरलें होतें. असें असून इकडे चंद्राननेा राणीनें आपल्या नवऱ्याचें वचन घेतलें, तेव्हां तिचा आणि पद्मगुप्ताची स्त्री सानुमती यांचा निश्चय ठरला. पुष्पमित्राचें वचन मिळालें तेव्हां सानुमतीनें विशेष आग्रह करून आपल्या नवऱ्याचेंही मन वळविलें. मुळापासून पद्मगुप्ताच्या मनांत हा योग यावा असें होतेंच. पुष्पमित्रानें तसें करण्याचें नाकारल्यावरून तो निरूपायास्तव दुसरें स्थळ पाहण्याच्या प्रयत्नास लागला होता. सिंहवर्म्याजवळ आपण कबूल केलें असून आतां दिलेला शब्द मोडावा, याचा त्याला मोठा विचार पडला. व पुष्कळ गोष्टी विशेष अनुकूल झाल्यावरून त्यानेंही पहिला बेत फिरविला! आणि शशिप्रभा आनंदवर्धनाला देण्याचा निश्चय ठरवून त्याप्रमाणें वाग्दानविधि देखील झाला.

वस्तुतः प्रत्येक कामांत आपण जो संकेत करावा, त्याप्रमाणेंच गोष्टी घडून येतात, असें नाहीं. भवितव्यता मोठी प्रबल आहे. ती मनुष्यांना पराधीन करून बलात्कारानें त्या त्या गोष्टी घडवीत असते. आनंदवर्धन

आणि शशिप्रभा हीं पूर्वजन्मीचीं नवराबायको असून त्यांचा या जन्मांत देखील तोच संबंध कायम राहावयाचा होता, म्हणून जें व्हावयाचें तेंच झालें, असें म्हटलें पाहिजे. पण साधारण लोकरीतीप्रमाणें पुष्पामित्र व त्यांतूनही विशेषतः पद्मगुप्त हे यासंबंधानें दोषास पात्रभूत झाले, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ते दोघेही विचारी असून त्यांनीं ही जी गोष्ट केली ती आपल्या मुलांना विशेष सुख व समाधान प्राप्त व्हावें, म्हणूनच केली, पण तिचा परिणाम फार विलक्षण झाला! जन्मभर त्या दोघांला दुःख भोगावें लागलें. व या संबंधानें त्या दोघां म्हाताऱ्यांवर अपवाद आला. असो.

ईश्वरसंकेताप्रमाणें सर्व योग अनुकूल येऊन शशिप्रभा व आनंदवर्धन या उभयतांचा सुमुहूर्तावर मोठ्या समारंभानें विवाह झाला. पुष्पामित्र हा मोठा राजा असून पद्मगुप्त सावकार होता, तरी तोही मोठा द्रव्यवान् असल्याकारणानें दोहींकडून कोणत्याही प्रकारचें व्यंग पडलें नाहीं. पद्मगुप्तानें विशेष औदार्य दाखवून ह्या कार्यांत अतोनात खर्च केला. पुष्कळ दिवसपर्यंत जेवणीं खाणीं नाचरंग वगैरे आनंदाचे प्रकार चालले होते. वधूवर उपवर असून दोघांचीं मनें एकमेकांवर अतिशय आसक्त असल्यामुळें हा प्रसंग त्यांला व इतर सर्व लोकांला फार आनंदकारक झाला. बहुत दिवस उभयतांच्या मनांत वाढत गेलेला अनुराग त्यावेळीं पूर्णतेस आला. चंद्रानना आणि सानुमती या दोघींचे हेतु पूर्ण झाले. पद्मगुप्ताला आपण आज कृतकृत्य झालों असें वाटलें. याप्रमाणेंच पुष्करावतींतील सर्व लोक जो योग

यावा असें इच्छित होते, तो घडून आल्यामुळें फार आनंदित झाले. व आनंदवर्धनानें सर्वांचा आनंद वृद्धिगत करून कांहीं दिवस आपल्या नांवाचें सार्थक करून दाखविलें. पण तो योग फार दिवस कायम राहिला नाहीं!

राजा पुष्पामित्र दिवसेंदिवस अशक्त होत चालला होता. आतां आपले फार दिवस जाणार नाहींत, असें त्याच्या मनांत आल्यावरून त्यानें हळू हळू सर्व राज्य-सूत्रें आपल्या पुत्राच्या हातीं देण्याची सुरवात केली. व लौकरच सर्वसंगपरित्याग करून परलोकसाधनाचा मार्ग पाहण्याकरितां तपोवनांत जाऊन ईश्वराचें आराधन करण्याचा त्यानें निश्चय केला. त्याचा मित्र पद्मगुप्त हाही वृद्धच झाला होता. त्याच्या पोटीं पुत्रसंतान नसून कायती एकच मुलगी होती. ती सुस्थळीं पडल्या-वरून तोही बिनघोर झाला होता. आपण कितीही दिवस ह्या संसारांत गुटमळत राहिलों तरी त्यापासून कंटाळा येईल असें होणार नाहीं, तेव्हां विचारानें मनाचा निग्रह करून वळेंच त्याचा त्याग केला पाहिजे. असा विचार करून त्यानेंही पुष्पमित्राबरोबर जाण्याचा निश्चय केला. आपली स्त्री सानुमती हिच्याविषयीं त्याला फारशी काळजी नव्हती. कारण आवडता जांवई सर्वप्रकारें तिचें चालविणार. म्हणून त्यानें आपलें घरदार वगैरे जें कांहीं होतें, तें सारें आनंदवर्धनाला देऊन तो अगदीं मोकळा झाला.

पुष्पमित्र आणि पद्मगुप्त या उभयतांनीं एक दिवस निश्चित करून त्या दिवशीं शहरांतील शेटसावकार, सर-दार, दरकदार, आसपासचे आपले मांडलिक राजे, व

कामदार, या सर्वांला बोलावून मोठा दरबार केला. पुष्पमित्र स्वतः मोठा शूर होता. त्याणें आपल्या पराक्रमानें असा कांहीं वचक बसविला होता कीं, तो असेपर्यंत त्याच्या शत्रूंनीं अथवा इतर उलाढाली लोकांनीं मुळींच कांहीं गडबड केली नाहीं. तरी आपल्या पश्चात् हें असेंच सुयंत्र चालेल, याची त्याला खात्री नव्हती. आनंदवर्धन अगदीं सत्वशील आहे. त्याच्यानें शत्रूला मान वर न करूं देतां राजपदाचा उपभोग फार दिवस घेववेल कीं नाहीं, याची त्याला मोठी काळजी होती. तथापि आपण कांहीं त्याच्या जन्मास पुरणार नाहीं. त्याच्या नशीबीं असेल तसें होईल. म्हणून त्यानें त्याविषयीं विशेष काळजी करावयाचें सोडलें. त्याच्या कामदारांपैकीं सेनापति व मुख्य प्रधान यांच्यावर मोठा भरंवसा होता. त्यांला जें कांहीं सांगावयाचें तें सांगून आनंदवर्धनाला वेळोवेळीं उत्तम साह्य करण्याविषयीं सांगितलें होतें. शेवटीं सर्व लोकांचा समाज जमवून पुत्राला त्यांच्या हवालीं करावें, असा विचार करून त्यानें मुद्दाम हा दरबार भरविला होता.

दरबारांत सर्व मंडळी आटोकाट जमली. तेव्हां राजा पुष्पमित्रानें आपले मांडलिक, सरदार, कामदार, व इतर प्रतिष्ठित लोक ह्यांला उद्देशून गाहिवर येण्यासारखें भाषण केलें. तो म्हणाला, 'सर्व तुम्ही आजपर्यंत ईश्वरकृपेनें माझ्या हातीं जो कांहीं अधिकार व सत्ता होती, त्याखालीं राहिलां व मला वेळोवेळीं साह्य केलें, याबद्दल मी तुम्हांविषयीं कृतज्ञ आहें. ज्याच्या हातीं न्याय, अन्याय, धर्म, अधर्म यांचा निर्णय करण्याचा अधिकार असतो, त्याच्याकडून सर्वकाळ सर्वच मनुष्यांला संतोष

होईल, असें वर्तन ठेवतां येण्याचा संभव नाहीं. एकाच्या मनाप्रमाणें झालें म्हणजे तो त्याविषयीं प्रसन्न होईल. पण ज्याच्या मनाविरुद्ध झालें असेल, तो रुष्ट होणार हें उघडच आहे. तथापि सत्ताधाऱ्यानें तिकडे विशेष लक्ष्य देतां कामा नये. त्यानें धर्म व न्याय यांवर दृष्टि देऊन आपलें कर्तव्य बजाविलें पाहिजे. व असें करतांना देश, काल, वर्तमान ह्यांकडे लक्ष्य देऊन जितका विशेष विचार करवेल तितका करावा लागतो. मी आजपर्यंत आपल्या हातीं आलेला अधिकार धर्माला व न्यायाला अनुसरून माझ्या समजुतीप्रमाणें जितका योग्य रीतीनें चालवितां आला, तितका चालविला. व तो तुम्हां सर्वांला मान्य झाला. याविषयीं तुम्ही वेळोवेळीं माझ्या हुकुमाला मान देऊन अनुकूल वागलां, यापरतें दुसरें कांहीं उदाहरण नको.'

'इतके दिवस वेडीवांकडी कशी तरी माझ्या हातून तुम्हीं सेवा करून घेतलीत याबद्दल मला फार संतोष वाटतो. पण आतां मी फार वृद्ध झालों आहें, यामुळें माझ्यानें पहिल्यासारखे श्रम करवत नाहींत. व जन्मास आलेल्या मनुष्यानें ऐहिककर्तव्य करून शेवटीं पारलौकिक कृत्यही अवश्य केलेंच पाहिजे. म्हणून मी आपला सर्व अधिकार ह्या माझ्या पुत्राच्या (आनंदवर्धनाच्या) हातीं देतों याविषयीं तुम्हां सर्वांचें पूर्ण अनुमोदन असावें; व जसें तुम्हीं मला वेळोवेळीं साह्य केलें व माझ्यावर प्रेमा ठेवून एकनिष्ठपणें वागलां, तसेंच ह्या तुमच्या तरुण राजाला साह्य करून याच्यावर प्रेम ठेवा, आणि त्याच्याशीं एकनिष्ठपणें वागा. राजा आणि प्रजा या दोघांनींही

आपआपल्या मर्यादेच्या आंत राहून एकमेकांच्या हिता-विषयीं तत्पर असणें हें परस्परांचें मुख्य कर्तव्य आहे. व तें योग्य रीतीनें बजाविलें असतां त्यापासून उभयतां-चेंही हित होऊन ऐहिक व पारलौकिक पुरुषार्थ सिद्ध होतात, नाहींपेक्षां दोघांचेंही अहित होतें. आतां याहून विशेष कांहीं सांगावयाचें नाहीं. हा तुमचा तरुण राजा सर्व प्रकारें योग्य असून तुम्हांला मी याच्या हातीं सोंपविलें आहे. व यालाही तुमच्या हातीं सोपविलें अहे. उभयतां एकविचारानें वागून आपआपलें हित करून घ्या म्हणजे झालें. मी आतां तुमचा निरोप घेतों. आजपर्यंत कदाचित्, माझ्या हातून कांहीं अन्याय झाला असला तर त्याची क्षमा करून तुम्ही मला अनुज्ञा द्या.'

असें भाषण करून राजा पुष्पमित्रानें प्रेमपूर्वक सर्वांचा निरोप घेऊन पद्मगुप्तासह तो तपोवनास निघून गेला. तरुण राजा आनंदवर्धन मोठा चतुर असून धर्म-न्यायानें वागणारा होता. त्यानें बापानें सांगितल्याप्र-माणें राज्यव्यवस्था उत्तम प्रकारें चालविली. पूर्वींचा जम बसलेला होताच, यामुळें त्याला नवीन विशेष कांहीं खटपट करावी लागली नाहीं. तरी एकदोन सामान्य प्रसंगांवरून रयतेनें त्याचें वजन ओळखलें. प्रत्येक ठिकाणीं प्रत्येक काळांत, बरे आणि वाईट लोक असतातच. चांगल्या वर्त-नाच्या लोकांना उलाढाली मुळींच आवडत नाहींत. यामुळें त्यांच्यावर अधिकार चालविण्यास कांहींच कठीण पडत नाहीं. काय ती अडचण वाईट लोकांच्या संबंधानेंच असते. त्यांला आपल्या धाकांत ठेवून त्यांच्या-वर अधिकार चालवावा लागतो.

आनंदवर्धन व त्याचे सल्लागार हे आपल्याकडून पुष्कळ खटपट करीत होते. पण त्याच्या कारकीर्दीत रयतेवर धाक बसेनासा झाला. प्रत्येक कामांत कडक शिक्षा करून अथवा सामोपचाराच्या गोष्टी सांगून कांहीं उपयोग होत नाहीं. एकंदरींत--राज्य चालविणें अतिशय कठीण आहे, असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. त्यांत अमक्या एका नियमित रीतीनें वागलें तर झालें, असें मुळींच नसून प्रसंग पडेल तसें वर्तन ठेवावें लागतें. तात्पर्य, राजपदाचा अधिकार चालविण्यास अवश्यक असलेले गुण अंगीं नसल्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा आनंदवर्धनाचें राज्य चिरकाल राहण्याच्या संबंधानें--त्याच्या हितचिंतकांला दिवसेंदिवस संशय येऊं लागला. व याविषयीं काय उपाय करावा, याचा त्यांला विचार पडला. असो.

आनंदवर्धनाला इकडे असाच ठेवून आपण चंद्रगुप्ताकडे वळूं. चंद्रगुप्ताचा--आपल्या मुलाबरोबरच विवाह करून द्यावयाचा असा सिंहवर्म्याचा बेत होता व त्याप्रमाणें पद्मगुप्ताच्या मुनीमाला त्यानें शशिप्रभेला करून घेण्याचें निश्चयाचें वचन दिलें होतें, हें वर सांगितलेंच आहे. सिंहवर्म्याच्या येथें लग्नाची कडेकोट तयारी चालली होती. त्याच्या दोघां पुत्रांला--एकाला कौशांबी नगरीच्या राजाची कन्या, व दुसऱ्याला विशाला नगरीच्या राजाची मुलगी ठरविली होती.

आमच्या या कथानायकाच्या हयातीच्या समयांत देखील स्वयंवराची रीत क्षत्रियलोकांत चालू होती. ज्याची जशी योग्यता असेल तदनुसार तो लहान मोठा समारंभ

करून त्यांत कांहीं पण लावून—तो जो जिंकील त्याला मुलगी देण्याचा परिपाठ होता. जेवढे क्षत्रिय तेवढे सगळेच राजे होते असें नाहीं. त्यांत पुष्कळ गोरगरीबही होते. तथापि त्यांनीं आपला संप्रदाय सोडला नव्हता. क्षत्रियाला राक्षस, आसुर किंवा गांधर्व हे विवाहाचे प्रकार धर्मशास्त्रानें मुख्यत्वें सांगितले आहेत. 'मी तुमच्या मुलाला मुलगी देतों,' असें सांगून मुलगी देणें अथवा 'माझ्या मुलाला तुमची मुलगी द्या' म्हणून मुलीच्या वापाजवळ याचना करावयास जाणें हें काम नेभळ्या भट्टोबांचें आहे असें समजून क्षत्रिय त्याचा मुळींच स्वीकार करीत नव्हते!

° उघडच आहे. क्षत्रिय या शब्दांतच असा कांहीं अर्थ आहे कीं—त्यानें पराक्रमाच्या गोष्टी केल्याच पाहिजेत. द्रव्य अथवा बायको, किंवा अधिकार जें कांहीं मिळवावयाचें तें त्यांनीं बाहुबलावरच मिळविलें पाहिजे. मुलगीच कां होईना, पण ती तरी—मला दे म्हणून याचना करायला जाणें हें त्यांना विहित नाहीं. अगदीं गरीब क्षत्रिय असला तरी तो ज्याला मुलगी द्यावी अशी इच्छा असेल त्याच्याकडून कांहीं तरी पराक्रमाचें व साहसाचें कृत्य करविल्यावांचून मुलगी देण्यास तयार होत नसे. व मुलीही प्रौढ असून त्यांच्या अंगीं—आपल्या कुळांतलें परंपरागत कांहीं तेज असल्यामुळें—त्या नवरा पराक्रमी आहे असें पाहिल्यावांचून त्याला वरण्यास मुळींच तयार होत नसत! असो.

सिंहवर्म्याचा ज्येष्ठ पुत्र पुष्पसेन याला कौशांबीचा राजा कांतिसेन याची मुलगी शारत्सुंदरी ही करायची असा संकेत ठरला होता. राजा कांतिसेन यानें आपल्या संप्रदायाप्रमाणें एक मदोन्मत्त हत्ती दरवाज्याशीं बांधून

ठेविला होता. त्या हत्तीला जो कोणी जेरीस आणील, त्याला आपली मुलगी द्यायची असा त्यानें निश्चय केला होता. इतर पुष्कळ तरुण तरुण राजपुत्र आपल्याकडून होईल तितका प्रयत्न करून, पण जिंकण्याविषयीं शर्थ करून दमले, पण कोणाला कांहीं यश मिळालें नाहीं. शेवटीं पुष्पसेनानेंच तो पण जिंकला, म्हणून कांतिसेनानें त्याला आपली मुलगी देण्याचा निश्चय केला होता.

याप्रमाणेंच विशाला नगरीचा राजा श्वेतकेतु याची कन्या कुसुमकुमारी ही वीरमित्राला द्यावी असा विचार झाला होता. त्याच्या राज्यांतील एका किल्ल्यावर कांहीं भिल्ललोकांनीं आपलें ठाणें करून पुंडावा चालविला होता. श्वेतकेतुराजानें पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याच्यानें तो बंडावा मोडवला नाहीं. म्हणून—जो कोणी राजपुत्र हा किल्ला सर करून देईल त्याला कुमुमकुमारी द्यावयाची—असा त्यानें पण लावला होता. व त्याप्रमाणें राजपुत्र वीरमित्र यानें बंडवाल्याचा मोड करून श्वेतकेतूला किल्ला सर करून दिल्यावरून त्यानें त्याला आपली मुलगी देण्याचा निश्चय ठरविला होता.

क्षत्रिय पण जिंकून मुली वरीत असत. पण जिंकला कीं ती त्याची बायको झाली, असें होत नव्हतें. नंतर यथाविधि लग्न लावलेंच पाहिजे होतें. पण जिंकला म्हणजे ती मुलगी त्याच्यावांचून दुसऱ्याला द्यावयाची व करावयाचीही नाहीं, इतकेंच कायतें. बाकी रीतीप्रमाणें शास्त्रोक्तविधीनें लग्न लावलेंच पाहिजे होतें. सिंहवर्म्याचे पुत्र पुष्पसेन आणि वीरमित्र या दोघांनीं आपआपल्या पराक्रमानें मुली वरल्या. व त्यांचा विवाह होण्याचा

दिवस ठरविला. त्यांच्या बरोबरच चंद्रगुप्ताचाही व्हाव-याचा असून हीं तिन्हीं कार्यें उज्जयिनींतच होण्याचें ठरविलें होतें. कांतिसेन व श्वेतकेतु हे दोघे राजे होते तरी सिंहवर्म्यापेक्षां त्यांचें पाडें कमी असल्यामुळें त्याच्या इच्छेप्रमाणें उज्जयिनीस आपआपल्या मुली घेऊन येण्याचें त्यांणीं कबूल केलें होतें.

शशिप्रभा चंद्रगुप्ताला देण्याचा निश्चय करून पद्म-गुप्ताचा मुनीम गेला होता. व त्याप्रमाणें लग्नाची तीथी नेमण्याचा कायतो अवकाश होता. मुनीम परत जाऊन पुष्कळ दिवस झाले. व सगळी तयारी झाली, तरी अद्याप पद्मगुप्ताकडील कांहीं खबर समजत नाहीं; म्हणून सिंहवर्म्यानें मुद्दाम त्याची चौकशी केली. तों इकडे निराळाच बेत होऊन कार्य देखील उरकून पार झाल्याचें वर्तमान त्याला समजलें! मग काय विचारतां! सर्पाच्या शेपटांवर पाय देऊन त्याला खवळविल्याप्रमाणें सिंहव-र्म्याच्या अंगाची लाही झाली. चंद्रगुप्त तर त्याच्या-हीपेक्षां अतिशय संतापला. यःकश्चित् वाणगटानें (पद्मगुप्तानें) आपल्याला फसविलें, ही गोष्ट सिंह-वर्म्याच्या मनाला अतिशय लागली. चंद्रगुप्तानें शशिप्रभेचे गुण व तिचें रूप वगैरेंची तारिफ ऐकून तो तिच्यावर विशेष राजी झालाच होता. पण त्यांतूनही पूर्वजन्मींच्या संस्कारानें म्हणा किंवा दुसऱ्या कशानेंही म्हणा——चंद्रगुप्ताची शशिप्रभेवर आसक्ती बसली होती. आनंदवर्धनानें तिच्याशीं विवाह केला हें प्रत्यक्ष आपल्या बायकोचेंच हरण केलें असें त्याला वाटलें!

पुरुषमात्राला आपल्या बायकोविषयीं किती अभिमान

असतो; व तिच्याकडे नुसत्या वांकड्या नजरेनें जरी कोणीं पाहिलें तरी त्यांना त्याचा किती राग येतो; व तो त्याच्यावर कसा डाव धरतो, याविषयीं येथें विशेष कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. चंद्रगुप्त आधींच तापट व मोठा शूर असून आवेशी होता. त्यानें जिला बायको म्हणून मानली तिच्याशीं लग्न लावणाऱ्या आनंदवर्धनाचा त्याणें डाव धरला असेल, हें येथें सांगावयासच नको! याप्रमाणें आपला अपमान केला म्हणून राजा सिंहवर्मा व आपली बायको हरण केली म्हणून चंद्रगुप्त व आपल्या बालमित्राच्या स्त्रीचा अपहार केला म्हणून पुष्पसेन आणि वीरमित्र हे उभयतां राजपुत्र हे चौघेही आनंदवर्धनाचे पुरे शत्रु बनले!

सिंहवर्म्याचे येथें यावेळीं कार्याची गडबड होती. यामुळें त्यांणीं आपल्या वैराचा प्रभाव दाखविण्यास थोडा विलंब लाविला व कांहीं तरी निमित्त लाविल्याशिवाय--केवळ शशिप्रभा दिली नाहीं, याच निमित्तानें कलह उपस्थित करावा, ही गोष्ट सिंहवर्म्याला योग्य वाटली नाहीं. म्हणून त्याणें आनंदवर्धनाचा सूड घेण्यास तयार झालेल्या आपल्या शूर पुत्रांचें समाधान करून जो प्रसंग आजच येणार होता, तो कांहीं कांलांतरावर ढकलला. आणि दुसरी योग्य मुलगी पाहून चंद्रगुप्ताच्या लग्नाची तयारी करून मोठ्या समारंभानें तीनही कार्यें आटपून घेतलीं. बरेच दिवसपर्यंत उज्जयिनी नगरींत जिकडे तिकडे आनंदीआनंद चालला होता. उभयतां राजपुत्रांला मुली देऊन कांतिसेन आणि श्वेतकेतु हे दोघे आपआपल्या राजधानीला निघून गेले. याप्रमाणेंच

यौधपुरांतला प्रसिद्ध सावकार कुबेरगुप्त हा आपली कन्या कादंबिनी ही चंद्रगुप्ताला देऊन जांवयाच्या मनाचा संतोष होण्याकरितां पुष्कळ उत्तम उत्तम वस्तु त्याला आंदण देऊन परत आपल्या घरीं निघून गेला.

पुष्पसेनाची स्त्री शरत्सुंदरी व वीरमित्राची स्त्री कुसुमकुमारी ह्या आपआपल्या नवऱ्यांला आवडत्याच होत्या. त्यांचा संबंध प्रीतिपूर्वक घडून आला होता. यामुळें तीं दोन्हीं दंपत्यें मोठ्या आनंदांत व सुखासमाधानांत होतीं. पण चंद्रगुप्ताचा योग कांहीं विलक्षण होता. त्याची स्त्री कादंबिनी ही रूप व गुण यांनीं अप्रतिम असून स्वभावानेंही चांगली होती तथापि एकंदरींत तिच्याबद्दल त्याच्या मनाला संतोष नव्हता. 'प्रीतीला कांहीं बाह्य कारणें लागत नाहींत. तिला कांहीं अंतरंगीं विलक्षण योगानें बळकटी येत असते' असें जें एका कवीचें म्हणणें आहे तें कांहीं खोटें नव्हे. चंद्रगुप्ताची स्त्री कादंबिनी ही खरोखर इतर कोणत्याही गुणांनीं कमी होती असें नाहीं, व ती बिचारी रात्रंदिवस नवऱ्याची मर्जी राखण्याविषयीं एकसारखी जपत होती. तथापि चंद्रगुप्ताचें मन तिच्यावर असावें तसें राजी नव्हतें. त्याचें मन शशिप्रभेकडे लागलें होतें.

वस्तुतः शशिप्रभेची आणि याची अद्याप प्रत्यक्ष दृष्टादृष्ट देखील झाली नव्हती. त्याला लोकांच्या सांगण्यावरून तिच्या गुणांविषयीं व——वर पहावयाला आलेल्या पद्मगुप्ताच्या मुनिमानें दाखविलेल्या तसबिरीवरून कायती तिची माहिती होती. पण तेवढ्यावरूनच तो तिच्यावर आसक्त झाला होता. आनंदवर्धनाची आठवण झाली

म्हणजे दांत ओंठ खाऊन नागासारखा वरचेवर फुसकारे सोडीत असे. त्याला आनंदवर्धनाच्या नर्डीचा घोंट केव्हां घेईन, असें झालें होतें, यामुळें त्याचें कादंबिनीकडे असावें तसें लक्ष्य नव्हतें. त्याणें तिचा अगदीं अव्हेर केला होता, अथवा तिला त्रास देत होता, असें नाहीं. लोकरीतीप्रमाणें तो तिच्याशीं वागायचें तसेंच वागत होता. पण एकंदरींत त्याचें लक्ष्य दुसरीकडे लागलें होतें यामुळें तिच्याकडे दुर्लक्ष्य होत असे.

राजा सिंहवर्मा याचा स्वभाव मोठा मानी असल्यामुळें पद्मगुप्तानें आपला अपमान केला, ही गोष्ट त्याच्या मनांत वरचेवर सलत होती. विशेष आग्रह करून मुलगी करण्याविषयीं त्यांच्याकडून वचन घेतलें नसतें, किंवा परभारें ईशगुप्ताकडे त्याविषयीं बोलणें चालणें झालें असतें, तर त्याबद्दल त्याला इतकें वाईट वाटलें नसतें. पण तो नाहीं नाहीं म्हणत असतां मुद्दाम आर्जवें करून त्याचें वचन घेतलें व आपणास कांहीं कळविल्याशिवाय परभारें कार्य उरकून घेतलें, ही गोष्ट त्याच्यासारख्या मानी पुरुषाला सहन न होणें यांत कांहीं विशेष आश्चर्य नाहीं. आपल्यासारख्या राजाशीं असें वर्तन करण्याला पद्मगुप्तासारख्या बनण्याची छाती झाली नसती. त्याला पुष्पमित्रानें तसें करण्याविषयीं भर दिली असेल असें सिंहवर्म्याच्या मनांत आलें होतें. पुष्पामित्राशीं त्याचें उघड वैर नव्हतें, तरी कांहीं कारणामुळें एकमेकांविषयीं त्यांचीं अंतःकरणें शुद्ध नव्हतीं. व पुष्पामित्रानेंही मुलगी आपल्या मुलाला करून घेतली तेव्हां सिंहवर्म्याची तशी समजूत होण्याला विशेष बळकटी आली होती.

आतां ह्या आपल्या अपमानाचा सूड घ्यावयाचा तो कोणाचा घ्यावा? हा एक विचार होता. ज्या मुनिमानें सिंहवर्म्याजवळ कबूल केलें होतें तो तर बोलून चालून चाकर. धन्यानें सांतिल्यावरून त्याणें चंद्रगुप्ताला शशिप्रभा देण्याचा निश्चय ठरविला. पण तें वचन त्याचें स्वतःचें नसून तें पूर्ण करण्याविषयींही तो असमर्थ असल्यामुळें त्याच्यावर दोष लागु होत नाहीं. दोषी कायतो पद्मगुप्त व त्याला तसें करायला लावणारा राजा पुष्पमित्र हे दोघे असून त्यांचा सूड उगवावयाचा. पण ते घरदार सोडून कोठें जंगलांत जाऊन बसले, याचा मुळीं ठिकाणच नाहीं. तेव्हां अर्थात् या सर्व दोषाला पात्रभूत बिचारा आनंदवर्धन हाच झाला! व सिंहवर्म्यानें त्याचा सूड उगविण्याचा निश्चय करून चंद्रगुप्त व आपले दोघे पुत्र यांला त्याविषयीं परवानगी दिली. तथापि केवळ ह्या अपमानाची गोष्ट पुढें करून कलह उपस्थित करूं नये, असा हेतु असल्यावरून तो कांहींतरी निमित्त पाहात होता. त्याप्रमाणें लवकरच त्याला एक निमित्त सांपडलें.

सिंहवर्म्याचा एक सरदार चंडबाहू हा शिकारीला गेला होता. आनंदवर्धन आणि सिंहवर्मा या उभयतांच्या राज्याची हद्द अगदीं एकमेकांला लागली होती. चंडबाहूची जाहागीर आनंदवर्धनाच्या राज्याच्या सरहद्दीचे अगदीं जवळ होती. तो आपल्या हद्दींतच शिकार करीत होता. शिकार करतां करतां तो एका रानडुकराच्या पाठीं लागला. तो डुकर एकसारखा

पळत सुटला तो आनंदवर्धनाच्या हद्दींतल्या एका पिकलेल्या गव्हांच्या शेतांत घुसला.

त्या शेताचा मालकही एक गरीब क्षत्रियपुत्र होता. शेत पिकलेलें असून जनावरें त्यांचा नाश करतील म्हणून मालकानें आपल्या मुलीला राखणीस बसवून तो घरीं जेवायाला गेला होता. त्याची मुलगी भर ज्वानींत आली असून ती अविवाहित होती. क्षत्रियांच्या स्त्रिया घोड्यावर बसणें, बाण मारणें, इत्यादिकांत प्रवीण असतात. त्यांतून गरीब तर विशेषेंकरून त्याचा अभ्यास करतात. ती मुलगी वसुमती हिचा बाप प्रतापसिंग फार गरीब असून तो शेती करीत असे. त्याला चार मुलगे व ही मुलगी वसुमती अशीं पांच अपत्यें होतीं. वसुमती तीर मारण्याच्या कामांत व गोफणीनें दगड मारण्याच्या कामांत हुषार असून तिचा बांधा बराच मजबूत व कांहींसा राठ होता. असो.

चंडबाहु त्या डुकराच्या मागें भरधांव घोडा सोडून मोठ्या आवेशानें आला तो प्रतापसेनाच्या शेतांत शिरला. तेव्हां शेताची राखण करीत माळ्यावर बसलेल्या वसुमतीनें त्याला—पुढें येऊं नको, म्हणून मोठ्या जोरानें हाक मारून सांगितलें. घोड्याच्या टापांनीं पिकाचा नाश होईल, म्हणून तिनें त्याला अटकाव केला. चंडबाहूनें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. ही पोरगी आपलें काय करणार? म्हणून बेपरवाईनें तो तसाच पुढें येऊं लागला. आपण आपल्या शेतांत नको येऊं म्हणून सांगितलें तरी न ऐकतां बेपरवाईनें शेताचा नाश करीत आहे, ही गोष्ट त्या शूर क्षत्रियाच्या मुलीला अगदीं सहन झाली नाहीं. तिच्या हातांत गोफण होती, ती गरगर फिरवून तिनें एक धोंडा असा जोरानें

मारला, कीं तो चंडबाहूच्या घोड्याच्या डोळ्याजवळ मर्म-स्थानीं लागून तो तत्काल मूर्छित होऊन खालीं पडला. आधींच दूरवर दौडत आल्यामुळें घोडा श्रमला होता. त्यांतून वर्मस्थानीं दगड लागतांच तत्काल त्याचा प्राण गेला.

घोडा खालीं पडला त्याबरोबर चंडबाहूही खालीं आला. तरी त्यांतले त्यांत सांवरून तो पटकन् उडी टाकून जमिनीवर उभा राहिला. घोडा तर मेलाच, पण तसेंच पुढें जाऊन आपली शिकार साधावी असा त्याचा इरादा होता म्हणून तो पुढें गेला. त्याणें हुसकून लावलेला डुकर तेथें जवळच लपून बसला होता. तो त्या शूर क्षत्रियकन्येनें पाहिला. चंडबाहूला त्या मुलीचें तें कृत्य सहन झालें नाहीं. तरी—आधीं शिकार साधून मग ह्या मुलीचा समाचार घ्यावा, असा विचार करून तो त्या डुकराजवळ जाऊन त्याला बाण मारणार इतक्यांत—वसुमतीनें लागोपाट एकावर एक असे दोन बाण जोरानें सोडून त्या डुकराला जागच्याजागीं चीत केलें. आपण बाण सोडण्यापूर्वीच त्या मुलीनें बाण सोडले व डुकराला मारलें, हें चंडबाहूच्या लक्ष्यांत आलें. भर दोनप्रहरची वेळ असल्यामुळें त्याची दृष्टि आपल्या शिकारीवर एकसारखी ठरत नव्हती यामुळें माळ्यावरून वसूमतीनें डुकरावर बाण मारले ते त्याच्या नजरेस पडले नाहींत.

चंडबाहू—डुकर श्रमून जमिनींत तोंड घुसवून बसला आहे, असें समजून त्याणें त्याच्यावर बाण मारला; व लगेच आपली तरवार उपसून त्याचें शीर कापण्याकरितां धांवला. इतक्यांत वसुमतीही माळ्यावरून खालीं उतरून डुकराकडे धांवली आणि तरवार मारायला तयार झालेल्या

चंडबाहूचा हात धरून हंसत हंसत म्हणाली, ' अहो, तुम्ही कोण आहां ? तुम्ही क्षत्रिय असाल असें वाटत नाहीं. खरा जातीचा क्षत्रिय दुसऱ्यानें मारलेल्या जनावराबरावर शस्त्राचा प्रहार कधींही करणार नाहीं. हा डुकर आधींच मेलेला असून त्यावर तुम्ही बाण मारला, आणि आतां तरवारीनें त्याचें डोकें तोडायला तयार झालां, हें कोण षंढपणाचें कृत्य !

चंडबाहूला तिनें आपला घोडा मारला याचा आधीं राग आलाच होता. त्यांतून एकाएकीं पुढें येऊन तरवार धरते आणि आपला उपहास करून—मारलेल्या जनावराला मारतां काय ? म्हणून विचारिते, याचा त्याला फारच राग आला. तो तिचा धिक्कार करून डुकरावर तरवार मारण्याला पुढें सरसावला, तेव्हां वसुमतीनें त्याची तरवार जोरानें हिसकून घेतली. चंडबाहू हा वेळपर्यंत एक प्रकारच्या वेडेपणाच्या धुंदींतच होता. पण तरवार हिसकून घेऊन—हां, खबरदार डुकराला हात लावाल तर, असें तिनें सांगितलें तेव्हां तो अंमळ ठिकाणावर आला. वसुमती तरवार कांखेला मारून त्या डुकराला आपल्या खोपटाकडे ओढून नेऊं लागली. तेव्हां चंडबाहूचा आणि तिचा पुनः वाद जुंपला. चंडबाहूनें—ही शिकार आपली आहे व ती माझी मला दे, म्हणून तक्रार लावली. तेव्हां वसुमती रागानें म्हणाली, 'भल्या गोष्टीनें येथून चालता हो. माझ्या शेतांत राहशील, किंवा भांडशील तर दुसराच कांहीं तरी परिणाम होईल ! '

चंडबाहूला तिनें दर्डावून सांगितलें तरी तो ऐकेना आणि शिकार आपली म्हणून भांडूं लागला. डुकराच्या अंगावर

तिनि बाण लागले होते व त्यांवर दोघांच्या निशाण्या होत्या. तेव्हां वसुमतीचे दोन बाण व चंडबाहूचा एक बाण याविषयीं कांहीं वाद नव्हता. पण आपला बाण आधीं लागला व त्यानेंच हा डुकर मेला म्हणून चंड-बाहू भांडत होता. पण वसुमतीचे बाण वर्मस्थानीं लागले होते; यामुळें तिच्याच बाणांनीं डुकराचा प्राण गेला, व रक्ताचे ओघळ थिजले होते, त्यावरून वसुमतीचेच बाण आधीं लागले असें चंडबाहूला कबूल करावें लागलें, आणि दोघांचा तंटाही मिटला!

वस्तुतः आतां भांडण्याचें कांहीं कारण नव्हतें, पण चंडबाहूला तिच्याविषयीं अभिलाप उत्पन्न झाला होता. ती शेतकऱ्याची मुलगी होती, तरी रूपानें साधारणतः बरीच होती. चंडबाहू तिच्या शौर्याला पाहून अतिशय मोहित झाला होता. तो तिच्यापेक्षां विशेष संपन्न असून इतर गुणांनींही योग्य होता. अशी शूर मुलगी आपली स्त्री व्हावी, हें त्याच्या मनांत आलें. पण त्याच्या अंगीं विशेष शौर्य असल्याचें दिसलें नाहीं, म्हणून वसुमतीला तो मुळींच आवडला नाहीं. ती उपवर होती व चंडबाहू तिला मान्य होण्यासारखें कांहीं शौर्य दाखविता, तर कदा-चित् तिचें मन त्याच्यावर गेलें असतें. पण त्याच्या हातून तसें कांहीं न झाल्यामुळें तो तिच्या अनादराला पात्र झाला.

मनुष्य कामी झाला म्हणजे तो विवेकशक्तीला अगदीं फांटा देतो. चंडबाहू हा क्षत्रिय होता व साधारणतः क्षत्रि-यांच्या मुलींची आवड कोणत्या प्रकारची असते, हें त्याला

माहीत नव्हतें असेंही म्हणतां येत नाहीं. विशेषेंकरून शूर पुरुषाला चाहणाऱ्या क्षत्रियकन्येला संतोष वाटण्यासारखें आपल्या हातून कांहीं घडलें नाहीं, व त्यांतूनही वसुमती स्वतः शूर व साहसी असून तिनें आपल्या शौर्यानें आपणाला लाज वाटण्यासारखें कृत्य करून दाखविलें, या गोष्टीचा चंडबाहूनें विचार केला असता तर—वसुमती आपली बायको व्हावी, हा विचार त्यानें मुळींच मनांत आणला नसता! निदान उघड दाखविला तरी नसता. पण कामानें वेडा झालेला चंडबाहु तिच्या पाठीस लागला, आणि ही शिकार आपल्या हद्दींतली आहे, तेव्हां तिच्यावर माझा हक्क आहे, म्हणून उगीच तक्रार करूं लागला.

चंडबाहूच्या म्हणण्यांत कांहीं जीव नव्हता. कारण, शिकारीचा नियम असा आहे कीं, ती ज्याच्या हद्दींत सांपडेल, त्याचीच समजली जाते. मूळचें हें जनावर अमक्याच्या हद्दींतलें आहे, असें ठरविण्याला कांहीं विशेष साधन नसल्यामुळें—ज्या ठिकाणीं तें मिळेल तेंच त्याचें ठिकाण, असें समजावें लागतें, हें चंडबाहूला माहीत नव्हतें असें नाहीं, तथापि त्याचा हेतु निराळाच होता. कांहीं तरी कुरापत काढून—तूं आपली बायको हो, असें त्याच्या मनांत सांगावयाचें होतें! व म्हणूनच तो तक्रार करीत होता. त्यानें बराच वेळ जिकीर करून शेवटीं तिचीं आर्जवें करण्यास सुरवात केली, पण ती त्याला अनुकूल झाली नाहीं. फार वेळ विनवण्या करून करून दमला तरी—कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून—कामाच्या बहरांत—हिचें शौर्य किती आहे, व आपलें हिच्यापुढें चालेल

किंवा नाहीं, याचा कांहींच विचार न करितां--तो तिच्यावर बलात्कार करण्यास प्रवृत्त झाला.

वसुमती चंडबाहूपेक्षां शूर व बलाढ्य होती, हें तेथें निराळें सांगावयास नको. कारण, तिच्या पूर्वीच्या पराक्रमावरून तें अगदीं उघडच होत आहे. चंडबाहु बलात्कार करूं लागला, तेव्हां तेथल्या तेथें त्याला चीत करणें हें तिला फारसें अशक्य नव्हतें. पण तो हावेळपर्यंत तिचीं पुष्कळ आर्जवें करित होता, त्यावरून जरी ती त्याला वरायाला तयार झाली नव्हती, तरी तिला त्याची दया आली होती, यामुळें त्याच्याच तरवारीनें त्याचें डोकें उडविणें हें क्रूर काम करण्यास ती तयार झाली नाहीं. चंडबाहु आपल्यावर जबरी करतो असें पाहून—बाबा धांव, अशी बापाच्या नांवानें आरोळी मारून ती त्याच्या हातूंन सुटून जाण्याचा प्रयत्न करूं लागली.

वसुमतीचा बाप प्रतापसेन व त्याचे मुलगे घराकडे गेल्याला बराच वेळ झाला होता. ते जेवणखाण आटपून परत शेताकडे येण्यास निघाले असून अगदीं जवळ पोहोंचले होते. वसुमतीची आरोळी त्यांच्या कानीं गेली, व त्यांणीं तेथूनच--भिऊं नको, हे आलों पहा --असा जबाब दिला. तो ऐकून वसुमती चंडबाहूला म्हणाली, 'मेल्या ह्राडा, अजून तरी एकीकडे हो, आणि पळून जा. नाहींतर फुकट प्राणाला मुकशील.' हें तिचें सांगणें कामानें वेडावलेल्या चंडबाहूच्या कानांत मुळींच शिरलें नाहीं. त्याचा अविचार चाललाच होता, इतक्यांत प्रतापसेन व त्याचे मुलगे तेथें धांवत आले.

शूर क्षत्रियच ते! आपल्या बहिणीवर--तिच्या इच्छे-

विरुद्ध—हा दांडगा जुलूम करीत आहे, असें पाहून प्रतापसेनाचे चौघेही मुलगे एकदम चंडबाहूच्या अंगावर तुटून पडले. त्यांणीं लाथांबुक्क्यांनीं त्याचा चांगला समाचार घेतला, आणि त्याच्याच कमरेचा काच्या सोडून त्याच्या मुसक्या बांधून त्याला गांवांत घेऊन गेले. प्रथम त्यांणीं त्याला आपल्याच घरीं नेऊन ठेवलें, व नंतर ते त्यास आपल्या सरकारांत पाठविणार होते. तरी तेथें कांहीं सवड साधून तो मोकळा झाला. आणि त्याच्या देखरेखीवर असलेल्या —प्रतापसेनाच्या धाकट्या मुलाला जखम करून तो पळून जाण्याच्या विचारांत होता. तो चांगल्या गुणांनीं राहता तर प्रतापसेनानें त्याला शरणागत समजून कदाचित् सोडूनही दिलें असतें; पण त्याणें आपल्या मुलाच्या अंगावर वार केला ही गोष्ट प्रतापसेनाला सहन झाली नाहीं. त्याणें त्याची अतिशय निर्भर्त्सना करून त्याला मोकळें सोडलें, आणि—खरा क्षत्रियाच्या पोटचा असशील तर ये, म्हणून बोलावून द्वंद्वयुद्धांत त्याचा शिरच्छेद केला.

वर सांगितल्याप्रमाणें चंडबाहु आपल्या पाजीपणानेंच मेला; पण त्याचें मरण हें मोठ्या अनर्थाला कारण झालें. चंडबाहूला आनंदवर्धनाच्या हद्दींतील शेतकऱ्यानें मारलें, ही बातमी सिंहवर्म्याच्या कानांवर गेली. वस्तुतः त्या चंडबाहूनें जो अन्याय केला, त्याला ती शिक्षा योग्यच होती. पण चंडबाहूचें वाईट वर्तन जेमस न धरतां—आनंदवर्धनाच्या हद्दींतल्या शेतकऱ्यानें विनाकारण आमच्या सरदाराचा खून केला, असें मानून सिंहवर्मा आनंदवर्धनाशीं कलह उपस्थित करण्याला तयार झाला.

त्याला कांहीं तरी निमित्त पाहिजेच होतें, तें हें आयतेंच मिळालें, तें त्याणें फुकट जाऊं दिलें नाहीं ! हा कलह विशेष पेटवून आनंदवर्धनाचा सूड घ्यावा, असा त्याणें निश्चय ठरविला. आणि एका चतुर वकिलाच्या हातीं आनंदवर्धनाला खलिता देऊन पाठविला. 'प्रतापसेन याचे चारी मुलगे व मुलगी वसुमती यांसह त्याला आपल्या ताब्यांत द्यावें; नाहींपेक्षां आपण स्वारी करून त्याला बलात्कारानें ताब्यांत घेऊं.' अशा अर्थाचा मजकूर त्यांत होता.

सिंहवर्म्याची आज्ञा घेऊन हुकूमाप्रमाणें वकील आनंदवर्धनाकडे गेला. आणि त्याणें आपल्या धन्याचें काय म्हणणें आहे तें कळवून त्याला तो खलिता दिला. आनंदवर्धनाच्या अंगी असावें तितकें विशेष शौर्य नव्हतें, तरी तो एरवीं बुद्धिमान् असल्यामुळें कामाकाजाची व्यवस्था चांगल्या रीतीनें चालवीत होता. प्रतापसेनानें जी गोष्ट केली, ती त्याला कळली होती. तथापि त्यांत त्याचा कांहीं अपराध होता असें न दिसून आल्यावरून त्याणें त्याबद्दल प्रतापसेनाला कांहीं शिक्षा वगैरे दिली नव्हती. सिंहवर्मा मोठा अभिमानी असून स्वभावानें उद्दाम आहे, हें त्याला ऐकून ठाऊक होतें. तथापि तो स्वतः—शांत व न्याय अन्यायाचा विचार करून—झालया गोष्टीबद्दल विशेष चर्चा करील, असें त्याला वाटलें नव्हतें. सिंहवर्म्याच्या मनांत कोणत्या गोष्टीचा दंश आहे, व त्याणें या प्रकरणाला इतका जोर कां दिला, हेंही त्याला माहीत नव्हतें. वकिलानें दिलेला

खलिता घेऊन आनंदवर्धनानें, विचार करून याचें काय तें लवकरच उत्तर मिळेल, असें सांगून सत्कारपूर्वक त्याला ठेवून घेतलें.

सिंहवर्म्यानें खलिता पाठविला त्यांतील मजकूर बराच उद्दामपणाचा होता, व त्याची मागणी अपमानकारक होती. तथापि आनंदवर्धनानें तें प्रकरण निकरावर येऊं नये म्हणून प्रधानमंडळीसह त्याच्या खलित्याचा नीट विचार केला. प्रतापसेनाचें कुटुंब आपल्या ताब्यांत द्यावें, नाहींपेक्षा लढाईला तयार व्हावें असाच त्याच्या लेखाचा मतलब होता. त्याणें प्रत्यक्ष तुमच्याशीं आपण लढाईला तयार आहों, किंवा तुम्ही तयार व्हा, असें लिहिलें नाहीं. तरी प्रतापसेनावर अर्थात् आपल्या रयतेवर परकीय राजा सिंहवर्मा याणें हल्ला केला, व त्याचें कुटुंब धरून नेलें किंवा त्याचा नाश केला, तर त्या संबंधानें आनंदवर्धनाला उदास राहतां येत नव्हतें. परकीय लोकांनीं हल्ला करून रयतेला उपद्रव दिला, आणि आनंदवर्धनानें तिकडे दुर्लक्ष्य केलें, तर ती गोष्ट त्याच्या राज्यसत्तेला अपायकारक होणार ! स्वतः राजानें आपल्या प्रजेवर जुलूम करणें—हें देखील चांगलें नव्हेच पण एखादवेळ तसें झालें तरी चालेल, परंतु शत्रूनें रयतेला उपद्रव दिला आणि राजानें तो सहन केला, तर ही गोष्ट कधींही सहन होत नाहीं. त्यामुळें राजाचें वजन समजतें व आपल्या राजाच्या अंगीं तितकें सामर्थ्य नाहीं, असें समजून रयत बेदील होते. उलाढाली-लोकांना खटपटी करण्यास संधि मिळते. असे अनेक

अनर्थ होतात; म्हणून रयतेचें परशत्रूपासून रक्षण करणें हें राजाचें प्रथम कर्तव्य आहे.

एका कुटुंबाकरितां आपल्या राज्यावर अनर्थ ओढून घ्यावा, त्या भानगडींत पडण्यापेक्षां प्रतापसेनाचें कुटुंब सिंहवर्म्याच्या हातीं देऊन हें प्रकरण मिटवावें, असें आनंदवर्धनाच्या मनांत होतें पण त्याचे प्रधान, सेनापति यांला ती गोष्ट मान्य झाली नाहीं. ते म्हणाले, 'आंज आम्हीं प्रतापसेनाचें कुटुंब देऊन तंटा मिटविण्याचा प्रयत्न करूं, पण त्यामुळें तो आमचें वजन ओळखील, व यापेक्षांही भारी असून अपमानकारक अशी दुसरी मागणी करण्याला मागें पुढें पाहणार नाहीं. या कामांत त्याचा सरदार चंडबाहु हाच अपराधी होता व म्हणूनच त्याला ही शिक्षा मिळाली ती योग्यच आहे. असें असून तो मुद्दाम हा तंटा उपस्थित करतो व आपल्याला धमकावतो, तेव्हां आपण ही त्याची मागणी कबूल केली, तर पुढें आणखीं काय करील, कोणास ठाऊक. व कांहीं अन्याय नसतां प्रतापसेनाचें कुटुंब आपण त्याच्या हवालीं केलें तर लोक आपल्याला भ्याले असें समजतील, तेव्हां तसें करणें मुळींच योग्य नाहीं!

याप्रमाणें पुष्कळ भवति न भवति होऊन शेवटीं सिंहवर्म्याची मागणी कबूल करूं नये, असा विचार ठरला, व त्या अर्थाचें त्याला उत्तर पाठवावें, असा निश्चय झाला. आनंदवर्धनानें सिंहवर्म्याला त्याच्या खलित्याचें उत्तर पाठविलें, त्यांत असें होतें कीं, 'आपण केलेली मागणी न्यायाला अनुसरून नाहीं. क्षत्रियांच्या धर्माप्रमाणें आपला सरदार चंडबाहु हा वागला नाहीं. प्रतापसेनानें त्याचा वध केला तो क्षत्रियाच्या रीतीला अनुसरूनच केला. तथापि

आपल्या एका मोठ्या सरदाराचा अशा रीतीनें शेवट झाला, याबद्दल आम्हीं फारच दुःखी आहों.'

झालेल्या गोष्टींत प्रतापसेनाकडे कांहीं अपराध लागू होत नसल्यामुळें आमच्यानें त्याचें कुटुंब आपल्या ताब्यांत देववत नाहीं. आपण न्याय अन्याय याचा नीट विचार करून, निरपराधी प्रतापसेनाच्या कुटुंबावर हल्ला करणें अयोग्य आहे, व तसें झालें तर रयतेच्या नात्यानें आम्हांस त्याचा बचाव करणें भाग पडेल. अल्पकारणाकरितां उभयतांच्या मित्रत्वांत व्यत्यय आणावा, ही गोष्ट आम्हांस बिलकूल पसंत नाहीं. यावर आपली मर्जी!'

आनंदवर्धनानें रीतीप्रमाणें वकिलाचा सन्मान करून हा खलिता त्याच्याजवळ दिला. एकंदरींत आपला हेतु काय हें त्याला कळविलें. वकिलानें खलिता सिंहवर्म्याला नेऊन दिला, आणि आनंदवर्धनाचें म्हणणें काय आहे, तें कळविलें. खलित्यांतील मजकुरावरून प्रतापसेनावर आपण हल्ला केला, तर आनंदवर्धन त्याचा बचाव करण्यास—अर्थात् त्याच्याबद्दल लढण्यास तयार होणार असें होतें, त्याचा त्याला फार राग आला. चंद्रगुप्त व त्याचे बाळमित्र पुष्पसेन आणि वीरमित्र हे लढायाला तयार असून वरचेवर त्यांना स्फुरण येतच होतें. त्यांतून आनंदवर्धनानें पर्यायमात्रानें आपण लढाईस तयार आहों, असें सुचविलें, तेव्हां सिंहवर्म्यानें आपल्या सेनापतीला एकदम लढाईची तयारी करण्याचा हुकूम दिला.

आनंदवर्धन व त्याचे प्रधान यांलाही, सिंहवर्मा अशा रीतीनें शांत होणार नाहीं व तो लढाईस उभा राहील, असें वाटलें होतें. तथापि आपण पाठविलेल्या उत्तरावर

त्याचें कांहीं तरी प्रतिउत्तर येईल, व त्यांत तो लढाईला तयार झाल्याचें कळवील असें वाटलें; म्हणून त्यांणीं विशेष कडेकोट तयारी केली नव्हती. कदाचित् त्याचे लोक प्रतापसेनावर हल्ला करतील म्हणून त्याच्या रक्षणाकरितां—तो ज्या खेड्यांत राहत होता, तेथें—कांहीं फौज पांठाविली होती, व हळू हळू तो जमवाजमव करण्याच्या विचारांत होता.

इकडे सिंहवर्म्यानें आपल्या फौजेची कडेकोट तयारी करून राजधानीपासून सरहद्दीकडे कूच् केला, व आनंदवर्धनाच्या सीमच्या जवळ जवळ आपली फौज पोहोंचली असें पाहून—आपण प्रतापसेनावर हल्ला करायाला आलों आहों, अशा अर्थाचा खलिता आनंदवर्धनाकडे पाठविला. तो खलिता आनंदवर्धनाच्या हातीं येऊन फौजेची तयारी करून सिंहवर्म्याला अटकाव करण्याला तो येऊन पोहोंचेपर्यंत बराच अवकाश लागला. तोंपर्यंत सिंहवर्मा आपली हद्द ओलांडून आनंदवर्धनाच्या हद्दींत शिरला व त्याणें जिकडे तिकडे दाणादाण करण्याची सुरवात केली. प्रतापसेनाचें रक्षण करण्याकरितां पाठविलेल्या फौजेवरच्या अधिकाऱ्यानें—शत्रू कडेकोट तयारीनें आला आहे, तेव्हां आपल्याच्यानें थोड्याश्या फौजेच्या बळावर त्याच्यापुढें टिकाव धरवणार नाहीं, व आपल्याला लौकर मदतही पोहोंचण्याचा संभव नाहीं; म्हणून त्याणें तें खेडें सोडून जवळच एक मजबूत पाहडी किल्ला होता, तेथें प्रतापसेन व त्याचें कुटुंब यांला नेऊन ठेविलें, आणि फौजे सहवर्तमान त्या किल्ल्याचा आश्रय करून राहिला.

सिंहवर्म्यानें आपल्या फौजेच्या दोन टोळ्या केल्या

होत्या; एका टोळीवर चंद्रगुप्त व आपले दोघेही पुत्र यांला नेमलें असून ही टोळी अघाडीला पाठविली होती, व दुसऱ्या टोळींत स्वतः आपण होता. रागरंग पाहून पुढें चाल करायची असा विचार करून तो आपल्या सरहद्दीवरच तळ देऊन बसला होता. अघाडीला गेलेल्या टोळीचे अधिपति अर्थात् दोघे राजपुत्र व चंद्रगुप्त हे मोठे शूर असून आनंदवर्धनाचा सूड घेण्याच्या कामांत त्यांना विशेष आवेश होता. तेव्हां अर्थात् त्यांणीं आनंदवर्धनाच्या राज्यांत मोठा अनर्थ उडवून दिला. प्रतापसेन ज्या खेड्यांत राहत होता, तेथें त्यांणीं प्रथम तळ दिला; पण तो तेथें नसून जवळच्या किल्लचावर आहे, असें समजल्यावरून त्यांनीं किल्लचाला वेढा दिला, व जिकडे तिकडे मोरचे बांधून किल्लचावर मारा सुरू केला. प्रतापसेनाच्या बचावाकरितां असलेली फौज विशेष नव्हती, तरी त्याच्या वरचा अधिकारी हुपार असून त्यांना मजबूत आश्रय मिळाल्यावरून त्यांणीं बरेच दिवस शत्रूला दाद दिली नाहीं.

इकडे आनंदवर्धनाला सिंहवर्म्याचा खलिता पोहोंचतांच त्याचें धाबें दणाणलें. तो वयानें अल्प असून अनुभव नसल्यामुळें घाबरला होता, तथापि सेनापति व मुख्य प्रधान यांणीं लवकर फौजेची तयारी करून--त्या सात्विक राजा आनंदवर्धनाला सिंहवर्म्यांशीं सामना करण्याला बाहेर काढलें ! ज्या दिवशीं आनंदवर्धन शहराच्या बाहेर प्रस्थान ठेवणार त्यादिवशीं राजवाड्यांत जिकडे तिकडे रडारड सुरू झाली. आनंदवर्धनाची आई चंद्रानना व शशिप्रभेची

आई सानुमती ह्या दोघी ह्या अनाथांला प्रवर्तक झाल्या होत्या. जटाबिटा तोडून घेऊन व जीव देण्याचें भय घालून आपआपल्या नवऱ्यांकडून त्यांणीं शशिप्रभा व आनंदवर्धन यांचें लग्न लाविलें! व आपण दोघीं परस्परांच्या विहीणी बनल्या. पण त्याचा परिणाम काय होणार हें त्या बायकामनुष्यांच्या लक्षांत कोठून येणार? व अद्यापि तरी आनंदवर्धनावर हें संकट येण्याला कारण आपलीच कृति हें त्यांच्या लक्षांत देखील नव्हतें! तो अल्पवयस्क असून प्रकृतीनें फार नाजूक आहे, तेव्हां लढाईसारख्या कठीण प्रसंगांत त्याचे फार हाल होतील, एवढ्याच करितां त्या दुःख करित होत्या.

शशिप्रभेला आनंदवर्धनाचा क्षणभरदेखील वियोग सहन होत नव्हता. लढाईसारख्या धोक्याच्या प्रसंगांत त्याचें काय होईल कोणास ठाऊक. या भीतीनें तिणें त्याच्याबरोबर जाण्याचा निश्चय केला, व आनंदवर्धनालाही तिच्यावांचून चैन पडत नव्हतें, म्हणून प्रधानाच्या अनुमतानें त्यानें शशिप्रभेलाही बरोबर घेतलें. आनंदवर्धन फौजेसहवर्तमान कूच दरकूच करित शत्रु ज्या भागांत धांदल करित होते, तिकडे निघाला.

सिंहवर्मा आपल्या सरहद्दीवर तळ देऊन बसला होता, हें वर सांगितलेंच आहे. आनंदवर्धनाच्या हालचालीवर त्याणें सारखी नजर ठेविली होती. त्याचे गुप्त हेर तिकडे काय काय चाललें आहे, त्याची त्याला वरचेवर बातमी देत होते. प्रतापसेनाला ज्या किल्लयावर ठेविलें होतें, तिकडे आनंदवर्धन फौज घेऊन चालला आहे. हें ऐकून तो त्याच्या पाळतीवर होता. तो जवळ जवळ आला असें

ऐकून सिंहवर्म्यानें पुढें कूच करून आनंदवर्धनाला मधल्या मधेंच अडथळा केला. किल्लचावरच्या फौजेची आणि त्याची भेटच होऊं दिली नाहीं. कारण, आनंदवर्धनाची फौज किल्लचाजवळ पोहोंचली असती, तर आपल्या अघाडीला गेलेल्या टोळीला अपाय झाला असता, म्हणून त्यानें मध्येंच त्याला अटकाव केला.

स्वतः आनंदवर्धन भित्रा होता; पण त्याचे सेनापति व सरदार मोठे शूर होते. सिंहवर्मा आडवा आला हें पाहून त्यांणीं तेथेंच तळ दिला व दोघांची लढाई सुरू झाली. सिंहवर्मा आपली सरहद्द सोडून आनंदवर्धनाच्या राज्यांत लढत असल्यामुळें या लढाईपासून आनंदवर्धनाचें अतोनात नुकसान होत होतें. आनंदवर्धनाचे सरदार मोठ्या शौर्यानें लढत होते, तरी शत्रूशीं लढाई करणें व आपल्या रयतेला त्याच्यापासून उपद्रव न होऊं देणें ह्या दोन गोष्टींकडे त्याला ध्यान ठेवावें लागत होतें. सिंहवर्म्याची फौज अधिक असून त्याची तयारी चांगली होती. यामुळें दिवसेंदिवस त्याची सरशी होत चालली.

सरदार, शिपाई, वगैरे लोक कितीही शूर असले, व ते निकरानें लढत असले तरी मुख्य धनी शूर असल्यावांचून त्यांच्या शौर्याचा विशेष उपयोग होत नाहीं. माहाभारतांतल्या उत्तरासारखा भित्रा धनी असल्यावर बिचाऱ्या सरदारांनीं काय करावयाचें आहे? आनंदवर्धनाचा सेनापति प्रतिदिवशीं त्याला लढाईंत आपल्या बरोबर घेत होता. आनंदवर्धन मनापासून नाहीं तरी सरदारांच्या आग्रहास्तव कां होईना--पण आपल्या धनुर्विद्येचा प्रभाव दाखविण्याचा प्रयत्न करित होता. तथापि

एकंदरींत त्याला आवेश व धैर्य नसल्यामुळें त्याचें कांहीं तेज पडत नव्हतें!

आनंदवर्धनाच्या राज्यांत, स्वतः आनंदवर्धनाची आणि सिंहवर्म्याची, तसेंच त्याच्या सरदारांची आणि चंद्रगुप्तादि तिघांची अशा निरनिराळ्या दोन ठिकाणीं लढाया चालल्या होत्या. यामुळें राज्यांत जिकडे तिकडे हाहाकार झाला. शत्रूच्या फौजेला व स्वतः आनंदवर्धनाच्या फौजेला सर्व प्रकारचा पुरवठा करतां करतां रयत अगदीं त्रासून गेली. ज्या ठिकाणीं लढाया चालल्या होत्या त्याच्या आसपासचे गांवचे गांव अगदीं उजाड पडून फौजेच्या त्रासामुळें रयत जीव घेऊन वाट फुटेल तिकडे पळत जात होती!

याप्रमाणें देश उजाड होत असून लढाईचा शेवट होण्याचा रंग दिसेना, तेव्हां आनंदवर्धनाच्या मुत्सद्दी लोकांना मोठें संकट पडलें. दोघे राजपुत्र आणि चंद्रगुप्त प्रतापसेनाला आपल्या ताब्यांत घेण्याकरितां किल्लुचाला वेढा देऊन लढत होते. किल्लुचावरच्या लोकांना आश्रय मजबूत मिळाल्यामुळें ते आपल्याला दाद देत नाहींत, असें पाहून ह्या तिघांला कंटाळा आला, व एकप्रकारें लाजही वाटली. तेव्हां त्यांनीं मसलत करून किल्लुचावर चोरवाटेनें आपले कांहीं लोक पाठविण्याची तयारी केली, आणि त्या तिघांनीं भेद करून किल्ला सर करण्याची योजना केली व ती त्यांची सफलही झाली. त्यांला किल्लुचाचे माहितगार असे कांहीं लोक मिळाले होते. त्यांच्या सल्लचानें स्वतः वीरमित्रानें चोरवाटेनें कांहीं निवडक मंडळीसह किल्लुचांत प्रवेश केला; आणि एकदम आंत जाऊन एक

दरवाजा खुला केला. पुष्पसेन व चंद्रगुप्त हे पूर्वसंकेता-प्रमाणें त्या दरवाज्याच्या तोंडाशीं आपली फौज घेऊन तयारच होते. दरवाजा उघडा होतांच ते एकदम किल्ल्यांत घुसले!

किल्ल्यावर म्हणण्यासारखी विशेष तयारी नव्हती व लोकही थोडे होते. शत्रूची एकदम पुष्कळ फौज आंत येतांच त्यांची धांदल उडाली. त्यांना किल्ल्याचा मजबूत आश्रय असून शत्रू उघड्यावर होते, म्हणूनच त्यांचा हावेळपर्यंत निभाव लागला होता. पण शत्रू किल्ल्यांत घुसले तेव्हां त्यांच्यावर मोठा आणीबाणीचा प्रसंग आला. आतां दुसरा कांहीं उपाय नाहीं, असें पाहून सर्वांनीं आपल्या जिवावर उदार होऊन लढण्याचा विचार केला, आणि एकदम त्यांच्या अंगावर तुटून पडले. पण थोड्याशा लोकांचा एवढ्या मोठ्या फौजेबरोबर कसा टिकाव लागणार? पुष्पसेन व त्याच्या बरोबरचे इतर लोक यांणीं शत्रूच्या लोकांची एकसारखी कत्तल उडविली, आणि हां हां म्हणतां शेंकडों लोक कापून काढले. त्यांना मुख्यत्वें प्रताप-सेन व त्याचें कुटुंब यांना धरावयाचें होतें, म्हणून ते फौजेचा विशेष नाश करीत नव्हते.

त्या गर्दींत प्रतापसेनाचे मुलगे कोठच्या कोठें मरून पडले याचा कांहीं पत्ताच लागला नाहीं. प्रतापसेन—आपली मुलगी वसुमति हिला पळवून नेऊन सुरक्षित ठिकाणीं ठेवावी, म्हणून तिला घेऊन धांवत होता इतक्यांत चंडबाहूबरोबर शिकारीस गेलेला त्याचा मोतद्दार त्या लढाईंत होता. त्याच्या दृष्टीस पडतांच त्यानें प्रतापसे-नाला ओळखलें. आणि—आपल्या धन्याला मारणारा तो

म्हणून मोठ्यानें ओरडून तो त्याच्या अंगावर धांवला. त्याबरोबर चंद्रगुप्त जवळच होता, त्यानें धांवत जाऊन प्रतापसेनाचें डोकें उडविलें; व त्याची मुलगी वसुमति हिला कैद करून आपल्या सरदाराच्या हवालीं केलें! सारांश, थोडक्या अवकाशांत किल्ल्यावरच्या सर्व लोकांचा पराभव करून त्यांणीं तो सर केला.

याप्रमाणें इकडे त्यांना जें काम करावयाचें होतें तें झालें. प्रतापसेनाचें शीर व त्याची मुलगी वसुमती हिला जिवंत धरून, आणि आपल्याकडील जे लोक मेले त्यांची पुढची व्यवस्था लावून मंडळी किल्ल्यावरून खालीं उतरली. त्यांना मुख्यत्वें प्रतापसेनाला शिक्षा करावयाची होती ती झाली तेव्हां अर्थात् त्यांचें कार्य झालें. आतां रयतेला उपद्रव देणें योग्य नाहीं असा विचार करून ते सिंहवर्म्याला येऊन मिळाले. दोघे राजपुत्र व चंद्रगुप्त यांणीं प्रतापसेनाचें शीर सिंहवर्म्याच्या पायांवर ठेवून व त्याची मुलगी वसुमति हिला पुढें उभी करून ते तिघेही त्याच्यापुढें हात जोडून उभे राहिले. आपल्या इच्छेप्रमाणें मुलगे विजयी होऊन आले, हें पाहून सिंहवर्म्याला मोठा आनंद झाला. त्यानें त्या तिघां जयशालींना शाबासकी देऊन त्यांचें मोठें गौरव केलें.

सिंहवर्म्याची आनंदवर्धनाशीं बरेच दिवस लढाई चालली होती. पण म्हणण्यासारखा हावेळपर्यंत कोणत्याही पक्षाला जय न आल्यामुळें, त्याला त्या लढाईचा एकप्रकारें कंटाळा आला होता. त्यांचा मुख्यत्वें आनंदवर्धनावर राग होता. रयतेवर राग असण्याचें मुळींच कांहीं करण नव्हतें. लढाई फार दिवस चालल्यामुळें

रयतेला अतिशय उपद्रव झाला, ही गोष्ट सिंहवर्म्याला ही अयोग्य वाटत होती. आपले मुलगे विजयी होऊन आपणास येऊन मिळाले, यामुळें आपल्या पक्षाला विशेष जोर आला; व ह्या विजयानें आनंदवर्धनाच्या पक्षाची तितकीच नाउमेद झाली. तेव्हां ह्याच संधीला काय तो या युद्धाचा शेवट करावा, असें सिंहवर्म्याच्या मनांत आलें.

त्याणें आपल्या छावणींत एक दरबार भरविला. आणि त्यांत सर्व योध्यांना मोठा आवेश येईल, याप्रकारचें भाषण करून—तीन दिवसांच्या आंत आनंदवर्धनाला कोण जिंकावयाला तयार असेल त्याणें प्रतिज्ञा करून विडा उचलावा. त्याणें आनंदवर्धनाला जिवंत धरून आणलें, तर मी, आनंदवर्धन व त्याची स्त्री शशिप्रभा या दोघांला त्याला बक्षीस देईन! त्याचे प्राण ठेवणें अथवा त्यांची पाहिजे ती व्यवस्था करणें याचा सर्व अधिकार त्या जिंकणाराला माझ्याकडून बक्षीस करण्यांत येईल! व आनंदवर्धनाच्या राज्याचा निम्मे भाग त्याला देईन. उगीच मनुष्यांचा संहार करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपल्याला मुख्य कर्तव्य काय आहे, तेंच केलें म्हणजे झालें.

सिंहवर्म्यानें लढाईचा लौकर शेवट व्हावा म्हणून ही युक्ति काढली. आनंदवर्धनाला आपण खात्रीपूर्वक जिंकूं याविषयीं त्याला मुळींच संशय नव्हता, तथापि कांहीं आवेश उत्पन्न केल्यावांचून या युद्धाचा लौकर शेवट लागावयाचा नाहीं, असें त्याला वाटत होतें. आनंदवर्धनाला जिंकल्यानंतर चंद्रगुप्त व त्याचे मित्र जे आपले दोघे पुत्र हे त्याला छळल्यावांचून किंवा त्याची स्त्री शशिप्रभा —जी ह्या लढाईला मुख्य कारण—तिच्यावर नजर

ठेवल्यावांचून राहणार नाहींत. आणि त्यांचा विशेष आवेश असल्यामुळे त्या कामीं आपल्यालाही प्रतिबंध करतां येणार नाहीं. असें झालें म्हणजे कदाचित् आपल्या बरोबरीचे राजे आपल्याला दोष देतील. त्यांचें निवारण व्हावें म्हणून सिंहवर्म्यानें मुद्दाम दरबार करून हा पण लावला होता. लढाईत लूट मिळाली, अथवा शत्रूकडच्या उत्तम स्त्रिया मिळाल्या, तर मिळविणाराला त्या बक्षीस देण्याची पूर्वीपासून चाल होती. म्हणूनच मोठमोठे शूर लोक त्यांच्या आशेनें जिवावर उदार होऊन लढत असत!

सिंहवर्म्याचें भाषण ऐकून विरांना मोठें स्फुरण आलें. त्यांत चंद्रगुप्त मोठा आवेशी होता,आणि दोघे राजपुत्र त्याचा हेतु पूर्ण करण्याविषयीं झटण्यास तयार होते. आपल्याला पाहिजे होता, तोच पण लाविल्यामुळें चंद्रगुप्त वीरश्रीनें फुरफुरला. आणि राजा सिंहवर्मा याच्या समोर जाऊन पुढें ठेवलेल्या तरवारीस हात लावून म्हणाला, 'महाराज, आपण व इतर वीरांनीं माझी प्रतिज्ञा ऐकावी. मी शस्त्राला स्पर्श करून शपथ घेतों कीं, आजपासून तिसऱ्या दिवशीं सूर्यास्त होण्यापूर्वी आनंदवर्धनाला जिवंत धरून आणल्यावांचून राहीन, अथवा त्याचें शीर माहाराजांच्या पायांपुढें हजर न करीन, तर मुळींच आपले प्राण ठेवणार नाहीं! परलोकांत मला अक्षय नरकप्राप्ति होईल! ही प्रतिज्ञा पुरी केल्यावांचून युद्धांतून परत येऊन जिवंत राहिलों, असें या जगांत कोठेंही कोणाच्या दृष्टीस पडणार नाहीं!'

चंद्रगुप्तानें याप्रमाणें प्रतिज्ञा करून विडा उचलला. त्याबरोबरच त्याचे मित्र पुष्पसेन आणि वीरमित्र या दोवां-

नींही चंद्रगुप्ताला त्या कामीं पूर्ण साह्य करावयाचें व त्यानें जी शपथ घेतली आहे तीच आपणासही लागू आहे, अशा अर्थाचें भाषण केलें व शपथा प्रमाणें करून ते तिघेही लढाईला तयार झाले. नंतर राजा सिंहवर्म्यानें त्यांचा उत्साह वाढेल अशा प्रकारचें भाषण करून त्यांचें फार गौरव केलें व दुसऱ्या दिवशींच्या लढाईची कडेकोठ तयारी करविली.

आजपर्यंत झालेल्या लढाईंत शत्रूला जय अथवा पराजय प्राप्त होईल, याविषयीं आनंदवर्धनाकडच्या वीरांचें मत कांहीं निश्चित झालें नव्हतें. कधीं शत्रूला व कधीं आपल्याला जय आणि पराजय सारखेच येत गेल्यामुळें ते निराशही झाले नव्हते. पण प्रतापसेनाचा तसा शेवट होऊन शत्रु विजयी झाल्यामुळें त्यांला बरीच नाउमेद झाली. तथापि सेनापति आणि मुख्य प्रधान यांनीं धीर देऊन लढाई तशीच चालविली. शत्रूच्या गोटांत दरबार होऊन प्रतिज्ञा झाली आहे. हें वर्तमान आनंदवर्धनाकडच्या मुत्सद्यांना कळल्यामुळें त्यांना याविषयीं आतां काय करावें? याचा विचार पडला. भवति न भवति होऊन शेवटीं तहाचें बोलणें लावावें, असा विचार ठरला, व त्याप्रमाणें सिंहवर्म्याकडे त्यांनीं वकील पाठविला.

वकीलानें तह करण्याचा हेतु कळविला, तेव्हां सिंहवर्म्यानें ती गोष्ट मान्य केली; व तह करण्याविषयीं आपली पूर्ण संमती असल्याचें दर्शविलें. तेव्हां तह करावयाचा झाला, तर तो कोणत्या शर्तींवर करावा? हा प्रश्न निघाला. तेव्हां सिंहवर्म्यानें, अर्धें राज्य व आनंदवर्धन आणि शशिप्रभा या दोघांची मागणी केली! तो म्हणाला, आम्हांस तुम्ही

कामदारलोक व रयत यांचा नाश करण्याची बिलकुल इच्छा नाहीं. मला तुमच्या राज्याची देखील गरज नव्हती. आम्हांस मुख्यत्वें तो तुमचा नेभळा राजा व सुंदर राणी या दोघांवांचून दुसरें कांहींच नको होतें. पण ज्यापेक्षां मी आज आपल्या वचनानें बांधला गेलों आहें व अर्धें राज्य आणि तीं दोघें स्त्रीपुरुषें बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे, त्यापेक्षां.आतां मला तें वचन पुरें केलें पाहिजे! तह करण्याची तुमची इच्छा असल्यास वर सांगितल्याप्रमाणें माझें मागणें कबूल कराल तर आपल्याकडून तयारी आहे.'

सिंहवर्म्याचें भाषण ऐकून वकील परत आपल्या गोटांत आला व मुत्सदी मंडळीला सिंहवर्म्याचें मागणें कळविलें. त्यांना तें मुळींच कबूल करण्यासारखें नव्हतें. कदाचित् त्यांणीं अर्धें राज्य दिलें असतें, पण राजा आणि राणी यांना देऊन मग तह तो कसला करावयाचा? असें समजून तहाविषयीं ते निराश झाले शेवटीं जें होईल तें होईल; मारून मरावें असा निश्चय करून त्यांणींही आपल्याकडून कडेकोट तयारी केली.

सूर्योदय होतांच उभय पक्षांकडील सैन्यें तयार होऊन लढाईची सुरवात झाली. यापूर्वी बरेच दिवस युद्ध चाललें होतें, पण त्याचें आणि आजच्या लढाईचें स्वरूप अगदीं निराळ्या प्रकारचें होतें. उभय पक्षांकडील योद्धे अगदीं जिवावर उदार होऊन लढत होते. चंद्रगुप्त व त्याचे दोघे मित्र सर्वांच्या पुढें होऊन मोठ्या आवेशानें शत्रूवर चाल करीत होते. त्यांणीं मुख्यत्वें आनंदवर्धनावर नेम धरला होता, पण आनंदवर्धनाकडच्या वीरांनीं त्याला मागें

सुरक्षित ठेवून शत्रूला ते आपल्या अंगावर घेत होते. चंद्रगुप्तानें त्यांच्या फौजेची दाणादाण केली, व आनंदवर्धनाला गांठण्याचा इरादा करून तो पुढें सरला; पण त्यांचा सेनापति पुढें होऊन त्यानें चंद्रगुप्ताला अडाविलें. मुख्य प्रधान हत्तीवर बसून वेळोवेळ सल्ला मसलत देत होता. चंद्रगुप्त सेनापतीशीं लढत आहे, असें पाहून वीरमित्रानें प्रधानाला गांठलें. त्या उभयतांची बराचवेळ निकराची लढाई होऊन शेवटीं हत्ती मरण पावल्यामुळें प्रधानाला पळ काढावा लागला! ही वेळ सूर्यास्ताची असल्यामुळें लढाई तहकूब झाली.

दुसऱ्या दिवशीं पुनः युद्धास प्रारंभ झाला. चंद्रगुप्त व दोघे राजपुत्र यांणीं त्या दिवशीं शौर्याची कमाल केली. शत्रूचे पुष्कळ मोठमोठे वीर पाडले. आनंदवर्धनाचा बचाव करण्याकरितां झटणाऱ्या त्याच्या सेनापतीला चंद्रगुप्तानें मोठ्या शौर्यानें मारल्यामुळें, प्रधानानें दुसऱ्या दिवशींची लढायी सूर्यास्ताच्या सुमारास पुरी केली.

सर्व मार कायतो सेनापतीवर होता. तो पडल्यामुळें आनंदवर्धनाच्या प्रधानमंडळाची उमेद खचली. कदाचित् आपण पळून गेलों तर शत्रू पाठलाग करतील; म्हणून शत्रूच्या तोंडावर लढाई चालू ठेवून आनंदवर्धन आणि शशिप्रभा यांना कोठें तरी सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेवावें, अशी त्यांणीं मसलत केली. पण तीच त्यांना विशेष घातक झाली! आनंदवर्धन व शशिप्रभा कांहीं निवडक मंडळीसह अपरात्रीं पळून जाणार. हें वर्तमान चंद्रगुप्ताच्या हेरांनीं त्याला आधींच कळविलें होतें. त्यावरून त्यांनीं पाळत ठेवून त्यांच्या जाण्याच्या रस्त्यावर अडचणीच्या जागीं त्यांना गांठतां

येईल, अशा बेतानें कांहीं लोक पाठविले, व त्या रात्रीं आपल्या छावणींत---इषारा होतांच सर्वांनीं तयार असावें--- असा चंद्रगुप्तानें सक्त हुकूम ठेविला होता.

मध्यरात्रीच्या सुमारास कांहीं निवडक शिपाई बरोबर घेऊन आनंदवर्धन व शशिप्रभा आणि त्यांच्या खानगीकडील इतर लोक दुसऱ्या एका किल्ल्यावर पळून जाण्याच्या बेतानें निघाले. हें वर्तमान कळतांच चंद्रगुप्त निवडक स्वारांनिशी एकटाच आडरस्त्यानें जाऊन त्यांच्या वाटेवर एका नदीच्या वळणांत दबून बसला. त्यानें पुढें पाठविलेले लोक तेथून जवळच पाळतीवर होते. आनंदवर्धन कोणच्या वाटेनें जातो, याची वेळोवेळ चंद्रगुप्ताला खबर कळत होती. रात्र अंधारी असून जिकडे तिकडे झाडी असल्यामुळें कांहीं दिसत नव्हतें. अशा संधींत आनंदवर्धन त्या नदीच्या वळणांत येऊन पोहोंचतांच चंद्रगुप्तानें एकाएकीं आपल्या लोकांना इषारा करून त्यांच्यावर छापा घातला !

बरोबरच्या लोकांनीं बरीच हालचाल केली; पण त्यांचें कांहीं चाललें नाहीं. चंद्रगुप्तानें व त्याच्या लोकांनीं त्यांचा पराभव करून आनंदवर्धन व शशिप्रभा ह्या दोघांला कैद करून नेलें. चंद्रगुप्ताला जिच्याबद्दल मोठी ईर्ष्या उत्पन्न झाली होती, व जिच्या निमित्तानें हा एवढा अनर्थ उपस्थित झाला, आणि जिच्याकरितां पूर्वजन्मांत त्यानें प्राणत्याग केला, ती शशिप्रभा हस्तगत झाल्यावरूनें तो कृतकृत्य झाला ! रात्र अंधारी असल्यामुळें तिचें रूप अवलोकन करण्याचा लाभ त्याला घडला नाहीं. यद्यपि तीं दोघें या वेळीं त्याच्या हातांत सांपडलीं होतीं, तथापि त्यानें

त्यांची अमर्यादा केली नाहीं. त्या दोघांला कैद करून तो परत आपल्या गोटाकडे जाण्यास निघाला. इतक्यांत सूर्योदय होऊन गोटांत पोहोंचेपर्यंत बराच दिवस वर आला.

आनंदवर्धनाला शत्रूनीं कैद करून नेलें, हें वर्तमान त्याच्या छावणींत कळण्यापूर्वींच इकडे लढाई सुरू झाली होती. पळून गेलेली मंडळी सुरक्षित येऊन पोहोंचेपर्यंत शत्रूला अडकवून धरावें, असें आनंदवर्धनाच्या प्रधानाच्या मनांत होतें. पण इकडे दुसरीच व्यवस्था झाली, हें त्याला मुळींच ठाऊक नव्हतें. लढाई सुरू झाल्यावर कांहीं वेळानें त्याला हें वर्तमान समजलें तेव्हां त्यांनीं पळ काढला; पण पुष्पसेन आणि वीरामित्र या दोघांनीं त्यांचा पाठलाग करून प्रधान व दुसरे कांहीं प्रमुख सरदार यांना ठार केलें! एकंदरींत आनंदवर्धनाच्या फौजेचा सर्वप्रकारें नाश होऊन लढाईचा शेवट झाला.

याप्रमाणें ज्याकरितां लढाईचा आरंभ केला होता, तें कार्य सिद्ध होऊन सिंहवर्मा विजयी झाल्यामुळें लढाईचा शेवट झाला. सिंहवर्मा--विजयी चंद्रगुप्त व आपले पुत्र यांसहवर्तमान जयघोष करीत आपल्या छावणीच्या ठिकाणीं परत आला. त्या दिवशीं सिंहवर्म्याच्या छावणींत जिकडे तिकडे अगदीं आनंदीआनंद झाला होता. शिपाईलोक मद्य वगैरे प्राशन करून ठिकठिकाणीं नाच, रंग, तमाशे व इतर अनेकप्रकारच्या कर्मणुकी करण्यांत गुंग झाले होते. या दिवशीं त्यांना त्यांच्या वरिष्ठाकडून यथेच्छ वर्तन करण्याची मुभा मिळाली होती. जेवणखाण आटपून कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर सिंहवर्म्यानें आपल्या गोटांत

दरबार भरविला. लष्करी अधिकारी व इतर सरदार, मानकरी वगैरे जमल्यावर सिंहवर्म्यानें चंद्रगुप्ताची व त्याचे मित्र पुष्प-सेन्न आणि वीरमित्र यांची फार तारिफ केली. आणि कैद केलेलीं आनंदवर्धन व शशिप्रभा या दोघांला दरबारांत आण-वून सिंहवर्म्यानें सर्वांदेखत त्यांना चंद्रगुप्ताच्या हवालीं करून ——आजपासून या उभयतांवर चंद्रगुप्ताची सर्वप्रकारें सत्ता आहे, व त्यानें त्यांची पाहिजे तशी व्यवस्था करावी, असें जाहीर केलें; आणि आनंदवर्धनाच्या सर्व राज्याची मालकी आपल्याकडे आली आहे, व यांतील अर्धें राज्य आपण चंद्रगुप्ताला दिलें आहे, असें जाहीर करून त्या लढाईंत ज्यांनीं विशेष पराक्रम केले होते, त्यांना बक्षीसें वांटलीं. नंतर—आनंदवर्धनाचें राज्य आपण खालसा केलें, व त्यावर आजपासून त्याची कांहीं सत्ता नाहीं, अशा अर्थाचा जाहीरनामा जिकडे तिकडे प्रगट केला!

यावेळीं आनंदवर्धनाच्या राज्याला अधिकारी कोणी राहिला नव्हता. मुख्य राजा आनंदवर्धन हा तर सिंह-वर्म्याच्या कैदेंत सांपडला असून त्याच्यामागें व्यवस्था चालविणारे सेनापती व प्रधान हे दोघेही युद्धांत पडले. तशांतून बहुत दिवस लढाई चालून लोकांना उपद्रव झाल्यामुळें जिकडे तिकडे विशेष अस्वस्थता झाली होती.

अशा स्थितींत सिंहवर्म्यानें आपला पुत्र पुष्पसेन याला—जिकडे तिकडे थारवाथारव करून देशांत स्वस्थता करण्याच्या कामीं नेमून, तो परत आपल्या राजधानी-कडे निघून गेला. चंद्रगुप्ताला आनंदवर्धनाच्या राज्याचा अर्धा भाग दिला होता, तरी—सिंहवर्म्याचे पुत्र आणि तो यांच्यांत कोणत्याही प्रकारचा परकीय विचार

नसल्यामुळें—त्यानें निराळी गादी स्थापन करून स्वतंत्र रीतीनें कारभार चालविण्याचें मुळींच मनांत आणलें नाहीं. जें सर्व राज्य आहे तें आपलेंच आहे, पुष्पसेन जी कांहीं व्यवस्था करील, तीच आपल्यालाही मान्य आहे, असें सांगून तो व वीरमित्र दोघेही सिंहवर्म्याबरोबर परत उज्जयिनीस गेले.

सिंहवर्मा शहरांत प्रवेश करते वेळीं मोठा उत्सव झाला. आपला राजा विजयी होऊन आला, हें वर्तमान ऐकून आनंदीत झालेल्या प्रजेनें त्याचा मोठा सत्कार केला. उज्जयिनींत आल्यावर चंद्रगुप्तानें, आनंदवर्धन व शशिप्रभा या दोघांलाही आपल्या वाड्यांत नेऊन ठेविलें. तीं प्रतिबंधांत होतीं तरी त्यांच्या योग्यतेप्रमाणें सर्व प्रकारचे उपभोग व आदरसत्कार यांत कोणत्याही रीतीनें कांहीं कमी न पडूं देतां चंद्रगुप्तानें त्यांची व्यवस्था ठेविली होती. फक्त त्या स्त्रीपुरुषांला परस्परांची भेट मात्र घेऊं दिली नाहीं!

इकडे पुष्पसेनाला आनंदवर्धनाच्या राज्याची व्यवस्था करण्याच्या कामावर नेमलें होतें. त्याच्याबरोबर फौजफांटाही बराच ठेविला होता. शत्रूकडून मागें पुढें कांहीं उपद्रव होईल, किंवा कोणी छापा घालील, किंवा कांहीं दगा फटका होईल म्हणून पुष्पसेन फार जपून वागत होता. त्यानें रयतेला कोणत्याही प्रकारचा उपद्रव न देण्याबद्दल आपल्या फौजेंतील लोकांना सक्त हुकूम केला. सिंहवर्मा परत निघाला, तेव्हां त्यानें हळू हळू त्या देशची मुख्य राजधानी पुष्करावती, तिकडे प्रमाण केलें. प्रत्येक मुक्कामास त्या ठिकाणच्या व आसपासच्या लोकांना बोलावून त्यांचें समाधान करून तो त्यांना अभय देत होता.

'तुमच्या शरीराला व वित्ताला कांहीं भय नाहीं, महान् पराक्रमी आमचा पिता राजा सिंहवर्मा याच्या ताब्यांत सांप्रत तुम्ही गेलां आहां. तो तुमच्या सर्व इच्छा पूर्ण करून उत्तम प्रकारें तुमचें परिपालन करील! परशत्रूच्यानें तर काय, पण प्रत्यक्ष काळाच्यानेंदेखील तुमच्याकडे वक्रदृष्टीनें पाहवणार नाहीं'—इत्यादिप्रकारें लोकांची समजूत करून जिकडे तिकडे शांतता करीत करीत तो पुष्करावती नगरीजवळ येऊन पोहोंचला. तेथें पुष्पसेनाची स्वारी शहराजवळ आली हें वर्तमान ऐकून लोक बेदील झाले होते. तथापि त्यांतल्या कांहीं प्रमुख मंडळींनीं समजूत केल्यावरून विशेष गडबड झाली नाहीं.

वस्तुतः या वेळीं पुष्पसेनाला राजवाड्यांत प्रवेश करण्यास देखील हरकत नव्हती. पण एकाएकीं तसें केलें तर लोकांना कदाचित् वाईट वाटेल, असें समजून तो शहराच्या बाहेरच मुक्काम करून राहिला. त्यानें सूचना केल्यावरून राहिलेसाहिले कामदार व शेटसावकार वगैरे लोक त्याच्या भेटीस आले. त्या वेळीं पुष्पसेनानें त्या सर्वांचें समाधान करून पुढें राज्याची व्यवस्था वगैरे कशी काय करावयाची तें त्यांना कळविलें. सिंहवर्म्याचा लोकांवर वचक बसला होता व राज्यालाही कोणी वारस नव्हता, तेव्हां लोक बहुतकरून पुष्पसेनाला अनुकूल झाले. कोणतीही राजधानी म्हटली कीं, तेथें उलाढाली, विघ्नसंतोषी, चोर, चहाड असे अनेक प्रकारचे लोक असावयाचेच. पुष्पमित्रानें प्रमुख लोकांना वश करून घेऊन बाकी ज्यांनीं त्याच्या विरुद्ध प्रयत्न केला, त्यांना कडक शिक्षा देऊन त्यानें जिकडेतिकडे शांतता केली. व कांहीं

नवे व कांहीं जुने असे कामदारलोक वगैरे नेमून कारभार सुयंत्र चालविला.

प्रमुख लोक अनुकूल झाल्यावरून त्यांच्या सल्ल्यानें पुष्पसेनानें मोठ्या समारंभानें राजवाड्यांत प्रवेश केला. तेथें आनंदवर्धनाच्या अगदीं जवळच्या अशा दोघी स्त्रिया--एक त्याची आई चंद्रानना, व सासु सानुमती ह्या होत्या. पुष्पसेनानें त्यांची चांगली व्यवस्था ठेविली असती, पण तो आज राजवाड्यांत प्रवेश करणार तेव्हां आपली कदाचित् हालअपेष्टा होईल, ह्या भीतीनें—पुत्राच्या व मुलीच्या वाईट परिणामानें आधींच ज्यांच्या प्राणांनीं प्रस्थान ठेविलें होतें, अशा त्या दोघींनीं विष खाऊन प्राणत्याग केला!

पुष्पसेनानें राजवाड्यांतील आप्तसंबंधीं, नोकरचाकर, वगैरे सर्व लोकांची यथायोग्य व्यवस्था ठेविली. तात्पर्य आपला राजा जाऊन आपण परकीयांच्या हातीं सांपडलों आहों, असें कोणालाही न वाटे, या रीतीनें बंदोबस्त ठेवून पुष्पसेनानें ह्या नवीन काबिज केलेल्या राज्याची व्यवस्था फार चांगली लाविली. येथवर--पूर्वजन्मींच्या संबंधानें अथवा त्यांचा योगायोगच तसा होता, असें म्हटलें तरी चालेल—शशिप्रभा—तिच्यावर निरुपम प्रीती करणाऱ्या चंद्रगुप्ताच्या हातीं कोणत्या प्रकारें आली व त्याला काय काय कारणें झालीं तें सांगितलें. आतां त्यांचें पुढें काय झालें तें पाहूं.

शशिप्रभा कांहींएक विचित्र योगायोगानें चंद्रगुप्ताच्या हातांत सांपडली. त्याचा तिच्यावर कांहीं विलक्षण लोभ होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हजारों मनुष्यांना बळी

पाडून व इतका प्रयत्न करून चंद्रगुप्ताला तिची प्राप्ति झाली, तथापि त्यानें विशेष उतावळेपणा दाखविला नाहीं. स्त्रियांचें मन कसें रंजवावें, व त्यांना कोणत्या रीतीनें अनुकूल करून घ्यावें, हें त्याला माहीत होतें. तिला आपल्या वाड्यांत आणून ठेवल्यावर प्रतिदिवशीं तिला भेटून तो तिचा क्षेम समाचार विचारीत असे. तिला कोणत्याही प्रकारची उणीव न पडावी याविषयीं त्यानें फार चांगली व्यवस्था ठेविली होती. दररोज तिच्याशीं कांहीं वेळ गोष्टी करण्याचा त्यानें परिपाठ ठेविल्यापासून, प्रथम प्रथम ती मुळींच कांहीं बोलत नसे; पण मग हळू हळू त्याच्याशीं कांहीं गोष्टी करूं लागली. तिचा पति आनंदवर्धन याच्यावर तिचें किती प्रेम होतें, याची येथें द्विरुक्ति करावयास नको. आनंदवर्धनाची भेट होत नाहीं म्हणून ती अतिशय दुःखी होती; म्हणून—आपण यावेळीं कैदेंत आहों व वेडेंवांकडें कांहीं भाषण केलें, किंवा त्याच्या विषयीं हट्ट धरिला आणि त्याचा परिणाम वाईट झाला तर मग काय करावें! चंद्रगुप्ताला राग आला, तर तो त्याला कदाचित् ठार मारून देखील टाकील! या भीतीनें शशिप्रभा त्यासंबंधानें चंद्रगुप्ताजवळ कांहींच बोलली नाहीं.

चंद्रगुप्त तिच्याशीं मैत्री करून तिचें मन आपल्यावर राजी करून घेण्याचा सतत प्रयत्न करीत होता. स्त्रियांचें मन फार विचित्र असतें. तें प्रसंगीं इतकें कठोर व निर्दय होतें कीं, त्याला वज्राची देखील उपमा साधणार नाहीं. पण त्यांच्या अंगीं कोमलपणाही तसाच असतो. त्यांतून त्यांच्या छंदानें वागणें व आर्जवें करणें याच्या योगानें स्त्रिया लौकर अनुकूल होतात. चंद्रगुप्त शशिप्रभेला

फारच चांगल्या रीतीनें वागवीत असून, तिच्याविषयीं विशेष काळजी दाखवित असे; यामुळें हळू हळू तिचें मन त्याच्याकडे वळूं लागलें. चंद्रगुप्त आणि शशिप्रभा यांची एकमेकांवर प्रीति होती; तरी त्यांच्या मनोवृत्तींत मोठा फरक होता. ती आपल्याला अनुकूल होऊन आपली वासना पूर्ण व्हावी, म्हणून चंद्रगुप्त तिच्यावर प्रेम करीत होता. पण तिचें मन शुद्ध होतें. ह्याचें आपल्यावर इतकें प्रेम आहे व आपणास हा विशेष सुख देतो, याबद्दल आभारी होऊन ती त्याच्यावर प्रेम करीत होती. शिवाय त्याची मर्जी प्रसन्न होऊन कदाचित् त्याला दया आली आणि आपणां उभयतांची त्यानें सुटका केली तर पहावें, असाही तिचा हेतु होता.

चंद्रगुप्तानें, शशिप्रभा त्याच्या ताब्यांत आली, तरी पुष्कळ दिवस तिच्या जवळ आपल्या हेतूच्या संबंधानें मुळींच कांहीं गोष्ट काढली नाहीं. नंतर तिचा आपल्यावर स्नेह जडला आहे व ती प्रसन्न आहे, असें वाटल्यावरून त्यानें हळूच आपला भाव व्यक्त करण्यास सुरवात केली. शशिप्रभा आनंदवर्धनाकरितां रात्रंदिवस तळमळत होती, तरी तिनें कधीं कोणाजवळ तो भाव व्यक्त करून दाखविला नाहीं. कारण, तिच्या भोंवतीं चाकर वगैरे झाडून सारीं माणसें चंद्रगुप्तानें नेमलेलीं अर्थात् त्याच्याकडचीं होतीं. तेव्हां तिला मन मोकळें करून सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्यास देखील विशेष संकोचच होता. एवढी लढाई होऊन हजारों मनुष्यांचे बळी पडले, त्याला कारण आपणच आहों, हें तिला यापूर्वीच कळून आलें होतें. चंद्रगुप्तानें आपल्याला एवढा प्रयत्न करून मिळविलें,

त्याअर्थी त्याचें आपल्यावर विलक्षण प्रेम आहे, हें तिला समजलेंच होतें.

पुरुष कोणत्याही एका स्त्रीवर कामदृष्टीनें प्रेम करूं लागला आणि तिनें दुसऱ्यावर प्रेम दाखविलें, तर ती गोष्ट त्याला मुळींच सहन होत नाहीं. तो त्या स्त्रीचें कदाचित् शासन करील किंवा न करील देखील; परंतु ती ज्याच्यावर लोभ करीत असेल, त्याचा घात केल्यावांचून तो राहणार नाहीं. चंद्रगुप्तानें आनंदवर्धनाला हा वेळपर्यंत जिवंत ठेविलें, याचेंच शशिप्रभेला मोठें नवल वाटत होतें. कारण, तो जिच्यावर प्रेम करीत होता, त्या शशिप्रभेवर वारसा सांगणारा आनंदवर्धनच होता. त्याचा त्यानें तेव्हांच शिरच्छेद केला असता, पण तो गरीब असून सर्व प्रकारें आपल्या हातांत आहे, तेव्हां त्याला जिवंत मारण्यांत कांहीं विशेष नाहीं. जिचें त्यानें प्राणिग्रहण केलें ती त्याच्यादेखत आपल्या ताब्यांत आली हें त्याला दाखवावें, याचें त्याला विशेष महत्व वाटलें; म्हणून त्यानें आनंदवर्धनावर तरवार उपसली नाहीं.

बिचारा आनंदवर्धनही अतिशय गरीबच होता. आपल्याला अशी स्थिति प्राप्त झाली, याबद्दल त्याला फार दुःख वाटत होतें; तरी त्याबद्दल आवेश अथवा क्रोध आल्याचें त्यानें कधीं दाखविलें नाहीं. प्राप्त झालेली स्थिति निमुटपणें तो सहन करीत होता. शशिप्रभेची आणि आपली भेट होत नाहीं, याचें मात्र त्याला फार दुःख वाटत होतें. आम्हीं आनंदवर्धनाच्या स्थितीचें वर्णन केलें आहे, त्याविषयीं वाचकांना कदाचित्

संशय येईल. पण तो येण्याला कांहीं विशेष कारण नाहीं. मनुष्यमात्राचे स्वभाव पूर्वकर्मानुसार शांत, रागीट, मूर्ख इत्याादि अनेक प्रकारचे असतात. आनंद-वर्धन हा पूर्वजन्मींचा मोठा शांत, जितेंद्रिय, व सत्वशील असा तापस होता. आणि चंद्रगुप्त हा राजस, तामस स्वभावाचा शूर राजा होता. या जन्मीं आनंदवर्धन राजा असून चंद्रगुप्त वैश्य होता, तरी त्यांच्या स्वभावांत मुळींच फरक नव्हता. तो राजाला योग्य नाहीं, अशा सत्वशीलपणानें, व हा वैश्याला योग्य नाहीं अशा राजस, तामस वृत्तीनें वागत होता!

एखादा मानी क्षत्रिय, याप्रमाणें अप्रतिष्ठा होऊन शत्रूच्या हातीं सांपडला असता, तर त्यानें कांहींतरी हालचाल केली असती. किंवा निदान तो स्वतः अतिशय दुःखी होऊन आपला नाश तरी करून घेण्याचा प्रयत्न करता. पण आनंदवर्धनाला त्याचें फारसें कांहीं वाटलें नाहीं. तो प्रथम दुःखी होता, तरी लौकरच प्राप्त झालेल्या स्थितींत सुखासमाधानानें कालक्षेप करूं लागला. चंद्रगुप्ताचा शशिप्रभेविषयीं एकसारखा प्रयत्न चाललाच होता. दासदासी वगैरे जितकीं माणसें तैनातींत होतीं, त्या सर्वांला हरप्रयत्नानें तिचें मन वळाविण्याविषयीं त्याची आंतून सूचना होतीच.

स्त्रियांच्या सामान्यतः मनोवृत्ति कशा असतात, या गोष्टीचा विचार करणाराला, शशिप्रभा चंद्रगुप्ताला या-वेळीं अनुकूल झाली असती, तर त्याचें फारसें आश्चर्य वाटलें नसतें. कारण, स्त्रियांला विशेष आनंदांत काळ घालविण्याची मोठी हौस असते. आतां हा आनंद

म्हणजे ज्या त्या स्त्रीची योग्यता व तिच्या इच्छा यांवर अवलंबून असतो. तरी एकंदरींत त्यांना फारसे कष्ट काढवत नाहींत. आपल्या देखत आपल्या नव-ऱ्याचा अपमान झालेला त्यांच्यानें पाहवत नाहीं; व त्या नवऱ्यावर त्यांची कितीही प्रीति असली, तरी तशा प्रसंगीं तिच्यांत कांहीं उणेंपणा आल्यावांचून राहत नाहीं. आपल्या नवऱ्याचा किंवा त्या ज्यांच्यावर प्रेम करीत असतील त्यांचा मोठेपणा पाहून त्यांना विशेष आनंद होतो. सर्वांत---मग ती ब्राह्मणाची असो, क्षत्रि-याची असो किंवा पाहिजे त्याची असो, स्त्री म्हटली, कीं, तिचा शूर पुरुषावर स्वाभाविक अनुराग असतोच.

आनंदवर्धनाची या वेळची स्थिति किती शोचनीय होती; हें वर सांगितलेंच आहे. तसेंच स्त्रियांच्या साधा-रण स्वभावाच्या स्थितीचेंही वर वर्णन केलें आहे, त्याव-रून शशिप्रभेचें त्याच्यावरचें प्रेम या वेळीं शिथिल होणें अगदीं साहजिक होतें. पण स्त्रियांचा वर जो सामान्य स्वभाव वर्णन केला आहे, त्याला अपवादभूत अशाही कांहीं स्त्रिया आहेत. दमयंती, सीता, इत्यादि स्त्रियांचें प्राचीन कवींनीं जें विशेष वर्णन केलें आहे, तें तरी कां? तर त्यांच्या अंगीं विशेषप्रकारचे कांहीं पातिव्रत्यादि धर्म दिसून आले, म्हणूनच त्या इतक्या त्यांच्या आदराला पात्र झाल्या. आमच्या ह्या कथेची नायिका सुंदरी अथवा या जन्मांतली शशिप्रभाही तशाच प्रकारची होती. चांगली अथवा वाईट कोणत्याही प्रका-रची स्थिति प्राप्त होवो, व कितीही दुःखें भोगावीं लागोत, तरी पतीवरचें प्रेम बिलकुल कमी न होऊं देणें, हा मुख्य

धर्म तिच्या अंगीं अप्रतिम होता. आनंदवर्धन उत्तम स्थितींत असतां, त्याच्यावर तिचें जसें प्रेम होतें तसेंच या वेळीं देखील होतें ! त्यांत तिळमात्रही कमीपणा आला नाहीं, यामुळें चंद्रगुप्तानें केलेले प्रयत्न व्यर्थ होऊन शेवटीं त्याचा परिणाम अगदीं विपरीत झाला.

ही आज अनुकूल होईल, उद्यां अनुकूल होईल म्हणून चंद्रगुप्त वाट पाहत होता. समक्ष ती जें वर्तन करी व दासीकडून त्याला जें समजे त्यावरून त्याची आशा दिवसें-दिवस वाढत गेली. एके दिवशीं त्यानें पुष्कळ इकडच्या तिकडच्या गोष्टी करून तिला असें विचारलें कीं, 'मी तुला सर्व प्रकारें सुख देत असतां, तुझ्या शरीरावर टवटवी दिसत नाहीं, याचें कारण काय ?'

शशिप्रभा म्हणाली, 'टवटवी दिसत नाहीं, असें म्हणतां, पण मला कांहीं तसें वाटत नाहीं. माझी स्थिति आहे तशीच आहे. तुमच्या कृपेनें मला कोणत्याही प्रकारचें दुःख नाहीं. मी सर्वकाळ तुमचे आभार मानीत आहें. परमेश्वरानें मला ज्या स्थितींत ठेविलें आहे, तींत मी अगदीं सुखानें काळ घालवीत आहें ?'

यावर चंद्रगुप्त म्हणाला, 'सुखानें काळ घालवीत आहें, असें तूं सांगितलेंस, तें मला खरें वाटत नाहीं. तुला कांहीं तरी दुःख असलेंच पाहिजे.'

शशिप्रभा म्हणाली, 'सांप्रत माझें सुख अथवा दुःख काय तें सर्व तुमच्या हातीं आहे. मला तर कांहीं दुःख आहे असें वाटत नाहीं, पण आपल्याला तसें वाटत असेल तर तें कोणतें असावें, हें मी सांगण्यापेक्षां आपल्याच मनांत आपण समजलां म्हणजे झालें. या-

शिवाय माझी अशी एक विनंति आहे कीं, मला दुःख होण्यासारखें आपल्याकडून कांहीं होत आहे का?'

चंद्रगुप्त म्हणाला, 'तुला दुःख व्हावें, असें बुद्धिपूर्वक कांहीं केल्याचें मला स्मरत नाहीं. पण त्याचा परिणाम दिसतो, यावरून होत असावें, अशी मला शंका येते.'

शशिप्रभा म्हणाली, 'तर मग तें कोणतें असेल, त्याचा विचार करा म्हणजे झालें.'

चंद्रगुप्त म्हणाला, 'दुसरें तर कांहीं दिसत नाहीं. एका गोष्टीच्या संबंधानें तुला दुःख होत असेल, असें वाटतें. पण त्याचा परिहार करणें माझ्या हातीं नाहीं. तें तुलाच नाहींसें करतां येईल.'

शशिप्रभा म्हणाली, 'इतकी माझ्या अंगीं शक्ति असेल असें वाटत नाहीं. मला सुख अथवा दुःख देणें हें सर्वप्रकारें आपल्याच हातीं आहे.'

चंद्रगुप्त म्हणाला, 'नाहीं नाहीं. खरोखर तें नाहींसें करणें तुझ्याच हातीं आहे. मानसिक दुःखें दुसऱ्याच्यानें घालविलीं जात नाहींत.'

शशिप्रभा म्हणाली, 'असें खरें. पण तें दुःख जर दुसऱ्याच्या कृतीमुळें झालें असेल, तर त्याचा परिहार होण्यासारखी कृति करणें त्याच्या हातीं असेल तर त्यानें करावी, म्हणजे तें आपोआप नाहींसें होईल.'

अशा तारुण्यांत शशिप्रभेला पुरुषाचा समागम नाहीं, म्हणून ती दुःखी असेल, असें चंद्रगुप्ताला वाटून—तो समागम करणें हें तुझ्या हातीं आहे, असें त्यानें सुचविलें. वस्तुतः ती आपल्या पतीविषयीं दुःखी होती. पण सांप्रतच्या स्थितीवरून त्याच्याविषयीं तिची इतकी प्रीति असेल,

असें चंद्रगुप्ताला वाटलें नाहीं. कामपिुरुषाचें जिच्यावर मन असेल, तिनें दुसऱ्याच्या उद्देशानें कांहीं चेष्टा केली असली, तरी ती—आपल्याबद्दलच केली असेल, असें त्यांना वाटतें. शशिप्रभेचें वर्तन व तिचें दुःख आपल्याकरितांच असावें, असें समजून चंद्रगुप्त यावेळीं तिच्याशीं बोलत होता. म्हणून तिनें दुःखपरिहार होण्यासारखी कृति करावी—म्हणजे तुम्ही आपला स्वीकार करा असा–तिचा हेतु आहे असें तो समजला. वस्तुतः तिच्या मनांत मला जें दुःख होत आहे, तें आपल्या पतीची आणि आपली ताडातोड केल्यामुळेंच होत आहे व तें तुमच्या कृतीनें झालें आहे. तेव्हां दोघांची भेट करून देऊन तुम्ही त्याचा परिहार करा, असा तिचा अभिप्राय होता.

चंद्रगुप्त म्हणाला, 'मग याविषयीं मी तर तयारच आहें. तुझ्या आज्ञेचाच कायतो उशीर.

हें ऐकून शशिप्रभेला सकृत्दर्शनीं असें वाटलें कीं, आपणां उभयतांची भेट होऊं देण्यास हा तयार झाला आहे. परंतु विचाराअंतीं तिला ती गोष्ट असंभवनीय वाटली. इतका प्रयत्न करून ज्यानें आपला हेतु पूर्ण केला, तो मनुष्य तसें करण्यास कसा तयार होईल? आपण अनुकूल आहों, असें कळविण्याचाच त्याचा हेतु आहे, तेव्हां याला आपण काय उत्तर द्यावें याचा तिला मोठा विचार पडला. आपल्या पतीला सोडा—असें म्हणावें तर त्याचा कांहीं उपयोग तर होणार नाहींच, पण उलटें त्यापासून त्याचें मन मात्र बिघडेल? व कदाचित् सक्तीचा उपाय करण्यास तयार होईल, असें तिला वाटलें. ती फारवेळ विचार करीत आहे, असें पाहून चंद्रगुप्त

म्हणाला, 'काय, तुला इतका विचार कसला पडला आहे? तुझ्या मनांत जी गोष्ट आहे, (याच्या मतानें) तीच मी बोललों. मग आतां विचार कसला?'

यानें आपला हेतु उघड केला, तेव्हां उगीच बाहेर बाहेर टाकून बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असा विचार करून शशिप्रभा म्हणाली, 'तें खरें; पण आपण धर्मज्ञ असून एकवेळ जिचा दुसऱ्यानें पाणिग्रह केला, तिचें पुनः आपण कसें पाणिग्रहण कराल, याच गोष्टीचा मला मोठा विचार पडला.'

चंद्रगुप्त म्हणाला, 'हात्तिच्या! ही कांहीं मोठी अडचण नाहीं! "जी केवळ पाणिग्रहणानेंच कायती दूषित झाली आहे, पण जिला पुरुषसमागम घडला नाहीं, तिच्याशीं पुनः विवाह करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं." असें धर्मशास्त्रकारांचें मत आहे. तेव्हां तुझें पाणिग्रहण पूर्वी झालें असलें, तरी कांहीं हरकत नाहीं. तुला संयोगाचा दोष लागला असेल याविषयीं तर मुळीं शंकाच घ्यावयास नको. कारण येथें आल्यानंतरच तूं त्या वयांत आली आहेस.'

ज्या अडचणीनें त्याचें बोलणें मोडून काढतां येईल, असें तिला वाटलें होतें तिचा त्यानें परिहार केला. हें पाहून शशिप्रभा म्हणाली, 'असेल; पण मला नाहीं ठाऊक. मेले शास्त्रकार कांहीं तरी सांगतात. एका बायकोचीं अशीं लग्नें व्हावयाचीं तरी किती?'

चंद्रगुप्त म्हणाला, 'वाहवा! एकूण शास्त्रकारांवर देखील तुमची कोटी आहेच म्हणावयाची! बरें, तें कांहीं असो. आतां उगीच विलंब कां? फक्त तुझ्या प्राप्तीकरितां मी

किती साहसकृत्यें व अनर्थ केले आहेत, हें तुला माहितच असेल. हा वेळपर्यंत तुझें मन दुखवूं नये, म्हणून मी ती गोष्टच काढली नाहीं. माझ्या मनांत तूं आपण होऊन हा उपक्रम काढशील, असें होतें; पण स्त्रियांचा स्वभाव फार निर्दय असतो. त्यांना आपल्याकरितां दुसऱ्याला किती दुःख होत आहे, याची कल्पना देखील होत नाहीं. बरें, झालें तें झालें. पण आतां तरी तूं माझा हेतु पुर्ण करशील अशी मला खात्री आहे.'

हें प्रकरण अगदीं चिकटलें असें पाहून शशिप्रभेनें —मला थोडे दिवस त्या गोष्टीचा विचार करण्याची सवड द्या, म्हणून त्याची प्रार्थना केल्यावरून चंद्रगुप्तानें तें कबूल केलें; व ती वेळ कशी तरी निभावली.

प्रतिदिवशीं उभयतांची भेट होऊन बोलणें चालणें होतच होतें. दुसऱ्यांदा विवाह कसा करावा, याचीच कायती तिला शंका असेल असें समजून, चंद्रगुप्त आपल्या आश्रित व भटभिक्षुकांला तिच्याकडे पाठवून, —या गोष्टीविषयीं शास्त्राचा आधार आहे, याबद्दल तिची खात्री करवीत होता. दासी वगैरे वरचेवर ह्या गोष्टी काढून —बाइसाहेब, आपण कसा विचार करीत नाहीं? हें सोन्यासारखें तारुण्य अगदीं वायां दवडतां, याला म्हणावें तरी काय? एक एक घटका सोन्याची निघून जाते. तिकडे आमचे धनीसाहेब रात्रंदिवस तळमळत असतात, व इकडे तुम्ही तळमळतां, तेव्हां हें असें कां! दैवानें चांगला योग घडवून आणला आहे, तर सुखाचा अनुभव घ्यायचा सोडून सारावेळ विचार कसला करतां?'

दासींनीं असें सांगितलें तरी ती त्यांना मुळींच कांहीं उत्तर देत नसे. कारण, आपला खरा हेतु काय आहे, तो मन मोकळें करून कोणाजवळ सांगण्याची तिला येथें अडचणच होती. तेव्हां उगीच त्यांच्याबरोबर वाद घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें समजून ती त्या संबंधानें —अग, होय. मलाही तसेंच करायचें आहे; पण कोणतीही गोष्ट उतावळीनें करूं नये. ज्याअर्थी आपल्या स्वतालाच हा संबंध करावयाचा आहे, त्याअर्थी दूरवर विचार केला पाहिजे;—असें सांगून ती त्यांची समजूत करीत असे.

विचार करण्याकरितां म्हणून मुदत घेतली त्याला पुष्कळ दिवस झाले, तरी शशिप्रभेकडून कांहीं बोलणें निघत नाहीं, असें पाहून चंद्रगुप्त एके दिवशीं तिला म्हणाला, 'कां, अद्याप तरी विचार झाला कीं नाहीं? कीं आपला जन्मभर विचारच करीत बसायचें!'

शशिप्रभेनें मागच्याप्रमाणें ह्या खेपेलाही एक तोड काढून ठेवली होती. ती म्हणाली, 'तसें कसें होईल? जन्मभर विचारच करीत बसायचें असलें, तर तो विचार करायचा तरी कशाला? मी आपला विचार केला. पण त्यांत एक अडचण आहे; तिची तोड कशी लावतां येईल?

चंद्रगुप्त म्हणाला, 'अशी अडचण तरी कशाची?' शशिप्रभा म्हणाली, 'दुसरें कांहीं नाहीं. महाराजांनीं (सिंहव र्म्यानें) मला आपल्याला बक्षीस दिलें आहे. आणि लग्न झालेली बायको दुसऱ्याला बक्षीस देणें म्हणजे तिला त्याची बटीक करणें होय. मला आपण तशा रीतीनें वागवीत नाहीं, हा आपला मोठा उदारपणा आहे.

शिवाय आपण माझ्यावर विशेष लोभही करतां, ही गोष्ट निराळी; पण खरें म्हटलें तर मी आपली बटीक झालें आहें. मग बटकीशीं आपल्यासारख्या थोर पुरुषाला लग्न कसें लावतां येईल? व त्यांत किती हीनपणा आहे, याचा विचार करायला नको काय? '

शशिप्रभेनें सांगितलें तें अगदीं खरें असल्यामुळें चंद्रगुप्त मोठ्या गोंधळांत पडला. कांहीं वेळ त्याला यावर काय तोड काढावी, हें सुचेना. बराचवेळ विचार करून तो म्हणाला, 'याचा देखील परिहार करतां येईल. ज्या महाराजांच्या (सिंहवर्म्याच्या) शब्दानें तूं आपल्याला—बटीक झालें असें मानतेस, त्यांनींच तुला दासीभावापासून मुक्त केलें म्हणजे झालें. ज्यांच्या शब्दांत तुला बटीक करण्याचें सामर्थ्य आहे, त्यांच्याच शब्दांत त्यापासून मुक्त करण्याचीही शक्ति असलीच पाहिजे.'

शशिप्रभा म्हणाली, 'होय, नसेल कां? त्यांच्या शब्दांत तसें सामर्थ्य असेलच, पण नुसतें शब्दानें बटिकपणापासून मुक्त केलें म्हणून झालें नाहीं. तशी कृति झाली पाहिजे.'

शशिप्रभेच्या बोलण्याचा अर्थ फार व्यापक होता. बटीक नाहीं—अशी कृति करून दाखविणें म्हणजे अर्थात् दोघांलाही सोडून देणें असेंच होतें. पण तसें करण्यास चंद्रगुप्त कसा तयार होईल? म्हणून तिच्या बोलण्याचा आशय समजूनही त्याचें कांहींच उत्तर न देतां म्हणाला, 'पण महाराजांची तरी गरज काय? तूं बटीक असलीस तर माझीच असली पाहिजे. मीच तुला त्यांतून मुक्त करतों म्हणजे झालें!'

हें ऐकून शशिप्रभा आनंदानें म्हणाली, 'तसें झालें तर मला फारच संतोष होईल. मी तरी तेंच म्हणतें. आपण दासीभावापासून मला मुक्त केलें तर आपले मजवर मोठेच उपकार होतील. देव करो, आणि आपल्याला तशी बुद्धि होवो!'

चंद्रगुप्त बोलण्याच्या भरांत तसें बोलून गेला. पण त्याचा अर्थ काय होतो, हें लगेच त्याच्या ध्यानांत आलें, तेव्हां तो गोंधळल्यासारखा होऊन मुकाट्यानें तेथून निघून गेला, आणि दुसरीकडे जाऊन आपल्या तोंडांतून जे शब्द निघाले, त्यांचा परिणाम काय होईल, याचा विचार करूं लागला. शशिप्रभेला युद्धांत कैद करून आणलें ती गोष्ट निराळी; पण या वेळीं तिला सोडतां येणार नाहीं. दासीभावापासून मुक्त केलें तर मग तिच्यावर आपली कांहीं सत्ता राहिली नाहीं. ती निघून जाऊं लागली तर आपल्याच्यानें तिला अडकाव करवणार नाहीं. आणि तसें केलें तर तो उघड अन्याय होईल; म्हणून चंद्रगुप्त मोठ्या विचारांत पडला.

तो दिवस तसाच गेला. दुसरे दिवशीं चंद्रगुप्त पुनः तिच्या भेटीस गेला. परस्परांचे कुशलप्रश्न झाल्यावर चंद्रगुप्तानें ती गोष्ट काढली. शशिप्रभेनें—कालच्या प्रश्नाचें उत्तर आल्याशिवाय मी काय सांगूं? असें सांगितल्यावरून चंद्रगुप्त म्हणाला, 'तें जाऊंदे. त्या प्रश्नाला इतकें महत्व देण्यासारखें कांहीं नाहीं. दासी आणि अदासी म्हणणें हें सर्व माझ्याकडे आहे. मी जर तुला आपली धनीण म्हणतों आहें, तर दासीपण राहिलें कोठें?'

शशिप्रभा म्हणाली, 'असें कसें होईल? मीही चांगल्या मोठ्या कुळांतली आहें, आणि तें आपल्याला ठाऊक नाहीं असें नाहीं. दैवानें मला अशी स्थिति प्राप्त झाली, त्याला उपाय नाहीं. पण मला भलतेंच करतां येत नाहीं? व तसें आपणही माझ्याकडून करवूं नये.'

चंद्रगुप्तानें या वेळीं अगदीं निश्चयच केला होता कीं, कोणत्याही रीतीनें आपला हेतु पूर्ण करावयाचा! त्यानें पुष्कळ प्रकारें तिची समजूत केली, पण तिनें कांहीच ऐकलें नाहीं, तेव्हां तो अगदीं निकरावर आला. कामीपुरुष आपल्या आवडत्या स्त्रीचीं प्रथम पाहिजे तशीं आर्जवें करतात, पण तितकेंही करून ती अनुकूल झाली नाहीं, तर शेवटीं बलात्कार करणें हा त्याचा परिणाम होतो. शशिप्रभा कांहीं केल्या ऐकत नाहीं, असें पाहून चंद्रगुप्तानें शेवटचा उपाय मनांत आणला!

तो म्हणाला, 'तुझ्या पाहिजे तितक्या अडचणी असोत. त्यांत कांहीं जीव आहे, असें मला वाटत नाहीं. मी आज याचा काय तो शेवट करणार. तुझ्यावर माझी सर्वप्रकारें सत्ता असून अतिशय प्रीतिही आहे. त्याबद्दल फारसा विचार करीत बसण्याचें मला कांहीं कारण नाहीं. आजपर्यंत केवळ तुझ्या मर्जीखातर मी दिवस घालविले, पण आतां मात्र तसें होणार नाहीं.'

चंद्रगुप्तानें तर आपला इरादा व्यक्त करून दाखविलाच. तो समजून शशिप्रभेवर जणूं आकाशच कोसळलें, असें झालें. तिला अतिशय दुःख होऊन रडें आलें, पण तें आंवरून ती दीनवाणीनें म्हणाली, 'माझा जीव सर्वप्रकारें आपल्या हातीं आहे. आपण माझे धनी, पोशिंदे किंवा जें

कांहीं म्हणावें, तें सर्व आपणच आहां! आपल्या चाकरांकडून अधर्म न होऊं देण्याविषयीं धन्यानें त्यांना वरचेवर बोध किंवा सक्ती देखील करावी; असें असून धनीच त्यांच्याकडून अधर्म करवायला तयार झाला, तर त्यांचा काय इलाज? माझ्या शरीरावर आपली सत्ता आहे, पण मनावर कोणाचीही सत्ता नाहीं. ह्या गोष्टीचा विचार करून आपण मज गरीबावर दया करा. माझ्याकडून अधर्म करवूं नका, इतकीच माझी विनंति आहे!' असें बोलून शशिप्रभेनें त्याच्या पायांवर डोकें टेविलें.

आजचा प्रसंग कांहीं विलक्षण आला होता. तिचा समागम न घडल्यामुळें चंद्रगुप्ताला जें दुःख होत होतें, तें त्याच्यानें सहन करवेनासें झालें होतें. गोडीगुलाबीनें ती वश होत नाहीं; म्हणून त्याला तिचा फार राग आला होता; ती करुणस्वरानें प्रार्थना करूं लागल्यामुळें त्याला तिची दया आली. असे एकांत एक अनेक विकार उत्पन्न झाल्यामुळें तो अगदीं वेड्यासारखा होऊन गेला. बराच वेळ तो तिच्याकडे टक लावून पहात होता, व ती खालीं मान घालून मुळमुळ रडत होती. घटकेंत त्याला तिच्यावर जबरी करावी, असें वाटे. घटकेंत ती अनुकूल होत नसली तर तिला नाहींशी करून आपल्या दुःखाचा शेवट करावा, असेंही त्याला वाटे. पण ह्या गरीब अबलेवर आपण असा क्रूरपणा करूं नये,—असें ..ून त्याचें मन बदलत असे. त्यानें—तूं आपल्याला अनुकूल होणारच नाहींस कां? असें विचारलें. पण तिनें त्यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. 'शरीरावर सत्ता आहे, पण मनावर नाहीं. 'हे तिचे शब्द त्याच्या मनाला फार

झोंबले. 'इतके दिवस आपण ही सांगेल तसें ऐकलें व हिला प्राणापेक्षांही प्रिय मानलें, तरी हिचें मन आपल्यावर नाहीं तें नाहींच. तेव्हां एकंदरींत ही फारच निर्दय आहे; याकरितां आपणही तसेंच वर्तन केलें म्हणून कांहीं हरकत नाहीं,'–असा विचार करून त्यानें तिच्या अंगावर हात टाकला!

शशिप्रभा इतके दिवस त्याच्या येथें होती, तरी त्यानें तिला स्पर्श केला नव्हता. त्या साध्वीला चंद्रगुप्ताचा हात केवळ सर्पासारखा असह्य झाला. त्यानें तिला अलिकडे ओढलें तेव्हां—आतां प्राणत्यागावांचून दुसरा कांहीं उपाय नाहीं; असें समजून तिनें पुढें येतांना पडल्यासारखें करून त्याच्या पायांजवळ आपलें कपाळ इतक्या जोरानें आपटून घेतलें कीं, त्यासरशी तिला मूर्च्छा आली व तींतून ती पुनः मुळींच सावध झाली नाहीं! याप्रमाणें तिनें आपल्या प्राणाचा व त्याबरोबर असह्य दुःखाचा व चंद्रगुप्ताच्या बहुत दिवसांच्या आशेचा एका क्षणांत शेवट करून घेतला!

तिची ती स्थिति पाहून चंद्रगुप्ताला देहाची देखील शुद्धि नाहींशी झाली. तो फार वेळ विलाप करण्यास राहिला नाहीं. इतक्या दिवसांची आपली आशा नष्ट होऊन, केलेल्या सर्व प्रयत्नांची निर्फलता झाल्यामुळें, तो जिवावर उदार होऊन मनांत म्हणाला, केवळ आपल्या आश्रयाखालीं असलेल्या, ह्या स्त्रीचा अशा तऱ्हेनें शेवट होण्याला केवळ आपणच कारणीभूत झालों; त्याविषयीं त्याला अतिशय दुःख होऊन मोठी लाज वाटली. हिचा असा दृढ निश्चय आहे, असें समजलें असतें तर

आपण हिला आपली मानली नसती, पण झाल्या गोष्टी-विषयीं आतां कांहीं उपाय नाहीं, असा विचार करून त्या शूर व मानी चंद्रगुप्तानें तत्क्षणीं तरवार घेऊन आपला शेवट करून घेतला!

त्या उभयतांचा असा शेवट झाला, हें ऐकून आनंदवर्धनानेंही प्राण सोडला! पुढें आपल्यावर काय संकट येईल याची त्याला मोठी भीति होती. याप्रमाणें एकमेकांच्या संबंधानें असलेल्या प्रीतीचा व दोषांचा विलक्षण परिणाम करून, त्या तिघांनींही ऐहिक सर्व संबंध तोडून घेऊन पारलौकिक दृढबंधनांत आपणांला बांधून घेतलें!

उपसंहार.

सामान्यतः प्रत्येक मनुष्याला स्त्रियांच्या संबंधानें विलक्षण प्रकारचा आवेश, अभिमान किंवा खुनशीपणा इत्यादि प्रबल विकार उत्पन्न होतात; आणि त्या विकारांला वश होऊन मोठमोठीं घोर व अनुचित कृत्यें करण्यास ते प्रवृत्त होतात, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. या भागाच्या कथेचा नायक चंद्रगुप्त यानें वरील दुष्ट विकारांला वश होऊन काय केलें तें पहा! बिचाऱ्या आनंदवर्धनाचा सूड उगविण्याकरितां त्यानें हजारों मनुष्यांचे बळी घेतले? त्याला व शशिप्रभेला एवढ्या मोठ्या संकटांत घातलें व शेवटीं त्यांचा आणि आपलाही नाश करून घेतला! या कृत्याला, त्याच्या दुष्ट वासनेशिवाय दुसरें कांहीं योग्य कारण होतें काय? हर हर!! केवढें घोर कृत्य हें. त्या साध्वी शशिप्रभेची धन्य आहे कीं,

जी तशा संकटांत पडली असतांही तिनें आपल्या पातिव्रत्यांत तिळमात्र चलबिचल होऊं दिली नाहीं!

यासंबंधानें आमचे प्रिय बांधव व प्रिय भगिनी यांनीं निरनिराळ्या रीतीनें दोन प्रकारचीं उदाहरणें ध्यावींत. पुरुषांनीं केवळ आपली दुर्वासना तृप्त होण्याकरितां दुष्ट विचारांला वश होऊन चंद्रगुप्तासारखी राक्षसी कृत्यें करून, आपला हेतु पूर्ण करून घेण्याचा प्रयत्न न करतां स्त्रियांविषयीं उदार व शांत मनोवृत्तीचा अवलंब करावा. स्त्रियांनींही तसा जुलूम करण्यास प्रवृत्त झालेल्या पुरुषांच्या तावडींत न सांपडतां होईल त्या रीतीनें आपलें पातिव्रत्य रक्षण करून इहपर लोक साधण्याविषयीं दृढ निश्चयानें तयार असावें.

समाप्त.